ॐ

॥ नमो श्रीज्ञानेश्वराय ॥

सचित्र

श्रीज्ञानेश्वरबोधामृत.

हें पुस्तक

शंकर आनंद देशमुख

यांनीं

श्रीगावधूत यांच्या साह्यानें

तयार केलें, तें

श्री[illegible] यांनीं

धार्मिकजनहितार्थ

पुणें येथें

महादेव नारायण कवडे यांच्या

"शारदा" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १९०८.

किंमत १२ आणे.

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.
मंगलाचरण...	१
अवताराचें कारण... ...	२
कुलवृत्तांत....	४
विठ्ठलपंतांचा संन्यासदीक्षा घेण्याचा विचार... ...	२३
विठ्ठलपंतांचें श्रीकाशीक्षेत्रीं गमन...	२९
रुक्मिणी बाईची दुःखद स्थिति...	३१
विठ्ठलपंतांचें संन्यसादीक्षा-ग्रहण...	३३
विठ्ठलपंतांस ज्ञानोपदेश...	३७
रुक्मिणीबाईचें अनुष्ठान...	४०
पुन्हां गृहस्थाश्रम... ...	४२
निवृत्तीनाथादिकांचें जन्मवृत्तांत व माता-पित्यांचें पुन्हां काशीक्षेत्रीं गमन ...	५०
निवृत्तिनाथादि भावंडांचा अपरोक्षानुभव... ...	५९
श्रीनिवृत्तिनाथांस गहिनीनाथांचा बोध...	६३
प्रतिष्ठान क्षेत्रीं गमन... ...	७०
रेड्याकडून वेदोच्चारण.....	७२
पैठणस्थ ब्रह्मवृंदास झालेला पश्चात्ताप व बोध...	७५
स्वर्गस्थ पितरांचें आगमन...	८४
भक्तियोग...	८८
ध्यानयोग...	८९
नागरिकजनांस ज्ञानोपदेश.	९१
नेवासें क्षेत्रीं प्रयाण व वेदांतविषयक संभाषण... ...	९३
फकीराचा व श्रीज्ञानेश्वरांचा संवाद...	९६
ग्रामस्थ जनांतील चर्चा...	१०१
मशीदीचें उच्चारण व फकीराचा पश्चात्ताप...	१०३
फकीरास ज्ञानोपदेश... ...	१०६
भाविक पुरुषाची निःसीम भक्ति...	१०८
सच्चिदानंद बावांचा पुनर्जन्म.	११२
सच्चिदानंद बावांस उपदेश.	११९
श्रीज्ञानेश्वरी व अमृतानुभव ग्रंथलेखन...	१२३
चांगदेवदर्शन व अगणित प्रेतांचें पुनरुज्जीवन...	१२४
महिषवराची समाधि... ...	१२८
विसोबा चाट्याची छळणा...	१३०
श्रीज्ञानेश्वरांचे पाठीवर मांडे भाजणें...	१३९
विसोबा चाट्यास पश्चात्ताप.	१४१

विषय.	पृष्ठ.
विसोबा 'खेचरास' ज्ञानोपदेश.	१४४
चांगदेवाचा वृत्तांत... ...	१४९
अध्यात्म विषयक चर्चा ...	१५५
चांगदेवाचें कोरें पत्र... ...	१५७
'चांगदेवपासष्टी'चा तात्पर्यार्थ.	१५९
चांगदेवाचा अनुताप... ...	१६२
श्रीनिवृत्तिनाथादि भावंडांची व चांगदेवाची भेट... ...	१६४
चांगदेवास मुक्ताबाईचा उपदेश...	१७१
श्रीपंढरीक्षेत्रमाहात्म्य... ...	१७७
श्रीज्ञानेश्वरांचें श्रीपंढरीस गमन व नामदेवासह तीर्थाटन.	१८१
नामदेवाची प्रेमभक्ति... ...	१८५
कऱ्हाडचे राजाची द्वेषबुद्धि व त्यास ज्ञानोपदेश...	१८७
गोपुनरुज्जीवन...	२०२

विषय.	पृष्ठ.
श्रीवाराणशी क्षेत्रीं देवजोशीचें गमन...	२०५
यज्ञवृत्तांत...	२०६
पुरोडाशग्रहण...	२०८
भक्तवृंदास ज्ञानोपदेश... ...	२१०
योगसिद्धीची व भक्तिमार्गाची समानता...	२१३
औंढ्यानागनाथ देवळाची पराङ्मुखता...	२१७
नामदेवाला सज्जनांस बोध.	२२१
श्रीपांडुरंगदर्शनाचा सोहळा.	२२२
श्रीपांडुरंगासह सर्व संतमंडळींचें अलंकापुरीस गमन ...	२२५
समाधीचा सोहळा... ...	२२९
अलंकापुरीवर्णन... ...	२३४
ज्ञानोबाची आरती... ...	२३८

॥ ॐ नमो श्रीज्ञानेश्वराय ॥

प्रस्तावना.

सुजनहो ! कोणत्याहि राष्ट्राला उन्नतदशा प्राप्त होण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे स्वार्थत्याग, एकनिष्ठता, शांत-दांत, तत्वज्ञ अशा प्रकारचे श्रेष्ठ पुरुषच अवतीर्ण झाले पाहिजेत ! अशा विभूतींच्या सत्समागमानें व त्यांच्या बोधामृतानें जिज्ञासु व भाविक पुरुष पावन होतील यांत नवल तें काय ! परंतु त्यांच्या केवळ दर्शनमात्रेंकरून साधारण जनांसही नीतितत्व, परोपकारदक्षता व सदाचरण इत्यादि सद्गुणांचा अनायासें लाभ होतो ! !

जगाला चटक लागणारीं जबरदस्त आमिषें जीं कनक व कांता, तसेंच मान—अपमान, सुख—दुःख, किंबहुना आपल्या प्राणाचीदेखील पर्वा न करतां, प्रापंचिक सुखाला व ऐश्वर्याला तिलांजुली देऊन जगाच्या कल्याणासाठीं ज्यांनीं आपला देह झिजविला; आणि श्रोत्रादि इंद्रियांचे गुलाम न बनता स्वतःच्या सिद्धिसामर्थ्यानें व आत्मज्ञानाच्या अनुभविक बळानें जगास चकीत करून सोडले, अशा सत्पुरुषांनीं जर अज्ञजनांचीं मनें वळवून घेतलीं नसतीं, तर विवेक वैराग्यादि सद्गुणांचा निश्चित अभाव झाला असता. म्हणून संतलीला व साधुपुरुषांचीं चारित्रें हीं भाविक

जनांस जणूं सन्मार्गदर्शक कितेच आहेत, हें कोणीही कबूल करील !

अशा प्रकारच्या साधुमालिकेंतील ज्या संतश्रेष्ठांचें चरित्र महिमा व बोधामृत सांप्रत मी या पुस्तकांत सरळ गोष्टीरूपानें वर्णन करणार आहे, ते महात्म्ये **श्रीज्ञानेश्वर** महाराज होत. हे सुमारे ६०० वर्षी पूर्वीं महाराष्ट्रांत होऊन गेले असून त्यानीं घालून दिलेला ठरीव भजन हा कित्ता वित्येक भाविकजन स्वतः गिरवीत आहेत व इष्ट–मित्र यांजकडून गिरववीत आहेत ! आणि तोच क्रम सरित्प्रवाहाप्रमाणें सांप्रत चालू आहे ! ! हें महात्म्ये भक्ति—ज्ञान—वैराग्याचे केवळ पुतळे असून यांच्या बोधामृतानें त्यांचे शिष्यही तसेंच बनले ! !

पूर्वीं जेव्हां यवनी राजाच्या जुलमी कारकिर्दीनें भरतभूप्रदेशीं अनेक दोष घडूं लागले; तेव्हां त्यांच्या निवारणार्थ श्रीशंकर, विष्णु, ब्रह्मा व आदिशक्ति हे अनुक्रमें **श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानेश्वर, श्रीसोपानदेव** व माता **मुक्ताबाई** ह्या नामरूपानें महाराष्ट्र भूप्रदेशीं अवतीर्ण झाले ! ह्या संतश्रेष्ठांनीं अघटितघटनापटीयसी असा अगाध महिमा सहज लीलेनें दाखवून जगास चकीत करून सोडले; आणि त्यायोगें अज्ञ जनांचा अभिमान नष्ट झाला ! नंतर श्रीज्ञानेश्वरांनीं त्यांस बोधामृतप्राशन करवून या भवबंधापासून मुक्त केले ! अशा संतमहंताचा कुलवृत्तांत, त्यांचा अगाध महिमा व त्यानीं अधिकार तारतम्यानुसार शिष्यवर्ग, भाविकजन

इत्यादिकांस केलेला बोध यांचें वर्णन या पुस्तकांत गोष्टीरूपानें केलं आहे; इतकेंच नव्हें, तर श्रीनिवृत्तिनाथादि भावंडांत झालेला अध्यात्मविषयक संवादही जागजागीं दिला आहे! शिवाय श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अवतारापासून समाधिपर्यंत घडलेली साद्यंत हकीकत सप्रेम अंतःकरणानें वर्णिली आहे!! जे श्रद्धावान् पुरुष यांतील विषयांचें श्रवण—मनन करतील, त्यांचें चित्त शुद्ध होऊन त्यांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्याच कृपाप्रसादानें परमपदाप्रत प्राप्त होईल यांत संशय नाहीं!!!

भक्तजनहो! सच्चिदानंद परमेश्वरानें मनुष्याच्या कल्याणासाठीं धर्माधर्मप्रबोधक मोक्षप्राप्तिरूप परमपुरुषार्थ उत्पादक, निर्दोष, स्वतःप्रमाणभूत व सूर्याप्रमाणें स्वयंप्रकाशक असे वेद निर्माण केले. ज्या सूर्यरूप वेदाच्या निर्मल प्रकाशानें भक्ति—ज्ञानरूप विमानावर आरूढ होऊन नारदप्रभृति सहज परमपदाप्रत प्राप्त झाले! अशा पदप्राप्तीची इच्छा इंद्रादि देव देखील करतात! तसाच प्राचीन व अर्वाचीन ऋषि—मुनींनीं व साधु—संतांनीं या वेदमार्गाचें श्रेष्ठत्व जाणून त्याचा अंगिकार केला; ह्मणून ते परमपदाप्रत प्राप्त झाले! अशा वेदमार्गाचें ज्ञान संस्कृत अनभिज्ञ सर्व साधारण जनास अवगत व्हावें, म्हणून यांत गहन असें वेदांतविषयात्मक श्रीज्ञानेश्वरमहाराजाचें बोधामृत सरळ व सोप्या भाषेंत निरूपण केलें आहे; व अभिमान निरसनार्थ त्यांचा अगाध महि-

माही वर्णिला आहे; इतकेंच नव्हे तर, श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या अगाध लीलेचा सहज बोध व्हावा, ह्मणून त्या त्या प्रसंगास अनुसरून योग्य स्थळीं सुंदर चित्रेंही दिलेलीं आहेत! जे पुरुष यांतील विषयांचें श्रवणमनन, करून अनन्य भावानें सद्गुरूस शरण जातील ते खरोखर हा भवसागर सहज तरून जातील!! यास्तव प्रापंचिकांनीं यांतील धर्मतत्वें आपल्या मुलाबाळांस अवगत करून देऊन त्यांचीं मनें सुसंस्कृत करणें यामध्येंच त्यांच्या जीविताचें खरें साधन आहे.

भक्तजनहो! भीमावधूत यांनीं अल्पवयस्क अशा योगसाधकांस अन्नोदक देऊन योगाभ्यास शिकविण्याच्या कामीं अत्यंत परिश्रम करून बरींच पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत! अशा पुण्यपुरुषांच्या साहायानें मी हें श्रीज्ञानेश्वरबोधामृत नामक पुस्तक तयार केलें आहे; पण मी अल्पवयस्क, अल्पज्ञ व भाषा अनभिज्ञ असा असल्यामुळें यांत बरेच दोष राहिले असतील, तरी सुज्ञांनीं "हंसोयथा-क्षीरमिवांबुमिश्रं" ह्या वचनाप्रमाणें यांतील सारभूत अर्थ ग्रहण करून सदय अंतःकरणानें त्याची क्षमा करावी, अशी सर्व सुज्ञाप्रत या बालकाची सविनय प्रार्थना आहे. इति।

कीलकनामसंवत्सरे
शके १८३०.

साधु–संतांच्या चरणीं विनम्र झालेला.
शंकर आनंद देशमुख.

॥ ॐ नमो नागार्याय ॥

श्री ज्ञानेश्वरबोधामृत.

मंगलाचरण.

ज्ञानेशा भगवंता भगवज्जन वल्लभा महासदया ॥
कलियुगवर्ती जन जो देशी स्मरणेंचि मुक्तिचे पदया ॥ १ ॥

—मोरोपंत.

नमो ज्ञानराजा तुझी संतकीर्ति ॥
जगीं गाति प्रेमें वदूं मी किती ती ॥
परी अंतरीं प्रेरणा मन्मतीला ॥
जसी होय तैशी वदे थोर लीला ॥ १ ॥

सुजनहो ! श्रीकृष्ण परमात्म्यानें "धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे

युगे" असें श्रीमद्भगवद्गीतेंत ह्मटल्याप्रमाणें ज्या ज्या वेळीं धर्माचा ऱ्हास होतो, त्या त्या वेळीं दुष्टांचा संहार व सुष्टांचें पालन करण्याकरितां परमेश्वर अनेक रूपानें जगांत प्रकट होतो. कलियुगांत श्री वेदव्यासानीं भगवंताच्या आज्ञेनुसार स्वामी जयदेवाचा[1] आवतार घेतल्यावर आणखीहि कित्येक संतमूर्ति या भूलोकीं अवतीर्ण झाल्या.

अवताराचे कारण.

ज्यावेळीं ' यवनीं राजे भ्रष्ट केले । ठायीं ठायीं दोष घडले ' अशा प्रकारची आर्यावर्तात स्थिति होती, तेव्हां भूपतीच्या जुलमानें प्रजाजन अत्यंत पीडित होतसाते परमेश्वराचें रात्रंदिवस स्तवन करून त्याची करुणा भाकूं लागले. अधर्माचरणाचा प्रभाव वाढत चालला, ह्मणून परमेश्वरानें श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानदेव, श्रीसोपानदेव व आदिशक्ति मुक्ताबाई या रूपानें "हे आवतार घेतले । कलिदोष हरावया"[2] अशा परमेश्वररूप आवतारी पुरुषांस अनन्य भावानें शरण जाऊन त्यांच्याच प्रेरणेनुसार हा त्यांचा अगाध बोधामृत ग्रंथ वर्णन करीत आहे.

कोणें एके समयीं वैकुंठलोकीं भगवान् श्रीविष्णु आनंदांत बसले असतां सत्यलोकाहून ब्रह्मदेव व कैलासहून श्रीशंकर असें उभयतां

---

१. हा कलियुगांतील प्रथमावतार आहे.

२. सदाशिवाचा आवतार । स्वामी निवृत्ति दातार ॥ १ ॥
महाविष्णुचा आवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ २ ॥
ब्रह्मा सोपान तो झाला । भक्ता आनंद वर्तला ॥ ३ ॥
आदि शक्ति मुक्ताबाई । दासि जनी वंदी पायीं ॥ ४ ॥

भगवंताच्या दर्शनार्थ आले. त्यांचा वंदनादि शिष्टाचार झाल्यावर परमात्म्यानें त्या उभयतांचा सन्मान करून त्यांस अत्यंत प्रेमानें आपल्या जवळ बसवून घेतलें. बराच वेळ जीवकोटीच्या संरक्षणसंबंधीं वगैरे संभाषणें झाल्यावर भगवान् श्रीविष्णु त्या उभयतांस ह्मणतात:— भूलोकीं अधर्माची विशेष प्रवृत्ती होऊन सज्जनांस अत्यंत पीडा होऊं लागली आहे. यास्तव आदिमायेसह आपण निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई या नांवानें बहिण भांवडें होऊन मृत्युलोकीं अवतीर्ण होऊ; आणि जगास अनेक प्रकारची लीला दाखवून लोकांना सन्मार्गास लावूं. अधर्माचा ऱ्हास झाल्यानें अनायासेंच सज्जनांचें पालन होईल; इतकेंच नव्हें, तर त्या योगें ते हा भवसागरही तरून जातील. श्रीभगवान् विष्णुच्या या मधुर वाणीस श्रीशंकर व ब्रह्मदेव यानीं मान्यता देऊन पुन्हां वंदनादि शिष्टाचार झाल्यावर ब्रह्मदेव व श्री शंकर आपआपल्या स्थानाप्रत प्रयाण करते झाले.

ज्या ज्या कुळीं जगच्चालक प्रभु अवतार धारण करतो, तीं तीं कुळें उत्तम सदाचारी, भगवद्भक्त व दयामान् अशींच असतात. ज्या

१. आतां ऐका देऊनी चित्त । विरंची आणि कैलासनाथ ॥
क्षीरसागरां अकस्मात । दर्शना येत हरीच्या ॥ १ ॥
तयासि ह्मणे क्षीराब्धीजावर । मृत्यु लोकीं घेऊनी अवतार ॥
निवृत्ति सोपान ज्ञानेश्वर । लीला साचार दाखवावी ॥ २ ॥
त्रिवर्ग बंधु एके ठायीं । जन्म घेउनी लवलाहीं ॥
आदिमाया मुक्ताबाई । भगिनी होईल आपणासी ॥ ३ ॥

भक्तिविजय

कुलांत श्रीनिवृत्तिनाथादि चतुवर्गांचें अवतार झालें, तें कुल उत्तमोत्तम होतें, हें निराळें सांगावयास नकोच! अशा पुण्यपुरुषांचा कुलवृत्तांत प्रथम दिल्यानें त्यांची कुलपरंपरा व गुरुपरंपरा ही सहजच अवगत होऊन त्यांचें नामसंकीर्तन होईल; व त्यांचा बोधामृतही प्राशन करण्यास मिळेल, असें जाणून श्री निवृत्तिनाथादि चतुर्वर्गाच्या कुलवृत्तांतापासून कथानकास प्रारंभ करतो.

कुलवृत्तांत

गोदावरी नदीच्या तीरीं ' आपेगांव ' या नांवाचें एक लहानसें खेडें आहे. त्या गांवीं '**गोविंदपंत**' या नांवाचा यजुर्वेदी शाखेचा एक सदाचारी गृहस्थ राहत असे. तो कर्मनिष्ठ व महान् भगवद्भक्त असून त्यांची प्रियपत्नी **निराबाई** ही मोठी भक्तिमान् अशी महासाध्वी होती. आपेगांवची जोशी–कुळकर्ण्याची वृत्ति त्यांजकडे असल्यामुळें त्यावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असे. आतां जोशी–कुळकर्ण्याचें उत्पन्न तें कितीं असणार; परंतु तेवढ्यावरच ते दांपत्य अतिथि अभ्यागतांचे परामर्ष घेत आनंदानें कालक्रमणा करीत असत. गोविंदपंतांच्या पोटीं पुत्र संतान नसल्यामुळें मात्र त्यांची थोडिसी उदास वृत्ति असे. त्या उभयतांचा वृद्धापकाळ झाल्यामुळें अर्थातच त्यांची पुत्रप्राप्तीची अशा बहुतेक नष्ट झाल्यासारखीच होती. सर्वतोपरी ईश्वरावर भार टाकून ते नेहमीं भगवद्भजनांत निमग्न असत. एकें दिवशीं कर्मधर्मसंयोगानें नाथपंतांतील

'**गैनीनाथ**' या नांवाचें एक सत्पुरुष—महायोगी—यांची स्वारी संचार करीत करीत आपेगांवी येऊन त्यानीं तेथील एका देवालयांत बरेंच दिवस वास्तव्य केलें. नित्य या महात्म्यांच्या दर्शनाकरितां सुष्ट—दुष्ट—आस्तिक—नास्तिक वगैरे सर्व स्त्री पुरुषांची गर्दी लोटत असे. त्यांचीं सदोदीत असलेली आनंदीत वृत्ति पाहून भाविक जनांस तर आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या होत्या. कित्येक लोक त्या सत्पुरुषांच्या दर्शनास नेमानें जात असून त्यांच्या बोधामृताचा रसास्वाद घेत व दुसऱ्यासही आग्रह करून नेत असत. सारांश—गैनीनाथ त्या आपेगांवीं आल्यावर तेथील भाविक जनांस त्यांच्या स्तुतीशिवाय बोलण्याला दुसरा विषयच नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल. ते महान् योगी होते. त्यांची मुद्रा गंभीर, तेजस्वी, मस्तकावर भव्य जटाभार, विभूति चर्चित काया, आणि शांतवृत्ति पाहून भाविकांस तर 'कैलासनाथ श्रीशंकरच आह्मां पातकी जनांचा उद्धार करण्याकरितां अवतीर्ण झाले आहेत कीं काय" असें वाटत असें.

याप्रमाणें आपेगांवांत प्रसृत झालेलीं गैनीनाथांची सत्कीर्ति एके दिवशीं सहज गोविंदपतांच्या कानावर गेली. त्यावरून गोविंदपंत व त्यांची पत्नि साध्वी निराबाई या उभयतांस त्या सत्पुरुषांच्या दर्शनाची उत्कटेच्छा झाली. मग ते दुसरे दिवशीं प्रातःकाळींच संध्यावंदनादि नित्यकर्म सारून गोविंदपंत हे कुटुंबासह त्या महात्म्यांच्या दर्शनास निघाले. जातांना मार्गांत त्यांना

उत्तम शुभशकुन झाले. त्यामुळें तेव्हांच त्यांनीं आपल्या मनांत जाणलें कीं, ह्या सत्पुरुषांच्या कृपाप्रसादानें आपला हेतु खास सफळ होणार ! त्या योगेश्वरांच्या दर्शनार्थ निघालेलें हें दांपत्य त्यांच्या वास्तव्यस्थळीं गेल्यावर प्रथम त्यांचें दर्शन घेऊन नंतर षोडशोपचारें त्यांनीं त्यांची पादपूजा केली. नंतर इतर स्त्रीपुरुष-समाज बसला होता, त्या ठिकाणीं हेही उभयतां जाऊन बसले.

योगेश्वर गैनीनाथ हे कोणाकडून कांहीं प्राप्त व्हावें, याची किंचि-तही आपल्या मनांत अपेक्षा न बाळगतां, केवळ निरपेक्ष बुद्धीनें आलेल्या भाविक जनांस ऐहिक व पारलोकिक सौख्याचा लाभ घडावा, या सदिच्छेनें परम प्रेमपूर्वक नीतिपर व वेदांतपर उपदेश करीत असत. त्याप्रमाणें त्या दिवशींही त्यांचा चाललेला पारमार्थिक बोध गोविंदपंत व त्यांची पत्नि निराबाई या उभयतांनीं श्रवण करून त्यांच्या मनास अत्यंत समाधान झालें. श्रोतेमंडळीं सर्व निघून गेल्या-वर हे उभयतां तसेंच बसले आहेत असें त्या सत्पुरुषांनीं पाहून त्या उभयतांस प्रेमपूर्वक आपल्या जवळ बोलाविलें, आणि विचारिलें कीं, “ तुम्ही कोण, कोठचे व येथें कोणत्या हेतूनें बसला अहां, हें साविस्तर मला सांगा!” हें त्या महात्म्यांचें मोठ्या कळकळीचें भाषण ऐकून गोविंदपंतानीं आपल्या मनांत यत्किंचित् सुद्धां किंतु न बाळगतां आपले सर्व वृत्तत्या साधुवृंदांच्या चरणीं निवेदन करून विनयपूर्वक प्रार्थना केली कीं, “ महाराज! आमच्या हातून कांहीं

दिवस आपली सेवा घडावी, एतदर्थ आपल्या जवळ राहण्याची आम्हांस अनुज्ञा असावी." गैनीनाथानीं गोविंदपंतांच्या मनांतील भाव ओळखून "तुमची इच्छा असल्यास सुखानें रहावें," असें त्यांस सांगितलें. तें ऐकून त्या उभयतांस फार आनंद झाला ! व ते त्यांच्या जवळ राहिले. त्या उभयतांनीं बरेंच दिवस एकनिष्टपणें सेवा केलेली गैनीनाथानीं पाहून त्यांच्यावर संतुष्ट होत्सातें त्यांनीं त्यांस मंगलकारक आशीर्वाद देऊन ह्मणाले;—" अहो गोविंदपंत! तुह्माला सदाचारी–सुशील व ईश्वरभक्तिपरायण असा एक पुत्र होईल; व पुढें त्याच्या उदरीं असा एक ज्ञानवान् हिरा जन्मास येईस कीं, तो आपल्या प्रकाशकिरणानें सर्व भूमंडळ दिपवून टाकील." ही त्या सत्पुरुषांच्या मुखांतून निघालेली ईप्सित फलदायक मधुरोक्ति त्या दंपत्यांनीं ऐकून त्यांस इतका आनंद झाला कीं, त्या मोदभरांत सहज निघालेल्या प्रेमाश्रूनें त्यांनीं त्या साधुवृंदांच्या चरणास स्नान घातलें; आणि भक्तिपुरस्सर त्यांस वंदन करून त्यांच्या आज्ञेनें ते स्वगृहीं येते झाले. सत्पुरुष गैनीनाथानीं पुढें कांहीं दिवस त्या स्थलीं वास करून एके दिवशीं ते एकदम अदृश झाले.

कांहीं काल लोटल्यावर सद्गुरु गैनीनाथांच्या कृपाप्रसादानें साध्वी निराबाई गर्भवती होऊन नवमासांतीं सुमुहुर्तावर सुलक्षणी असें पुत्ररत्न प्रसवली ! त्यावेळीं त्या उभय दांपत्याच्या आनंदास पारावार नाहींसा झाला, ज्या सत्पुरुषांच्या पूर्णाशीर्वादानें वृद्धापकालच्या

दशेंत पुत्रसुखाचे सोहळे पाहावयास सांपडले, त्या सद्गुरु गैनीनाथांचें त्यांनीं मनापासून अत्यंत आभार मानलें. हा मुलगा प्रासादिक जाणून गोविंदपंतांनीं श्रीपांडुरंगाच्या भक्त्यातिशयानें त्याचें नांव 'विठ्ठल' असें ठेविलें. शुक्लेंदुवत् तो सकुमार बालक जसजसा मोठा होत चालला, तसतसी त्याची ती मनाला रममाण करणारी बाललीला पाहून त्यांना वरचेवर आनंदाचें भरतें येई. विठ्ठल सात वर्षांचा होतांच गोविंदपंतानीं त्याचा व्रतबंध करून विद्याभ्यासाकरितां त्यास गुरुगृहीं ठेवलें. विठ्ठलाची बुद्धि अतीशय तीव्र असल्यामुळें तो वेद विद्येंत व संस्कृत भाषेंत लौकरच निष्णात झाला. वेदाध्ययन संपूर्ण झाल्यानंतर त्यानें आपल्या घरीं येऊन वडील व मातोश्रीस प्रेमानें वंदन केलें. अल्पवयांत विद्याविभूषित झालेली आपल्या पुत्राची कोमल तनु पाहून त्या उभयतां मातापित्यांस गगनांत मावेना इतका मोठा आनंद झाला. मुलाचें वेदाध्ययन संपल्यानंतर तीर्थयात्रा करून येऊन मग त्यानें गृहस्थाश्रम स्वीकारावा, असा शास्त्रनिर्बंध असल्यामुळें विठ्ठलपंतानीं कांहीं दिवस आपल्या घरीं राहून मग एके दिवशीं त्यानें माता–पिता जवळ तीर्थाटणाला जाण्याची अनुज्ञा मागितली.

प्राचीनकालचा शिक्षणक्रम आणि हल्लींचा शिक्षणक्रम यांत किती महदंतर आहे हें पहा—प्राचीनकाळीं विद्याव्यासंग संपल्यानंतर मुलांनीं केवळ पुस्तकीज्ञानावरच अवलंबून न राहतां तीर्थाटनाच्या मिषानें भरतखंडांतील प्रसिद्ध स्थळें, परदेशांतील लोकांच्या

रीतिभाति पाहून आणि नानाप्रकारच्या चमत्कारिक आख्यायिका श्रवण करून अनुभविक ज्ञान संपादन करावें अशी चाल होती. त्यामुळें युक्तिप्रयुक्ति व चमत्कृतिकारक शोधनशक्ति अंगीं उद्भवून बहुश्रुतपणानेंही व्यवहारास लागणाऱ्या ज्ञानाची साहजिक वृद्धि होई. असो. विठ्ठलपंतानीं तीर्थाटणास जाण्याची केलेली विनंती ऐकून साध्वी निराबाईस फार खेद झाला. याच्या इतक्या अल्पवयांत हा प्रवासांतील दुःखाचा भार कसा सहन करील! मार्गांत याच्या खाण्यापिण्याचा परामर्ष कोण घेईल! साधूच्या कृपाप्रसादानें वृद्धापकालीं हें अपत्य, त्यांतून एकुलता एकच असून तीर्थाटनमिषानें मला अंतरणार ना! मग मी कोणाच्या मुखाकडे पाहून काळ घालवावा बरें!! अशा विचाराच्या उकळ्या त्या निराबाई मातेच्या सदय अंतःकरणांत फुटून तिचा कंठ दाटून आला, नेत्र आश्रुनें भरले, अंतःकरण सद्गदित झालें, या योगानें त्या बिचारीला एकाएकीं मूर्छना आली! तेव्हां वरदपुत्र विठ्ठलपंतानीं आपल्या मातोश्रीची अशी झालेली विपन्नावस्था पाहून त्यांस फार वाईट वाटलें. त्यानीं लागलीच घरांतून पाणी आणून मातोश्रीच्या डोळ्यांस लावलें, व वारा घालीत तिच्या जवळच बसून राहिले. पुत्र विरहानें आपल्या प्रियपत्नीची झालेली ती दीन अवस्था पाहून गोविंदपंतांसही मोहाचा उमाळा आला; परंतु त्यानीं विवेकेकरून आपलें मन घट्ट आवरून धरलें. इतक्यांत ती माउली सावध झाली. तेव्हां शास्त्र नियमा

कोणासही उल्लंघन करतां येत नाहीं, वगैरे तिला बोधपर वचनें सांगून गोविंदपंतानीं तिचें शांतवन केलें. तें ऐकून त्या माऊलीनीं मोठ्या कष्टानें विठ्ठलपंतांस तीर्थाटणास जाण्याची आज्ञा दिली. मातोश्रीची अनुज्ञा मिळतांच विठ्ठलपंतानीं उभयतां मातापित्यांच्या चरणांवर आपलें मस्तक ठेवून दंडवत प्रणाम केला. मग ते तेथून निघाले. त्यावेळीं तीं उभयतां त्यांस बोळविण्यासाठीं बरींच लांबवर गेलीं होतीं. परत फिरण्यापूर्वींच त्या सदय अंतःकरणाच्या माऊलीनें पुत्राचें मुख कुरवाळून गद्गदस्वरानें ती त्यास ह्मणाली:—"बाळा! पिकलेल्या पानाप्रमाणें आम्हीं केव्हां गळून पडूं याचा नेम नाहीं; त्याअर्थीं आह्मां वृद्धांवर लक्ष ठेवून परत घरीं लौकर ये बरं. मार्गांत आपल्या प्रकृतीला जपत जा. अनेक प्रकारचे जन तुला भेटतील, त्या सर्वांशीं नम्रपणानें नेहमीं वाग. आपल्या मनांत सत्संगतीची आवड ठेव, व दुर्जनांपासून दूर रहा. बाळा! तूं परत येईपर्यंत आमचे लक्ष तुझ्याकडेच अगदीं लागून राहील. यास्तव आह्मां अनाथ दीन वृद्धांची आठवण ठेवून लौकर परत ये." असा त्या माऊलीनीं आपल्या प्रियपुत्रास मोठ्या कळकळीचा बोध केला. तेव्हां विठ्ठलपंत त्या उभयतांस वंदन करून श्रीहरीचें भजन करीत होत्साते मार्गस्थ झाले; आणि गोविंदपंत व निराबाई ते दृष्टीस पडेपर्यंत सप्रेम अंतःकरणानें त्याकडे पाहत राहून ते दिसेनासे झाल्यावर ती बिचारी मोठ्या कष्टानें परत फिरली; आणि उभयतां आपल्या गृहाप्रत चालते झाले.

ज्याची बुद्धि परिपक्व झाली नाहीं, ज्याला सद्गुरुप्राप्तीची लालसा आहे, त्यानें तीर्थाटणमिषानें महात्म्यांच्या दर्शनलाभाकरितां इच्छा करणें योग्य असून सांप्रतच्या चालीरीतीचें धोरण लक्षांत आणलें ह्मणजे अल्पवयांत आपल्या मुलांस त्याच्या बरोबर ममतेचें कोणी मनुष्य नसतां रानावनांत एकटेच त्याला भडकूं देणें जरा धाडसाचें कृत्य होईल; पण स्वावलंबनास हें प्रत्यवाय होणार नाहीं. असो. त्या दांपत्यास असें वाटत होतें कीं, ज्या प्रमाणें कान मोठे असून बहिरा आहे, किंवा नाशिकाशिवाय सर्वांग सुंदर आहे, ह्मणजे तें असून नसल्यासारखें आहे; त्या प्रमाणें पुष्कळ शास्त्राभ्यास केला, वेदविद्या करतलमलवत् झाली, अनेक कलाही अवगत झाल्या, तरी अंतःकरणांत विरक्तता उत्पन्न होऊन ईश्वर भक्तीचा ठसा उमटला नाहीं; तर त्या विद्येचा, शास्त्राचा, किंवा ज्ञानाचा कांहींच उपयोग नाहीं. आपला विठ्ठलपंत तशा प्रकारचा नव्हता. त्याला अल्प वयांतच शास्त्र, वेदविद्या, व अध्यात्मज्ञान यथोचित प्राप्त झालें असून भक्ति—ज्ञान—वैराग्य यांचा तो पुतळाच बनला होता! त्याला अरण्यांत राहिलें काय, किंवा घरीं राहिलें काय, सारखेंच वाटत असें! कारण, विरक्त पुरुषाची चित्तवृत्ति सदोदीत समान असते. त्याला सुख-दुःखाची पर्वा वाटत नाहीं. अशाच प्रकारचा आपला विठ्ठलपंत असल्यामुळें मोठ्या मनोत्साहानें तो तीर्थाटणास निघाला. विठ्ठलपंत

यानीं आपेगांवाहून निघून प्रथम थेट उत्तरेकडे गमन केलें. तिकडील तीर्थें करीत करीत स्वारी 'द्वारावतीस' आली. तेथें कांहीं दिवस वास करून 'गोमतीचें' स्नान, श्रीकृष्णमूर्तीचें दर्शन, सतत हरी भजन करीत कालक्रमणा करून नंतर ते 'सुदामपुरी,' 'मूळमाधव,' 'भालुकातीर्थ,'[1] पाहून 'प्रभासपट्टणास' आले. तेथेंही किंचितकाल वास्तव्य करून पुढें 'सोरटीसोमनाथ,' 'मुचकुंदाची गुहा' इत्यादि यात्रा संपूर्ण करून 'सप्तशृंगास' आल्यावर जगन्मातेचें दर्शन घेऊन तेथेंही त्यांनीं कांहीं दिवस वास केला. तीर्थाटण प्रसंगी मार्गांत लागणाऱ्या निरनिराळ्या ठिकाणाची वनशोभा, ऋषींचे पवित्र आश्रम, सरितांचे सुंदर प्रवाह, पर्वतांचे प्रचंड देखावे, योगीजनांच्या गुहा वगैरे रमणीय स्थलें अवलोकन करण्याची अनायासें प्राप्त झालेली संधी विठ्ठलपंतांनीं मुळींच वांया जाऊं दिली नाहीं. याप्रमाणें पहात पहात 'ब्रह्मगिरी,' 'कपालेश्वर,' 'त्रिंबक,' 'कुशावर्त' व 'भीमाशंकर' इत्यादि तीर्थाटन केल्यावर ते परत 'आलंकापुरी' उर्फ 'आळंदी' येथें येऊन दाखल झाले.

विठ्ठलपंत आळंदीस आल्यावर चक्रतीर्थाचें स्नान करून संध्यावंदनादिक कर्में अटोपल्यावर चित्तैकाग्रतेनें ध्यानस्थ बसले होते. इतक्यांत त्या गांवचे कुळकर्णी '**सिधोपंत**' नांवाचे सद्गृहस्थ स्नानाकरितां अकस्मात् त्या स्थलीं प्राप्त झाले. त्या कालीं विठ्ठलपंतांची

१. या स्थलीं श्रीकृष्णावताराची समाप्ति झाली.

ध्यानस्थ झालेली बालमूर्ति पाहून त्यांस त्यांची कींव आली; आणि ते त्या बालब्रह्मचारी विठ्ठलपंतांस साष्टांग प्रणिपात करून क्षणएक तेथेंच स्थित झाले; मग विठ्ठलपंतांचें ध्यान विसर्जन झाल्यावर त्यानीं त्यांस विनयपूर्वक प्रार्थना केली कीं, " आपण कोठचे राहणारे? आपलें नांव काय? इकडे कोणिकडे आलात? वगैरे सर्व हकीकत मला कृपा करून सांगावी. " तेव्हां विठ्ठलपंतानीं त्यांस आपला सर्व वृतांत यथार्थ सांगून सांप्रत मी तीर्थयात्रेकरितां बाहेर पडलों आहे. उत्तरेकडील तीर्थे करून आज तुमच्या या पुण्यक्षेत्रांत येऊन दाखल झालों असें ह्मटले. विठ्ठलपंत मूळचेंच शांत स्वभावाचे असून गंभीर मनाचे होते. तशांत गोविंदपंतांसारख्या कर्मनिष्ठ व पापभीरु पुरुषांच्या शिक्षेंत त्यांची जोपासना झाली असल्यामुळें वडिलांचे बाळबोध वळण त्यांस साहजिकच लागून त्यांचें शुद्धाचरण, सदोदित आनंदी वृत्ति असे. त्यांना बाळपणापासून अध्यात्म विषयाची गोडी असल्यामुळें त्याबद्दल सदासर्वकाळ ते आत्मविचारांत निमग्न असत. अशा ब्रह्मनिष्ठ कोमल मूर्तीची व पापभीरु अशा सिधोपंतांची अकस्मात् भेट झाल्यामुळें सिधोपंतांस परम संतोष वाटला; आणि ते त्यांस ह्मणाले:—" माझें पूर्व सुकृत उदयास आल्यामुळें आज मला आपल्या दर्शनाचा अलभ्यलाभ घडला. आतां आपण माझ्या पर्णकुटीप्रत येऊन माझा आश्रम पवित्र करावा. " अशी त्यानीं विनयपूर्वक प्रार्थना केली. ती त्यांची सविनय प्रार्थना विठ्ठलपंतांच्यानें

अमान्य करवेना; ह्मणून ते तत्काळ सिधोपंतांच्या बरोबर त्यांच्या घरीं गेले. नंतर सिधोपंतानीं विठ्ठलपंतांस आदरपूर्वक षड्रस पक्वान्नांचें भोजन देऊन इतर प्रकारानेंही त्यांचा चांगला परामर्ष केला.

सिधोपंत हे आळंदीचे कुळकर्णी असून मोठे धनवान् व गुणवान् होते. त्यांचेकडे आळंदी गांवचें कुलकरणाचें काम असून शिवाय ' चऱ्होली ' व त्याच्या आसपासचें बेचाळीस गांवाचीं कामें त्यांच्याकडेसच चालत असत. हे गृहस्थ फार सुशील असून स्वभावानें अत्यंत शांत होते. आळंदीक्षेत्रांत कोणी अतीत अभ्यागत आल्यास ते आदरपूर्वक त्यांचा परामर्ष घेत असत. सिधोपंतांस पुत्रसंतान नव्हते, तरी पण **रुक्मिणीबाई** नांवाची लावण्यवती व सद्गुणी अशी एक कन्या मात्र होती. त्यामुळें तिच्यावर त्यांचें पंचप्राण असत. त्या कालीं ती उपवर झाली असल्यामुळें त्यांस तिच्या विवाहाची मोठी काळजी लागून राहिली होती. विठ्ठलपंत सिधोपंतांच्या घरीं आल्यावर त्यांची शांतवृत्ति, वेदविद्येची निपुणता व सरळ स्वभाव इत्यादि सद्गुण कांहीं कालच्या सहवासानें त्यांच्या लक्षांत येत गेल्यानमुळें उत्तरोत्तर विठ्ठलपंतावर त्यांची दृढभक्ति बसत चालली; आणि असा सद्गुणी वर जर आपल्या कन्येस लाभेल, तर खरोखर आपण कृतकृत्य होऊं, असें नेहमीं त्यांच्या मनांत घोळत असे. या विषयीं विठ्ठलपंतांस एकदां तरी प्रश्न करावा, असें कित्येकवेळां त्यांस वाटे; परंतु सांप्रत ते ब्रह्मचारी दशेंत असल्यामुळें त्यांस विचारण्याचा सिधोपंतांस धीर

होईना. विठ्ठलपंतानीं कांहीं काळ त्यांच्या घरीं राहून तीर्थाटणाच्या श्रमाचा परिहार झाल्यासारखा त्यांस वाटल्यावरून एके दिवशी ते सिधोपंतांस ह्मणाले कीं, " उदयीक आम्हीं दक्षिणेकडील यात्रेकरितां प्रयाण करणार आहोंत; त्यास आपली अनुज्ञा असावी " हें विठ्ठलपंतांचें भाषण श्रवण करून " आपला हेतू परिपूर्ण होत नाहीं असें सिधोपंतांच्या मनाला वाटून त्या दिवशीं ते विशेषसें चिंताग्रस्त झाले. ईश्वरलीला अगाध आहे! त्याचा महिमा कोणाला कळणार!! त्याच्या अगम्य लीलेनें ब्रह्मादि देवांना सुद्धां भुलवून सोडले; मग मानवाची कथा ती किती!!! आपला प्रियभक्त विशेष चिंताग्रस्त झाला आहे, असें जाणूनच कीं काय, परमेश्वर त्या दिवशीं रात्रौ सिधोपंतांच्या स्वप्नांत येऊन त्यांस साक्षात् पांडुरंग मूर्तीचें दर्शन दिलें! व ह्मणालें कीं, " अरे सिधोपंत, तूं इतका काळजींत कां पडला आहेस! तूं आपली सद्गुणी मुलगी तुझ्या घरीं आलेल्या पाहुण्यास ह्मणजे बालब्रह्मचारी यांस सालंकृत कन्यादान करून दे. " असें स्वप्न पाहून सिधोपंत जागृत झाल्यावर त्यांना अत्यंत हर्ष झाला. ते त्या आनंद भरांत एकदम उठून आसनावर बसले; आणि ते आनंदाच्या भरांत ह्मणतात:—"परमेश्वर माझा हेतु सिद्धीप्रत खास नेणार! आतां याला विठ्ठलपंतांचें मात्र अनुमोदन पाहिजे. " या विचारांत त्यांची उत्तररात्र गेली; मग ते प्रभातसमयीं उठून सुस्नात झाल्यावर संध्यावंदनादीक ब्रह्मकर्म आटोपून त्यांनीं ईश्वराचें स्मरण केलें. नंतर

त्यानीं परम प्रेमपूर्वक त्या रात्रीचें स्वप्न विठ्ठलपंतांस सांगितलें. तेव्हां "तुह्माला जसें स्वप्न पडून परमेश्वराची आज्ञा झाली, तशी मला झाल्यावांचून मी तुमचें बोलणें मान्य करणार नाहीं; शिवाय सांप्रत मी तीर्थयात्रेस निघालों असल्यामुळें वडिलांची आज्ञा घेतल्याखेरीज विवाहासारख्या महत् कार्याचे कामीं अनुमोदन देणें हें मला उचित नव्हे" असें विठ्ठलपंत बोलून स्तब्ध राहिले. हें त्यांचें भाषण श्रवण करून शिधोपंतानीं विनयानें त्यांस ह्मटलें कीं, "आजचा प्रयाण रहित करावा, ह्मणजे मजप्रमाणेंच त्या दयाळु जगदीशाचा आपल्यास दृष्टांत होईल. ही माझी विनंति आपण कृपा करून मान्य करावी. कारण, ईश्वराच्या मनांतून माझ्या कन्येसी आपला विवाहसंबंध जुळवून आणण्याचें असल्यास तो दयाघन प्रभु तुह्मांसही दृष्टांत कां देणार नाहीं!" ही सिधोपंतांची विनययुक्त वाणी ऐकून विठ्ठलपंतानीं त्या दिवशीं राहण्याचा निश्चय केला; व तसेंच सिधोपंतांस सांगितलें. रात्रौ भोजनोत्तर विठ्ठलपंतानीं शुचिर्भूत होऊन तुळसीवृंदावनाजवळ ईश्वर स्मरणपूर्वक शयन केलें. निद्रा लागल्यावर अरुणोदयाच्या समयास ज्यानें आपल्या करकमलाचे ठायीं शंख—चक्र—गदा—पद्म हीं आयुधें धारण केलीं असून पीतवसन परिधान केलें आहे, ज्याच्या मस्तकावर देदिप्यमान असा दिव्य मुकुट आहे, अशी श्री विष्णुमूर्ति पुढें उभि राहिली; आणि तिनें हास्यवदन करून ह्मटलें—"विठ्ठला! तुझ्यापासून सिधोपं-

तांच्या कन्येच्या उदरीं ईश्वरांश असे महान् थोर पुरुष अवतीर्ण होणार आहेत. असा पूर्वींचाच संकेत असल्यामुळें तूं सिधोपंताच्या कन्येशी विवाह करून नंतर दक्षिण यात्रेस जा." इतकें सांगून ती मूर्ति अंतर्धान पावली. इतक्यांत विठ्ठलपंतही जागृत झाले! हें स्वप्न पाहून विठ्ठलपंतांस असें वाटलें कीं, ईश्वराच्याच मनांतून हें कर्तव्य करावयाचें आहे. तेव्हां मी नाहीं ह्मणून तरी काय उपयोग! दुसरे दिवशीं प्रातःकाळीं मुखमार्जन झाल्यावर सिधोपंतानीं रात्रौ कांहीं दृष्टांत झाला असल्यास मला सांगण्याची कृपा करावीं. असें ह्मटल्यावर " तुमच्याप्रमाणेंच या विवाहासंबंधानें मलाही त्या जगन्नियंत्या परमेश्वराची आज्ञा झाली आहे. यास्तव मी तुमच्या ह्मणण्यास रुकार देतों;" याप्रमाणें विठ्ठलपंतानीं सिधोपंतांस सांगितल्यावर " माझ्या हेतूस परमेश्वरानें पाठबळ दिलें" याबद्दल सिधोपंतानीं परमेश्वराचे आभार मानले; व हर्षभरित होत्साते त्यानीं ही हकीकत आपल्या प्रिय पत्नीस कळविली. नंतर सिधोपंत मोठ्या आनंदानें विवाहाच्या तयारीस लागले; व त्यांनीं आपली कन्या रुक्मिणीबाई इची पत्रिका विठ्ठलपंतांच्या टिपणाशीं (त्यांना जन्माची माहिती विचारून) जुळते कीं नाहीं हें लौकिकरीत्या पाहण्याकरितां तत्काळ ग्रामजोशास बोलावून आणलें; आणि पाहिलें तों सर्वच ग्रह अत्युत्तम जमल्याचें जोशांनीं सांगितलें. मग दुधांत साखर घातल्याप्रमाणें " अधिकस्य अधिकं फलं" होऊन मनांत संशय आणण्यास मुळींच जागा उरली

नाहीं. नंतर सिधोपंतानीं मोठ्या उल्हासानें सुमुहूर्तावर यथाविधि मंगलकार्य केलें; आणि विवाहसमारंभकालीं ग्रामस्थांस भोजन दिलें. तसेंच जामातासही वस्त्रालंकारांनीं भूषित केलें. विठ्ठलपंत हे मूळचेंच वैराग्य संपन्न असल्यामुळें श्रीविष्णूच्या आज्ञेवरून विवाहाकरितां गुंतून आळंदीस राहिले होते. विवाहकार्य आटोपल्यावर तीर्थयात्रेस जाण्याकरितां त्यानीं सिधोपंतांची आज्ञा मागितली; आणि असेंही बोलले कीं, जेष्ठ मास इकडेसच गेला. आषाढमासीं श्रीपंढरीची यात्रा करून मग पुढें जाण्याचा माझा हेतु आहे. हें आपल्या जामाताचें भाषण ऐकून सिधोपंत म्हणाले कीं, आम्हीही सहकुटुंब आपल्याबरोबर श्रीपांडुरंगाच्या दर्शनास येतो. मग लागलीच सर्व तयारी करून आनंदानें ती सर्व मंडळी आलंकापुरीहून निघाली. ती मजल दर मजल करीत श्रीपंढरी क्षेत्रास येऊन दाखल झाली. त्या स्थळीं गेल्यावर सर्वत्रांनीं चंद्रभागेचें स्नान करून प्रथम नगरप्रदक्षणा केली; आणि श्रीपांडुरंगाच्या देवळांत गुरुपारापाशीं येऊन प्रथम साष्टांग नमस्कार घातले. विठ्ठलपंत हे श्रीपांडुरंगाची मूर्ति संप्रेम भरित होत्साते अवलोकन करीत असतां कंठ दाटून त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहू लागले. सिधोपंतानीं कन्या आणि जामात उभयतांस श्रीपांडुरंगाच्या पायावर घालून त्यांच्या आयुरारोग्य वृद्धिस्तव अनन्य भावानें देवाची प्रार्थना केली. त्यास आलिंगन दिलें; व कांहीं द्रव्यांश श्रीपांडुरंगावरून ओवाळून टाकला. नंतर त्यानें भगवद्भक्तांच्या मेळ्यांत

जाऊन सर्व साधुसंतांचें दर्शन घेतलें. याप्रमाणें तेथील सोहळा संपूर्ण होईपर्यंत चार दिवस आनंदानें काळक्रमणा केली. एके दिवशीं विठ्ठलपंतानीं दक्षिणयात्रेकारितां श्वशुराची आज्ञा मागितली. तेव्हां सिधोपंतानीं विनंति केली कीं, " आपली दक्षिणेकडील यात्रा संपूर्ण झाल्यावर आळंदीस येऊन नंतर स्वग्रामीं जावें. " हें ऐकून " बरे आहे " असें ह्मणून विठ्ठलपंत हे सासू—श्वशुरांच्या चरणावर मस्तक ठेवलें; आणि लागलीच तेथून निघाले. सिधोपंत हे कुटुंब व कन्येसह आळंदीस जाते झाले.

विठ्ठलपंत दक्षिणेकडे संचार करीत श्रीशैल्य मल्लिकार्जून, निवृत्तिसंगम, अहोबळनारसिंहतीर्थ, वासुदेवतीर्थ, श्रीव्यंकटगिरी, गोकर्ण महाबळेश्वर, हाटकेश्वर करून सीताशुद्धीस जाण्यापूर्वीं हनुमंतानीं ज्या पर्वतावरून उड्डाण केलें, तें स्थल अवलोकन करून सेतुबंध रामेश्वरास आले. तेथील यात्रा आनंदानें यथासांग करून परत येतांना संगममाहुली, करवीर वगैरे पहात पहात पुनरपि आळंदी येथें आले. संपूर्ण तीर्थयात्रा झाल्यावर जामात वचनाप्रमाणें सुखरूप आपल्या घरीं परत आल्याचें कळतांच सिधोपंतांस परमानंद झाला. विठ्ठलपंतानीं सासू—श्वशुरास नमन केलें. नंतर सिधोपंतानीं प्रेमपूर्वक त्यांस अशिर्वचन देऊन कुशल प्रश्न विचारलें. त्यानींही त्यांचीं यथोचित उत्तरें दिलीं. त्यावेळीं सिधोपंतानीं श्रम परिहारार्थ कांहीं दिवस त्यांस ठेवून घेतले. पुढें एके दिवशीं विठ्ठलपंतानीं विनंती

केली कीं, तीर्थाटण प्रसंगामुळें मी वृद्ध माता पित्यांच्या दर्शनास फार दिवस अंतरलो. आतां त्यांच्या दर्शनाची उत्कंठेच्छा झाली आहे, या अर्थी मला तिकडे जाणें उचित आहे. यास्तव जाण्यास आपली अनुज्ञा असावी. हें जामाताचें नम्रतापूर्वक भाषण ऐकून सिधोपंत ह्मणालेः--आह्मीही तुमच्या बरोबर तुमच्या वडिलांच्या भेटीस येतो. या त्यांच्या वाणीनें विठ्ठलपंतांस महादानंद झाला. मग सिधोपंत, कन्या व कुटुंबासह विठ्ठलपंतांच्या बरोबर निघून आपेगांवी येऊन दाखल झाले. ही सर्व मंडळी गोविंदपंतांच्या घरीं आल्यावर आपल्या परम प्रिय पुत्रास पाहून ते फार आनंदीत झाले! विठ्ठलपंतानीं आपल्या वृद्ध मातापित्यांस साष्टांग प्रणिपात केला. त्या वेळच्या त्यांच्या आनंदास काय विचारावें! जसें श्रीरामचंद्र देवी जानकीसह अयोध्येस आल्यावर राजा दशरथ व कौसल्या यांस येऊन भेटले, त्या वेळीं त्यांना जसा आनंद झाला, तसाच यावेळीं वृद्ध गोविंदपंत व निराबाई यांस झाला. त्यानीं मुलावरून निंबलोण उतरून टाकलें, व त्यांस आपल्या जवळ बसवून घेऊन विठ्ठलपंतांच्या मस्तकाचें अवघ्राण केलें. सिंधोपंतानीं त्या उभय वृद्धांस विवाहाची सर्व हकीकत सांगितल्यावर गोविंदपंतांस अति हर्ष झाला. पण बायकांच्या कोमल स्वभावाप्रमाणें " आम्हांला न कळवितां परभारेंच लग्न करून घेतलें " म्हणून निराबाईस मात्र अमंळ वाईट वाटलें. तेव्हां विठ्ठपंतानीं सांगितलें कीं, " विवाहकार्य उरकून घेऊन नंतर पुढील

यात्रेस जा" अशी श्रीपांडुरंगाची आज्ञा झाल्यामुळें निरुपायानें मला तसें करणें भाग पडलें. याची मला क्षमा करावी. असें आपल्या मुलाचें सत्य व लीनतेचें भाषण ऐकून त्या माऊलीचें समाधान झालें. व एव्हांपासूनच विठ्ठलावर परमेश्वराची कृपा पूर्ण आहे हें जाणून तिला धन्यता वाटली! सिधोपंतांनीं ही सर्व हकीकत गोविंदपंतांस सांगून आपल्या बरोबर आणलेले वस्त्रालंकार त्यांस आर्पण करून " मुलीला तुमच्या ओटींत घातली आहे, त्याअर्थी तिचें बालकाप्रमाणें पालन करणें सर्वथैव तुमच्याकडेसच आहे." वगैरे सन्मानपूर्वक गोविंदपंतांशीं संभाषण केलें. मग त्यांच्या आग्रहावरून चार दिवस तेथें राहून नंतर कन्येस तेथेंच ठेवून सिधोपंत कुटुंबासह परत आळंदीस आले.

पुढें कांहीं काल लोटल्यावर कालाच्या वक्रगतीनें विठ्ठलपंतांचे वडील व मातोश्री पंचत्व पावली. त्यामुळें अल्पवयांतच विठ्ठलपंतांच्या शिरावर प्रपंचाचा सर्व भार पडला. त्यांची वृत्ति बालपणापासूनच शांत व समाधानी असून ते ज्ञानसंपन्न असल्यामुळें सुख आणि दुःख समसमान मानीत असत. पर्जन्याच्या अतिवृष्टीमुळें तुडुंब प्रवाहानें भरलेल्या सरिता समुद्रास जाऊन मिळाल्या, तरी त्याचे पाणी वाढत नाहीं, किंवा अनावृष्टिमुळें कमी होत नाहीं; तसें विठ्ठलपंतांस त्या संसार ओझ्याचें कांहींच वाटलें नाहीं. अशा विरक्तपणानें परमार्थाचा लाभ घेत ते संसार राहटी चालवीत असत. आपले व्याही सकुटुंब निवर्तल्याची बातमी सिधोपंतांस कळतांच त्यांस

फार वाईट वाटलें. व ते लागलेच आळंदीहून निघून आपेगांवीं जामाताचे घरीं आले. तेथील त्यांची स्थिति पाहून विठ्ठलपंतांस ह्मणाले कीं, "तुमचें लक्ष नेहमीं परमार्थाकडे असल्यामुळें संसारास लागणाऱ्या हरएक प्रकारच्या जिनसांची आण ने वगैरे बद्दल तुह्मांस क्लेश भोगावे लागतात. यास्तव तुम्ही या ठिकाणचें सर्व खटलें मोडून आळंदीसच रहावयास चला, ह्मणजे माझेंही तुमच्याकडे लक्ष लागून कधीं कधीं होत असलेली चित्ताची अस्थिरता नाहींशी होऊन तुमची समाधान वृत्ति राहील; आणि आपण सर्वजण एके ठिकाणीं राहून आनंदानें काळ घालवूं. विठ्ठलपंतानीं आपल्या स्वशुराच्या म्हणण्याचा विचार करून अनायासें तीर्थवास घडत आहे; व तेथें राहिल्यानें आपणास अधिक उत्तेजन येऊन सुरळीतपणें भगवद्भजन करतां येईल; आणि साधुसंतांच्या भेटी होतील. वगैरे गोष्टी मनांत आणून "तुमच्या आज्ञेबाहेर मी नाहीं" असें त्यानीं त्यांस सांगितलें. आपल्या हेतूस पुष्टिकरण देणारें जामाताचें भाषण ऐकून सिधोपंतांस फार समाधान वाटलें. सिधोपंतांच्या उदरीं पुत्रसंतान नसल्यामुळें एकुलत्या एक कन्येवर त्यांचा अत्यंत जीव असे. म्हणून त्यांनीं आपली स्थावर जंगम मालमत्ता रुक्मिणी बाईच्या नांवानें करून दिली. कारण, आपल्या पश्चात तिला कोणत्याही प्रकारची काळजी न रहावी. याप्रमाणें सिधोपंतांच्या मनांत असलेला पुष्कळ दिवसांचा हेतु जामात घरीं राहावयास आल्यावर त्यांनीं पूर्ण करून घेतला.

विठ्ठलपंतांचा संन्यासदीक्षा घेण्याचा विचार.

आळंदीसारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं विठ्ठलपंतांसारख्या सत्वस्थ व ज्ञानसंपन्न पुरुषांचा वास झाल्यामुळें त्यांच्या मूळच्या वैराग्य वृत्तींत सत्समागमानें अधिकच भर पडली. नित्य इंद्रायणीचें स्नान साधुसंतांचें दर्शन व श्रीहरीच्या मंगल नामाचा घोष इत्यादि मनेच्छेप्रमाणें घडून येऊं लागल्यामुळें त्यांचें चित्त तेथें रममाण झालें. विठ्ठलपंत हे आळंदीस राहूं लागल्यापासून त्यांनीं आषाढी कार्तिकीच्या यात्रेस श्री पंढरपुरास जाण्याचा परिपाठ ठेवला होता. बाळपणापासून त्यांस अध्यात्म विषयाची विशेष गोडी असल्यामुळें ते आपलें नित्यकर्म आटोपून राहिल्या वेळांत श्रीमद्भगवद्गीता व योगवासिष्ट या ग्रंथांचें अवलोकन करीत असत. एके दिवशीं भोजनोत्तर ते योगवाशिष्ट ग्रंथांतील चुडालाख्यान वाचीत बसले असतां त्यांतील दृष्टांतांचें व अनेक कथानकांचें प्रतिबिंब विठ्ठलपंतांच्या अंतःकरणांत पडून ब्रह्माचें सत्यत्व व जगाचें मिथ्यत्व हें त्यांच्या लक्षांत आलें. तेव्हां एकदम त्यांची ब्रह्माकारवृत्ति होऊन त्यांचें देहभान नाहींसें झालें. कांहीं वेळानें पुन्हां देहावर येऊन पुढें असलेल्या ग्रंथांतील विषय कांहीं वाचावें पुन्हां स्तब्ध व्हावें, असें चाललें असतां त्यानीं आपल्या मनाचा पक्का निश्चय केला कीं, क्षणभर माझी वृत्ति अशा प्रकारची झाली; पण मी जर पुन्हां स्त्रीमोहांत सांपडलों, तर खरो-

खर आपला जन्म व्यर्थ जाईल! असें जाणून स्त्री निद्रिस्त आहे तोंच आपण येथून चालते व्हावें. कारण, सद्गुरूच्या कृपेशिवाय आपला मनोगत हेतु सिद्धीस जाणार नाहीं ह्मणून सद्गुरूशोधाकरितां आतांच बाहेर पडावें हेंच योग्य होय! अशी संधी पुन्हां मिळणार नाहीं. इतकेंच मनाशीं बोलून विठ्ठलपंत तत्काल आसनावरून उठले; आणि अंगावर वस्त्रें परिधान करून ते लागलीच निघाले. लौकर बाहेर पडण्याच्या लगबगीनें निद्रिस्त अशा सुशील पत्नि रुक्मिणीबाईच्या खोप्यास त्यांचा पाय लागला; व त्या योगें त्यांची नजर त्या साध्वीकडे सहजच गेली. तेव्हां क्षणएक ते तेथेंच तटस्थ वृत्तीनें उभे राहून विचार करूं लागले कीं, "मनोभावानें प्रतिपाल करण्याविषयीं अग्निब्राह्मणासमक्ष जिला अभिवचन दिलें; व जी सदाचरणानें, निष्कपटभावानें व ममतेनें आपल्याशीं आजपर्यंत वागून एकनिष्ठपणें जिनें आपली सेवा केली; अशा सुशील पत्निची प्रतारणा करून तिला न विचारतां तसेंच निघून जावें, तर अधर्माचरणाचा दोष माथीं बसेल. बरें, तिला जागृत करून आपल्या मनांतील हेतु स्पष्टपणें कळवावा, तर मोहामुळें या गोष्टीस ती मुळींच रुकार देणार नाहीं; आणि असें झालें ह्मणजे आपल्याला संसारांत पडून 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनं' ह्या वचनाप्रमाणें आपल्याला ही येरझार कधींही सुटावयाची नाहीं." अशा विचाराचें काहूर त्या वेळीं

विठ्ठलपंतांच्या मनांत उद्भवून त्यांच्या मनाची वृत्ति पालटली. शेवटीं पत्नीला न कळवतां जाणें प्रशस्त नव्हें, असा विठ्ठलपंतांनीं मनांत विचार करून रुक्मिणीबाईस जागृत केलें. तेव्हां ती उठून आपल्या पतीकडे पहातें तों त्यांच्या सज्ज झालेल्या पोषाखा-वरून 'आजचें चिन्ह कांहीं निराळें दिसतें' असा रुक्मिणीबाईनें आपल्या मनांत तर्क केला; आणि ह्मणाली कीं, "भलत्याच वेळीं हा असा पोषाख करून मला एकदम जागृत केलें; हें आहे तरी काय?" यावर त्या उभयतांचा परस्पर झालेला संवाद खालीं देतों. ह्मणजे त्यावेळीं उभयतांची परिस्थिति कशी झाली होती हें सज्जनांच्या लक्ष्यांत तेव्हांच येईल. साध्वी रुक्मिणीबाईचें तें भाषण ऐकून विठ्ठलपंत ह्मणतात. नेहमी माझें चित्त अध्यात्म विषयांत निमग्न झालें असल्यामुळें मला परमार्थ प्राप्तीची विशेष अभिरुची लागली व त्या योगानें संसार हा मृगजलाप्रमाणें मिथ्या भासत आहे; हें समजून उमजून मी त्यांतच रममाण झालों, तर अप्राप्य अशा ब्रम्हपदास मुकून जन्म—मृत्यूच्या फेऱ्यांतच मला चिरंकाल गटकळ्या खाव्या लागतील. यास्तव सद्गुरूचा शोध करून त्यांज-कडून संन्यासदीक्षा घ्यावी; आणि ब्रह्मस्वरूपीं तल्लीन व्हावें. असा मनाचा दृढ निश्चय करून तुझें अनुमोदन घेण्याविषयीं आतां मी तुला जागृत केलें. अलभ्य लाभाच्या प्राप्तीसाठीं मायामोह सोडून मला जाण्यास रुकार देशील अशी माझी खात्री आहे.

लग्न झाल्या दिवसापासून ज्यानें आपल्यास ममतेनें वागवून कधीं तिलप्राय सुद्धां दुःख दिलें नाहीं. व ज्यांच्यावर सर्व संसाराची मदार अशा त्या प्रियपतीच्या मुखांतून निघालेलें संन्यास घेण्याविषयींचें विरक्त भाषण त्या माउलीनें ऐकतांच कर्णकठोर व भयंकर अशा शब्दरूप आवाजानें वीजच कोसळून मस्तकावर पडली कीं काय, असें त्यावेळीं तिला वाटलें! तिच्या सर्वांगास कंप सुटला, घसा कोरडा पडला, व डोळ्यांस एकदम अंधेरी येऊन ती साध्वी धाडदिशी जमिनीवर निचेष्टित पडली! असा हा विपरीत प्रकार पाहिल्याबरोबर विठ्ठलपंत हे भयभीत होऊन तत्काळ आपल्या जाग्यावरून उठले; व चटकन पाणी आणून तिच्या नेत्रांस लावून किंचित् मस्तकावरही शिंपडलें; आणि आपल्या धोतराच्या पदरानें तिला वारा घालीत बसले. ती बिचारी कांहीं वेळानें सावध होऊन उठून बसली; आणि प्रियपतीकडे पाहतांच त्यांच्या मुखांतून नुकतेंच निघालेलें " संन्यास " शब्द मूर्तिमंत त्या माउलीच्या नेत्रांपुढें उभे राहून तिला एकदम रडूं कोसळलें. त्यावेळीं विठ्ठलपंतांनीं दयार्द्र दृष्टीनें आपल्या पत्नीकडे अवलोकन करून तिला ममतेनें कुरवाळलें; आणि चार वेदांत पर गोष्टी सांगून तिचें समाधान करण्याचा प्रयत्न करूं लागले. ते तिला म्हणतात.:—

संसारीं असतें जरी सुख पहा भूपाळ तेही कसे ।
राज्यें त्यागुनि बैसले वनीं तपश्चर्येसि ऐको असे ॥

ना ये वीट जया जरी विषयींच्या भोगें बहु त्रासती ।
ऐसा मूर्ख समूह पाहुनि तया साधु तयां हांसती ॥ १ ॥

आणखी लक्षांत आण:—

जरि नरतनु भाग्यें प्राप्त झाली जिवाला ।
निज सुख जणु हाता सांपडे तरी तयाला ॥
सुखमय परमात्मा जाणनी सर्व सृष्टी ।
मुरुनि सुखसमुद्रीं चित्त पावेल तुष्टी ॥ १ ॥

एवढयाकरितां प्रत्येक प्राणिमात्रानें आपल्या जन्माचें खरें सार्थक कशांत आहे याचा पूर्ण विचार केला पाहिजे. म्हणून म्हणतों कीं, सद्गुरुप्राप्तिकारितां अन्य देशीं जाण्यास तूं मला अनुमोदन दे. कदाचित् तुला असें वाटेल कीं, पाठिमागें माझें कसें होईल, याची चिंता करावयास नको. कारण, तुला तुझ्या वडिलांनीं दिलेली संपत्ति तुझ्या उदर भरणास पुरून उरण्यासारखी विपुल असल्यामुळें चरितार्थ चालविण्यास मुळींच अडचण पडणार नाहीं. हें प्रिय पतीचें वैराग्यपर भाषण ऐकून ती माऊली ह्मणाली: शिव! शिव! आज हें काय चाललें आहे. बाबांच्या पोटीं पुत्रसंतान नव्हतें, म्हणून मुलीकडून तरी माझें दार उघडें राहील, या आशेनें वडिलांनीं आपली सर्व संपत्ति नांवानें करून दिली. तिचा हा काय परिणाम! हेंच कां त्याचें सार्थक! माझा प्रतिपाळ असाच होणार! संसाराची पुरतीशी मांडामांड होते न होते तोंच त्याची आटपा आटप!! अग्नि ब्राह्मणासमक्ष मला दिलेल्या वचनाची स्मृति अगदींच राहिली नाहीं

कां? अशा प्रकारानें माझी हेळसांड करावयाची होती, तर मग लग्न तरी करावयाचें नव्हतें. बरें, पोटीं एखादें संतान होऊन मग हा विचार मनांत आणला असतां तरी योग्य झालें असतें. आतां मी कोणत्या तोंडानें अनुमोदन देऊं. असें आपल्या पतीशीं ती माऊली रुक्मिणीबाई मर्यादेनें बोलून आणखी ह्मणूं लागली कीं, परमार्थ साधनाकरितां प्रपंच टाकायला पाहिजे असें कांहीं नाहीं. प्रपंच करून परमार्थ साधतां येतो. पहा—राजा जनकानें प्रपंच साधून परमार्थाचा लाभ करून घेतला. शिखिरध्वज राजा वैराग्य भरानें अरण्यांत जाऊन बसला होता, तेव्हां त्याची पत्नि साध्वी चुडाला हिनें त्यास नानाप्रकारें बोध करून घरीं आणलें; आणि त्यांनीं प्रपंच व परमार्थ दोन्हीही संपादन केलें. असे अनेक दृष्टांत देऊन मोठ्या करुण स्वरानें तिनें पतीशीं भाषण करून शेवटीं म्हटलें कीं, निदान एखादें मूलबाळ होईपर्यंत तरी संन्यास घेण्याची गोष्ट माझ्यापाशीं काढूं नका! एवढेंच आपल्यापाशीं मागणें आहे.

अशा तऱ्हेनें उभयतांची भाषणें झाल्यावर पुढें हें प्रकर्ण तसेंच थंड पडून विठ्ठलपंतांचें जाणें तूर्त रहित झालें. पति केव्हां घर सोडून जाईल याची रात्रंदिवस रुक्मिणीबाईला मोठी काळजी लागली. आधल्या दिवशीं घडलेली सर्व हकीकत दुसरे दिवशीं त्या माउलीनें आपल्या वडिलांस ह्मणजे सिधोपंतांस निवेदन केली. तेव्हां ते तिला ह्मणाले कीं, शास्त्र नियमाप्रमाणें पत्नीच्या आज्ञेशि-

वाग्य पतीला संन्यास घेतां येत नाहीं, ह्मणून तुला सांगून ठेवतोकीं, जेव्हां ते विचारतील, तेव्हां तूं त्यांस उत्तर देण्याची सावधगिरी ठेव.

विठ्ठलपंतांचें श्रीकाशीक्षेत्रीं गमन.

साध्वी रुक्मिणिबाईच्या शोकातिशयानें विठ्ठलपंतांच्या अंतःकरणांत लवमात्र विपर्यास न पडतां त्यांच्या मनांतील हेतु अधिकच दृढ होत चालला; पण त्या अडथळ्यामुळें त्यांना चोहोंकडे उदास वाटून त्यांचे चित्त अस्वस्थ झालें. ज्याप्रमाणें सीताविरहानें श्रीरामचंद्रास तिच्या शिवाय सर्व जग शून्यवत् भासूं लागलें; त्याप्रमाणें विठ्ठलपंतांची स्थिति झाली. सत्समागम, तपाचरण व परमार्थ लाभ, ऋषिमुनींचें पवित्र आश्रम, सन्याशांचे मठ, योग्यांच्या गुहा इत्यादि गोष्टी त्यांच्या दृष्टिपुढें उभ्या राहून सद्गुरूची भेट केव्हां होईल याबद्दल त्यांस रात्रंदिवस तळमळ लागली होती. परमार्थ प्राप्तीचा छंद लागून जो मूर्तिमंत वैराग्याचा पुतळा बनला, अशा पुरुषांचें मन कितीही प्रयत्नानें प्रपंचांत पडण्याविषयीं वळविलें, तरी काहीं उपयोग होईल काय? नाहींच व्हावयाचा. विठ्ठलपंतांच्या मुखांतून अहोरात्र हरिनामाचा गजर चालत असून ते सदा उदास वृत्तीनें राहत असत. मला रात्रंदिवस सद्गुरुप्राप्तीचा छंद असल्यामुळें “कसेंही करून संन्यास घेण्यास तूं मला अनुमोदन दे!” असें ते आपल्या पत्नीला ह्मणत. त्या योगानें “कोणत्या वेळीं मजवर दुःखाचा डोंगर कोसळेल याचा नेम नाहीं असें जाणून ती साध्वी रुक्मिणीबाई चिंतामग्न

असे; तरी पतीला उत्तर देण्यांत फार सावधगिरी ठेवी. एके दिवशीं असें झालें कीं, दोन प्रहरच्या समयास रुक्मिणीबाई उदास वृत्तीनें गृहकृत्यांतील काम—काज करीत असतां साहजीकच तिचें चित्त ठिकाणावर नव्हतें. अशा वेळीं विठ्ठलपंत माडीवरून खालीं येऊन "मी स्नानास जाऊं कां?" असें ह्मणाले, व तिनेंही "जावें" असें ह्मटलें. हे शब्द विठ्ठलपंतांच्या कानीं पडतांच "पडत्या फळाची आज्ञा" असें समजून ते लागलीच घराबाहेर पडले. ज्या प्रमाणें गारोड्यापासून नाग सुटला असतां चटदिशीं निघून जातो किंवा पिंजऱ्यांतून शूक पक्षी बाहेर पडल्याबरोबर आनंदानें आपल्या झुंडीस जाऊन मिळतो, अथवा व्याधापासून कुरंग निसटून जातो; त्याप्रमाणें विठ्ठलपंत एकदम घरांतून बाहेर चालते झाले. लग्न समयीं "**सावधान**" शब्दाची सूचना होतांच समर्थ रामदासस्वामी लग्न मंडपांतून निघून गेले; तद्वत विठ्ठलपंतांस होऊन घराबाहेर पडल्यानंतर कोणी ओळखून आपल्यास परत नेईल, ह्मणून ते आडमार्गाकडे वळले. ते थेट उत्तरेकडील रोंख धरून रात्रंचे वेळींच मार्ग आक्रमण करीत असत. बरेंच लांब गेल्यावर त्यांनीं तो क्रम सोडून दिला. सद्गुरुप्राप्तीकरितां उत्कंठित झालेले विठ्ठलपंत साधुसंतांचें दर्शन घेत व आपला हेतु त्यांना कळवीत चालले असतां एका वैराग्यानें त्यास सांगितलें कीं, "काशी क्षेत्रांत रामानंद[1] नावांचे महात-

१ यानांच रामाश्रम स्वामीही म्हणतात.

पस्वी व योगी असे सन्याशी आहेत. ते अध्यात्म विषयांत पारंगत असून अत्यंत विरक्त आहेत. त्या सत्पुरुषांच्या समागमानें कोणाच्या कशाही शंका असल्या तरी त्या दूर होऊन अंतःकरणाची तळमळ नाहींशी होते. स्वामीच्या मधूर अशा वेदांत वाणीला श्रोता लुब्ध होऊन मठ सोडून दुसरीकडे जावें असें त्यांस कधीं वाटतच नाहीं. अध्यात्मज्ञान प्राप्तीस्तव सद्गुरुचा शोध करीत असलेल्या विठ्ठलपंतांस इतकी माहिती मिळतांच मग कोठचा दम निघायला! प्रवासांतील अनेक संकटें भोगीत ते एकदम काशीक्षेत्रास येऊन दाखल झाले.

सुजनहो, विठ्ठलपंत काशीस निघून गेल्यावर त्यांचे पश्चात आळंदीस साध्वी रुक्मिणीबाईची स्थिति काय झाली असेल याकडे तुमचें लक्ष वेधलें असेल. तरी आतां त्या माउलीचा वृत्तांत ऐकावा.

रुक्मिणीबाईची दुःखदस्थिति.

रुक्मिणीबाई उदास वृत्तीनें गृहकृत्यें करीत होती, हें मागें सांगितलेंच आहे. तिचें तें कृत्य संपल्यावर सहज माडीवर जाऊन पाहूं लागली तों आपला भ्रतार तेथें नसून त्याच्या भजन करण्याच्या चिपळ्याही नाहींत, हें पाहून तत्काल ती माउली मनांत चरकली व "जावें" असें आपण उच्चारलेले शब्दही तिच्या लक्षांत आले. मग काय! त्याबरोबर ती साध्वी अतिशय घाबरून तिच्या सर्वांगाला डवडवून घाम फुटला; आणि केळ जशी उलथून पडते;

तद्वत ती मोठ्यानें किंकाळी फोडून धाडदिशी जमिनीवर मूर्छित होऊन पडली. ती किंकाळी ऐकण्याबरोबर आईबाप व घरांतील इतर मंडळी धांवत आली;आणि तिची ती विपन्नावस्था पाहून त्यांच्याही तोंडचें पाणी पळालें. मातांपितरांनीं अनेक प्रकारें उपचार केल्यामुळें तीं बिचारी हळू हळू सावध झाली. आणि मोठ्यानें हंबरडा फोडून आईला ह्मणाली. “ आईग घात झाला बरं ! आतां माझें कसें होईल !! मी चांडाळणीनें येथेंच सन्यास घेण्यास अनुमोदन दिलें असतें, तर डोळे भरून मुखावलोकन करण्यास तरी सांपडलें असतें !! कायरे देवा ! माझ्यावर हा केवढा घाला घातलास !!!” असें म्हणून ओकसाबोकशी रडूं लागली. तिच्या शोकाचें त्यांना कारण कळतांच तेही अतीशय घाबरें झाले; आणि मग विवेकानें आपल्या मनास आळा घालून सिधोपंतानीं त्या माउलीची पुष्कळ प्रकारानें समजूत केली; नंतर विठ्ठलपंतांच्या शोधाकरितां चहूंकडे तत्काल माणसेंहि पाठविलीं. धर्मशाळा,. तळीं, आड,विहिरी वगैरे अनेक ठिकाणीं शोध करून आसपासच्या गांवांतही तपास चालविला. एवंच त्यांना जेवढे प्रयत्न करणें शक्य होते तेवढे करून पाहिले; परंतु कोठेंही त्यांचा तपास लागेना. यामुळें तेही अगदीं निराश झाले. तरी प्रयत्न करण्यांत खंड पडला नव्हता. विठ्ठलपंत आळंदीहून गेल्यापासून साध्वी रुक्मिणिबाईस अत्यंत दुःख झालें. ती बिचारी पंतांचे सद्गुण आठवून क्षणोक्षणीं

दुःख करीत असे, ह्मणून आईबापही तिची वारंवार समजूत करीत असत; परंतु पतिविरहानलानें संतप्त झालेल्या त्या माउलीच्या मनाचें समाधान कसें होणार ! स्त्रियांना पतिवियोगदुःख सहन करणें अशक्य तर खरेंच; पण ती साध्वी विषयलालसेनें दुःख करीत नसून पतिव्रता धर्माप्रमाणें तिची पतीचे ठायीं पूर्ण निष्ठा होती. पतिव्रता स्त्रियांना पति हेंच दैवत असल्यामुळें इतर वस्तु त्यांना प्रिय कशा वाटणार ! ह्मणून पतिमूर्तिशिवाय साध्वी रुक्मिणी-बाईला अन्य चिंतन नव्हतें. विठलपंत गेल्यापासून त्या माऊलीनें अन्नपाणी वर्ज करून आपलें शरीर काष्ठवत शुष्क बनविलें ! ती बिचारी नेहमीं चिंताग्रस्त होऊन मनांत ईश्वराचा धांवा करीत असे. अशा तऱ्हेनें तिचा काल दुःखमय स्थितींत चालला असतां तिकडे श्रीकाशीक्षेत्रांत काय प्रकार घडला तो श्रवण करण्याविषयीं सुज-नांनीं एकाग्र चित्त करावें.

विठ्ठलपंतांचें सन्यासदीक्षाग्रहण.

विठ्ठलपंत हे श्रीक्षेत्र काशीस गेल्यावर रामानंदस्वामींच्या मठाचा शोध करून त्या स्थलीं गेले. ती सायंकालची वेळ असल्यामुळें मठाला एका प्रकारची रमणीयता आली होती. तें मनोहर स्थल पहतांच विठ्ठलपंतांस फार आनंद झाला. त्यावेळीं भव्य व तेजः-पुंज यतिश्रेष्ठमूर्ति भगवी कौपिन परिधान करून मध्यभागीं उच्च आसनावर विराजमान झाली आहे. कित्येक साधुवृंद व इतर श्रोतृ-

समाज वगैरे भाविक जन त्यांच्या समोर आपआपल्या स्थानावर स्वस्थ चित्तानें स्थित झाले आहेत. यतिश्रेष्ठांच्या पुढें चौरंगावर योगवासिष्ठ व श्री मद्भगवद्गीता असे दोन ग्रंथ असून त्यांच्या दोन्ही बाजूस दोन दीप्तिमान दीप प्रज्वलीत आहेत. असा हा मनोहर देखावा पाहून विठलपंत अत्यंत चकित झाले! नुकताच त्या यतिमहाराजांच्या वक्तृत्वाला प्रारंभ झालेला होता. ते अस्ति—भाति—प्रिय याची मीमांसा, जगाचें मिथ्यत्व व सत्व--रज—तम या त्रिगुणांचे धर्म सांगून शेवटीं त्यानीं संन्यासयोग प्रतिपादन केला. तो श्रवण करीत सकळ श्रोतृवृंद आनंद सागरांत पोहूं लागला. हें पाहून विठ्ठलपंतांस असें वाटलें कीं, ही मूर्ति केवळ अज्ञ जनांस भवसागर तरून नेणारी केवळ नौकाच होय! अस्तु. यतिश्रेष्ठांची वेदांतासारख्या अति गहन विषयाची—श्रोत्यांच्या मनावर ठसण्यासारखी-प्रतिपादन करण्याची अत्युत्तम शैली पाहून विठ्ठलपंतांच्या मनाची पूर्ण खात्री झाली कीं, आपण कांहीं दिवसापूर्वीं एका साधूच्या मुखांतून ज्या यतिवरांची सत्कीर्ति श्रवण केली होती, तेच हे रामानंद स्वामी असावेत. अशा सत्पुरुषांचा आपल्यावर अनुग्रह झाल्यास जन्माचें सार्थक कां होणार नाहीं? अर्थात होईल! असें जाणून ते आनंदभरित झाले. स्वामी महाराजांचें वक्तृत्व समाप्त झाल्यावर सर्व श्रोतृसमाज आपआपल्या स्थानीं निघून गेला. मग स्वामिनीं तेथें एकटेच राहिलेल्या विठलपंतांस पाहून हाक मारली. ते तत्काळ त्या

यतिश्वरांजवळ जाऊन अति नम्रतेनें त्यांस साष्टांग नमस्कार करून त्यानीं त्यांचें पाय घट्ट धरलें. स्वामीनीं "कल्याणंभवति" असा आशिरवाद देऊन त्यांस उठविलें; आणि "तुम्ही कोठील कोण आहां? तुमचे आप्तेष्ट कोण आहेत? व येथें कशा करतां आला आहां? हें सविस्तर मला सांगा" असें ह्मटलें. तेव्हां विठलपंत भी विवाहित आहे असें सांगितलें, तर स्वामी मला चतुर्थाश्रम न देतां गृहस्थाश्रमांतच राहण्यास सांगतील; आणि त्यामुळें या गुरुमहाराजांचा अनुग्रह न होतां मी त्यांच्या अमोघ बोधामृतास मुकून परमार्थास सर्वथैव आंचवेन. बरें तसें न सांगावें, तर असत्य भाषणाचा दोष माथीं घ्यावा लागेल. आतां आपण या यतिश्रेष्ठांस काय सांगावें, अशा विचारांत ते क्षणएक मग्न होऊन पुन्हां आपल्या मनाशींच ह्मणतात—"परमपदप्राप्तीसाठीं यद्यपि असत्य भाषण केलें, तरी त्याचा दोष नाहीं असा शास्त्रनियम आहे; तर मग बोधामृत प्राशन करण्याची आलेली अशी उत्तम संधी व्यर्थ कां दवडावी!" असा मनाचा निश्चय केल्यावर करद्वय जोडून त्यानीं यतिश्रेष्ठांची प्रार्थना केली कीं, "महाराज, या देहाला विठल असें नांव आहे. मी गोदावरीतीरीं आपेगांवचा राहणारा असून मला वडील, मातोश्री वगैरे कोणी नाहींत. आपल्या सारख्या सत्पुरूषांच्या सवेंत ही काया झिजवावी; चित्ताची अस्थीरता नाहींशी करावी; आणि अध्यात्मज्ञान संपादावें; हाच एक हेतु मनांत धरून मी आपल्या

चरणापाशीं आलों आहे. कृतार्थ करणार श्रीसमर्थ आहेत." असें ह्मणून त्यानीं त्यांस साष्टांग प्रणिपात केला; व पुन्हां सद्गदित अंतःकरणानीं म्हटलें:—स्वामी महाराज!

"होवोनि भ्रांत बुडलों, विषयांध झालों ॥
दुःखें अनावर भवाब्धिंधन, फार भ्यालों ॥
संसारतापशमनार्थ प्रयत्न केले ॥
ते ना परी सुख करूं मजला शकेले ॥ १ ॥

माझी स्त्री, पुत्र माझे, गृह–धन–पशु हे, द्रव्यही सर्व माझें ॥
देहांतीं काय माझें ! ! ह्मणुनि दचकलों चित्त ना शांत माझें ॥
सोडीना कर्म कोठ ! कठिणतर अशा पातकानें जळालों ॥
भीतीनें ग्रस्त झाला, त्यजुनि सकल ते दूर देशीं पळालों ॥ २ ॥

ज्यांचें दर्शन सोडवी न उरवी तापत्रयांची कथा ॥
वाङ्माधुर्यरसामृतें दुर करी जन्मादिकांची व्यथा ॥
नाशी जीव दरिद्र आत्मसुखसाम्राज्यासना स्थापुनी ॥
देती मुक्ति पवीत जाणुनि, अशी कीर्ति आलों ऐकुनी ॥ ३ ॥

संसारबंधन हरिल असा न कोणी । भेटे ह्मणोनि स्मरला हृदिं चक्रपाणी ॥
जो निर्विकार विभु, त्यापरि आपणाला । भावोनिया निरखुनी मज धीर आला ४॥

भवसमुद्र भयानक यांत मी । बुडुनि जातसे बहु या तमीं ॥
मज अशांतुनि सद्गुरु सोडवा । नमित पंकजपद्म भवार्णवा ॥ ५ ॥

अशी विठ्ठलपंतांची अनुतापयुक्त वाणी त्या यतिवरांच्या कर्णरंध्रीं पडतांच त्यांस त्यांची दया आली; व ते त्यांची शांतमुद्रा, परमार्थ प्राप्तीची उत्कंठेच्छा व अल्पवयांत त्यांचे ठायीं बाणलेलें

तीव्र वैराग्य इत्यादि सद्गुण पाहून हा पुरुष चतुष्टसाधनसंपन्न असून मोक्षाचा पूर्ण अधिकारी असावा; असें त्यांस वाटून म्हणाले:—

गुरुवरें कर ठेवुनि मस्तकीं । वदति भ्रांति हरीन समस्त कीं ॥
धरिया विषयीं मनि काळजी । कथिन ते तुज मी धरीं काळजीं ॥ १ ॥
करिन जो उपदेश तुला, मनीं । दृढ धरोनि बसे निज चिंतनीं ॥
मृगजलासम या भवसागरीं । न बुडतांचि उगा भय कां धरीं ॥ २ ॥
नर तटस्थ जरी उदका मधीं । निरखितां प्रतिबिंब बुडे कधीं ॥
न बुडतां बुडलों ह्मणतो जसा । न भवसागरसंग तुला तसा ॥ ३ ॥

याप्रमाणें रामानंद स्वामीनीं त्यांस अभय वचन देऊन आपल्या आश्रमीं ठेवून घेतले; व विठ्ठलपंतानींही स्वामीची आज्ञा शिरसा मान्य करून ते त्यांच्या मठांत मोठ्या आनंदानें राहिले. त्या दिवसापासून विठ्ठलपंतानीं त्या यतिश्रेष्ठांचीं श्रद्धापूर्वक अशी सेवा केली कीं, थोड्याच कालांत स्वामी सुप्रसन्न झाले; व योग्य दिवशीं त्यांस सन्यासदीक्षा देऊन त्यांचें चैतन्य असें नामाभिधान ठेविलें. नंतर ते त्यांस वेळोवेळीं बोध करीत असत. एके समयीं यतिश्रेष्ठ व विठ्ठलपंत हे स्वस्थ चित्तानें बसले असतां स्वामीनीं त्यांस अध्यात्मज्ञानाचा उपदेश केला. त्याचा सारांश येथें देतो:—

विठ्ठलपंतांस ज्ञानोपदेश.

तूं एकला तुजवरी घडले अनेक ॥
जें वस्तुता न दिसतें करितां विवेक ॥
झाला उगाचि भ्रम जेंवि भुजंग दोरीं ॥
मिथ्या वरी उठति भ्रांति नसें विचारीं ॥ १ ॥

तें माच तूं विसरला तुझिया मुळाला ॥
जो एकला परि न जाणुनि या खुळाला ॥
ते सर्व खेळ अवघे तुझिया मनाचें ॥
कल्पोनि कल्प मनिं जाय तुझ्यांत नाचें ॥ २ ॥

तूं निर्विकार अनिवार सुखस्वरूप ॥
झालें अहंपण तुझ्यांत विकार रूप ॥
विस्तार सर्व घड ा मग हा तयाचा ॥
देहादि सर्व जडभा पुढें जयाचा ॥ ३ ॥

अज्ञान हें तुजवरीं उपजोनि तूंतें ॥
झांकोनियां मिरवती वरि पंचभूतें ॥
दृष्टांत यासि कथितों तुज शिष्यराया ॥
ऐकोनि तो दृढ धरीं हरि सर्व माया ॥ ४ ॥

सूर्या रीं किरण त्यावरिं अभ्र आलें ॥
तें सूर्यतेज मुळींच न दिसें लपालें ॥
संपूर्ण अभ्रमय जें नयनासि भासें ॥
तें भासणें समज कीं रविच्या प्रकाश ॥ ५ ॥

अभ्रांत दृष्टि पसरे तंव सूर्य नाहीं ॥
ऐसें दिसें परि वसे रवि तेथ पाहीं ॥
जें अभ्र तें उपजल किरणांत ज्याच्या ॥
तो शुद्ध सूर्य कधिं संग तया न याचा ॥ ६ ॥

तूं निर्विकल्प रवि शुद्ध तुझ्या स्वरूपीं ॥
स्फूर्ती अहं किरण ज्ञान उठे अरूपीं ॥
ज्ञानप्रभेवरि उठे बहुनाम रूपें ॥
अभ्रें रवीसि तुज झांकिति शु रूपें ॥ ७ ॥

ज कां अहंपण तुझें उठल तुझ्यांत ।।
तेणेंचि सर्व रचिलें विषयादि जात ॥
तूं कल्पना रहित कल्पित मीपणाते ॥
सांडोनि लक्षित रहा निज आपणाते ।। ८ ।।

अज्ञानें तुज माजि वृत्ति उठती त्या देखसी एकला ।।
तूं चैतन्य परंतु सूक्ष्म मुक्तिचा जो मार्ग तो चूकला ।।
त्याला तो व्यतिरेकें अन्वय असा अभ्यास जे साधिजे ॥
ब्रह्मानंदनिमग्नरूप मुक्तिची जी खूण ती लाधिजे ।। ९ ।।

विसर न तुज तूं जो सच्चिदानंदरूप ॥
जरि तुजवरि भासे इंद्रि‍यां विश्वरूप ॥
समज सकल दृष्टा दृश्य आत्माचि सारा ।।
उलटोनि अवलोकीं आपणा निर्विकारा ।। १० ।।

भक्तहो याप्रमाणें श्री रामानंदस्वामींनीं विठ्ठलपंतांस ब्रह्मस्वरूपाची ओळख करून देऊन योगमार्गही सांगितला. " अगोदर सोन्याचें आणि त्यावर कोंदण जडावाचें " मग काय विचारायाचें ! तद्वत् विठलपंतांस पूर्वींपासूनच अध्यात्मविषयाची गोडी होतीच; आणि त्यावर सद्गुरुचा अंतःकरणांत ठसण्यासारखा सदुपदेश ! या योगें विठ्ठलपंत अल्पकाळांतच समाधिसुखाचा निश्चल अनुभव घेऊं लागले; व काशीवास हें त्यांचें अक्षय्य निवासस्थान झालें असें ते मनांत दृढ धरून सद्गुरुसेवा, समाधियोग व ईश्वर चिंतन अशा आनंदमय स्थितींत कालक्रमणा करीत असत !!

रुक्मिणिबाईचें अनुष्ठान.

इकडे अलंकापुरीस पतिवियोगाच्या जबरदस्त धक्यानें विव्हल झालेली साध्वी रुक्मिणीबाई अगदीं आसन्नमरणप्राय झाली. तिनें अन्नपाणी वर्ज केलें, उपास तापास करून ती आपलें शरीर झिजवूं लागली. केव्हां तरी पति परत येईल, अशी तिला दृढतर आशा होती; परंतु पुढें एके दिवशीं " आपला पति चतुर्थाश्रम घेऊन काशीक्षेत्रीं राहिला; व त्यांस श्री रामानंदस्वामींनीं संन्यासदीक्षा दिली. " असें त्या माऊलीला कोणा एका बैराग्याच्या मुखानें कळलें; तेव्हां काय विचारावयाचें! अग्निकुंडांत घृताहुती टाकल्यानें जशी ज्वाला भडकते; त्याप्रमाणें त्या साध्वीच्या अंतःकरणांत पतीच्या कायमच्या विरहानलाची ज्वाला भडकली! पहा—जेव्हां अरण्यवासांत असतांना महान् पतिव्रता दमयंतीस अकस्मात नळराजाचा वियोग झाला; किंवा अग्निप्रलयकालीं सति तारामतीस हरिश्चंद्राचा वियोग घडला; तद्वत् पतीच्या संन्यासग्रहणाची वार्ता ऐकल्याबरोबर पतिभक्तिपरायण रुक्मिणीबाईची महान् कष्टद स्थिति झाली! तिनें मोठ्यानें हंबरडा फोडून आकांत मांडला, आंग धरणीवर टाकलें, व तिला त्या वेळीं प्रबल मूर्च्छना येऊन ती जमीनीवर चलवलन रहित होऊन पडली! तिची ही भयंकर स्थिति पाहून तिच्या वडिलानीं, मातोश्रीनीं व ग्रामांतील चार शिष्ट जनांनीं सावध करून तिला अनेक प्रकारच्या बोधपर गोष्टी सांगून तिचें

समाधान केलें. मग त्या साध्वीनें आपल्या मनांत त्या सर्व गोष्टींचा विचार करून अस्वस्थ चित्तास स्थीरता आणली. या पुढें हा देह सार्थकी लावावा, कांहीं पुण्य आचरावें व आनंदवृत्तीनें रहावें असाही विचार केला. तिनें अश्वथ्थास[1] प्रदक्षणा घालण्याचा निश्चय करून मनमुहुर्तावर नियमाप्रमाणें आचरण करण्यास प्रारंभही केला. याप्रमाणें सति रुक्मिणीबाईनें असह्य कष्टद स्थितींत एक तप ह्मणजे बारा वर्षे घालविलीं. त्या तपाचरणाचें महत्पुण्यफल एका सुयोग्य वेळीं तिला कसें प्राप्त झालें तें पहाः—

विठ्ठलपंतांचा काशीवास सद्गुरूच्या कृपेनें सुखकारक झाला; हें मागें सांगितलेंच आहे. ज्या सद्गुरूच्या कृपेनें त्यास ही आनंदमय स्थिति प्राप्त झाली, ते जगदोद्धारक महात्म्ये रामानंदस्वामी आपला पट्टशिष्य चैतन्य [विठ्ठलपंत] यांस मठाचा सर्व अधिकार सोंपवून ते श्री रामेश्वराच्या यात्रेस निघाले. उत्तरेकडील सर्व तीर्थे करीत करीत ते आलंकापुरीस आले; व ज्या अश्वथ्थाला साध्वी रुक्मिणीबाई नित्य नियमानें प्रदक्षणा घालीत असे, त्याच अश्वथ्थाच्या पारावर ते आसनस्थित झाले. त्या दिवशीं ती माऊली मोठ्या पांहटेस उठून अश्वथ्थाला प्रदक्षणा घालण्याकरितां आली; आणि पहाते तों तेथें एक तेजःपुंज यतिमूर्ति दंड—कमंडलुसह कडासनावर विराजमान झाली आहे, असें रुक्मिणीबाईच्या

१ हा वृक्ष श्री ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीजवळ प्रदक्षणेच्या वाटेवर आहे.

दृष्टीस पडलें. त्या यतिश्रेष्ठांची सतेज व शांत—दांत मुद्रा पाहून त्यांच्याविषयीं तिचे ठायीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली; आणि या यतिमहाराजांस आपल्या पतीची कांहीं वार्ता विचारावी, या हेतूनें त्या माऊलीच्या प्रदक्षणा संपूर्ण झाल्यावर त्यांच्या जवळ जाऊन तिनें त्या यतिश्रेष्ठांस नम्रतापूर्वक वंदन केलें. स्वामिनींही शास्त्रनियमाप्रमाणें तिला **पुत्रवत्तिभव** असा आशिरवाद दिला. स्वामीच्या मुखांतून निघालेलीं अक्षरें कानीं पडतांच रुक्मिणीबाईची मुद्रा खिन्न झाली ! तें पाहून स्वामी म्हणालें कीं, मातोश्री ! तुमची मुद्रा एकदम अशी उदास कां झाली ? त्यावर त्या माऊलीनें विनयपूर्वक ह्मटलें कीं, महाराज ! “ अग्निकुंडांत बीज पेरून त्याचा वृक्ष बनणें, किंवा खडकावर पर्जन्याची वृष्टि होऊन त्यावर तृण उद्भवणें, अथवा तेलावांचून दीप प्रकाशीत होणें, हें जसें घडणें अशक्य; तद्वत् पतीनें संन्यास घेतल्यावर मला पुत्रप्राप्ति होणेंही असंभवनीय होय; परंतु सत्पुरुषांचा आशिरवाद मिथ्या होणें शक्य नाहीं, असा शास्त्र सिद्धांत आहे; त्याअर्थीं आपला आशिरवाद पुढील जन्मीं सफळ होईल कीं काय असें वाटून मला आश्चर्य वाटलें; व लागलीच खिन्नताही आली ! यांत मजकडून कांहीं प्रमाद घडला असल्यास त्याची स्वामीनीं या अबलेला क्षमा करावी.

पुन्हां गृहस्थाश्रम.

त्या साध्वीचा हा वृत्तांत ऐकतांच स्वामीस मोठे आश्चर्य वाटून

ते ह्मणाले:—“ ज्यांनीं तुमच्या पतीस संन्यास दिला असेल, त्याला शास्त्रनियमाप्रमाणें प्रायश्चित्त द्यावें लागेल; आणि तरुण वयांत त्यांतून संतान नसलेल्या स्त्रियेचा त्याग करून संन्यास घेणारासही शास्त्रांत मोठा दंड सांगितला आहे. ” बरें मातोश्री, ज्यांनीं आपल्या पतीस संन्यास दिला त्यांचें नांव वगैरे आपल्यास कांहीं माहीत आहे काय? असें स्वामीनीं विचारतांच ती माऊली ह्मणाली:—“ काशीक्षेत्र निवासस्थ श्री रामानंदस्वामी ह्मणून कोणी यतिश्रेष्ठ आहेत, त्यांनीं माझ्या पतीस संन्यास दिल्याचें मी ऐकलें आहे. ” हे शब्द श्रवणीं पडतांच स्वामीच्या हृदयास लागून त्या योगें ते क्षणएक स्तब्ध झाले. मग आपल्या मनांशी ह्मणतात. ‘ माझा पट्ट शिष्य जो चैतन्य ह्मणजे पूर्वाश्रमाचा विठ्ठलपंत त्याची पूर्ण चौकशी न करतां त्याचा कडकडीत विरक्तपणा पाहून मी त्यास संन्यासदीक्षा दिली, तोच या साध्वी रुक्मिणीबाईचा पती असावा, यांत संशय नाहीं. होणार तें होऊन गेलें; आतां त्याच्यावर क्रोध करणें ह्मणजे आपल्या अंगीं कलंक असून चंद्रमानें तारांगणास हंसणें, किंवा सागराचे ठायीं क्षारत्व असून त्यानीं गंगेची निंदा करणें, अथवा आपले नासिक सरळ नसून दर्पणांत पाहून त्यावर रागावणें हें जसें अयोग्य आहे; त्याप्रमाणें त्याच्यावर आमचें रागावणें हास्यास्पद होईल.’ असें जाणून मग त्यांनीं शांतपणानें व गंभीरवाणीनें ह्मटलें: “ मातोश्री इतःपर तुम्ही अगदीं काळजी

करूं नका. माझ्या आशिरवादाप्रमाणें खरोखर तुह्मी पुत्रवती व्हाल." असें अभयवचन देऊन "तुह्माला आई—बाप—बंधु वगैरे कोणी आहेत काय?" असें स्वामीनीं विचारतांच "आई—बाप आहेत" म्हणून त्या साध्वी रुक्मिणीबाईनीं सांगितलें तें ऐकून यतिश्रेष्ठ ह्मणाले कीं, आतां तुमच्या वडिलांस आमचेकडे घेऊन या. मनाला आनंद देणारे स्वामीमहाराजांचे हे शब्द ऐकून ती माऊली तत्काल घरीं गेली; आणि आपल्या पित्यास यतिश्रेष्ठांकडे घेऊन आली. सिधोपंतानीं यतिश्रेष्ठांचें तेजःपुंजरूप पाहिल्याबरोबर त्यांस परम आनंद होऊन त्यानीं त्यांस साष्टांग प्रणिपात केला. व करद्वय जोडून त्यांची प्रार्थना करून ह्मणाले: "यतिवर्य, आपलें निवासस्थान कोणतें? व कोणत्या हेतूनें तुमचें इकडे आगमन झालें. हें सविस्तर सांगितल्यास आमच्या जामातासंबंधी आपल्या चरणीं कांहीं विनंती करण्याचा माझा मानस आहे." त्यावर स्वामी ह्मणाले. 'आह्मी काशीक्षेत्राचे रहाणारे असून श्री रामेश्वरच्या यात्रेकरितां इकडे येणें झालें आहे. रामानंद मलाच ह्मणतात व मीच आपल्या जामातास संन्यासदीक्षा दिली. आतां तुमचे जामात तुमच्या स्वाधीन करणें हीच आमची रामेश्वरची यात्रा समजून येथूनच आह्मी परत जाणार. गास्तव तुह्मीही आपल्या कन्येसह आमच्या बरोबर चलावें.' हें वामीचें भाषण श्रवण करितांच साध्वी रुक्मिणीबाईस जो आनंद ला तो अवर्णनीय आहे! सिधोपंतांसही आनंदाचें भरतें येऊन

त्यानीं पुन्हां स्वामीचरणावर मस्तक ठेवून नम्रपणानें म्हटलें: " आपण दयाघन सत्पुरुष अहांत! दुःखितांना सौख्य देण्याकरितांच आपला अवतार आहे!! यास्तव आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. आपण आपला स्वतःचा हेतू बाजूला सारून आम्हां दुःखीतजनांचे कल्याणाकारितां झटत आहांत; त्याअर्थी मी आपला अत्यंत आभारी आहें. आम्ही तुमच्या समागमे येण्यास सिद्ध आहोंत. येथून कधीं निघावयाचें त्याची मात्र आज्ञा व्हावी" सिधोपंतांचें हें भक्तिरसपूरित व विनययुक्त भाषण ऐकून यतिश्रेष्ठांस त्या उभयदांपत्याची करुणा आली; आणि लगलीच त्यांच्या आज्ञेप्रमाणें तयारी करून ते त्रिवर्ग तेथून प्रयाण करते झाले.

मजल दर मजल करीत करीत त्या उभयतांसह स्वामी महाराज काशीक्षेत्रीं येऊन दाखल झाले; आणि त्या दांपत्यांस सान्निधच पण किंचित आडबाजूला राहण्यास सांगून त्यानीं आश्रमांत प्रवेश केला. हें वर्तमान विठ्ठलपंत उर्फ चैतन्य यांस समजतांच स्वामीचें आगमन अकालीं झालें याचें मोठें आश्चर्य वाटून तत्काळ स्वामीजवळ येऊन त्यानीं त्यांच्या चरणावर मस्तक ठेवलें; आणि त्यावेळीं त्यांचे इंगळासारखे लाल झालेले नेत्र व अत्यंत क्रूर मुद्रा पाहून ते आपल्यास आत्तांच शाप देतात कीं काय असें त्यांस वाटलें. यामुळें चैतन्य मान खालीं करून स्तब्ध उभा राहिला. तेव्हां स्वामी ह्मणाले:— " चैतन्या! तूं माझ्याशीं मिथ्या बोलून संन्यासदीक्षा घेतलीस

ह्मणून यात्रा अपुरीच टाकून मला परत यावें लागलें. तूं विवाहित असून तुला कांता आहे कीं नाहीं बोल. अतःपर माझ्याशीं असत्य भाषण करशिल, तर त्याचा तूं दूरवर विचार कर." असें आपल्या गुरुचें भाषण श्रवण करितांच चैतन्याच्या अंगास दरदरून घाम सुटला; शरीर थरथरा कापूं लागलें; व भाषा अस्पष्ट उमटूं लागली. एवंच तो अगदीं घाबरून एकदम स्वामींच्या चरणावर दंडप्राय पडला. आणि ह्मणालाः—"गुरो! मी अपराधी आहे. मला आतां क्षमा करावी," अशी त्याच्या कंठांतून दीनवाणी निघतांच स्वामींचें अंतःकरण द्रवलें. मग स्वामींनीं अभय वचन देऊन आपल्या चरणावरून उठविल्यावर विठ्ठलपंतांस आपल्याजवळ बसवून घेऊन शांतपणानें म्हटलें—चैतन्या! संसारापासून तूं जरी विरक्त झाला होतास, तरी तुझ्या अस्तित्वावर व ऐश्वर्यावर सर्वथैव अवलंबून राहणारी तुझी सहधर्मचारिणी भार्या तरुण वयांत असतां व तिची संसाराविषयीं कोणतीही इच्छा परिपूर्ण न करितां तिला घरीं तळमळत ठेवून चतुर्थाश्रम स्वीकारणें तुला उचित नव्हतें. अस्तु. आतां तूं माझ्या आज्ञेनें आपल्या साध्वी पत्नीचा अंगिकार करून **पुन्हां गृहस्थाश्रम** स्वीकारावा!" असें ह्मणून त्यांनीं सिधोपंतांस व रुक्मिणीबाईस हांक मारतांच ते उभयतां आंत गेले. व त्यांनीं त्यांच्या समक्ष पुन्हां त्यांस म्हटलें:—"चैतन्या! एकदां संन्यासदीक्षा घेतल्यावर पुनरपि गृहस्थाश्रम स्वीकारल्यास शास्त्र विरुद्ध कर्म घडलें, असा

तुझ्या ठायीं कदाचित् विकल्प उत्पन्न होईल; तथापि त्याचा तूं आपल्या मनांत किंचितही विषाद न बाळगतां माझी आज्ञा प्रमाण मानून तूं आपल्या पत्नीचा स्वीकार कर, गृहस्थाश्रमीं हो, आणि चार मुलेंबाळें झाल्यावर मग खुशाल आमच्या आश्रमीं येऊन रहा."

पहा, आत्मज्ञानाकरितां मान–अपमान, लाभ–हानि व सुखः–दुख इत्यादिकांची ज्यानीं पर्वा बाळगली नाहीं; अशा पूर्ण वैराग्यसंपन्न पुतळ्यास ह्मणजे चैतन्य उर्फ विठ्ठलपंतांस ज्या यतिश्रेष्ठांच्या साहचर्यानें, शिक्षणानें व प्रसादानें वेदांतविषयक ज्ञान उत्तम प्रकारें प्राप्त झालें, परमार्थ व अमोघ शांतिभांडाराच्या किल्ल्या स्वाधीन झाल्या, त्या सद्गुरूच्या आज्ञेपेक्षां ज्यास अन्य वस्तु प्रियतर जगांत नाहीं, असें त्या विठ्ठलपंतास वाटून तात्काल त्यानीं आपल्या पत्नीचें पुनश्च पाणिग्रहण केलें. त्या वेळीं साध्वी रुक्मिणीबाईचा आनंद काय विचारावा!! ती मनांत ह्मणाली कीं, ज्या यतिश्रेष्ठांच्या कृपेनें आज मी धन्य झालें, ज्यांनीं या अनाथ अबलेला सनाथ केलें, त्यांचे उपकार मी कितीतरी मानूं! आपल्या विनवण्यानें, आर्जवानें व रुदनानें ज्या पुरुषांच्या मनावर यत्किंचित्‌ही परिणाम झाला नाहीं; व ज्यांच्याकरितां मला बारा वर्षे असह्य विरह सहन करावा लागला; त्या प्रियपतीची मनोवृत्ति स्वामींच्या एका शब्दानें पालटली. अशा त्या यतिश्रेष्ठांचा महिमा वर्णन करावा तितका थोडाच आहे! एक तपानंतर पतींनें पुन्हां आपला अंगिक

केला, ही गोष्ट सत्य आहे कां मला भ्रांति उत्पन्न झाली! मी स्वप्नांत तर नाहीं ना! अशा नाना तरंगांच्या लाटा त्या माउलीच्या हृदयसागरांत त्यावेळीं उचंबळूं लागल्या! आपण जागृतावस्थेंत असून या गोष्टीची साक्ष पटण्याकारितां प्रत्यक्षच आपल्या प्रियपतीची गंभीर मूर्ति आपल्या शेजारी उभी आहे, अशी तिची पूर्ण खात्री झाली. मग त्या माउलीनें स्वामीच्या चरणावर मस्तक ठेवून त्यांस प्रेमानें वंदन केलें; व स्मित वदनानें ह्मणाली कीं, "हे यतिवर्य! आपल्या कृपाप्रसादानें माझें पूर्व सुकृत आज उदयास आलें, किंवा माझी एकनिष्ठा फळास आली, हें मला कांहींच सांगता येत नाहीं; परंतु येवढें मात्र खरें कीं, साधूचें वचन कधींच असत्य होत नाहीं, ह्मणून जें ह्मणतात त्याचा आज मला पूर्ण अनुभव आला! यावरून मनुष्य जन्मास आल्यावर सत्पुरुषांचा कल्याणकारक आशिरवाद नेहमीं घेत असावा हें त्यांस उचीत होय! स्वामी महाराज, आपल्या एकवार दर्शनानें मी कृतार्थ झाले! मग जे आपले नित्य दर्शन घेत असतील, ते पूर्ण भाग्यवानच होत! आतां या दीन अबलेवर आपली कृपादृष्टी पूर्ण असावी." येवढें बोलून रुक्मिणीबाईनें यतिवर्यास पुन्हां साष्टांग प्रणिपात केला; तेव्हां त्या दयाघन स्वामीनें त्या माउलीस '**सौभाग्यवतीभव**' असा आनंदानें आशिरवाद देऊन ह्मटलें:—"मातोश्री! ही सर्व त्या जगन्नियंत्या परमेश्वराची लीला आहे. त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून

तुह्मीं प्रपंचराहटी आनंदानें चालवीत रहा; ह्मणजे तोच परमात्मा तुमचें योगक्षेम करील! हें ऐकून त्या माऊलीचा आनंद गगनांत मावेनासा झाला. मग त्रिवर्गांनीं यतिवर्यांस दंडवत प्रणाम केले; आणि त्यांची आज्ञा घेतल्यावर सिधोपंत आपली कन्या व जामात यासहवर्तमान तेथून निघून मजल दरमजल करीत आलंकापुरीस येऊन दाखल झाले.

एका तपापूर्वीं जें चैतन्य या नावानें काशीक्षेत्रांत चतुर्थाश्रमीं होते, तेंच आतां आपलें पूर्वींचें विठ्ठलपंत हें नांव धारण करून गृहस्थाश्रमीं बनले. तथापि त्यांनीं संपादिलेल्या ज्ञानाचा कधींही दुरुपयोग केला नाहीं. फक्त आश्रम मात्र बदलला; एवढेंच काय तें अंतर!! ते रात्रंदिवस हरीभजनांत निमग्न असत. विठ्ठलपंत आळंदीस आल्यावर त्यांच्याविषयीं गांवांतील कुटाळ लोक आपसांत कुतर्क करीत. "कोणी ह्मणावें, कायहो, प्रथम संन्यास घेऊन नंतर त्यांनीं गृहस्थाश्रम कसा स्वीकारला! कोणी ह्मणत कीं, त्याच्या पदरीं अतीशय दोष असल्यामुळें त्यास पुन्हां संसारांत पडण्याची इच्छा झाली! कित्येक तर ह्मणत, अहो! इंद्रीयदमन करण्याचें काम सोपें नाहीं. तीं आंवरण्याची शक्ति नसल्यामुळें तो आपला गृहस्थाश्रमीं झाला. ज्याप्रमाणें प्रथम अमृतप्राशन करून कांजीपान किंवा मद्यप्राशन करावें; तशांतलाच प्रकार हा!" अशा प्रकारें गावांत चाललेली कुटाळकी विठ्ठलपंताच्या कानावर गेली, पण

त्यांच्या हृदयांत अढळशांतीनें स्थान दिल्यामुळें त्यांनीं लोकनिंदेचा मुळींच विषाद मानला नाहीं. सुजनहो! विठ्ठलपंतांचें ज्ञान त्यांची गुरुभक्ति व वैराग्य इत्यादि त्यांच्या सद्गुणांचा किमपिही विचार न करतां अज्ञानानें व मत्सरानें दूषित झालेल्या कर्मजाडच लोकांनीं ज्ञानसंपन्न अशा विठ्ठलपंतास बहिष्कार घातला. यामुळें त्यांना अलंकापुरी सोडून अरण्यवास पत्करणें भाग पडलें, ह्मणजे त्याच गावांबाहेर आश्रम बांधून तेथें त्यांनीं वस्ती केली; पण भिक्षेकरितां मात्र त्यांस गांवांत जावें लागत असे. ते नित्य भिक्षाटणावर उदर-निर्वाह करून अखंड हरिभजन व गीता–भागवतादि ग्रंथांचें अव-लोकन करीत असत. अशा संकटसमयीं आपल्या मनाची शांत-वृत्ति मुळींच ढळूं न देतां ती उभयतां त्या निर्जन अरण्यांत आनं-दानें कालक्रमणा करीत राहिली!

निवृत्तिनाथादिकांचें जन्मवृत्तांत व माता-पित्यांचें पुन्हां काशीक्षेत्रीं गमन.

विठ्ठलपंत आपल्या कुटुंबासह अरण्यांत आश्रम बांधून राहण्या-पूर्वींच त्यांस जननिंदेचें अनेक आघात सहन करावे लागत असत; हें मागील वर्णनावरून सज्जनांच्या ध्यानांत आलें असेलच, परंतु द्वंद्वशुकाच्या भीतीनें गरूडपक्षी जसा उडून जात नाहीं, किंवा श्वान भुंकूं लागले असतां गज कधींही भीतिग्रस्त होत नाहीं; तसें ज्यांना सद्गुरुकृपेच्या योगानें शांतीचा घोट भरला त्यालाही जननिंदेची

महासागराप्रमाणें उसळलेली लाट काय करूं शकेल. सत्संगतीनें दुर्गुणी पुतळासुद्धां सद्गुणी बनु शकतो, मग विठ्ठलपंतांसारख्या शांत–दांत पुरुषांच्या साहचर्यानें मूळचीच जी सद्गुणमंडित व ज्यांच्याकरितां एक तप असह्य दु:ख सहन केलें. ती साध्वी रुक्मिणीबाई ही दुसरी ज्ञानकलाच झाली होती असें ह्मटल्यास प्रत्यवाय नाहीं. जसें मनुष्य पूर्ण ज्ञानी झाल्यावर त्याला जगांतील मिथ्याभासाचें कांहींच सुखदु:ख वाटत नाहीं; त्याप्रमाणें साध्वी रुक्मिणीबाईस जातिबहिष्कृतीचें, लोकनिंदेचें व अरण्यांतील एकांतवासाचें किमपीही दु:ख वाटत नसे; अशीं तीं उभयता पतिपत्नि अक्षयी ईश्वरभजनांत निमग्न होऊन आनंदानें कालक्रमण करीत असतां एक तप लोटल्यानंतर यतीश्वरअनुग्रहानें साध्वी रुक्मिणीबाई गरोदर राहिली; व चंद्रकलेप्रमाणें सतेज गर्भ वृद्धिंगत होत होत नवमासांतीं माया–मोहाची निवृत्ति करणारें सुंदर पुत्ररत्न प्रसवली. मनमोहक बालकाचा जन्म शके ११९५ माघ वद्य १ स झाला. हें बालक ईश्वर भजनाच्या योगानें जनओघ प्रवृत्तिमार्गापासून वळवून निवृत्तिमार्गास लावील असें जाणूनच कीं काय नकळे! या पुत्राचें नांव "**निवृत्तिनाथ.**" असें ठेविलें. पुढें सुमारें दोन वर्षांनीं ह्मणजे शके ११९७ श्रावण वद्य ८ स सुयोग कालीं ज्ञानेश्वरांचा जन्म झाला. हें बालक जन्मतांच ज्ञानी असल्यामुळें ज्ञानदेव असें नांव पावलें. त्यावर शके ११९९

कार्तिक शुद्ध १५ स ईश्वरप्राप्तीचा केवळ सोपान मार्ग म्हणजे ब्रह्मतत्त्वाच्या शोधाचा जणू काय जिनाच अशी दिव्य मूर्ति व तृतीय पुत्ररत्न साध्वी रुक्मिणीबाई प्रसवती झाली. आत्मतत्त्वाचे मार्ग दर्शक ह्मणजे 'सोपान' असें नामाभिधान ह्या दयाघनास प्राप्त झालें. शेवटीं शके १२०१ आश्वीन शुद्ध १ स स्वतः मुक्त असून केवळ दर्शनानेंच मुक्ति देणारी ज्ञानकला "मुक्ताबाई" या नांवानें एक कन्यारत्न अवतीर्ण झालें. याप्रमाणें साधुवाक्य सत्य करण्याकरतांच कीं काय मानवरूपानें परमेश्वराच्या चार विभूति अज्ञानास सुमार्ग दाखविण्यासाठीं भूमंडळावर जन्मास आल्या! एका तपापूर्वीं यतिश्रेष्ठांनीं दिलेल्या **पुत्रवति भव** अशा मंगलकारक आशीर्वादाचें फल सांप्रत प्राप्त झालें म्हणून साध्वी रुक्मिणीबाई आनंदानें डोलूं लागली. तशींच उत्तरोत्तर वाढत्या कलेच्या शुक्लेंदु प्रमाणें हीं चारी भावंडें अरण्यवासांतील सौख्यांत वाढूं लागलीं. तीं जन्मयोगी असल्यामुळें त्या चौकडीचें बालपणांतील अगाध ज्ञान विरागी विठ्ठलपंतांच्या अनुभवास येऊं लागलें. यामुळें हीं बालकें अखंड कीर्तिमान होतील असें जाणून ते आनंद सागरांत स्वेच्छेनुरूप पोहूं लागले.

निवृत्तिनाथ, ज्ञानदेव व सोपान हीं तिन्हीं मुलें आतां बरींच मोठीं झालीं आहेत असें जाणून त्यांची माता रुक्मिणीबाई एके दिवशीं आपल्या प्रिय पतीस अत्यंत नम्रतेनें ह्मणालीः—" मुलें मौंजीबं

धनास योग्य झालीं असल्यामुळें त्यांच्या व्रतबंधाचा विचार केल्यास बरें होईल." ही आपल्या पत्नीची योग्यकालीय सूचना लक्षांत आणून विठ्ठलपंत त्याचा विचार करूं लागले. मग दुसरे दिवशीं साध्वी रुक्मिणीबाई व आपलीं चारी कोमल बालकें यांसह विठ्ठलपंत आलंकापुरींत गेले. आणि तेथलि विद्वान आणि कर्मठ अशा ब्रह्मवृंदांस प्रार्थना करून ह्मणाले:—"महाराज; धर्मशास्त्राप्रमाणें आह्मी अपराधीच आहोंत, परंतु आतां आमच्यावर कृपा करून आह्मांला प्रायश्चित्त द्यावें; ह्मणजे या बालकांचा व्रतबंध करण्यास बरें होईल." विठ्ठलपंताचें हें भाषण झाल्यावर त्यांचे जेष्ठ पुत्र श्रीनिवृत्तिनाथ त्या ब्रम्हवृंदांस साष्टांग प्रणिपात करून ह्मणतात:—"महाराज, आपल्यासारख्या विद्वद्वर्य व पुण्यश्लोकांच्या दर्शनानें आम्हीं साहीजण पवित्र झालों आहोंत; तरी पण शास्त्र नियमाप्रमाणें आपण आह्मांस शुद्ध करून घेऊन या अपवादापासून मुक्त कराल तर आम्हीं कृतार्थ होऊं" या स्थलीं अधिष्ठित झालेले पंडित—शास्त्री—वैदिक वगैरे ब्रह्मवृंद नम्रतापूर्वक केलेल्या प्रार्थनेचें निवृत्तिनाथासारख्या बालकांचें मधूर भाषण ऐकून त्यांस करुणा उत्पन्न झाली आणि शास्त्र काढून पाहूं लागले. तों संन्याशास व त्यांच्या बालकांस पवित्र करून घेण्यासारखा आधार त्यांस कोठेंच सांपडेना. मग त्यां पैकीं प्रमुखांनीं विठ्ठलपंतांस सांगितलें कीं, "तुह्मांस पवित्र करून घेण्यास शास्त्रांत कोठेंच आधार आढळत नाहीं, त्याअर्थीं तुम्हीं देहांत प्राय:श्चित्त घ्यावें, किंवा

अनुतापयुक्त होऊन घोर अरण्यवास अंगिकारावा, याशिवाय तुह्मांला दुसरा मार्गच नाहीं." हें त्यांचें भाषण ऐकतांच पूर्वींपासूनच विरक्त असलेल्या विठ्ठलपंतांस ब्रह्मवाणीनें अधिक अनुताप उत्पन्न होऊन, "तुला मुलें-बाळें झाल्यावर मग आमच्या आश्रमीं खुशाल येऊन रहा." असें श्रीक्षेत्र वाराणशी येथें सद्गुरु रामानंद स्वामीनीं उच्चारलेलें वाक्य तत्काळ त्यांच्या लक्षांत आलें. मग काय! वैराग्य परिपूर्ण असे विठ्ठलपंत तत्काळ आपल्या पत्नीस म्हणाले कीं, "मी सद्गुरूच्या दर्शनास चाललों; तुला यावयाचें असल्यास चल." इतकेंच बोलून ब्रह्मवृंदांस नमस्कार केला व निवृत्तिनाथादि चारी मुलें जन्मयोगीच आहेत. यास्तव त्यांच्याविषयीं काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. त्यांचा पाठीराखा परमेश्वर आहेच! असें जाणूनच कीं काय! ते मोहपाशांत न पडतां मुलांशीं संभाषण करून तेथून शांतपणानें तत्काळ प्रयाण करते झाले. परंतु मातेची ममता अहेतुक असते. त्यामुळें साध्वी रुक्मिणीबाईस मुलांच्या वियोगजन्य दुःखाबद्दल अत्यंत वाईट वाटून मोहानें व्याप्त झाल्यामुळें त्या साध्वीचे नेत्र पाण्यानें भरून आले व कंठ सद्गदीत झाला, तरी पण पतीचेंच अनुकरण करण्याच्या सादिच्छेनें आपल्या बालकांकडे प्रेमभरित एकदां अवलोकन करून अंतःकरणांत त्या प्रेमाचीच लाट उसळल्या-बरोबर कनिष्ट मुलें सोपान व मुक्ताबाई या उभयतांस पोटाशीं कवटाळून धरून ती साध्वी दयार्द्र अंतःकरणानें म्हणाली, "बाळे

मुक्ता—बाळा सोपाना, तुह्मीं अगदींच लहान असून अज्ञात आहांत, ह्मणून सांगतें कीं, निवृत्ति दादा व ज्ञानदेव दादा यांच्याशीं तुम्हीं सख्यत्वानें वागून त्यांच्या अर्ध्या वचनांत रहात जा बरें! असा बोध त्या उभयतांस करून ती माऊली लागलीच जेष्ठ कुमाराकडे वळली; आणि मग श्री निवृत्तिनाथ व श्री ज्ञानदेव यांचीं मुखकमळें प्रेमानें कुरवाळून ती साध्वी म्हणते:—बाळानों, तुह्मीं सर्वजण जन्मतांच ज्ञानी आहांत; तुमच्या उपदेशाप्रमाणें आम्ही वर्तन करावें अशी तुमची योग्यता आतां पासूनच दृष्टोत्पत्तीस येत आहे; त्या अर्थीं मी तुह्मांला अधिक काय सांगणार? तुह्मीं ईश्वरांशच आहांत! ज्याअर्थीं लौकीक दृष्ट्या तुम्हीं माझ्या उदरीं आला आहां! त्या अर्थीं माता या नात्यानें तुम्हांला उपदेशपर दोन गोष्टी सांगणें हा माझा धर्म आहे; ह्मणून शेवटचें भाषण आज मी तुमच्याशीं करीत आहे. निवृत्तिनाथा, ज्ञानराजा!! सोपान व मुक्ता हीं तुमचीं लहान भावंडें आहेत. त्यांना बोधपर गोष्टी सांगत जा! त्यांच्यावर प्रेम करा! तुह्मीं चौघेजण आपण एक जीवच आहांत; असें मानून परस्परांशीं अत्यंत प्रेमानें वागा! व तुह्मीं आपला सर्व भार त्या दयाघन श्रीपांडुरंगावर टाकून त्याचें निरंतर भजन करीत रहा. दर आषाढीच्या व कार्तीकीच्या महोत्सवाला पंढरीस जाऊन भक्तीनें श्रीपांडुरंगचरणांचें दर्शन घ्या. साधुसंतांच्या संगतींत आपला काळ घालवा! आतां तुह्मीं पोरकीं मुलें झालांत तेव्हां जननिंदेचें अगणीत

अघात तुम्हांस सहन करावे लागतील ते आनंदानें सोसा. सर्व प्राणीमात्रांचे ठायीं परमेश्वराची व्याप्ति आहे, असें जाणून कोणाचाही हेवा किंवा अवहेलना करूं नका. ह्मणजे तो भक्तकामकल्पद्रुम प्रभू तुमचें योगक्षेम चालवील. बरें, जाऊं मी आतां! असें ह्मणत असतां त्या माऊलीचें नेत्र पुन्हां पाण्यानें भरून आले! हें पाहून ज्ञानराज मातोश्रीच्या चरणावर मस्तक ठेवून म्हणतातः—" मातोश्री! तुझा अमोल उपदेश आह्मीं अक्षरशः पाळूं. तूं आमच्याबद्दल यत्किंचितही काळजी बाळगूं नकोस! आह्मीं सर्वजण एक विचारानें वागून श्रीपांडुरंगावर दृढ श्रद्धा ठेवूं व त्याच्या नामसंकीर्तनांत आह्मीं आनंदानें काल घालवूं, आणि मातेः—

सर्व हा संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥
जाईन गे माय तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलीया ॥ २ ॥
सर्व सुकृताचें फळ मी घेईन । क्षेम हें देईन परब्रह्मीं ॥ ३ ॥
बाप रुक्मादेवीवर विठ्ठलाचि भेटी । आपुले संवसाटीं करूनि ठेला ॥ ४ ॥

श्री ज्ञानेश्वरांची बाल्यावस्थेंतील ही निश्चयात्मक दृढ भक्ति जाणून साध्वी रुक्मिणीबाईस परम हर्ष झाला. नंतर ती माऊली म्हणतेः— " स्त्रियांना पतिच दैवत असल्यामुळें ते ज्या मार्गानें जातील तो मार्ग स्वीकारणें हें मला उचित होय. बाळानों! आतां मी जातें बरें" असें सांगून ती माउली पाठमोरी होण्यापूर्वींच श्री निवृत्तिनाथ श्रीज्ञानेश्वर, सोपानदेव व माता मुक्ताबाई या बालमूर्तींनीं आपल्या मातेच्या चरणावर मस्तक ठेविलें; आणि ती माउली पुत्रवात्सल्यानें

त्या चौघानांही "कल्याणं भवतु" अशा सप्रेम अंतःकरणानें आशिर्वाद देऊन तेथून चालती झाली! आणि तें दांपत्य रामानंदस्वामीच्या पूर्वींच्या आज्ञेप्रमाणें श्री काशीक्षेत्रीं जाऊन त्यांचे आश्रमीं वास करिते झालें.

अहाहा! किती तरी त्या साध्वीची पतिनिष्ठा! तसेंच बाल्यावस्थेंतील त्या कोमल मूर्तींचें अगाध ज्ञान आणि धैर्य!! धन्य ती माऊली व धन्य धन्य तीं मुलें! अल्पवयस्क कोमल बालकांचा त्याग करून जाण्याचें अलौकिक धैर्य व पतिनिष्ठा इत्यादि सद्गुण संपन्न अशा माऊलीचें व लोकोद्धारक अशा ज्ञानसंपन्न मूर्तींचें जनन आमच्या या आर्यवर्तांत झालें असल्यामुळें आज आह्मां अज्ञ जनांचा उद्धार होत आहे.

सुजनहो! ज्यांनीं ज्ञानतीर्थाचें स्नान केलें अशा सत्पुरुषांनीं प्रायश्चित्त घ्यावें असें शास्त्र मुळींच सांगत नाहीं. कारण ते स्वतः पवित्र असतात. अशा चारही बालकांच्या मनाला ज्ञाति बाह्यत्वामुळें व मातापित्यांच्या वियोगामुळें यत्किंचितसुद्धां विषाद वाटला नाहीं; इतकेंच नव्हे तर त्या चारी तेजोमय मूर्ति एखाद्या योगेश्वराप्रमाणें निरंतर आनंदानें श्री पांडुरंगाचें भजन करीत रहात असत! तेथील कुटाळजन करीत असलेली छळणा, उपहास व निर्भर्त्सना वगैरे प्रमाद तीं अनाथ मुलें निमुटपणें सहन करीत; किंबहुना एखादे वेळीं गावांत भिक्षा न मिळाल्यास त्यांना कंद—

मुळांवरच निर्वाह करावा लागत असे! इतके प्रकारही झाले, तरी त्यांनीं आपल्या मनांत यत्किंचित्सुद्धां त्याची खंती बाळगिली नाहीं!! अशीं तीं जन्मविरागी मुलें केवळ लौकिकदृष्टचा ब्राह्मणांची विनवणी करीत होतीं. त्या ब्रह्मवृंदां पैकीं सज्जनांना मात्र आदि-मातेसह हे त्रैमूर्ति आमच्या या आलंकापुरी क्षेत्रांत अवतीर्ण झालेत कीं काय असें वाटत होतें! परंतु जन अपवादार्थ शास्त्रोक्त रीत्या 'तुह्मीं पवित्र आहांत' असें म्हणून ज्ञातींत घेण्याचें धैर्य त्यांना होईना.

माता व पिता या उभयतांनीं या अर्भकांचा त्याग करून तेथून निघून चालते झाले, तरी तीं लहान भावंडें तेथेंच आनंदानें बसलेलीं पाहून सज्जनांस त्यांच्या अलौकीक धैर्याचें मोठें कौतुक वाटलें आणि ते आश्चर्य चकीत होऊन स्तब्ध बसले! तेव्हां निवृत्तिनाथ ह्मणतातः—" अहो ब्रम्हवृंद! शास्त्रांत जर आम्हांला प्रायश्चित्त नाहीं तर मग आमची वाट काय! आह्मीं कोणता मार्ग स्वीकारावा हें आम्हांस कृपा करून सांगावें! असे त्या लहान अर्भकाच्या मुखांतून निघालेले करुणास्पद शब्द ऐकून ब्रम्हवृंदाची मति कुंठीत झाली. तथापि ते म्हणाले " आमच्यापेक्षां अधिक विद्वान, शास्त्रविशारद व महान पंडित असे ब्राह्मण पैठण क्षेत्रांत आहेत. तेथें तुह्मीं जाऊन त्यांचें पत्र घेऊन या, ह्मणजे आह्मी तुह्मांस पावन करून घेऊं." ही त्या द्विज श्रेष्ठांची वाणी ऐकून निवृत्तिनाथ म्हणतात—" आह्मी तेथें जाऊन त्यांना काय सांगावें!" आह्मी कसे आहोंत पहा—

निवृत्तिनाथादि भावंडांचा अपरोक्षानुभव.

नव्हे मी ते कांहीं त्रिदशगणगंधर्वऋषि ते ॥
नव्हे भूतें रात्रिंचरदितिज हो पुण्य जन ते ॥
नव्हे पक्षी नोहे मृगगण पशू वृक्ष जडही ॥
बटू संन्याशी हो वनचर नव्हे आश्रम गृहीं ॥ १ ॥
अनादित्वें आहे निबिड ह्मणती चिद्घन जया ॥
विनाशातें नेणें स्थिति जनन नेणोचि प्रलया ॥
निजानंदीं साक्षी स्वरुप अति माझें बुझ मनीं ॥
नव्हे मी तें कांहीं नभ-महत-तेजाप-धरणी ॥ २ ॥
नहो आह्मी कांहीं त्रिगुणचि महत्तत्त्व अथवा ॥
विराटात्मा नोहे अवगुण न मी जाण बरवा ॥
नव्हे कांहीं जें जें वदति जन जें त्याहुनि पर ॥
स्वरूपानंदीं मी निखिल सुख चैतन्य सुपुर ॥ ३ ॥
आह्मां धर्माऽधर्मी किमपि तरि संकल्प न वसे ॥
निषेधाचा हो कां किमपि निधिनिर्बंध न दिसे ॥
नसे भेदाभेदीं अढळ निजरूपीं दिसतसें ॥
अशा बोधानंदीं सहज सहजीं मी वसतसे ॥ ४ ॥

सारांशः—मी अमक्या देश—कोशाचा नव्हे, माझे कोणीच नाहींत व मी कोणाचा नव्हे. मला जन्म—मृत्यु, नाम-रूपही नाहींत. मी मनुष्य, देव, यक्ष, किन्नर, गंधर्व तशींच ब्राम्हण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र आणि ब्रम्हचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्याशी हीं कांहींच नव्हे, तर केवळ सच्चिदानंदरूप आहे. अशा प्रकारचे आह्मी असल्यामुळें प्रतिष्ठानक्षेत्रीं जाऊन तेथील ब्रम्हवृंदांस काय सांगावें!

अहाहा! श्रीनिवृत्तिनाथांचें केवढें हें अगाध ज्ञान! आणि त्यांतून ते अत्यल्पवयस्क!! अशा ज्ञानमयतेजोमूर्तींना अवतारी पुरुष नव्हत असें कोण म्हणेल! तीव्र वैराग्य, अढळ शांति व दृढ अपरोक्ष ज्ञान यांच्या प्राप्तीस्तव कित्येक महात्म्यांनीं बहुत कालपर्यंत शरीराला कष्ट देऊन घोरतर तपश्चर्या व नाना प्रकारचीं साधनें केलीं, तरी त्यांस या तिन्हीं गोष्टी एकदम साध्य झाल्या नाहींत. या कोमल ज्ञानसंपन्न बालकांच्या मुखांतील धीरोदात्त व गंभीर वाणीनें अलंकापुरींतील ब्रह्मवृंदास आश्चर्यानें चकीत करून त्यांची मति कुंठित केली. अस्तु. याप्रमाणें श्रीनिवृत्तिनाथांचें भाषण झाल्यावर त्यांच्या वाक्यास अनुसरून श्रीज्ञानराज म्हणतातः—

आकाश आपण या रिघे । कांइ आगी आपणया लागे ॥
आपुला माथा वळघे । आपण कोण्ही ॥
तरी कांहीं नाहीं सर्वथा । ऐशी जरी व्यवस्था ॥
तरी नाहीं हे प्रथा । कवणासि पां ॥
माल्हावितां दिवे । माल्हविते जरी माल्वे ॥
तरी दीपु नाहीं हें फावे । कवणासि पा ॥
कीं निदेचिनि आलेंपणें । निदेलें तें जाय प्राणें ॥
तरी निद भली हें कोणें । जाणिजेल पां ॥
म्हणोनी कांहीं नाहीं पण । देखता नाहीं आपण ॥
नोहुनि असणें न विणें । असणें जें ॥
जो निरंजनीं निदेला । तो आणिकी नाहीं देखिला ॥
आपुलाहीं निमाला । आठऊ तया ॥

सुजनहो! श्रीनिवृत्तिनाथांच्या पूर्वोक्त निर्वाणबोधामृताचें आणि वरील श्रीज्ञानेश्वरांच्या अनुभवामृत अपरोक्ष ज्ञानाचें विवेचन करून पाहिलें असतां त्या उभय ज्ञानमय मूर्तींच्या अनुभवाला, विद्वत्तेला, अध्यात्मविद्यानैपुण्याला व त्यांच्या दृढाअपरोक्ष ज्ञानाला कोण बरें माना तुकावणार नाहींत! निरनिराळ्या स्थळीं झालेल्या समाधीवरून त्यांचें तीव्र वैराग्य व ठिकठिकाणीं अधिकारी पुरुषांच्या तारतम्यानुसार त्यांस केलेल्या बोधामृतावरून त्यांची अध्यात्मविद्येची आणि परचित ज्ञानाची निपुणता व्यक्त होत आहे! भक्त हो! वर दर्शविलेल्या श्री निवृत्तिनाथ व श्री ज्ञानेश्वर या उभयतांच्या अनुभवीक निर्वाण वचनांवरून त्यांची नैष्कर्म्यसिद्धि तर झालीच! आतां त्या उभय ज्ञानमय मूर्तींच्या धोरणास अनुसरूनच सोपानदेव व माता मुक्ताबाई यांच्या निस्सीम भक्तीवरून त्यांचेंही नैष्कर्म्यत्व सिद्ध करण्यास या खालीं उभयतांच्या अमृतरूप वचनांचें निरूपण करतों. तें असें:—

सोपानदेवः—ज्ञानेश्वर दादा! ज्ञात्या पुरुषानें वेदविहित कर्मे जरी केलीं, तरी भक्तिवांचून ईश्वरा (परमपदा) ची प्राप्ति होत नाहीं. भक्तिच प्राणिमात्रास मुक्ति देते. परमेश्वर प्राप्तीला ज्ञातीची व कुलाची अवश्यकता नाहीं. पहा—दुर्वास ऋषि, वसिष्ट महामुनि, गौतम, वेदव्यास, वाल्मिकी, मातंग महामुनि व अगास्ति ऋषि इत्यादि ऋषि-मुनींचें कुल उत्तम आहे, असें कोणतें शास्त्र सांगतें!

श्रेष्ठ कुलांत जन्म झाला व श्रुति-स्मृतींचाही पुष्कळ अभ्यास केला, परंतु ज्या प्राण्याच्या अंतःकरणांत ईश्वरभक्तीचा जर अलोट प्रेम नसेल, तर तो जन्मून व्यर्थच होय !

मुक्ताबाईः—सोपान दादा ! तुमचें ह्मणणें मला बरोबर पटलें. खरोखर भगवत्कथा फार आनंददायक असून त्या चित्तास शांति उत्पन्न करणाऱ्या आहेत. ईशकथाश्रवणांत जो काल जातो, तोच सार्थकी लागतो ! ज्या अधिकारी पुरुषांनीं भक्तिरसाचें पान केलें आहे, त्याला इतर पदार्थांची गोडी कितीशी लागणार. अमृतपान केलेला मनुष्य जसें मद्यप्राशन करण्याची इच्छा करीत नाहीं; तद्वत् भक्तिरस चाखलेल्या भगवद्भक्तास वर्णाश्रमधर्माची चाड मुळींच नसते. यास्तव आपण भगवन्नामसंकीर्तनांत रंगून जाणें हेंच हितावह होय.

याप्रमाणें श्री निवृत्तिनाथादि भावंडांची अमृतरूपी वाणी श्रवण करून ते द्विजश्रेष्ठ तटस्थ झाले, आणि ह्मणूं लागले:—" अहो ! तुह्मी अत्यंत ज्ञानसंपन्न असून प्रत्यक्ष ईश्वररूप आहांत ! त्या अर्थीं आह्मी तुम्हांस पावन तरी काय करणार ! तुम्हांस पवित्र करून घेण्यासारखें आमच्या अंगीं सामर्थ्य नाहीं. तुमच्या ज्ञानांजनशलाकानें आमचे अज्ञानपटल दूर होऊन आमच्या अंतःकरणांत लख्ख प्रकाश पडला. आतांच आम्ही तुह्मांस पवित्र मानून जर तुमच्याशीं व्यवहार करूं लागलों, तर प्रतिष्ठान व वाराणश्यादि क्षेत्रवासी

द्विजश्रेष्ठ आमच्यावर ग्रामण्य रचून आम्हांस ज्ञातिबहिष्कृत करतील, म्हणून आम्ही तुमच्या जवळ पत्र लिहून देतो, तें घेऊन जाऊन तेथील ब्रह्मवृंदाकडून त्यांचें उत्तर आणा; म्हणजे आम्हांस कोणीही प्रतिबंध करणार नाहीं. या विचारास निवृत्तिनाथांनीं आपली मान्यता दर्शविली; तेव्हां त्या विद्वान व कर्मठ द्विजवर्यांनीं आपल्या सह्या-निशी पत्र लिहून निवृत्तिनाथांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं तें घेऊन आपल्या भावंडांसह तेथील ब्रह्मवृंदास साष्टांग प्रणिपात करून प्रतिष्ठान क्षेत्रीं जाण्याकरितां लागलेंच प्रयाण केलें.

श्री निवृत्तिनाथांस गहिनी नाथांचा बोध.

सुजनहो ! आलंकापुरीहून निघालेली ही बालयोग्यांची चौकडी स्वच्छंदानें ईश्वराची लीला गात गात गोदावरीच्या काठीं त्र्यंब-केश्वरीं पोंचली. तें स्थळ त्यांना अत्यंत रमणीय वाटल्यावरून कांहीं दिवस तेथेंच राहण्याचा त्यांनीं निश्चय केला; आणि त्याप्रमाणें ते राहिलेही. उंचसखल डोंगरांचे कडे व त्यावरील अनेक प्रकारच्या वनस्पती, सुगंध पुष्पलता, सदैव फलदाती वृक्षराजी, डोंगरांतून खळखळ वाहणारे सुदंर व निर्मळ उदकाचे झरे इत्यादि पाहून निरंतर प्रपंचांत निमग्न झालेला व दुःखातिशयानें त्रासलेला मनु-ष्यही विरागी बनून त्याचें अंतःकरण सुप्रसन्न होईल; मग जे मूळचेच वितरागी त्यांचें चित्त त्यास्थळीं रममाण झालें यांत नवल तें काय ! अस्तु. अशा त्या रमणीय व पवित्र स्थळीं निवृत्तिनाथ, श्री

ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई यांनीं वास करून परमेश्वराच्या नामसंकीर्तनांत तल्लीन होऊन कालक्रमणा करीत असत. एके दिवशीं निवृत्तिनाथ मोठ्या पहाटेस उठून आपल्या भांवडांस न विचारतां एकटेच श्री त्र्यंबकेश्वराच्या दर्शनास गेले. त्यांनीं श्री शंकराचें भक्तिपूर्वक दर्शन घेऊन त्यास प्रदक्षणा घालीत असतां अकस्मात नवनाथांपैकीं श्री गोरक्षनाथांचे शिष्य गैनीनाथ ह्यांचें दर्शन झालें. त्या गैनीनाथानीं निवृत्तिनाथांची ती कुमारावस्था व विरक्तात्मक मुखकमल व शांत वृत्ति पाहून त्यांचें अंतःकरण प्रेमानें उचंबळूं लागलें. इतक्यांत त्यांच्या पितामहास ह्मणजे गोविंदपंतांस दिलेल्या उपदेशाचे गैनिनाथानें अंतर्ज्ञानानें जाणून ते ह्मणाले,—"बाळा! अशा कुमार वयांत तुला कोणत्या कारणानें वैराग्य प्राप्त झालें; आणि तुला माता–पिता, भाऊ–बंधु वगैरे कोणी आहेत काय!" निवृत्तिनाथांनीं हें गैनीनाथांचें भाषण ऐकून त्यांना प्रणिपात केला; आणि आपली सकल पीठिका त्यांस सांगून आम्ही कशा करितां बाहेर पडलों, व पुढें कोठें गमन करणार हेंही सांगितलें. तेव्हां गैनी-नाथांनीं हा प्राणी केवळ श्री शंकराचा अवतार असून यांचीं भांवडें श्री विष्णु, ब्रह्मदेव आणि आदिमाया असून हे भूलोकीं मानव रू-पानें अवतीर्ण झाले आहेत. आतां आपण यास बोधामृताचा घोटा प्राशन करवून कृतकृत्य करावें, असें मनांत आणून ते ह्मणतातः—"तुह्मी सर्व भांवडें ईश्वरांश अहांत! तुह्मांला मी उपदेश करावा

असें कांहीं नाहीं. परंतु श्रीरामचंद्र व श्रीकृष्णपरमात्मा यांना लौकिकरीत्या वसिष्ठ व संदीपन यांनीं उपदेश केल्यानें ते जीवन्मुक्त झाले. त्याप्रमाणें तुझ्यासारखा उपदेशास योग्य पुरुष मला मिळाल्यावर मी धन्य कां होणार नाहीं " गैनीनाथांच्या या प्रेमळ वाणीनें निवृत्तिनाथांस परमानंद होऊन ते सद्गदीत कंठानें त्यांस म्हणतातः—" आपला कृपापूर्ण अनुग्रह आह्मांस प्राप्त झाल्यावर आमच्या जन्माचें सार्थक निश्चयानें होईल. " नंतर तें ऐकून गैनीनाथानें त्यांस एकांतस्थलीं नेऊन बोधामृत प्राशन करवून आपला वरदहस्त मस्तकीं ठेवतांच निवृत्तिनाथांस एकदम समाधि लागली ! मग कांहीं वेळानें समाधि उत्थान झाल्यावर आत्मानुभवाची योगयुक्ति सांगितली; ती अशीः—

बाळा ! ह्या श्वासोच्छ्वासरूप प्राणवायूचा विचार केला असतां त्यास प्राण—अपान ही संज्ञा प्राप्त झाली असून प्राणास सूर्य व अपानास चंद्रमा असें ह्मटलें आहे. हे प्राण—अपानरूपी सूर्य—चंद्र क्षणोक्षणीं उदयास्त पावतात. यांचा उदयादिक्रियेचा जो प्रकाशक तोच स्वयंज्योतीसाक्षी आत्मा प्राण—अपानाहून पृथक् असून आपल्या स्वरूपानें आपणच प्रकाशतो; परंतु त्याचा यथार्थ बोध

---

१ आदिनाथ गुरुसकळ सिद्धींचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ॥ १ ॥
मच्छिंद्रानें बोध गोरक्षासि केला । गोरक्ष बोलला गहिनीप्रती ॥ २ ॥
गहिनी प्रसादें निवृत्ति दातार । चोजविलें सार ज्ञानदेवा ॥ ३ ॥
—पुढें विसोबा खेचर, नामदेव व जनाबाई अशी परंपरा आहे.

आचार्यद्वारा सूक्ष्म विचारावांचून होत नाहीं. आतां याचा विचार सांगतों:—

अंतरहृदयाकाश हें प्राणरूपी सूर्याचें उदय होण्याचें स्थान होय; आणि नासिकेपासून बारा अंगुळें बाह्याकाशांत अपानरूप चंद्रमाचें उदय होण्याचें स्थान आहे. यामुळें अंतरहृदयाकाशापासून प्राणरूपी सूर्य उदय होतो. तो आपल्या गतिरूप क्रियेचे ठायीं प्रवर्तत असतां बाह्य अपानरूप चंद्रमाच्या स्थानीं जाऊन अस्त होतो. अशा उदयास्तात्मक प्राणक्रियासह प्राणाशीं मिळून जो प्रकाशतो आणि विक्रियेस प्राप्त होत नाहीं तोंच ज्ञानरूपसाक्षी आत्मा होय. जेव्हां प्राणरूपी सूर्य अपानरूप चंद्रमाच्या स्थानाचे ठायीं अस्त होतो; आणि अपानरूपी चंद्रमा आपल्या स्थानाहून उदय पावलेला नसतो ह्या मध्य संधींत ह्मणजे प्राणाचे रेचक व अपानाच्या पूरकाअंतीं आणि अपानाचें रेचक व प्राणाच्या पूरकापूर्वीं जी कुंभकरूपा आहे, ती प्रकाशत असतां जो निर्भ्रमि भासतो, तोंच कूटस्थ साक्षी आत्मा होय. जेथें प्राणरूपी सूर्य अस्तमान पावतो असा अपान स्थानापासून अपान—(अंतरगामि प्राण) रूप शीतल प्रभा पाडणारा चंद्रमा उदय होऊन आपली अंतर्गत क्रिया करीत असतां प्राणरूपी सूर्यस्थानीं ह्मणजे हृदयकोटींत जाऊन अस्त होतो. ही जी अपानरूप चंद्रमाची उदयास्तादिरूप क्रिया तिनें युक्त आपानरूप चंद्रम्याशीं मिळून त्यास

आपल्या स्वस्वरूपानें प्रकाशतो, तोच स्वयंप्रकाश आत्मा होय. जेव्हां अपानरूपी चंद्रमा प्राणरूप सूर्याच्या हृदयस्थानीं लय पावला, परंतु तेथून प्राणरूपी सूर्य उदय झालेला नसतो, या मध्यसंधीत ह्मणजे अपानाचें रेचक व प्राणाच्या पूरकाअंतीं आणि प्राणाचें रेचक व अपानाच्या पूरकापूर्वी जी कुंभकरूपा आहे, ती स्वस्वरूपानें प्रकाशत असून जो निर्भ्रम भासतो, तोच स्वयंप्रकाश, अक्रियसाक्षी आत्मा होय. वास्तविक विवेकचक्षूंनीं पाहिलें असतां प्राणादि सर्व संघातरूप उपाधि व त्याचे क्रियादि धर्म इत्यादिकांपासून रहित असंग, निर्लेप, अक्रिय, सदां उदितरूप, स्वयंप्रकाशसाक्षी आत्मा होय. उदाहरण—जसें मूल चक्रीस दोरी बांधल्यावर ती चक्रि फेंकून पुन्हां आपल्या हातांत खेंचून घेतो, व याप्रकारें क्रीडा करीत असतांही तें मूल त्या चक्रीची गमनागमनरूपक्रिया पावत नाहीं, तद्वत साक्षीरूप बालक प्राणरूप चक्रीस स्वसत्तारूप दोरी बांधून आपल्या द्रष्टत्वमानेंकरून श्वासरूपानें बाहेर फेंकतो; आणि पुन्हां निच्छ्वासरूपानें आपल्या हृदयरूप हातांत ओढून घेतो; पण आपण स्वतः प्राणरूप चक्रीशीं मिळून देखील गमनागमनादिरूप विक्रिया पावत नाहीं. कारण तो सर्वदां अक्रिय, निरुपाधि व स्वयंप्रकाशित आहे. ह्या निर्विशेष समानचैतन्य साक्षीच्या सत्तेनेंच इंद्रिय, प्राण, मनबुद्ध्यादि सर्व आपापले व्यापार करीत असतात. चैतन्य सत्तेवांचून इंद्रियादि सर्व लोखंडाच्या बाहुलीप्रमाणें जड आहेत, त्यांस

:वयंसत्ता नाहीं. जेव्हां चैतन्यरूप चुंबकाची सन्निधता पावतात, तेव्हां तीं लोहवत् चेष्टा करूं लागतात. याप्रमाणें साक्षी हा लोहचुंबकवत् अक्रिय व आपण जशाचा तसाच असतो. दृष्टांत—जशी चुंबकाची लोहचालक शक्ति ही लोहसान्निद्धतेमुळें विशेष अनुभवास येते. लोखंडाच्या सान्निध्यावांचून लोहचुंबकाची लोहचालनात्मक सत्ता जशी अविज्ञात, अवाच्य असते, व ती विशेष अनुभवास येत नाहीं तद्वत सत्तासमान साक्षी आत्मा विषय, इंद्रिय, प्राणादिकांच्या अवलंबनावांचून विशेष जाणण्यांत, पाहण्यांत येत नाहीं. कारण तें निर्विशेष, अविज्ञान, अवाच्य पद आहे.

अशा स्वप्रकाश आत्म्यास आचार्यद्वारा जाणून आपआपल्या अनुभवेंकरून मोक्ष पावतात. मुमुक्षुही आचार्यांच्या युक्तिवाक्यद्वारां श्रवण—मनन करून आचार्यांच्या अनुभवांत आपल्या अनुभवाची एकता करून सर्वगत चैतन्य, सत्तासमानांत निर्भ्रम, निर्विकल्प, नेस्तर्क, निःसंशय होऊन अखंड, अवाच्य, अनिवार्य परमशांति पावून संतुष्ट होतो. जेव्हां त्या निर्विकल्प स्थितींत आचार्यांचे अंतःकरणांतून शिष्यभाव व शिष्याच्या अंतःकरणांतून गुरुभाव हें परस्पर निघून जातात, तेव्हां दोघे एक सत्तासमानांत जणू कांहीं अनुगत असतात; ह्मणजे समुद्रास मिळालेल्या नदीप्रमाणें एकरूप बनतात. बाळ! तुला सांगितलेल्या ह्या सर्वात्मविचारानें अथपासून इतिपर्यंत मनन करून आपल्या स्वस्वरूपांत शांतात्मा होणें हाच परम

पुरुषार्थ, हेंच परम श्रेय, हीच परम कृतकृत्यता होय. याप्रमाणें संपूर्ण योगविद्या, मंत्र-तंत्रविद्या सांगून पुढें तूं आपल्या भावंडास असाच उपदेश कर, आतां मी जातों असें ह्मणून ते तत्काल अंतर्धान पावले. सद्गुरु गैनीनाथ गुप्त झाल्यावर निवृत्तिनाथ समाधि लावून स्वानंद-सुखाचा अनुभव घेत तेथेंच बसून राहिले.

इकडे श्रीज्ञानेश्वरादि प्रातःकाळीं उठून पहातात तों निवृत्तिदादा नाहींत! यामुळें त्यांस मोठी चिंता उत्पन्न झाली. "आजपर्यंत निवृत्तिदादा आपल्यास सोडून एकटेच कधींही कोठें गेले नव्हते असें असून आज एकाएकीं त्यांना जावयास काय कारण झालें असावें, आतां त्यांची गांठ कोठें पडेल, वनशोभा पाहण्याच्या हेतूनें एकटेच गेले किंवा कोठें वाट चुकले? काय झाले नकळे!!" अशा अनेक तऱ्हेच्या कल्पनांनीं त्यांचें चित्त अगदीं व्यग्र झालें. आतां येतील, मग येतील, अशा चिंतेंत तो दिवस गेला. नंतर दुसरे दिवशीं ज्ञानेश्वरादि त्रिवर्ग त्यांचा शोध करण्याकरितां निघाले. त्यांनीं तेथील लहानसान देवालयें, गोदावरी तीर, पर्वतांच्या गुहा वगैरें स्थानें धुंडाळलीं; परंतु त्यास निवृत्तिनाथांचा कोठेंही पत्ता लागला नाहीं; मग तोही दिवस असाच गेला. तिसरे दिवशीं सकाळीं उठून ते पुन्हां त्यांच्या शोधास लागले. डोंगरांतील एकूनएक गुहा शोधून पाहिल्या. शेवटीं एका गुहेंत निवृत्तिनाथ समाधि लावून बसलेले त्यांच्या दृष्टीस पडले. मग काय विचारावें! त्यांच्या आनंदास पारावारच नाहींसा झाला! एवंच

ब्रह्मांडांत माईना इतका त्या त्रिवर्गांना आनंद झाला. ते नाथांच्या जवळ आले, इतक्यांत त्यांची समाधीही उत्थान झाली ! मग परस्परांचें आलिंगन कुशलप्रश्नादिक झाल्यावर निवृतिनाथांनीं भावंडास सोडून गेल्यापासून ह्या वेळपर्यंत सर्व हकीकत त्यास सांगितली. आणि गुरु गैनीनाथांच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं आपल्या भावंडांस उपदेश केला. नंतर कांहीं काल त्या स्थळीं आनंदानें वास करून नंतर सर्व मंडळी प्रतिष्ठान क्षेत्रास जाण्याकरितां निघाली.

प्रतिष्ठानक्षेत्रीं गमन.

त्या चारी मूर्ति तिकडील प्रदेश व वनोपवनें पहात पहात प्रतिष्ठान क्षेत्रीं येऊन पोहोंचल्या. नंतर आलंकापुरीच्या द्विजवर्यांकडून आणलेलें पत्र त्यांनीं तेथील ब्रह्मवृंदास दिलें; आणि त्यांना प्रणिपात करून त्यांची विनयपूर्वक प्रार्थना केली. आळंदीचें पत्र पहातांच त्यांना समजून चुकलें कीं, हीं संन्याशाचीं मुलें आहेत. मग काय ! त्या ठिकाणीं जमलेले गांवांतील दुष्ट—सुष्ट लोक त्यांच्या संबंधानें आपआपसांत चर्चा करूं लागले. कोणी ह्मणत, “हें यतिपुत्र पावन होण्याकरितां येथें आले; पण मद्यघटाला गंगाजलानें स्नान घातलें तथापि तो शुद्ध होऊं शकेल काय ? किंवा दग्ध बीज भूमींत पेरलें, तरी त्याला अंकूर फुटेल काय ? नाहींच. तशीच हीं

सन्याशाचा मुलें कोणत्याही तीर्थाचे ठिकाणीं जाऊन यांनीं कितीही मोठें प्रायश्चित घेतलें तथापि ते शुद्ध होणार नाहींत! मग आलंकापुरींतील विद्वद्वर्यांनीं यांना येथपर्यंत येण्याचें श्रम तरी कां दिलें ?'' कित्येक संभावित, धर्मभोळें व सज्जन लोक निवृत्तिनाथादि भावंडांची ही करुणास्पद दीन स्थिति पाहून त्यांस त्यांची दया आली, म्हणून ते या अनाथांस प्रायश्चित्त देऊन अगर कोणत्याही प्रकारें शुद्ध करून घेतां येईल तर पहावें, अशा सद्बुद्धीनें ते धर्मग्रंथ चाळूं लागले; पण संन्याशाच्या मुलांना प्रायश्चित्त कशांतही सांगितलेलें नाहीं असें त्यांस आढळून आलें. तेंव्हा निरुपाय होऊन त्या सर्वत्रांनीं एकविचारानें त्यास सांगितलें कीं, "बाबांनो, धर्मग्रंथांत तुम्हांला प्रायश्चित्त देऊन पावन करून घेण्यास कोठेंच आधार सांपडत नाहीं; म्हणून आम्हांस फार वाईट वाटतें. तरी पण तुम्ही सर्व प्राणिमात्रांचे ठायीं एकच आत्मा आहे असें जाणून अंतःकरणांत भूतदया बाळगावी, म्हणजे गाय, गाढव, शेळी आणि श्वान सारखेच मानावें. सूकर आणि अंत्यज समसमान मानून सर्वत्र ठिकाणीं सारखी भावना ठेवावी व परमेश्वराला शरण जावें, या व्यतिरिक्त अन्य उपाय नाहीं." ही दयापूर्ण विप्रवाणी ऐकून निवृत्तिनाथादि भावंडांना परमानंद झाला. आमच्या मनांत होतें तशीच धर्मनीति निघाली; असें मुक्ताबाईनें बोलून दाखविल्यावर सर्वत्रांनीं त्या तिघांची अत्यंत स्तुति केली.

रेड्याकडून वेदोच्चारण.

इतका प्रकार झाल्यावर कांहीं कुटाळांनीं निवृत्ति-ज्ञानेश्वरादिकांची कुटाळकी करावी असा विचार करून त्यांपैकीं एकजण ह्मणतो,:— "यांच्या मातापित्यांनीं यांचीं नांवें मोठीं सर्वोत्कृष्ठ ठेविलीं आहेत. काय ह्मणे निवृत्ति! यांच्या मनाची निवृत्ति होईल तेव्हांना! प्रवृत्ति मार्गांत राहून निवृत्ति हें नांव त्यास कितपत बरें शोभेल? तसेंच ज्ञानेश्वरानें कोठें वेदाचा अभ्यास केला? कां यास कांहीं शास्त्रव्युत्पत्ति झाली आहे. श्रुति तर यांच्या डोळ्यांपुढूनसुद्धां गेली नसेल! 'नांव सोनुबाई पण हातीं कथलाचा वाळा!' या ह्मणीप्रमाणें सुंदर नांवें ठेवून यांना जगाच्या उपहासास मात्र पात्र केलें आहे. जशी गाय मोठी पुष्ट आहे, पण ती दुभती नव्हे; किंवा समरांगणांत जाण्याची पुष्कळ हौस आहे, परंतु अंगीं यत्किंचित्ही शौर्य नाहीं; तसें ज्ञानाची व यांची ओळख कां नसेना पण काय ह्मणे आम्ही ज्ञानदेव. वाहवा रे ज्ञान देवा!!" इतक्यांत एक पखाल घेऊन त्या रस्त्यानें रेडा चालला होता, त्यास पाहून त्यांच्यापैकींच एकजण त्याला उत्तर देतो, "अरे नांवापाशीं काय आहे? हा जो समोरून रेडा येत आहे त्याला आम्हीं ज्ञानदेव म्हटलें, म्हणून तो ज्ञानी झाला काय?" असें या चांडाळचौकडीचें चाललेलें संभाषण ज्ञानराज ऐकून शांतपणानें म्हणतात:—"द्विज श्रेष्ठहो! माझी थोडीशी प्रार्थना ऐका. या रेड्यांत व आमच्यांत वास्तविक पाहिलें असतां कांहींच भेद नाहीं! ज्याप्रमाणें एकच सूर्य सर्वत्र

ठिकाणीं व्यापक आहे; तसाच आत्मा हा सर्व व्यापी असून सर्व प्राणिमात्रांचे ठायीं एकच आहे.पहा. प्रकृति, पुरूष, महत्तत्व, अहंकार, पांच सूक्ष्म भूतें, पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, पांच महाभूतें, सत्व, रज, तम, हीं तीन तत्वें आणि मन, एकूण अठ्ठावीस तत्वें ब्रह्मदेवापासून तों स्थावरापर्यंत सर्व कार्यामध्यें प्रविष्ठ झालीं आहेत. आणि ह्या सर्व तत्वांमध्यें एक परमात्मा हें तत्व व्यापून राहिला आहे, म्हणजे कार्यकारणात्मक हें विविध विश्व दिसत असतांही तें ब्रह्मरूप कसें नव्हे! तेंच ब्रह्म सत्य होय. सत्य वस्तूचें स्वरूप त्रिकालाबाधित असून आदि, मध्य व अंत या तिन्ही अवस्थांत निर्विकार रहातें. जसा सुवर्णाचा अलंकार घेऊन विचार केला तर तो अलंकार तयार होण्याच्यापूर्वी सोनेंच असतें, व अलंकार मोडल्यावर सोनेंच राहीलें; तद्वत आदि, मध्य व अंत या अवस्थांत अबाधित असतें तचें ब्रम्हरूप होय. म्हणजे दृश्य जगत् असत्य असून परमात्मतत्त्व मात्र सत्य आहे. तें परमात्म तत्त्व या रेड्याच्या आणि माझ्या देहांत एकच आहे, त्याअर्थी त्यांत आणि माझ्यांत भेद तो काय?"

याप्रमाणें श्रीज्ञानराजांच्या मुखांतून निघालेला ज्ञानोपदेश त्या मूढांस काय होय! ज्याप्रमाणें सभास्थानीं बसलेल्या पंडितांचें वाक्पांडित्य ऐकून पांखांडी जनांच्या अंतःकरणास यत्किंचित्‌ही समाधान न वाटून तो आपल्याच गर्वानें पंडितांकडे तिरस्कारमुद्रेनें पाहतो,

त्याप्रमाणें वेदांतज्ञानरहित कर्मठ ब्राह्मण ज्ञानराजांचा तिरस्कार करूं लागले; आणि त्यांजकडे क्रोध दृष्टीनें पाहून ह्मणाले कीं, "अहो ज्ञानाचे राजे, बोलेल तो करील काय! व गर्जेल तो पडेल काय! या ह्मणीप्रमाणें ज्याच्या अंगांत बोलल्याप्रमाणें कृति करून दाखविण्याचें सामर्थ्य नाहीं, त्याची नुसती वाचाळताच पाहून घ्यावी. आपली बडबड पुरे करा आतां!" इतकें ह्मणूनच तो ब्राह्मण स्वस्थ बसला नाहीं. त्यानें आपल्या जाग्यावरून मोठ्या आवेशानें उठून त्या भिस्त्याच्या हातांतील आंसूड आपल्या हातांत घेतला व बिचाऱ्या रेड्याच्या पाठीवर त्यानें आसुडाचे दोनचार तडाखे मोठ्या जोरानें मारले. मग "पहातों या रेड्याच्या व आपल्या हृदयांतील आत्मा एकच आहे, कीं दोन आहेत ते" अशी मोठ्यानें गर्जना करून बोलला. तेव्हां काय चमत्कार झाला पहा! रेड्याच्या पाठीवर असुडाचे आघात होतांच श्री ज्ञानराजांचें सर्व शरीर कंपायमान होऊन पाठीवर मोठालें वळ उठलें!! हें त्या ब्राम्हणानें पाहतांच तो आपल्या मनांत दचकून किंचित् ओशाळला व तत्काल त्याचा क्रोध जरासा शांत झाला. तरी त्यानें ते कोणाच्या दृष्टोत्पत्तीस येऊं न देतां तो पुन्हां म्हणतोः—अहो, जशी आपण ही एक चमत्कारिक कृति करून दाखविलीत, तसेंच आपल्या ठिकाणीं असलेलें ज्ञान अथवा वेदवाणी वाणीरहित अशा ह्या हाल्याच्या मुखांतून वदावा बरें पाहूं? " 'कांहीं हरकत नाहीं;

तसेंही होऊं शकेल.' असें म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज लागलीच त्या रेड्याजवळ गेले आणि त्याच्या मस्तकावर आपला वरद हस्त ठेवून म्हणाले, "भो महिषराज, आपण ऋग्वेदांतील एखादी ऋचा म्हणून दाखवून कर्मनिष्ठ व वेदोनारायण अशा या द्विजश्रेष्ठांची इच्छा पूर्ण करा बरें!" अशी श्रीज्ञानेश्वरांची आज्ञा होतांच तत्काल त्या महिषवरानें एखाद्या उत्तम वेदाध्ययनी वयोवृद्ध ब्राह्मणाप्रमाणें वेदऋचा म्हणण्यास सुरवात केली! तेव्हां तेथें जमलेल्या सकल ब्रह्मवृंदांनीं हा अघटित चमत्कार अवलोकन करून परम आश्चर्यचकित झाले; इतकेंच नव्हें, तर त्या चतुष्पाद रेड्याच्या मुखांतून मनुष्यवाणीप्रमाणें निघालेली ती वेदपूरित वाणी श्रवण करून तत्काल त्यांचा गर्व जिरला, व अभिमान नष्ट झाला. मग ते विस्मयाकुल होत्साते त्यांच्या नेत्रांतून आनंदाश्रु स्रवूं लागले. अशा आनंदभरांत त्यांनीं श्रीज्ञानेश्वरावर "धन्य! धन्य!' या मोदमय शब्दांनीं पुष्पवृष्टि केली.

पैठणस्थ ब्रह्मवृंदांस झालेला पश्चात्ताप व बोध.

नंतर ते आपापसांत बोलूं लागले कीं, "आम्हीं रात्रंदिवस परिश्रम करून वेदाध्ययन केलें, उपनिषदादि वेदांतग्रंथांचीं अनेक पारायणें, स्नानसंध्या जप–तप वगैरे अनुष्ठानें केलीं, तथापि असा एखादा चमत्कार करून दाखविण्याचें सामर्थ्य आम्हांस प्राप्त झालें नाहीं. सृष्टिकर्ता जो ब्रह्मदेव त्याच्या

हातूनही जें होणें अशक्य तें या अल्पवयस्क कुमारांनीं सहज करून दाखविलें. यामुळें हीं मनुष्यें नसून अज्ञ जनांच्या उद्धारार्थ प्रत्यक्ष ब्रह्मा–विष्णु–शंकर व आदिशक्ति हींच अवतरलीं आहेत यांत संदेह नाहीं"!! अशा सुविचारानें ते अभिमानगलित झालेले ब्रह्मवृंद श्रीज्ञानराजांच्या चरणीं लोळण घालूं लागले. तेव्हां ते त्यांस उठवून म्हणतात. "द्विजश्रेष्ठ हो! असें करून मला पातकांत घालूं नका. आपण वयोवृद्ध व तपोवृद्ध आहांत, यास्तव मींच आपल्या पायावर लोटांगण घातलें पाहिजे. मी तुम्हांस साष्टांग नमस्कार करतों. तुम्ही ईश्वराचें मुख असून सद्धर्मपालक आहां! तुम्हां सर्वत्रांच्या अंगीं स्वभावतांच अत्यंत पवित्रता वास करीत आहे. त्यामुळें प्रत्यक्ष वेदोनारायण तुमच्या मुखांत तिष्ठत आहे. तुम्ही पवित्र तिर्थांचें तीर्थरूप असून वेदांचें दृढ कवच आहां! तुम्ही मंत्रविद्येचें केवळ माहेरघरच असल्यामुळें तुम्ही आपल्या क्रोधानलानें त्रैलोक्याला भस्म करून टाकाल! आणि कृपादृष्टीनें पुन्हां उत्पन्न करूं शकाल! इतकें सामर्थ्य तुमच्या अंगीं आहे. तुह्मी आपल्या तपोबलानें पराक्रमी अशा नहुश राजाला सर्पाधिपती केलें, श्रीविष्णूला लत्ताप्रहार केला, तरी तो तुमचा अपराध न मानतां तुमचें पदतल भूषण ह्मणून आपल्या हृदयावर वागवीत आहे. रमादेवी अत्यंत चंचल, परंतु तुमच्या आशिर्वादबलानें श्रीविष्णूचें रात्रंदिवस पादसंवाहन करीत आहे. तुमच्या आशि-

र्वादबलानेंच वैश्वानर अग्नि तेजयुक्त होऊन सर्व पदार्थ भक्षण करतो. तुमच्या दर्शनानें अनंत जन्मांचीं पापें जळून खाक होतात. तुह्मांस साष्टांग प्रणिपात केला असतां कल्याणाची प्राप्ति होते, तुमचें पूजन केलें असतां अच्युत पदाची जोड मिळते, अशा तुम्हां श्रेष्ठांच्या किंकराचा मी किंकर आहें. यास्तव तुह्मी आम्हां पतितांवर दया करून आमचें हें अमंगल शरीर पावन करावें, इतकीच तुमच्या चरणांपाशीं आमची प्रार्थना आहे. "

भक्तहो! श्रीज्ञानेश्वरांच्या अंगीं असें विलक्षण सामर्थ्य असूनसुद्धां त्यांनीं त्या ब्रह्मवृंदांची नम्रपूर्वक स्तुति केली! श्रीज्ञानराजांच्या अघटित सामर्थ्यानें व लीनपणांच्या भाषणानें त्यांचा गर्व नष्ट होऊन ते ब्रह्मवृंद अत्यंत खिन्न झाले. नंतर त्यांपैकीं कांहीं विद्व-ज्जन पुढें होऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांची प्रार्थना करून म्हणतातः— "सद्गुरो! आह्मी सकल जन पूर्ण पश्चात्ताप पावून आपल्या चरणीं अनन्य भावानें शरण आलों आहों. कृपानिधे! आपण सदय अंत:करणानें आह्मां अज्ञजनांच्या अपराधाची क्षमा करून आतां आमचा उद्धार करावा. आह्मी गर्वानें अंध झाल्यामुळें आह्मांस तुमचीं स्वरूपें ओळखतां आलीं नाहींत; इतकेंच नव्हें, तर शास्त्र-मदानें उन्मत्त बनून केवळ ज्ञातीकडे लक्ष देऊन व्यर्थ तुमचा छळ केला. आतां आपण आह्मां मूढांस त्याची क्षमा करावी; आणि आह्मां अज्ञजनांस आपलें बोधामृत पाजून या भवबंधनापासून मुक्त

करावें. सर्वसमर्था ! आपण संसाराला जन्मतःच तिलांजली देऊन अज्ञ प्राण्यांस भक्तिमार्ग दाखविण्याकरितां भूप्रदेशीं अवतीर्ण झाले आहां; इतकेंच नव्हें, तर आपण बाळपणांतच आपल्या अंगाला वैराग्याची राख फासून अज्ञानंधःकारांत गुरफटलेल्या मूढ व अज्ञानी प्राण्यांच्या अंतःकरणांत ज्ञानसूर्याचा प्रकाश पाडण्याकरितां भूमंडलावर सर्वत्र संचार करीत आहां! संतश्रेष्ठहो ! आमच्या असंख्य पातकांच्या राशी ज्ञानाग्नीनें दग्ध करून आमचे देह पावन करण्याकरितांच सात्विक गुणसंपत्ति बरोबर घेऊन या स्थलीं आपण प्राप्त झाला आहां ! अज्ञ जनांची आस पुरविण्याकरितांच कीं काय, आपण सकल वासना दग्ध केल्या; आणि स्वतःचा लौकिक तर पायाखालीं तुडवून त्याची राखरांगोळी केली ! त्या आपणा समर्थांची आह्मी अज्ञ व मूढजन यश व कीर्ति कितीशी वर्णन करणार ? आपले गुणानुवाद गावे तितके थोडेच होत. आह्मी अत्यंत पातकी, मंदमती असून संसारउपाधीनें त्रस्त झालों आहोंत. ह्मणून वाल्मिकीसारखा वाटपाड्या कोळी ज्याप्रमाणें पश्चात्ताप पावून मुनि नारदास शरण जाऊन धन्य झाला, त्याप्रमाणें आह्मी प्रतिष्ठानवासी जन आपणांस शरण आलों आहोंत. महाराज ! ज्या कृपाप्रसादानें या पशूंचें अज्ञान नष्ट होऊन तीं आपल्या मुखांतून वेदवाणीरूप बहुमाल रत्नें स्रवू लागलीं, तीच कृपा आम्हां मूढ जनांवर करावी.''

ही त्या द्विजवर्यांची अनुतापयुक्त दीनवाणी श्रीज्ञानराज शांत चित्तानें ऐकून घेत होते. ब्राम्हणांची ही प्रार्थना संपूर्ण झाल्यावर श्रीज्ञानराजांच्या चरणांवर त्यांनीं आपलें मस्तक मोठ्या भावभक्तीनें निमग्न केलें. तेव्हां श्रीज्ञानदेव ह्मणतात:—"श्रेष्ठ हो, आम्हां पामरांचा व्यर्थ आपण गौरव करीत आहां! आह्मी सदां तुमच्या अनुग्रहाचे भुकेलेलें आहोंत! तुमच्या चरणरजाच्या स्पर्शानें आह्मांला शुद्धता येणारी आहे! आह्मी दीन दुबळीं लेकरें तुमच्याच आशिर्वादानें ईशकृपेस पात्र होऊं! हा पशु बोलता झाला ही सुद्धां तुमचीच कृपा होय! तुम्ही आपल्या मंत्रसामर्थ्यानें इंद्राला आपलें पद सोडावयास लावाल! तुम्ही निर्जिवाला जीव देऊन बोलवाल! मृत्तिका—पाषाणादि धातु मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करून त्याला देवपणा आणाल! अहाहा! केवढी तुमची थोरवी वर्णावी! तुह्मां समर्थांच्याच कृपाकटाक्षानें या महिषाला वाणी फुटून तो बोलता झाला! अशी तुमची अघटित करणी आहे. आपल्या कृपेवांचून आह्मां जातिहीनांच्या हातून काय होणार! तरी श्रेष्ठ हो, आतां आमच्यावर कृपा करून आह्मांस शुद्धिपत्र द्यावें, ह्मणजे आह्मी आपल्या आज्ञेनेंच जन्मभूमीप्रत जाऊं!"

इतक्यांत एक श्रेष्ठ द्विजवर्य पुढें होऊन प्रार्थना करून ह्मणतो-"सद्गुरुसमर्थ ज्ञानराजा! अखिल ब्रह्मांडाचा कर्ता जो प्रभु त्याच्यासारखी अघटित घटना करून दाखवून तुम्ही आपली कीर्ति या

भूमंडळावर अजरामर केली, हेंच शुद्धिपत्र सर्वांत श्रेष्ठ आहे. हे साधो, आकाशाला धीर कोण देईल! हा भूगोल कोण कोठें लपवील! सरितापति रांजणांत कोणाला साठवितां येईल! परंतु इतकेंही करण्याची शक्ति आपणां समर्थांमध्यें आहे. अशा थोर व जगद्वंद्य समर्थांना आह्मीं शुद्धिपत्र देणें अत्यंत लाजिरवाणें आहे, तथापि सद्गुरूची आज्ञाच होत आहे, ह्मणून हें शुद्धिपत्र आह्मी समर्थांच्या चरणीं अर्पण करीत आहों." असें ह्मणून लिहून आणलेलें शुद्धिपत्र श्रीज्ञानराजांच्या हातीं दिलें. व पुन्हां ह्मणतात: "–सद्गुरो! आतां आमची शेवटची श्रीचरणीं विज्ञप्ति आहे कीं, उपनयनादि शास्त्रप्रणित संस्कार येथेंच करून समर्थांनीं आम्हां अज्ञजनांच्या उद्धारासाठीं या प्रतिष्ठान क्षेत्रींच रहावें. तुम्ही महापुरुष, मुक्तिचे द्वार, आमच्या भाग्योदयानें आह्मांस लाभला आहां! आपलें परममंगल दर्शन नित्य आम्हांस घडेल तर आमच्या पापराशी दग्ध होतील. यास्तव समर्थांनीं आम्हां दीनांची एवढी प्रार्थना मान्य करावी. आणि आपलें बोधामृत प्राशन करवून या भवबंधनापासून आमचा उद्धार करावा."

ज्ञाने०—द्विजश्रेष्ठहो, तुम्हीं आज हें आम्हांस शुद्धिपत्र दिल्यानें आम्ही कृतार्थ झालों. आह्मी अर्थहीन व भाग्यहीन असल्यामुळें आपल्या उपकाराची फेड आमच्या हातून होणें शक्य नाहीं. श्रेष्ठहो, हा मृत्युलोक पाप व पुण्य या दोहोंनीं ग्रासलेला

असून अज्ञानानें परिवेष्टित आहे. या मृत्युलोकांत निर्माण झालेले पंचभूतात्मक कर्मगुणपरिवेष्टित देह जन्ममृत्यूच्या चक्रावर घातलेले आहेत. यास्तव असे हे आमचे देह परमेश्वरसेवेंत झिजवून आह्मी पूनीत करून घेऊं! सर्वांभूतीं ब्रह्मभावना धरून तीव्र अनुतापयुक्त अंतःकरणांनीं अमृतापेक्षांही गोड असें जें ईश्वराचें नामस्मरण तें मुखानें गाऊन जन्माचें सार्थक करून घेऊं! तें नाम कसें आहे ऐका:—

जन्मजग दुःखबाधा। स्मरता नाहीं गोविंदा॥
ऐसा जयासी नित्य धंदा। तोचि सदां सुखरूप॥ १॥
धन्य कुळ धन्य याति। धन्य जन्म पुढति पुढति॥
भक्तीविण नाहीं गति। मुखीं हरिनाम उच्चार॥ २॥
दिश्वीं विश्व जो व्यापकु। तोचि माझा परिपाकु॥
यासि भक्तीविण साधकु। नोळखी पै दुर्बुद्धि॥ ३॥
ज्ञानरंजनी रंजला। ज्ञानबोधें उपजला॥
ज्ञानदेव हरि सेविला। निरंतर सर्वकाळ॥ ४॥

द्विजश्रेष्ठहो, तुह्मी सर्व जाणते आहां! त्याअर्थी मी तुह्मांला अधिक तें काय सांगणार! परंतु माझे निवृत्तिनाथ सद्गुरु भ्रूसंकेतानें आज्ञा करीत आहेत. म्हणून त्यांची अनुज्ञा शिरसावंद्य मानून सद्गुरु बोलवितील, तेंच चार शब्द मी तुम्हांस सांगतों. ब्रह्मवृंदहो! राजा जनक प्रपंचांतच राहून परमार्थ साधून मोक्षाला गेले! त्याप्रमाणें तुम्ही आपलें आचरण ठेवून आत्मज्ञानाची प्राप्ती करून घ्या. यावर तुम्ही म्हणाल कीं, प्रपंचांत राहिल्यानें परमार्थ

प्राप्तीच्या मार्गांत अनेक विघ्नें येतात ! हें खरें. परंतु भगवंतानें जातिपरत्वें जो धर्म तुम्हांला लावून दिला आहे, तो तुमचा स्वधर्म. " स्वधर्मेनिधनंश्रेय: परधर्मो भयावह: " हा स्वधर्मरूप यज्ञ तुह्मी अहेतुक मनानें आणि निष्कामबुद्धीनें कराल तर तो तुह्मांला कामधेनुप्रमाणें फलद्रुप होईल. आणि हा दु:खमय संसार तुम्हांस सुखप्रद होईल. तुमचे पूर्वजन्मीचे दोष नाहींसे होऊन तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. अकालीं मृत्यु टळेल. तेज, बल, आणि यश हीं प्राप्त होतील. त्यायोगानें तुमची आज्ञा सर्व प्राणिमात्र पालन करतील. स्वधर्मपुण्याईच्या बलानें जिला गुणत्रयांचा संपर्क होत नाहीं, अशा सद्बुद्धीचा उदय होऊन तुमची चित्तशुद्धि होईल. नंतर तुम्ही सद्गुरूच्या कृपेनें सहज मोक्षपदाप्रत प्राप्त व्हाल ! तुमची निश्चलबुद्धि होऊन परमेश्वरस्वरूपीं तुम्ही निमग्न झाला, म्हणजे समाधीचें अखंड सुख तुम्हांला प्राप्त होईल. तुमचा स्वधर्म तुम्ही पाळीत असतां तुम्हांला कितीही दु:ख झालें, तुमच्यावर अगणित संकटें आलीं, तुमच्यावर जननिंदेचें काहूर कोसळलें, किंबहुना प्राणांत संकट प्राप्त झालें, तरी तुम्ही स्वधर्म सोडूं नका. यायोगें तुम्ही संसारबंधनापासून मुक्त व्हाल. श्रेष्ठहो ! ज्या प्रभूनें तुम्हांला हें वैभव दिलें, त्याला तुम्ही अनन्य भावानें शरण जा; अग्नि नारायणाला हवन द्या; देवाचें पूजन करा; सद्गुरूंना शरण जा; दुर्बळांना साह्य करा; अतिथींचा सत्कार करा; श्रेष्ठांना पूज्य

माना; आपल्या ज्ञातीला संतोषित करा; माता व पिता हीं अराध्य दैवतें मानून त्यांना संतुष्ट राखा; कोणाचा घात–पात करूं नका; परनिंदेनें जिव्हा विटाळूं नका; हातानें दान–धर्म व चरणानें तीर्थ--यात्रा करा; आणि जगांमध्यें सर्वत्र स्वधर्माचा महिमा वाढवा. तुम्ही चारी वर्णांत श्रेष्ठ, सर्व वर्णांचे आदिगुरु, म्हणून तुम्हांला माझें पुन्हां पुन्हां हेंच सांगणें आहे कीं, तुम्ही कामनारहित होऊन उचित अशा धर्मानें वागा. यापेक्षां तुम्हांस मीं अधिक तें काय सांगावें !

यापमाणें श्रीज्ञानदेवांनीं प्रतिष्ठानक्षेत्रांतील जनास बोध केला. नंतर सर्वत्रांनीं त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून "आपल्या उपदेशाप्रमाणें आह्मी वागत जाऊं, आपला कृपाहस्त मात्र आमच्या मस्तकीं असावा." अशी प्रार्थना केली. तेव्हां श्रीज्ञानराज जे जे नमस्कारास येत त्यांस मोठ्या प्रेमानें आपल्या हातांनीं उठवीत असत. इतक्यांत एक ब्राह्मण पुढें होऊन ह्मणूं लागला कीं, "महाराज ! माझ्या पर्णकुटींत कांहीं दिवस वास केल्यास मी कृतार्थ होईन." हें त्याचें विनयपूर्वक भाषण ऐकून श्रीज्ञानराजांनींही त्याच्या ह्मणण्यास रुकार देऊन म्हटलें "चला येतों". नंतर ब्रह्मवृंदास नमन करून श्रीज्ञानराज ह्मणाले कीं, "या रेड्यास आह्मी आतां आपल्याबरोबर नेतों, तरी आपली अनुज्ञा असावी," असें ह्मटल्यावर ब्राह्मण नको कसें ह्मणतील ? त्यांनीं लागलीच "कांहीं हरकत नाहीं.

सुखेन घेऊन जावें" असें बोलले. मग निवृत्तिनाथ, श्री ज्ञानेश्वर व सोपानदेव आणि मुक्ताबाई हीं सर्वजण त्या रेड्यास आपल्या बरोबर घेऊन विनंति करणाऱ्या त्या ब्राह्मणाच्या पाठोपाठ जाती झाली. नंतर ग्रामस्थ मंडळीही श्रीज्ञानराजांची कीर्ति वर्णन करीत आपापल्या घरोघर गेली.

स्वर्गस्थ पितरांचें आगमन.

श्रीनिवृत्तिनाथादि चौघाजणांनीं त्या ब्राम्हणाच्या घरीं निवास केल्यावर नित्य गंगेचें स्नान, वेदांतविषयाचा विचार, योगवासिष्ठादि ग्रंथांचें वाचन आणि रात्रौं श्रीहरीकीर्तन, इत्यादि करण्याचा नियम ठेवला होता. त्यांच्या पुराणश्रवणाला व हरिकीर्तनाला पुष्कळ भाविक जनांची गर्दी जमत असे. असा कांहीं काल लोटल्यावर एकेदिवशीं ज्या द्विजवर्याचे घरीं या सत्पुरुषांनीं वस्ती केली होती, त्या ब्राह्मणाच्या वडिलांचें श्राद्ध आलें. तेव्हां तो ब्राह्मण गांवांतील ब्रम्हवृंदास भोजनाचें आमंत्रण देण्याकरितां गेला असतां ("जेथें गांव तेथें म्हारवडा" या म्हणीप्रमाणें सुष्ट तेथें दुष्टही असावयाचेच. श्रीज्ञानराजांच्या अलौकीक कृतीनें व ज्ञानाच्या दीप्तीनें सर्व प्रतिष्ठान क्षेत्र दिपून गेलें होतें, तरी त्यांत दुष्ट हे होतेच!) त्यांनीं त्या ब्राह्मणांस "आह्मी तुझ्या घरीं भोजनास येत नाहीं," असें स्पष्ट सांगितलें. त्यांनीं त्याचें कारण विचारतांच ते म्हणाले कीं, "तूं आपल्या घरीं संन्याशाचीं मुलें ठेवून त्यांना आश्रय दिला आहेस;

त्याअर्थी आह्मी तुमच्या घरीं भोजनास येत नाहीं" हें त्यांचें अवि-चारित भाषण श्रवण करून तो बिचारा अत्यंत खिन्न होत्साता परत आपल्या घराप्रत येता झाला. त्यामुळें तो चिंताक्रांत होऊन बसला होता. इतक्यांत श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं त्याची खिन्न मुद्रा पाहून त्यास सहज म्हटलें:—"द्विजवर्या! आज तुह्मी असे दुःखित कां झाला." हें त्यांचें सप्रेम व मधुर भाषण ऐकून तो द्विज म्हणतो "महाराज! काय सागावें! आज घरीं पितृतिथि असल्यामुळें येथील ब्रह्मवृंदास आमंत्रण दिलें; परंतु त्यांनीं तुमचे घरीं संन्याशाचीं मुलें असल्यामुळें आम्ही तुमचे येथें भोजनास येत नाहीं, असें कठोर शब्दांनीं सांगितलें, यामुळें आजची ही वडिलांची श्राद्ध-तिथि कशी पार पडेल, या चिंतेनें मी दुःखित झालों आहें." ही त्याची दीन स्थिति पाहून ज्ञानदेव ह्मणतात:—"अहो द्विजवर्य! तुह्मीं याविषयीं मुळींच काळजी करूं नका! ज्या ब्राम्हणांनीं भोज-नास येण्याचें नाकारलें, त्यांचेच पितर आज तुमचे घरीं भोजनास येतील. चला आतां, पाकाची सिद्धता करा!" हें ज्ञानराजांचें भाषण ऐकून तो ब्राह्मण आश्चर्यचकित झाला, आणि श्रीज्ञानेश्वर महा-राजांच्या मागील अलौकीक प्रभावावरून विश्वास पटून तो तत्काल पाकसिद्धीच्या तयारीस लागला! संपूर्ण पाक तयार झाल्यावर भोजनास जितके ब्राह्मण सांगावयाचा त्याचा संकल्प होता, तितके काष्टफलक (पाट) मांडून त्यानीं श्रीज्ञानराजांस निवेदन केलें;

मग श्री ज्ञानराजांनीं लागलीच त्या पाटांवर मंत्राक्षत टाकली तोंच त्यांच्या स्वर्गस्थ पितरांचें आवाहन होऊन ते पाटांवर बसते झाले! ही अघटित करणी पाहून त्या ब्राह्मणास मोठा आनंद झाला! आणि त्यानें शास्त्रविधीपूर्वक त्यांचें षोडशोपचारें पूजन-वंदनादि शिष्टाचार केल्यावर पात्रें वाढलीं. मग " पितृस्वरूपींजनार्दनवासुदेवप्रीयतां" असा संकल्प सोडल्यावर ते पितृगण भोजनास बसले. त्यांचें भोजन झाल्यावर त्या ब्राह्मणानें पिंडप्रदान करून पितरांस दक्षणा व तांबूल देऊन तो त्यांस साष्टांग प्रणिपात करता झाला. याप्रमाणें त्यांचा विधि झाल्यावर 'स्वस्थानेवासः' अशी श्रीज्ञानेश्वरांची आज्ञा होतांच ते पितर तत्काळ अदृश्य झाले! अशाप्रकारें त्या द्विजवर्यांच्या वडिलांचा श्राद्धदिवस आनंदानें पार पडला.

ज्या कुटिल व कर्मठ ब्राह्मणांनीं, आह्मी भोजनास येत नाहीं, असें निष्ठुरतेनें सांगितलें होतें, ते ब्राह्मण आज याची श्राद्धतिथि आम्हांवांचून कशी पार पडते, हें पाहण्याकरितां मुद्दाम एकत्र जमून गुप्तपणानें घराच्या झरोक्यांतून डोकावीत होते. त्यावेळीं त्यांचे पितर जेवावयास बसलेले व विडा दक्षणा घेऊन अदृश्य झालेले त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें! आणि मग 'ते अघटीत घटना पटीयसी' अशी श्रीज्ञानराजांची करणी पाहून पाण्यांत पडलेल्या ढेकळाप्रमाणें तत्काळ त्यांचा गर्व जिरला; आणि ते आपआपसांत बोलतात:—" काय हो! ज्यांनीं पशूकडून वेद वदविले व ज्यांनीं

आज प्रत्यक्ष आमचे पितर स्वर्गाहून पुन्हां मृत्युलोकीं बोलाविले अशा महात्म्यांस आह्मी कर्मठपणाच्या अभिमानानें यःकश्चित् मनुष्यें समजलों, त्या अर्थीं हा आमचा केवढा मूर्खपणा बरें! ब्रह्मविद्येचें खरें तत्व काय आहे, हेंच जर आह्मांस अद्यापि माहीत नाहीं, तर आमचा हा कर्मठपणा केवळ दांभिक होय! धिःकार असो आम्हांला व आमच्या ब्राह्मण्याला!! हे साक्षात् ईश्वररूप केवळ जगदोद्धारासाठीं मानवरूपानें या भूप्रदेशीं अवतीर्ण झाले आहेत! वेदोनारायण मूर्तींची आम्ही कर्मठपणाच्या गर्वभरानें व्यर्थ निंदा केली, त्या अर्थीं आमच्यासारखे मूढ व अधम या भूमंडळावर कोणीच नसतील!" याप्रमाणें पश्चात्ताप पावलेल्या द्विजश्रेष्ठांनीं हळूच घरांत प्रवेश केला; आणि मग त्यांनीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणांवर मस्तक नमवून नम्रपणानें त्यांची प्रार्थना केली:—"भो सद्गुरु! पूर्वीं जेव्हां रेड्याच्या मुखानें वेद वदविला, त्या वेळीं आपण आम्हांस बोधामृत पाजलें, तरीपण आम्ही आमच्या कर्मगतीनें अद्याप पूर्ववत् मूढच राहिलों. यामुळें आह्मी आपला महिमा जाणून देखील व्यर्थ आपली निंदा केली. आतां आम्हांस पूर्ण पश्चाताप झाला आहे, त्याअर्थीं आपण आमच्या अपराधाची क्षमा करून आमचें अंतःकरण शुद्ध होऊन अंतीं आम्हांस सद्गति प्राप्त होईल असा एखादा सोपा उपाय सांगा."

भक्तियोग.

हें त्या द्विजवर्यांचें लीनतेचें भाषण ऐकून श्रीज्ञानेश्वर ह्मणतातः—“ब्रह्मवृंद हो! भारतीय युद्धप्रसंगीं संजयाला श्रीहरीचें अत्यद्भुत व अदृष्टपूर्ण असें जें विश्वरूप त्या स्वरूपाचें स्मरण होऊन तो आनंदभारित होत्साता मुखानें ‘श्रीकृष्ण, श्रीकृष्ण’ असें वारंवार ह्मणूं लागला. त्याची ती अखंड स्थिति पुत्रवात्सल्यानें मोहित झालेल्या धृतराष्ट्रास न समजल्यामुळें ते संजयास पुनःपुन्हां ह्मणूं लागले कीं, ‘संजया, तूं वारंवार काय उच्चारीत आहेस?’ त्यावर संजय म्हणतातः—“राजा! अनंत जे वेद त्यांपासून सव्वा लक्ष भारत निर्माण झालें. त्यांपैकीं सातशें श्लोकात्मक जी गीता तें या भारताचें सर्वस्व होय. अशा सर्वश्रेष्ठ गीतेमध्यें भगवंतांनीं अर्जुनाप्रत जो उपदेश केला, तोच आतां मी तुम्हांस कथन करतों. तुम्ही भगवंताच्या त्या वचनाकडे अवधान द्यावें.”

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमः स्कुरू ॥
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसिमे ॥

भगवान् ह्मणतातः—“अर्जुना! सर्वव्यापक जो मी त्या मला तूं आपल्या अंतःकरणाचा विषय कर, ह्मणजे तूं मला आपलासा करून घे. पिपीलिकेपर्यंत अर्थात् सकल पदार्थांत माझी व्याप्ति आहे. माझ्यावांचून दुसरी वस्तुच नाहीं. मी सर्वव्यापक असून सकल भूतांचे ठायीं माझें वास्तव्य आहे. मी सर्वांचा आत्मा असल्यामुळें अत्यंत

प्रेमपूर्वक तूं माझी भक्ति कर; आणि सकळ प्राणिमात्रांविषयीं आपल्या अंतःकरणांत भूतदया बाळग." भक्तजनहो! भगवंतांनीं सांगितलेलें हें श्रुतिसारभूत तत्त्व तुह्मी आपल्या अंतःकरणांत धारण करून त्याप्रमाणें आचरण केल्यास तो परमात्मा तुह्मांस ह्या भवसागरांतून पैलपार नेऊन जन्ममृत्यूच्या घटियंत्रांतून मुक्त करील. याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरांनीं त्या ब्रह्मवृंदास उपदेश केल्यावर ते पुन्हां प्रश्न करतातः—"सद्गुरो! परमात्मस्वरूपचिंतनावांचून अशी निस्सीम भक्ति आम्हांसारख्या मूढांस प्राप्त होणें कठीण आहे. यास्तव एखादा ध्यानयोग सांगून आम्हांस कृतार्थ करावें" हें त्यांच्या विद्वत्तेचें धोरण जाणून श्रीज्ञानेश्वर त्यांस ध्यानाचा प्रकार सांगतातः-

ध्यानयोग.

द्विजवर्य हो! जसें रवीला दोरी बांधून ती दह्यांत घुसळली असतां लोणी निघतें; तद्वत् अधिकारी पुरुषानें ह्या सर्व भूत-भौतिक जगाचें दधिरूप कल्पून चिंतन करावें व मन हीच कोणी एक रवि आहे असें चिंतन करावें आणि 'मी ब्रह्म आहें' अशा प्रकारचें जें अभेदरूप ज्ञान त्याचें रज्जुरूप कल्पून चिंतन करावें; तसेंच आनंदरूप अशा परमात्म्याचें नवनीतरूपानें चिंतन करावें. गुरु व शास्त्र ह्यांच्या उपदेशानें संसारसमुद्रापासून आत्म्याचा मोक्षरूप जो उद्धार तेंच या जगद्रूप दह्यांतून निघालेलें परमात्मरूप नवनीत होय. याप्रकारें अधिकारी पुरुषानें जगद्रूप दह्यापासून अद्वितीय

ब्रह्मरूप नवनीत काढून तद्वारें आत्मसाक्षात्कार करून घ्यावा" याप्रमाणें श्री ज्ञानेश्वरांनीं त्या ब्रह्मवृंदास त्यांच्या इच्छेनुसार उपदेश केल्यावर ते ब्रह्मवृंद श्री ज्ञानराजांच्या चरणीं दंडवत् प्रणाम करून त्यांची स्तुति करीत आपआपल्या घराप्रत चालते झाले.

याप्रमाणें श्रीनिवृत्तिनाथादि चौघा संतश्रेष्ठानीं त्या प्रतिष्ठान क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदास अद्भुत लीला दाखवून बोधामृत प्राशन करविल्यावर नेवासेस जाण्याचा विचार केला; आणि मग एके दिवशीं त्यानीं तेथून प्रयाण केलें. श्रीज्ञानेश्वरादि संतश्रेष्ठ आज प्रतिष्ठानक्षेत्र सोडून जाणार असें तेथील नागरिकांस कळतांच त्यांच्या दर्शनाकरितां अभेद रूपानें सर्व जातींच्या जनांची गर्दी जमली. त्यावेळीं प्रमुख ब्रह्मवृंद व नागरिक जनांनीं श्रीनिवृत्तिनाथादि ज्ञानमय तेजोमूर्तींच्या चरणावर लोटांगणें घातलीं. तेव्हां श्रीज्ञानेश्वर म्हणतातः—" सकल श्रेष्ठ ब्रह्मवृंद व नागरिकजनहो! आह्मीं आपल्या कृपेनें या प्रतिष्ठान क्षेत्रीं आजपर्यंत आनंदानें वास केला. आपण आम्हांस आपल्या पोटच्या बालकाप्रमाणें परम प्रेमानें वागविलें; यामुळें आम्हांवर आपणा सर्वांचे अनंत उपकार झाले आहेत. याची फेड आह्मी कशानें करणार. आतां आह्मी प्रतिष्ठानक्षेत्र सोडून नेवासक्षेत्रीं चाललों, यास्तव आह्मां दीन व अनाथ बालकांवर आपल्या सर्वत्नांची पूर्ण कृपा असावी," यावर नागरिकजन म्हणतातः— " सर्व समर्थ हो! आपण साक्षात् आदिशक्तिसह सदाशिव,

विष्णु व ब्रह्मा असून जगदोद्धारासाठीं मानवरूपानें अवतीर्ण झाला आहा. आपल्या राहण्यानें हें प्रतिष्ठानक्षेत्र पावन झालें. आपल्यासारखें सद्गुरु आह्मांस सोडून गेले, तर आह्मी हा दुस्तर भवसागर उतरून पैलपार कसें होऊं ? आम्हांला सच्चिदानंदरूप आत्म्याची ओळख कोण करून देईल ? वैकुंठाचा मार्ग दाखवून आह्मास मोक्षपदाप्रत कोण नेईल. दीनानाथा! आम्ही तापत्रयानें संतप्त होऊन अहंकाररूप संनिपातानें मृतप्राय झालों; म्हणून आपणांस अनन्यभावानें शरण आलों आहों. सद्गुरो ! आतां आम्ही कोणता मार्ग स्वीकारावा. ज्या योगानें आमच्या जन्माचें सार्थक होईल असा मार्ग दाखवून आम्हास कृतार्थ करावे" ही त्यांची नम्रपूर्वक प्रार्थना ऐकून श्रीज्ञानेश्वर म्हणतात:—

नागरिकजनांस ज्ञानोपदेश.

" नागरीक जनहो, विचारी मनुष्यानें दुसऱ्याचा स्वभाव व कर्मे ह्यांची स्तुति व निंदा कांहींही करूं नये. कारण, प्रकृति व पुरुष या पासून उत्पन्न झालेलें हें सर्व विश्व एकरूपच आहे, ह्मणून ह्यामध्यें भेद मानूं नये. जो कोणी दुसऱ्याच्या गुणावगुणाची प्रशंसा व निंदा करतो, तो या मिथ्या द्वैताच्या ठिकाणीं अभिमान बाळगीत असल्यामुळें ज्ञाननिष्ठारूप सौख्यापासून भ्रष्ट होतो. द्वैतदृष्टि ही सर्वथैव अनर्थास कारण आहे. ह्मणजे ज्याची द्वैतदृष्टि आहे, असा पुरुष संसारबंधनामुळें मोहाच्या आधिन होऊन

स्वप्नतुल्य मिथ्या सृष्टीला सत्यवत् मानतो. मग मिथ्याभूत द्वैताभिमान बळावत जाऊन त्याची बुद्धि भ्रष्ट होते. ह्मणून मिथ्या जगांतील सकल पदार्थांच्या ठिकाणीं आसक्ति जडून राग–द्वेष–अभिमानादि उद्भवतात. मग अर्थातच तो मनुष्य जन्ममरणरूप येरझाराच्या तावडींत सांपडतो. त्याच्या निवृत्तिकारितां तत्वज्ञ पुरुषांकडून अद्वैत ज्ञान संपादन करून घ्यावें, ह्मणजे राग–द्वेष–अहंकारापासून उद्भवलेल्या कर्माची निवृत्ति होते. पहा, "एको देवः सर्व भूतेषु गुढः ॥ सर्वव्यापी सर्व भूतांतरात्मा ॥" ह्मणजे हें विश्व उत्पन्न होतें तें, व जो यास उत्पन्न करतो तो, आत्माच होय; व ज्याचें रक्षण केलें जातें, व जो रक्षण करतो तोही सर्वशक्तिमान् विश्वात्माच होय. ह्मणजे आत्म्याची व्याप्ति सर्वत्र अद्वैतपणानें भरलेली आहे. हें अद्वैत तुमच्या मनांत पूर्णपणें बिंबलें ह्मणजे मिथ्याभूत पदार्थांची तुमच्या ठिकाणीं आसक्ति राहणार नाहीं. आत्मा सकल पदार्थांचा द्रष्टा असल्यामुळें केवळ चिद्रूप आहे, व देह जड असून नाशवंत आहे. तसेच सर्व दृष्टीगोचर पदार्थही विनाशीच आहेत, म्हणून सकल जगाचा जो चालक विश्वात्मा व प्रत्येक प्राणिमात्राचे ठायीं असणारा आत्मा एकच आहे असें जाणून त्या विश्वात्म्याची मनोभावानें व दृढ भक्तीनें सेवा करा, म्हणजे तो जगच्चालक परमात्मा भवबंधनापासून तुमचा उद्धार करील."

या प्रमाणें श्रीज्ञानराजांचा अमोघ ज्ञानोपदेश श्रवण करून सर्व

नगरवासी व श्रेष्ठ ब्रह्मवृंद आनंदभरित झाले. आणि मग त्यांनीं त्याची महोत्सवानें षोडशोपचारें पूजा करून साष्टांग प्रणिपात केल्यावर सर्वत्रांची आज्ञा घेत श्रीनिवृत्तिनाथ—श्रीज्ञानेश्वर—श्रीसोपानदेव व माता मुक्ताबाई ही मंडळी अखंड वेदघोष चाललेल्या महिषासह चालती झाली; आणि त्यांच्या पाठीमागून त्यांस पोहोंचविण्याकरितां चाललेले नगरवासीजन निवृत्तिनाथादि सत्पुरुषांच्या वियोगानें विव्हल होत्साते त्यांच्या नेत्रांतून सारखे अश्रुपात होऊं लागले, व मधून मधून " या महात्म्याच्या संगतीनें कांहीं काल कथा—कीर्तन—पुराणादि श्रवण—मननांत गेला. आपलें पूर्वभाग्य उदयास आल्यामुळेंच आम्हांस यांच्या दर्शनाचा अलभ्य लाभ घडला !!" असेंही ते बोलत असत. आपल्याबरोबर नागरीक जन पुष्कळ लांबवर आल्याचें पाहून श्रीज्ञानराजादि मंडळी थबकून त्यांस म्हणूं लागली कीं " सुजनहो, तुम्ही किती लांब जरी आला, तरी तुम्हांला परत गेलेंच पाहिजे. आतां तुम्ही येथून परता." असें म्हणतांच निरुपायानें सकल जन त्यांच्या चरणांस वंदन करून निघाले. तसेंच हेही मार्गस्थ झाले.

नेवासक्षेत्रीं प्रयाण व वेदांतविषयक संभाषण.

जन्मयोगी जीं श्रीनिवृत्तिनाथादि चारी भावंडें तीं महिषासह प्रतिष्ठान क्षेत्र सोडून चाललीं असतांना स्वानंदभरानें श्रीहरीगुण वर्णन करीत, व आश्चर्यकारक चमत्कार जनांस दाखवीत वनोपवनें,

नगरें, ग्रामें उल्लंघन करून महालसा (नेवासें) क्षेत्रीं येऊन पोंहोचलीं. तो सायंकालचा समय असल्यामुळें आतां आपण येथें कोठें वस्ती करावी अशा विचारांत असतां अकस्मात् एक मशीद त्यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां आपल्यासारख्या प्रवाशांस मशीद व देवालय हीं सारखींच, असें आपसांत बोलून त्या संतश्रेष्ठांनीं त्या मशिदींत प्रवेश केला. आंत गेल्यावर तें एकांत स्थल पाहून त्यांस अतिशयच आनंद झाला! कारण, परमेश्वराचे गुणानुवाद गाण्यास ही निवांत जागा ईश्वरकृपेनें आपल्याला मिळाली, ह्मणून त्याचे धन्यवादही गायले. मग सर्वजण स्थिर झाल्यावर श्रीज्ञानराज ह्मणाले:—

"ही निवांत जागा पाहून मला आनंद तर झालाच; परंतु श्रीनिवृत्तिदादांच्या उपदेशामृतानें माझें मन परमावधीचें तृप्त झालें. त्यांच्या कृपाप्रसादानें अज्ञानरूपी काष्ठें दग्ध होऊन सच्चिदानंद क्षेत्राचा अखंड वतनदार बनलों. आणि आत्मप्राप्तिरूप सिंहासनावर आरूढ होऊन त्रैलोक्याचें राज्य करूं लागलों कीं काय, असें मला वाटूं लागलें. वैराग्यरूप कुठारानें विषयसमूहाचें छेदन झाल्यामुळें इंद्रियें असून नाहीं सारखींच झालीं आहेत! अंतर्लक्षरूप पाश टाकून मनाला ब्रह्मगुहेंत कोंडून ठेवलें; क्रोधरूप पशूला शांतिरूप उल्हाटयंत्राच्या तोंडीं दिलें; देहाभिमानरूप राजाला लोभरूपी अंत्यजाचा स्पर्श होईल म्हणून त्याला राज्याचे बाहेर हांकून दिला; मोहाच्या छातीवर बसून त्यास धुळीस मिळविलें; मत्सराचा

मत्सर केल्यामुळें त्यानें माझ्या हृदयांतून तर आपोआपच पलायन केलें; म्हणून मी स्वस्वरूपीं मग्न होऊन आनंदाचा अनुभव घेत आहें." अशाप्रकारें षड्रिपूंचा विध्वंस केलेल्या पुरुषास ब्रह्मप्राप्ति होण्यास कितीसा वेळ लागणार! पण अज्ञजन मायेला भुलून प्रपंचाचा गाडा काळाच्या दाढेंत पडेपर्यंत हाकीत बसतात, त्यामुळें त्यांना दुःखरूप संसार भोगावा लागतो. परमेश्वर प्राप्तिकरतां कसाही त्रास होवो, आणि कितीही श्रम पडोत, तें निमूटपणें सहन करून श्रीसद्गुरुनाथाच्या चरणाशीं मिठी मारावी. आणि त्यांच्या कृपेस पात्र होऊन हा भवसागर तरून जावा, हेंच मानवजन्मास आल्याचें सार्थक होय!

सोपानदेवः—दादा, खरोखर मला तर ईश्वरसेवेंत अहर्निश निमग्नच होऊन रहावें असें वाटतें. मी प्रभूची सेवा करूं लागलों म्हणजे—भूक—तहान सुद्धां कोणीकडे पळून जाते हें मला कळत देखील नाहीं. भगवंताचे गुणानुवाद ऐकत बसावें, त्याचीं स्तोत्रें म्हणावीं व अखंड लीला गावी, असेंच नेहमीं मला वाटतें. टपून बसलेला मृत्यु गळ्यांत केव्हां पाश टाकील याचा नेम नाहीं, यास्तव एक क्षणदेखील त्याच्या स्मरणावांचून व्यर्थ जाऊं देणें उचित नव्हे. सुदैवानें ही नरतनु प्राप्त झाली असतां ईश्वरसेवेवांचून काळ व्यर्थ दवडणें म्हणजे मला मरणप्राय दुःख वाटतें.

निवृत्ति०—आत्मस्वरुपांत निमग्न झालेल्या पुरुषाला विषय हे

विषाप्रमाणें वाटून षड्रिपु त्याला भिऊन दूर पळून जातात, तेव्हां परमेश्वर आनंदाचा ठेवा त्याच्या स्वाधीन करतो; व तोही त्या परमेश्वराला आपल्या हृदयांत सांठवून ठेवतो.

मुक्ता०—पण दादा, आपण एकदां असें सांगितलें होतेना, कीं, परमेश्वर सर्वांतर्यामीं वास करतो; आणि आज आत्मस्वरुपांत जो पुरुष निमग्न असतो, त्याच्या हृदयीं परमेश्वर वास करतो, मग इतर प्राण्यांच्या ठिकाणीं तो नसतो काय?

निवृत्ति०—मुक्ताबाई, मागें सांगितलें तेंही खरें आणि आज सांगितलेलें हेंही खरें. म्हणजे त्याचा अर्थ असा:—जो प्राणी हृदयांतर्गत असलेल्या आत्मस्वरुपाची ओळख करून घेत नाहीं. त्याला तो दिसत नाहीं व जो ओळख करून घेतो, त्याला साक्षात्कार होतो, म्हणजे त्याच्या प्रत्यास येतो.

याप्रमाणें त्या चौघा भावंडांत आत्मस्वरूपाबद्दल विचार चालला होता. इतक्यांत त्या मशिदींत राहणारा फकिर आला. त्यावेळीं त्याचा व श्री ज्ञानेश्वरांचा संवाद झाला, तो येथें निरूपण करतों.

फकिराचा व श्री ज्ञानेश्वरांचा संवाद.

ज्याप्रमाणें हिंदुलोकांत साधुवृंद होऊन गेले, त्याप्रमाणें मुसलमान यातींतही झाले, त्यास फकिर म्हणतात व परमपदाला पोहोंचलेल्या साधूस अवलिया म्हणतात. ज्या दिवशीं श्रीज्ञानेश्वरादि भावंडें मशिदींत येऊन उतरलीं होतीं, त्या दिवशीं ते उतरण्यापूर्वीं त्या

मशिदींत राहणारा फकीर तेलाकरितां गावांत गेला होता. त्याच्याविषयीं लोकमत चांगलें नव्हतें. म्हणून तेथील ग्रामस्थ या फकीर बोवास एखादि जिन्नस लागल्यास मोठ्या नाखुषीनें देत असत, म्हणून तो त्यांच्यावर नेहमीं रागावत असे. त्या दिवशीं गांवांत जाण्यापूर्वी तो आपल्या मनाशीं बोलूं लागला कीं,—"काय करावें! या गांवांतील लोक धार्मिक नसल्यामुळें मला माझ्या एकट्या पोटाची पंचाईत पडते. कोणाच्या दारीं भिक्षेकरतां जाऊन उभा राहिलों, तर कोणी देखील मला स्वसंतोषानें भिक्षा घातली, असें कधींच झालें नाहीं. माझ्यासारख्या फकीराला भिक्षा घालायला जणूं काय यांच्या बापाचें गांठोडें बुडतें! मी एकटा फकीर एवढ्या गांवाला जड व्हावा काय! प्रत्येकांनीं जर पसापसा दाणे दिले तर माझी आठ दिवसांची बेगमी सहज होईल; पण आठ दिवसांनीं सुद्धां एका घरचे पसाभर दाणे मिळण्याची मारामार! यामुळें मला या लोकांचा असा राग येतो कीं, आतां त्यांना काय करूं! बरें झालें कीं, माझ्या नशिबानें आठ दिवसांत कोणी फकीर मशिदींत उतरावयास आला नाहीं. नाहींतर रोज मिळवावें तेवढें त्यांना घालावें लागतें; मग मीही सोदेगिरी करूं लागतों. त्यांच्यादेखत गांवांतल्या लोकांना चार शिव्या हांसडल्या, ह्मणजे तेही बिचारे निमूटपणें चालते होतात. हरामखोर लोक! खातात, पितात, चैन करतात पण मला मात्र या मशिदींत उपाशीं मरावें लागतें. अनेक सोंगें ढोंगें

करून, त्यांना थापा देऊन, रागावून, कोणीकडून तरी या वीतभर पोटाची खळगी भरावी लागते. आज सांजवातीला तेल नाहीं, तेवढें घेऊन यावें आणि मग मशिदींत आपण मिणमिणीत दिवा लावून बसावें." याप्रमाणें वटवट करीत त्या फकीराची स्वारी गावांत चालली; आणि वाण्याच्या दुकानीं थेंब थेंब तेल मागून घेऊन परत फिरली. मशिदींत येऊन पहातो तों चार हिंदू उतरले आहेत. मग काय! त्याची तळव्याची आग मस्तकांत जाऊन मनांत जळफळत मोठ्या आवेशानें तो बोलूं लागला.

फकीरः—तुम्ही कोणाला विचारून माझ्या मशिदींत उतरलात?

श्रीज्ञा०:—फकीरसाहेब, आम्ही विचारलें नाहीं खरेंच. परंतु विचारावयास मशिदींत तरी कोण होतें? अर्थात् येथें कोणीच नव्हतें.

फकीरः—कोणी नव्हतें, तर वाट पहावयाची होती. वाटेल त्यानें माझ्या मशिदींत येऊन उतरावें ह्मणजे काय? परवानगी-खेरीज माझ्या मशिदींत बेधडक घुसण्यास तुह्मांला लाज नाहीं वाटली?

श्रीज्ञा०:—आम्ही तुमच्या परवानगीशिवाय उतरलों हें तर खरेंच; परंतु फकीरसाहेब रागावूं नका. आम्ही रात्रीच्यारात्र येथें राहून सकाळीं उठून दुसरीकडे जाऊं.

फकीरः—म्हणून काय झालें! माझ्या परवानगीवांचून तुह्मी माझ्या मशिदींत काय म्हणून उतरलांत तें सांगा? शिवाय तुम्ही हिंदु आहांत. माझ्या मशिदींत उंदरावर बसणारा गणपती, किंवा

म्हशीवर बसणारी देवी आहे, असें तुम्हांस वाटलें काय? गांवांत हिंदूचीं देवळें काय थोडी रिकामी पडलीं आहेत—उठा—जा तिकडे.

श्रीज्ञान०—हें पहा साहेब, गणपती असो किंवा देवी असो. आह्मी उतरलों खरें; पण तुह्मी मघांपासून " **माझी मशीद, माझी मशिद,** " असें मोठमोठ्यानें ओरडून सांगत आहां ती मशीद तुमचीच कशावरून?

याप्रमाणें मशिदींत चाललेली बाचाबाच ऐकून रस्त्यानें जाणारे येणारे व शेजारचे पाजारचे लोक त्या ठिकाणीं जमा झाले. आपल्या पाठिंब्यास गांवांतलें बरेच लोक आले आहेत असें जाणून अधिक आवेशानें तो फकीर छातीला हात लावून मोठमोठ्यानें बोलूं लागला.

फकीरः—कशावरून ह्मणजे माझा बाप—आजा याच मशिदींत रहात होते, व त्यांच्यामागून आतां मी राहत आहें; म्हणून ही मशिद माझी नव्हेतर कोणाची?

श्रीज्ञा०ः—याच्याबद्दल तुमच्यापाशीं कांहीं पुरावा आहे काय? कां उगीच आपले कांहीं तरी म्हणतां!

फकीरः—पुरावा ह्मणजे? याच्याबद्दल माझ्यापाशीं कागदपत्र आहेत. शिवाय येथें जमलेल्या सर्व लोकांना विचारा म्हणजे तुमची पूर्ण खात्री होईल कीं, या मशीदीचा मालक मीच आहें!

श्रीज्ञा०ः—कागदपत्र आहेत म्हणतां! पण ते बनावट नसतील कशावरून?

फकीरः—माझी आहे माझी! ही मशीद माझीच! आहे कीं नाहीं याबद्दल येवढें हक्कानें विचारण्याचा तुम्हांला तरी अधिकार काय? मोठे आले आहेत मला विचारायला!

श्रीज्ञा०:—आम्हांस तसा अधिकार तर नाहींच; परंतु आम्ही असें म्हणतों कीं, ही मशीद तुमचीच आहे, अशाबद्दल पुरावा काय? ऐकीव बातमीवर लोक सांगणार! व तुम्ही कागदाची पुरजी दाखविणार! पण या सर्व लोकांसमक्ष मशीदीला तुम्हीच विचारा कीं, "तूं हिंदूची आहेस किंवा मुसलमानाची?"

फकीरः—वाहवा रे शहाण्या माणसा, तूं मला फसवूं पहातोस काय? बरेच तुम्ही भोंदू दिसता! म्हणे काय मशिदीला विचारा! दगडाची मशिद कोठें बोलत असते काय? अहो सभ्य गृहस्थ, तुम्ही मला विचारावयास सांगतां यापेक्षां आपणच विचारा वरें पाहूं मशिद बोलते कां?

श्रीज्ञा०:—तुम्ही मलाच विचारावयास सांगतां त्या अर्थीं विचारतों; पण तिनें "मी हिंदूची आहें" असें म्हटलें ह्मणजे मग ती आमची झालीना?

फकीरः—हो—हो!! ह्या सर्व लोकांसमक्ष मी सांगतों कीं, तिनें जर 'मी हिंदूची आहें' असें म्हटलें तर ती तुमचीच. अर्थात् मी येथून तत्काल चालता होईन. काय हा ढोंगीपणा! अहो, मशिदीचे मालक, दाखवा आपला प्रभाव; ह्या सर्व लोकांसमक्ष आपला

प्रकाश पडूं द्या एकदाचा. ह्मणजे सर्व लोकांची तरी खात्री होईल.

श्रीज्ञा०:—ठीक आहे. तुमच्या ह्मणण्याप्रमाणें मी तिला विचारतों आँ!

असें ह्मणून श्रीज्ञानराज नेत्र झांकून ध्यानस्त झाले. तेव्हां तेथें जमलेल्या मंडळींत चर्चा सुरूं झाली. त्यांमध्यें श्रद्धाळु, भोळा व पापभीरु असा एक सद्गृहस्थ असून त्यांनीं श्रीज्ञानेश्वरादि चतुर्वर्गास पैठणक्षेत्रीं पाहिले होते. त्यावरून त्यांचें लक्षांत आलें कीं, यांचें वचन मिथ्या होणें शक्य नाहीं. परंतु त्यावेळीं त्यांची ओळख जनांस न देतां तो ह्मणतो—

ग्रामस्थ जनांतील चर्चा.

पहिला—काय हो! हे कोणी तरी महान् सत्पुरुष असावेत. कारण इतकी खात्रीचीं भाषणें कोण उच्चारील?

दुसरा:—तुह्मी तर बोवा अगदींच भोळे दिसतां? अहो, निर्जीव पाषाणाची मशीद कोठें बोलेल काय? असें जर ह्यांच्या अंगांत सामर्थ्य असतें, तर मग हें गांवोगांव भटकत कां फिरतें?

पहिला:—अरे बाबा, परमेश्वराची लीला अगाध आहे. त्या जगच्चालक प्रभूच्या चरणीं यांची जर दृढनिष्ठा असेल, तर यांना कोणतेही अघटित कृत्य करणें अशक्य नाहीं. अशा सत्पुरुषांनीं आजवर अनेक चमत्कार दाखवून जगास थक्क करून सोडलें आहे. असें पुराणांत सांगितलें नाहीं काय?

दुसराः—पण अहो भगवद्भक्त, हें कलियुग आहे कलियुग! हें लक्षांत ठेवा!! "शापादपि शरादपि" असें तपःसामर्थ्याचे हरीचे लाल सांप्रत नाहींत बरें का! हा बौध्यावतार आहे.

पहिलाः—देव जरी बुद्ध झाला असला, तरी तो आपल्या सारख्यास दिसणार नाहीं; परंतु जे त्याच्या पदकमलीं रत झाले असतील, त्यांना तो दिसतो, त्यांच्याशीं बोलतो, व त्यांच्या-कडून अलौकिक चमत्कारही करवितो. प्रत्यक्ष उदाहरण महात्म्या चांगदेवाचेंच घ्याना?

दुसराः—ही गोष्ट खरी; पण सगळेच चांगदेव नव्हत. अहो! ज्यांना मनुष्यांशीं गोड बोलून त्यांना वश करून घेण्याची अक्कल नाहीं, तर मग अशांच्या स्वाधीन देव होणें असंभवच! यांचा उद्धटपणा आतांच आपण सर्वांनीं पाहिला आहेना!

[मध्येंच तिसरा पुढें होऊन]

तिसराः—अहो, आपसांत कां उगीच वाद घालतां! सूर्य—जयद्रथ समोरच आहेत. मीं ह्याची सत्कीर्ति ऐकली आहे. हे महात्मे आळंदी क्षेत्राचे राहणारे असून खरोखरच ह्यांना प्रत्यक्ष देव ह्मटल्यास हरकत नाहीं.

दुसराः—तुह्मी तर बोवा बरेंच पुढें गेला. यांना लागलीच देव बनविलें! अहो, काय वेड आहे तुह्मांला? ह्मणे काय दगडाची मशीद बोलते.

पहिला:—तुह्मांस माझ्या बोलण्याचा विश्वास न पटला तरी हरकत नाहीं; परंतु ह्या पुण्यपुरुषांनीं पैठण क्षेत्रीं रेड्याकडून वेद बोलविले. तो रेडा दारासी उभा आहे; पहा.

दुसरा:—असें सामर्थ्य जर ह्यांच्या अंगीं असतें, तर हे दगडासारखे डोळे मिटून उगीच बसले असते काय?

अशाप्रकारें ग्रामस्थ मंडळींत चर्चा चालली आहे, इतक्यांत श्री ज्ञानराज नेत्र उघडून म्हणाले—

श्रीज्ञा०:—फकीरसाहेब, आम्हीं मशिदीस विचारलें. ती ह्मणाली 'मी हिंदूची आहें.'

फकीर:—अरे साधूच्या बेट्या, लुच्याच्या कांद्या, तुझ्या अशा भोंदुपणानें मी फसेन होय. मूर्खा, चालता हो माझ्या मशिदीच्या बाहेर. नाहींतर देईन गचांडी. समजलास?

श्रीज्ञा०:—मग तुमचें ह्मणणें तरी काय? तिनें मोठ्यानें बोलावें. बरें ती तसेंही सांगेल! "मशिदमाते, तूं हिंदूंची आहेस किंवा मुसलमानांची आहेस हें मोठ्यानें सांग, ह्मणजे सर्व लोक ऐकतील."

मशीदीचें उच्चारण व फकीराचा पश्चात्ताप.

श्री ज्ञानराजांच्या मुखकमलांतून गंभीर गिरा निघाल्याबरोबर "**मी हिंदूची आहें.**" असा मोठा ध्वनी झाला! तो ऐकून तेथें जमलेले सर्व लोक व फकीर परम आश्चर्यचकित झाले! त्यावेळीं सर्वांचा भ्रम समूळ नाहींसा झाला व वृथाभिमानाची त्यांना अति-

शय लज्जा वाटली. अशी ही अघटित लीला पाहून फकीर आपल्या मनाशीं ह्मणतो—“ तोबा! तोबा ! हें काय झालें ! यांना मनुष्यें कोण ह्मणेल ? मी मत्सरबुद्धीनें यांना दुरुक्ति बोललों व त्यांचा उपमर्द केला ! अरेरे ! ! मी फार वाईट केलें ! कामधेनु घरांत आली असतां तिला काठी मारून बाहेर घालवावें, तसें केलें:—मी आपल्या हातानें आपल्या पायावर यांचा अवकृपारूपी धोंडा पाडून घेतला ! मीं मूर्खानें किती तरी निंद्य शब्दांनीं त्यांची अवहेळणा केली, तरी ती मूर्ति शांतपणानें बोलत होती. ज्यावेळेस माझ्या-तोंडांतून अपशब्द निघाले, त्याचवेळीं माझ्या जिव्हेचे शतशः तुकडे कां झाले नाहींत ! ! आतां ते महात्मे माझ्या अपराधाची क्षमा कर-तील काय ? ” अशाप्रकारें तो फकीर पश्चात्ताप होत्साता एकदम त्यांच्या पायांवर पडून ढळढळा रडूं लागला. त्यावेळीं दयासागर श्री ज्ञानराज त्याला आपल्या पायांवरून उठवून त्याचें समाधान केल्यावर ह्मणतातः—

श्रीज्ञा०:—अहो, यांत मीं अघटित तें काय केलें ? तुह्मी सुद्धां असें करूं शकाल ! मीं मशीद बोलविली ह्मणून तुह्मांस आश्चर्य वाटलें; परंतु ही सर्व त्या जगन्नियंत्याची कृपा आहे. तुम्ही भक्तिपूर्वक त्या जगदात्म्याच्या चरणीं लीन व्हा ! अनन्य भावानें त्यास शरण जाऊन त्याची करुणा भाका, व अहोरात्र त्याच्या नाम-संकीर्तनांत तल्लीन व्हा ! म्हणजे हें तरी काय ? पण याहीपेक्षां

अघटित कृत्यें करण्याचें तो प्रभु तुह्मांस सामर्थ्य देईल. या जगांत त्याच्या कृपेशिवाय अन्य प्रियतम वस्तु नाहीं, त्याच्या सत्तेवांचून वृक्षाचें पानही हालत नाहीं, सर्व स्थावर—जंगम पदार्थांच्या ठिकाणीं त्या जगच्चालक प्रभूची व्याप्ति आहे, हें लक्षांत आणा. तुमच्या-वर त्याची एकदां पूर्ण कृपा झाली म्हणजे तुह्मी प्रखर तापलेल्या वाळवंटांत बसला तरी तें तुम्हांस शीतलच वाटेल! नद्या उलटच्या वाहूं लागून तुमची तहान भागवितील! आणि तुह्मी जें जें मनांत आणाल व जें जें बोलाल तें तें सिद्ध होत जाईल. सर्व सुखाचा ठेवा जो परमेश्वर त्याची व्याप्ति रानावनांत, घरीं—दारीं, जळीं—काष्ठीं सर्वत्र असून तो नेहमीं तुमच्या बरोबरही हिंडत राहील. परंतु अंतःकरणांत खऱ्या भक्तीचा मात्र वास झाला पाहिजे; आप-पर भावना नाहींशी झाली पाहिजे; सर्व प्राणीमात्रांचे ठायीं तोच जगदात्मा भरला आहे अशी मनाची वृत्ति झाली तरच तो कृपा करील; हें जाणून आपलें चित्त त्याच्या भजनीं लावा "

फकीर०—महाराज! आह्मी फकीर लोक घरदार, आईबाप, भाऊबंद वगैरेंचा त्याग करून परमेश्वरप्राप्तीकरितां मशीदींत येऊन राहिलों; परंतु आतांपर्यंत माझा अभिमान नष्ट झाला नव्हता. आज आपल्या मनोहर वाणीनें जसा माझ्या अंतःकरणांत प्रकाश पडला, तसा कधींही पडला नव्हता. कारण आपल्यासारखे सद्गुरु जगांत दुर्मिळ आहेत यांत शंका नाहीं. सद्गुरो! आतां मला पूर्ण

पश्चात्ताप झाला आहे, यास्तव कृपा करून या देहाचें सार्थक होऊन हा भवसागर तरून जाईन असा मला कांहीं तरी उपाय सांगा! सद्गुरूवांचून आतां मला कोण तारणार आहे?

फकीरास ज्ञानोपदेश.

श्रीज्ञानेश्वर—फकीरसाहेब, तुम्ही म्हणतां मला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे, परंतु तसा झाला नसावा असें मला वाटतें. कारण आतां मी सांगतों हें सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. असें पहा—जोंपर्यंत तुमचा अभिमान गेला नाहीं, जोंपर्यंत इंद्रियें दमन करण्याची तुमच्या ठिकाणीं शक्ति आली नाहीं. जोंपर्यंत अंतःकरणांचे ठायीं शांतिदेवीची स्थापना झाली नाहीं तोंपर्यंत जन्माच्या सार्थकतेची इच्छा बाळगणें किंवा "मला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे" असें ह्मणणें ह्मणजे आकाश गुंडाळून बगलेंत मारलें असें ह्मणण्यासारखें आहे. घर सोडून मशिदींत राहिल्यानें, किंवा लांब लांब जटा वाढवून अरण्यवासी झाल्यानें अथवा भगवीं वस्त्रें परिधान केल्यानें मनुष्य साधु बनत नाहीं. साधु होण्याची इच्छा करणारांनीं मानापमानाचें गाठोडें दूर फेंकून दिलें पाहिजे. शांति अर्धांगीप्रमाणें वरली पाहिजे. परस्त्री मातेसमान मानून परद्रव्याचा वमनाप्रमाणें अंतःकरणापासून तिटकारा केला पाहिजे. षड्रिपूंचें दमन करून शब्दस्पर्शादि पंचविषयांचा त्याग केला पाहिजे. अहंकाररूपी ग्रंथीचें विचाररूप कुठारानें छेदन करून

परमात्मस्वरूपी चित्ताचा लय केला ह्मणजे तो मनुष्य साधु बनतो.

फकीरः—महाराज, आपला हा अमृततुल्य उपदेश ग्रहण करून त्याप्रमाणें वर्तन करण्याचा मीं आजपासून निश्चय केला आहे, तरी सद्गुरूचा वरदहस्त माझ्या मस्तकीं असावा.

असें ह्मणून तो फकीर प्रेमपूर्वक श्रीज्ञानराजांच्या चरणीं लागला. तेव्हां त्यांनीं "परमेश्वरावर निष्ठा ठेवून त्याची अनन्यभावानें सेवा करा, ह्मणजे तोच तुह्मांला सद्बुद्धि देऊन जन्ममरणाच्या यातनेंतून मुक्त करील" असें सांगितलें. इतकें झाल्यावर जमलेल्या ग्रामस्थ मंडळींत असलेले सुष्ट—दुष्ट, निंदक—वंदक व आस्तिक—नास्तिक वगैरे सर्व मंडळींच्या देहांत उजेड पडून श्रीज्ञानराजांच्या चरणां-पाशीं त्यांची पूर्ण श्रद्धा जडली. त्यांनीं त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून आशिर्वाद घेतला; व सर्वजण आपल्या घराप्रत निघून गेले. निवृत्तिनाथादि बहिण—भावंडें तेथेंच राहून ईश्वरभजनांत त्यांनीं ती रात्र मोठ्या आनंदानें घालविली.

मशीद बोलविल्याची वार्ता हां हां ह्मणतां सर्व निवास क्षेत्रांत पसरली. दुसरे दिवशीं श्रीज्ञानेश्वरादि महात्म्यांच्या दर्शनाकरितां लोकांच्या झुंडीच्याझुंडी येऊं लागल्या. त्यांमध्यें एका परम भाविक धर्मात्म्यानें श्रीज्ञानराजांस प्रार्थना केली कीं, "समर्थांनीं मशी-दींत राहण्यापेक्षां माझ्या घरीं येऊन माझा आश्रम पावन केला तर मी कृतार्थ होईन." हें त्याचें प्रेमळ वाक्य ऐकून श्रीनिवृत्ति-

नाथादि चतुर्वर्ग त्याच्या घरीं गेले. भाविकजन नित्य दर्शनाला येऊन त्यांची बोधपर वाणी श्रवण करीत असत. त्यामुळें दिवसें-दिवस बहुजनसमाजाची निवृत्तिनाथादि चतुरवर्गाचे ठायीं श्रद्धा दृढ होत चालली, व कित्येक भाविकजन त्यांच्यापासून उपदेश ग्रहण करूं लागले. यामुळें तें निवास क्षेत्र केवळ आनंदभुवनच होऊन गेलें होतें. तेथील जनसमूहाचा उत्साह परमावधीस पोहों-चला होता.

भाविक पुरुषाची निस्सीम भक्ति.

निवास क्षेत्रांतील एका सद्गृहस्थानें एके दिवशीं श्रीज्ञानराजां-पासून उपदेश ग्रहण केला. व त्याची त्यांचे ठायीं इतकी दृढ भक्ति जडली होती कीं, तो त्यांच्या नामसंकीर्तनांत रात्रंदिवस तल्लीन असे. यामुळें प्रपंचाचा सर्व भार त्याच्या प्रिय पत्नीवर पडला होता. तीही त्या प्रपंचास कंटाळून स्त्रीस्वभावानुरूप इतर व्यावहारिक स्त्रियां-प्रमाणें आपल्या पतीवर कधीं कधीं त्रासानें तोंडसुख घेत असे. प्रपंचांतील मनुष्यास सर्व कांहीं वस्तु पाहिजेत. त्या अनुकूल नस-ल्यामुळें प्रत्येक कुटुंबांत असाच झगडा नेहमीं चालत असतो. असो. एके दिवशीं त्या स्त्रीचा पति नित्याप्रमाणें भजनरंगांत दंग झाला असून प्रेमानें डुलत असतां घरीं भोजनसामुग्री नसल्या-मुळें मुलाबाळांची उपासमार झाली. मग काय विचारतां! ती स्त्री अतिशय संतप्त होऊन तिनें पतीशीं बोलण्यास प्रारंभ केला.

स्त्रीः—पुरें नाहीं का झालें अजून भजन; त्या चिपळ्या द्या एकदाच्या टाकून; आणि प्रपंचांत लक्ष घाला. पाहिलीत का हीं सोन्यासारखीं मुलें अन्नपाण्यावांचून उपाशी मरत आहेत! आह्मी किती दिवस तरी असेच उपासमारींत काढावयाचे!

पुरुषः —"श्रीसद्गुरु ज्ञानदेव । तयावरी माझा भाव ॥ १ ॥
त्यास मी देह विकलों । पिता बोधामृत धालों ॥ २ ॥
त्यानें दिला मज मंत्र । विठ्ठल नाम तें पवित्र ॥ ३ ॥
तेंचि गाईन मी सदां । मिळवीन श्रीहरीपदा ॥ ४ ॥

स्त्रीः—पुरे झालें मेलें. तेंच तें सदां. त्यांनीं पोट का भरतें आहे? उद्योग ना धंदा! कुठें जाणें नाहीं कीं येणें नाहीं. अगदीं सारखें घर धरून भजन नी पुराण! आग लागो त्या पुराणाला! आमच्या पोटाची आग अगोदर शांत करा नी मग पुराण वाचा कीं भजन करीत बसा. ह्मणतातना "अगोदर पोटोबा नी मग विठोबा" इथें पाहिलें तें मेलें सगळें उलटेंच. विचार करा बरें! घरांतलं असेल नसेल तेवढं सगळं नाहींसं केलं, बहुमोलाचे दागिने गेले, चांगलीं चांगलीं वस्त्रं गेलीं, भांडीं—कुंडीं नाहींशीं झालीं, किडुक—मिडुक सुद्धां मोडीन ह्मटलं तर तें सुद्धां जवळ राह्यलं नाहीं. वीष खाईन म्हटलं तर जवळ एक पैसा नाहीं. किंवा भिक्षा मागून आणीन ह्मटलं तर एकादें भांडं नाहीं. तेव्हां मी आतां काय करावं तुम्हीच सांगा! संसाराला नको काय! एखादी वस्तु नसली कीं अडतं बरं!

पुरुषः—अग, श्रीसद्गुरु ज्ञानराजांच्या मुखांतून निघालेल्या ज्ञानरूप धनाचा साठा अत्यंत प्रेमपूर्वक मीं आपल्या हृदयमंदिरीं केला आहे. मग मला आतां कशाची न्यूनता आहे बरें!

स्त्रीः—जळ्ळं मेलं तें सगळं उरफाटच बोलणं! अहो, तुम्ही त्या जोगड्याच्या नादीं लागल्यापासून घरांत मूठभर दाणे तरी आणलेत कां! अझून तरी शुद्धीवर या! त्याच्या नादीं लागल्या-पेक्षां त्या श्री चांगदेव महाराजांची सेवा केली असती, तर आम्हांला कशाची वाण पडली नसती! नीट डोळे उघडून पहा एकदां. त्यांच्या सेवेपासून किती लोकांचें कल्याण झाले? ते किती तरी सुखी झाले! याच्यापासून तुम्हांला काय लाभ होणार आहे? नारळाची आई हातांमध्यें आलेली मात्र प्रत्यक्ष दिसत आहे. नेहमीं वेदांताच्या गोष्टी सांगून पोट भरत नसतं! तुम्ही भूक—तहान, सुख—दुःख वाटून प्याला आहां! पण मला नाहींना अझून तें सुटलं! या पोटाची वाट लावा नी मग स्वस्थ बसा भजन करीत नी त्या ज्ञान्याच्या नांवानं ओरडत!

पुरुषः—अहाहा सद्गुरुनाथा, ज्ञानराजा! काय ही तुमची कृपा! संसारांतून पूर्णपणें मन विटण्याकरितांच आज माझ्यावर ही पुष्पवृष्टि होत आहे यांत संशय नाहीं.

स्त्रीः—बसा सद्गुरु सद्गुरु करीत त्याच्या नांवानं रडत! तो देईल आतां आणून तुम्हांला खायला!

पुरुषः—पण मी काय म्हणतों, तें ऐकून तरी घेतेस कां एकदा!

स्त्रीः—पुरें झालं. आजपर्यंत पुष्कळ ऐकलं बरं! ऐकून ऐकून कान किटले. मीच काय म्हणतें तें ऐकून घ्यावं. मामंजींनीं मिळवून ठेवलेलं सगळं आपल्या कृतीनं नाहींस होऊन चौपदरी मात्र हातांत आली आहे. हें पहा—तुमच्या गुरु ज्ञानदेवानं कोणतं मोठं शतकृत्य केलं आहे. काय म्हणे रेडा बोलविला, स्वर्गाहून पितर जेवावयास आणले, मशीद बोलविली, या गोष्टी केल्या. परंतु यांपासून लोकांचा कांहीं फायदा झाला आहे कां! त्या चांगदेव महाराजांपासून लोकांना किती तरी सुखं प्राप्त झाली आहेत? आज ते चौदाशें वर्षें वाचून जगावर सारखे उपकार करीत आले. त्यांनीं अनेक प्रकारचे चमत्कारही करून लोकांची कार्यें केलीं आहेत. त्यांची देवावर इतकी भक्ति आहे कीं, सांगतां पुरवत नाहीं. त्यांचीच एक मी आपल्याला गोष्ट सांगतें, तेवढी ऐकावी. हें पहा; वरुणगांवच्या दोन ब्राह्मणांनीं मृत्तिकालिंगाच्या ऐवजी वाळूवर वाटी ठेवून पार्थिवलिंग म्हणून पूजेला दिलें. त्यांनीं त्याची भक्तिपूर्वक पूजा केल्यावर प्रत्यक्ष शंकर त्यांतून प्रगट झाले. मग त्या ठिकाणीं देऊळ वगैरे बांधल्यावर त्याचें वटेश्वर असें नांव ठेविलें. तो वटेश्वर सर्वांना आतां नवसाला पावूं लागला आहे. त्याच्यापुढें मूठभर तांदूळ ठेवले, तर ताटभर द्रव्य प्राप्त होतें. म्हणून मी म्हणतें कीं, आपण या जोगड्याची भक्ति सोडून देऊन त्या महा-

भाग चांगदेव महाराजांच्या दर्शनाला चला, म्हणजे ते आपलें दारिद्र्य दूर करतील.

पुरुषः—शिव शिव!! सद्गुरु माउलीची माझ्यासमोर चाललेली निंदा कानांनीं ऐकण्यापेक्षां आपणच येथून चालते व्हावें तें बरें. सद्गुरु ज्ञानराजांनीं दिलेल्या नाममंत्राच्या ठिकाणीं केवढें तरी सामर्थ्य आहे. अहाहा!!

मुखीं विठ्ठल बोलतां । गेली संसाराची चिंता ॥ १ ॥
मज विठ्ठल संपत्ती । तोचि सर्व सुख–शांति ॥ २ ॥
साहाकारी दीनबंधु । पैल नेई भवसिंधु ॥ ३ ॥"

याप्रमाणें बोलून तो बिचारा तेथून एकदम चालता झाला. तेव्हां ती स्त्रीही मुकाट्यानेंच निघून गेली. वास्तवीक पाहतां ज्याचें चित्त परमेश्वराचे ठायीं रममाण झालें, त्याचें लक्ष संसारांतून उडण्याकरितां त्याची अशा प्रकारची योजना असावी; अशाच प्रकारची सत्पुरुषांचीं उदाहरणें बरींच आढळतात. असो. श्री निवृत्तिनाथादि चतुर्वर्ग बहिण–भावंडें नेवासें येथें असतांना दुसरा एक चमत्कार घडून आला तो असा.

सच्चिदानंद बावाचा पुनर्जन्म.

सच्चिदानंद बावा म्हणून एक सच्छील, सद्धर्मी व पापभीरु असा एक पुरुष मृत्यु पावला; त्यावेळीं त्याची स्त्री सति सावित्रीबाई पतिसहगमनाची तयारी करून त्या प्रेताबरोबर जाण्यास सज्ज झाली. तेव्हां तिच्या वडील बहिणीनें तिला सहगमनास न जाण्या-

विषयीं बऱ्याच प्रकारें उपदेश केला. तरी त्या माउलीनें त्याचा प्रतिकार केला. तेव्हां त्या उभयतांचा पतिव्रताधर्मासंबंधीं झालेला संवाद लक्षांत ठेवण्यासारखा आहे म्हणून तो येथें देतों.

राधाबाई:—माई, तुझ्यावर तर आकाशची कुऱ्हाडच पडली! तुम्हां उभयतांमध्यें अद्वितीय प्रेम होतें हेंही सर्वांना विदित आहे. परंतु त्याचा आतां कांहीं उपयोग आहे काय? झालेली गोष्ट पुन्हां येत नाहीं. असा आतिताईपणा करून कसें चालेल? तूं त्यांच्याबरोबर सति गेलीस, तरी त्यापासून तुझ्या देहाला कांहीं सुख का होणार आहे! उलट आम्हां सर्वांना वियोगानलांत होरपळत टाकून व्यर्थ प्राणास मात्र मुकशील.

सावित्री:—ताई, तूं म्हणतेस तें व्यवहार रीतीनें योग्यच आहे. परंतु थोडासा विचार कर. स्त्रियांना पति हेंच मुख्य दैवत आहे. त्यांची सुख—दु:खें सर्वस्वी पतिप्राणावरच अवलंबून आहेत. स्त्रियांना पतिवांचून अन्य धर्म नाहीं, अन्य कर्म नाहीं, त्यांची इष्टदैवता पतीच होय. यामुळें मनोभावानें त्यांची सेवा करून त्यांच्याकरतां देह झिजविणें हें स्त्रियांचें मुख्य कर्तव्यकर्म आहे. याला अनुसरून त्या जर वागल्या, तर त्यांना इहलोकीं सुख व परलोकीं सद्गति मिळेल. अर्थातच पतीवांचून स्त्रियांचें जिणें व्यर्थ होय. म्हणून त्यांनीं पतिसहगमन करणेंच इष्ट आहे व तेंच मला प्रिय आहे. यामुळें मी तुला प्रार्थना करून सांगतें कीं,

तूं मला मोह पाडून या सत्कृत्यास अडथळा आणूं नकोस. जणूं मी माहेरीं चाललें आहें, अशा भावनेनें मला आनंदानें निरोप दे.

राधा०—काय बाई करावं! तूं आपला हट्ट कांहीं सोडीत नाहींस! माई, तुझा देह अग्नींत होरपळतांना आम्हांला पाहवेल कायग! आणखी मी म्हणतें कीं, आत्महत्या करणें शास्त्रांत मोठा दोष सांगितला आहे, हें तूंही जाणत आहेस. यास्तव मी तुला इतकेंच सांगतें कीं, जाणून बुजून तूं आत्महत्या करूं नकोस. शिवाय असें पहा, भारती युद्धांत अभिमन्यु रणांत पडला, तेव्हां त्याची स्त्री उत्तरा सति जाण्यास तयार झाली, असें पाहून त्यावेळीं प्रत्यक्ष श्रीकृष्णानें तिचा निषेध केला. मग तूं तरी कां असा आग्रह धरतेस?

सावित्रीः—माई, तूं माझी वडील बहीण आहेस त्याअर्थीं मीं तुला काय शिकवावें? परंतु तुझ्या हृदयांत पुष्कळ अज्ञान वास करीत आहेसें दिसतें. श्रीकृष्णानें उत्तरेचा निषेध कां केला, हें तुझ्या लक्षांत आलें नाहीं. म्हणजे त्यावेळीं उत्तरा गरोदर असल्यामुळं तसाच उपदेश करणं श्रीकृष्णाला भाग पडलं! स्त्रिया गर्भवती असल्या किंवा त्यांची संतति अगदींच लहान असली तर त्यांनीं मात्र सहगमन करूं नये, असें शास्त्रांत सांगितलें आहे. पण तसा प्रकार माझा नाहीं. मग माझ्यासारख्या स्त्रीनें पतिसहगमन न करणें म्हणजे अमृताचा त्याग करून सुरापान करण्यासारखें होय. म्हणून

सांगतें, माई, तूं मला मोहपाशांत ओढूं नकोस ! हें पहा; आह्मांला स्वर्गाहून विमान येऊं लागलें! तेव्हां आतां मला आनंदानें निरोप दे. तूं आपल्या मनांत कांहींही दुःख बाळगूं नकोस. चार सुवासिनींच्या ओटचा भरून आतां मला जाऊं दे बरें! असें म्हणून ती सती त्याप्रमाणें करूं लागली. इतक्यांत श्री ज्ञानदेव, निवृत्तिनाथ सोपान देव व मुक्ताबाई असे चौघेजण गंगेवरून स्नान करून येत असतां मार्गीत त्यांनीं मोहनीराजाचें दर्शन घेतलें. नंतर गंभीर वाणीनें श्रीहरीचें भजन करीत आश्रमाप्रत चालले. त्यांच्या श्रीहरिभजनाची ती गर्जना ऐकून साध्वी सावित्रीबाईस त्यांच्या दर्शनाची लालसा उत्पन्न झाली; व लागलीच आपलें सौभाग्यवाहनाचें काम आटोपून लगबगीनें तेथून निघाली ती श्रीज्ञानेश्वराजवळ येऊन त्यांच्या चरणावर तिनें मस्तक ठेविलें. त्यांनींही सहज " अष्टपुत्रा सौभाग्यवतिभव " असा आशीर्वाद दिला. हा कल्याणकारक आशीर्वाद त्या माउलीनें ऐकतांच सजलनेत्रांनीं ती बिचारी खालीं पहात स्तब्ध उभी राहिली. तेव्हां श्रीज्ञानराज म्हणतात. " मातोश्री, अशी दुःखित कां झाली? तुला कोणतें संकट पडलें तें सांग ! ब्रह्मणें माझ्याकडून निवारण होण्यासारखें असल्यास मी करनि. " इतकें यांचें आश्वासन मिळतांच त्या माउलीस धीर येऊन ती म्हणते:— सर्वसमर्था श्रीज्ञानराजा, आज माझ्या संकटाला पारावार नाहीं. मी अबला पतिनिधनानंतर सती जाण्यास सिद्ध होऊन आपल्या

दर्शनार्थ आलें व आपण मला सौभाग्यदायक आशीर्वाद दिला. तेव्हां दुःख आणि आश्चर्य याच्या योगानें चित्तास अधिकच व्यग्रता उत्पन्न झाली. समर्थांनीं दिलेला आशीर्वाद या जन्मीं फलप्रद होणार किंवा पुढील जन्मीं? सत्पुरुषांचें आशीर्वाद कधींही व्यर्थ होत नाहींत, ह्मणून आशाही उत्पन्न झाली. तेव्हां माझी ही आशा आशीर्वादाप्रमाणें सफल करणें समर्थांकडेसच आहे.

श्रीज्ञान०—मातें, तुझी आशा सर्वसमर्थ प्रभूच सफल करील. तूं घरीं जाऊन पोहोंचतेस तोंच आह्मीही तेथें येतों. तूं आपल्या मनांत कांहींएक दुःख करूं नकोस. जा आणि आपल्या पतीचें शव बांधलें असल्यास मोकळें करून ठेव.

इतकी श्रीज्ञानराजाच्या मुखांतील मंगल वाणी ऐकतांच त्या पतिव्रतेस हर्ष होऊन ती घरीं गेली, व पतीचें शव मोकळें करविलें. इकडे श्रीज्ञानराज मार्गांनीं चालत असतांच करुणस्वरानें परमेश्वराची प्रार्थना करतात—" हे देवाधिदेवा, माझ्या पाठीमागें तूं ही उपाधी कां लाविलीस? त्या गतभर्तृका स्त्रियेला 'सौभाग्यवतीभव' असा आशीर्वाद देण्याची बुद्धि जशी तूं मला दिलीस, तसें तिचें सौभाग्य कायम ठेवणेंही तुझ्याकडेसच आहे. परंतु वारंवार जर अशा उपाधी उत्पन्न होतील, व त्यांचें निवारण तूं माझ्याकडून करविशील, तर माझे ठायीं अभिमान उद्भवून मी अहंकाराच्या तावडींत सांपडेन. म्हणून हे पांडुरंगा, अशा उपाधीपासून

मला दूर कर व तुझ्या स्वरूपीं मी अहर्निश लीन होईन अशी बुद्धि दे, येवढीच तुझ्या चरणापाशीं प्रार्थना आहे. निवृत्तिदादा, आतां याची काळजी पांडूरंगालाच !

निवृत्ति:——ज्ञानराजा, भक्ताचें संकट जर पांडुरंग दूर न करील तर " भक्तकामकल्पद्रुम " हें नांव त्याला कसें शोभेल बरें !

सोपान०:—पण दादा, परमेश्वर तर वैकुंठीं रहातो. मग येथें तुम्हांला संकट पडलें हें त्याला कसें समजणार ?

मुक्ता०:—आहारे वेड्या ! अरे, दुष्ट दुर्योधनांनीं सती द्रौपदीची वस्त्रें फेडण्यास जेव्हां प्रारंभ केला, तेव्हां आर्त स्वरानें प्रभूची तिनें करूणा भाकली. हें जाणून तात्काल तिची लज्जा जशी त्यानें रक्षण केली तसीच तो येथेंही करील. परमेश्वराला कठीण असें कांहींच नाहीं, हें सोपानदादा तुझ्या लक्षांत येऊं नये काय ? तुला भ्रांति पडली वाटतें !

याप्रमाणें तीं चौघें बहिणभावंडें आपसांत बोलत बोलत सच्चिदानंद बावाच्या प्रेताजवळ येऊन पोहोंचलीं व श्री ज्ञानेश्वरांनीं तेथें जमलेल्या लोकांस विचारिलें कीं यांचें नांव काय ? " यांस **सच्चिदानंदबावा** ह्मणतात " असें लोकांनीं सांगितलें. नंतर श्रीज्ञानराज त्या शवाजवळ बसून त्याच्या आंगावर हात फिरवीत म्हणतात— "**सत्+चित्+आनंद** " या निरुपाधिक आत्म्याला मृत्यु आला असें ह्मणणें किती आश्चर्यकारक आहे ! भ्रांतीमुळें आत्म्याचे ठायीं

जन्म—मरण आरोपित करणें अत्यंत मूढपणा आहे. सच्चिदानंद बावा, तुम्ही गाढ सुषुप्तीचा त्याग करून हेंच माझें म्हणणें जगास खरें करून दाखवा; उठा आतां."

ज्ञानराजांच्या कृपाप्रसादानें व सत्पुरुषाच्या हस्तस्पर्शानें जसा निद्रेंतून मनुष्य जागृत व्हावा; तद्वत् ते बावा हळूच उठून बसले! आणि त्यांनीं श्रीज्ञानदेवाच्या चरणावर मस्तक ठेविलें. त्यावेळीं श्रीज्ञानराजानेंही त्यास प्रेमालिंगन दिलें. हा अलौकिक चमत्कार पहातांच तेथें जमलेल्या जनांस परम आश्चर्य वाटलें. सती सावित्रीबाईनीं आपला पति जिवंत होऊन श्रीज्ञानराज त्यास आलिंगन देत आहेत, हें पहातांच हर्षातिरेकानें त्या पतिव्रतेस मूर्च्छना आली! इतक्यांत सच्चिदानंदबावानें ज्ञानदेवाच्या चरणावर पुन्हां मस्तक ठेवून प्रार्थना केली कीं:—

"हे दयाघन सर्वसमर्थ योगिराजा, आपल्या कृपेनें आज पुनर्जन्म पावून आपल्या दर्शनानें कृतार्थ झालों. हे प्रभो, यमदूत मला पाशानें दृढ बांधून फरफरा ओढीत नेत असतां सद्गुरूचें आलेलें ब्रह्मास्त्र पाहून विव्हल होत्साते त्यांनीं मला सोडून तत्काल पलायन केलें. सद्गुरुमहाराज! आपण साक्षात् भगवान आहां! आजपासून हा देह मीं आपल्याचरणीं अर्पण केला आहे. माझ्या पूर्वजन्मीचें सुकृत उदयास आल्यामुळें आपल्या सेवेस्तव त्यांनीं मला सजीव केलें. त्याअर्थीं माझीं पूर्वींचीं सर्व पातकें नष्ट झालीं यांत संशय नाहीं.

दयाघना, कुटुंबपोषणाकरितां द्रव्यार्जनाच्या कामीं माझ्या हातून अनेक पातकें घडलीं असतील! त्याचें निर्मूलन होऊन हा संसार तोडून टाकणार आपणच समर्थ आहां!

सच्चिदानंदबावास उपदेश

श्रीज्ञानराजः—सच्चिदानंदबावा, केवळ प्रपंचाचा त्याग केल्यानेंच परमार्थाची प्राप्ति होते असें नाहीं. कुशल पुरुष प्रपंचांत राहूनहीं ईश्वरप्राप्ति करून घेतात. तुम्ही गृहस्थाश्रमी आहां; त्याअर्थीं त्यास उचित अशा धर्मानें वागून अनन्यभावानें ईश्वरचिंतन करावें ह्मणजे त्यांतच तुमचे जन्माचें सार्थक होईल. जो पुरुष स्वधर्मानें न वागतां विरुद्ध आचरण करील त्याजवर परमेश्वराचा कोप होतो. जसा दीप मावळला ह्मणजे प्रकाशाचा अभाव होतो, तद्वत् स्वधर्मापासून च्युत झालेला मनुष्य नाश पावतो. काळोख्या रात्रीस स्मशानाचें ठायीं जशीं भुतें एकत्र होतात, तसेंच त्याचे सर्व दोष एकत्र होऊन त्याला वेडावून टाकतात. मग तो सर्व संकटाचा पुतळाच बनतो. यास्तव गृहस्थाश्रमास उचित अशींच कर्में करून साधुसंतांची सेवा प्रेमपूर्वक करीत असावी. ईश्वराचें अस्तित्व व महत्व ज्यांत प्रतिपादन केलें असेल, त्या शास्त्रांवर दृढ श्रद्धा ठेवावी; प्राणायाम करून मनाचा निग्रह करावा; मौन धरून वाणी आवरावी; औदासिन्यानें कर्माचा वेग कमी करावा; खरेपणा बाळगावा; अंतरींद्रियाचा जय कराबा; बाह्येंद्रियें वश करावीं; अद्भुत लीला

करणाऱ्या हरीच्या गुणांचें, चरित्रांचें व अवतारांचें कीर्तन श्रवण व ध्यान करावें; आपण जीं जीं कर्मे करतों, तीं तीं भगवत्पदीं अर्पण करावीं; घर–दार, स्त्री–पुत्र, प्राण हीं सर्व भगवंताचीच आहेत, अशी उदार बुद्धि ठेवावी; ईश्वरभजनीं रंगून जाणाऱ्या महात्म्यास फार मान देऊन त्याशीं मैत्री करावी; सर्व लोकांशीं गोडीनें वागावें; सुज्ञ मनुष्यें व सत्पुरुष यांच्याविषयीं विशेष पूज्यबुद्धि धरावी. साधुसंतांचा समागम करून भगवंताच्या गुणानुवादाची चर्चा व कीर्तन करावें; परस्परांनीं ईशभजनांत परस्परांस गोडी उत्पन्न करावी; परस्परांनीं परस्परांस भगवंताच्या लीला सांगून संतुष्ट करावें; व आपल्यांमध्यें वसत असलेल्या दुःखाची निवृत्ति करण्यास झटावें. बावा, अखिल पातकांचा संहार करणाऱ्या भगवंताच्या नामसंकीर्तनांत रात्रंदिवस तल्लीन झालेला मनुष्य अनायासें परमपदाप्रत प्राप्त होतो.

पति सजीव झाल्यावर आनंदातिशयानें मूर्च्छित पडलेली पतिव्रता सावित्रीबाई सावध झाली. तिनें लागलीच श्रीज्ञानराजांच्या चरणावर मस्तक ठेवून नम्रतापूर्वक त्यांची प्रार्थना करून ती ह्मणतेः— "परमेश्वररूपा योगिराजा, काळाच्या मुखांत सांपडलेल्या माझ्या प्रियपतीस आपण जीवदान देऊन आपला आशीर्वाद सत्य केलात! आपल्या धर्मकन्येस चुडेदान दिलेंत! माझ्यावर अमृताची वृष्टि केलीत! आपण सर्वसमर्थ आहां! म्या अबलेनें आपला महिमा

किती वर्णन करावा! आपले मजवर झालेले अनंत उपकार फेडण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य नाहीं. आपण साक्षात् ईश्वराचींच रूपें असून अज्ञानी जनांचा उद्धार करण्याकारितांच आपण मानवरूपानें अवतीर्ण झाले आहांत! नाहीं तर ' अघटितघटनापटीयसी ' अशी शक्ति कोणामध्यें असणार! कृपासागरा, आतां आमच्यावर कृपा करून आपल्या चरणाची सेवा करण्यास आह्मांला आज्ञा व्हावी.

सती सावित्रीबाईचें हें भाषण ऐकून श्रीज्ञानराज ह्मणतात:—हे महा पतिव्रते, हा सर्व तुझ्या सत्यधर्माचा प्रभाव आहे. पतीच्या ठिकाणीं तुझी अधिदैवताची भावना असल्यामुळें तूंच आपल्या पतीस मृत्यूपासून सोडविलें! जी स्त्री तुझ्याप्रमाणें पतिव्रता धर्म पाळील, सासू–श्वशुरांचा योग्य सन्मान राखून त्यांची सेवा करील, पति हेंच आपलें दैवत आहे असें मानून त्याच्या इच्छेप्रमाणें वर्तन ठेवील, पतीचें सुख तेंच आपलें सुख व त्याचें दुःख तें आपलें दुःख असें समजून सत्यधर्मानें व सदाचरणानें जी स्त्री वागेल, ती आपण स्वतः उद्धरून तिच्या संगतीनें दुसरेही तरून जातील! अशा माउलीला देव सुद्धां भिऊन असतात. अशा स्त्रिया इहलोकीं सौख्यानें नांदून अंतीं पतिसह परमपदाप्रत जातात. तर मग यांत मीं तें काय केलें?

सावित्री:—महाराज, आपण माझी व्यर्थ स्तुति केलीत. याच्या शंभराव्या हिश्शानें देखील माझ्या हातून वर्तन घडलें नाहीं! परंतु

माझी आपल्या चरणीं इतकीच प्रार्थना आहे कीं, आपण सांगितलेल्या धर्माप्रमाणें माझ्या हातून वर्तन घडेल, अशी मला सद्बुद्धि देणार आपणच दयाघन समर्थ आहां!

श्रीज्ञानराजः—हे माउली, तुझ्यासारख्या पतिव्रता आजकाल विरळाच सांपडतील. तरी तूं हेंच आपलें सत्यव्रत काम मनीं ठेव; ह्मणजे परमेश्वर तुला पतीसह आपल्या पदाप्रत नेईल.

इतकें भाषण झाल्यावर ती पतिव्रता श्री ज्ञानराजाच्या चरणावर आपलें मस्तक विनम्र करून बाजूला झाली, तोंच सच्चिदानंद बावा पुन्हां प्रार्थना करून ह्मणतात.

" सद्गुरो, आपल्या कृपाप्रसादानें माझें पुनर्ज्जीवन झालें. आपल्या कृपेनें माझी काया पूनित झाली. मी कृतकृत्य झालों. आतां माझ्या हातून आपली कांहींतरी सेवा घडावी अशी माझी इच्छा आहे, तरी ती पूर्ण करणार सद्गुरुच समर्थ आहेत! "

श्रीज्ञानराज०—बावा, तुमची इच्छाच आहे, तर मी तुह्मांला एक काम सांगतों. सांप्रत मी " भावार्थदीपिका " नामक ग्रंथ तयार करीत आहें, तरी तुह्मी मजजवळ बसून त्या ग्रंथाचें साग्र लेखन करावें. म्हणजे श्रीपांडुरंगाच्या कृपेनें तुह्मांला ब्रह्मसाक्षात्कार होऊन तुह्मी परमेश्वराच्या पदाप्रत जाल.

सच्चि०—इतकी माझ्यावर सद्गुरुची कृपा झाल्यावर मला

आणखी काय पाहिजे ? सद्गुरूची आज्ञा मला मान्य आहे. व ती मीं अवश्य परिपालन करीन.

याप्रमाणें संवाद झाल्यावर ग्रामस्थ मंडळी त्यांचे गुणानुवाद गात आपल्या घरीं निघून गेली. व श्रीज्ञानराजादि महात्म्ये श्रीहरीचें नामसंकीर्तन करीत मोठ्या आनंदानें आपल्या स्थानीं गेले.

श्रीज्ञानेश्वरी व अमृतानुभव ग्रंथलेखन.

श्रीज्ञानराजांचीं हीं अलौकिक कृत्यें अवलोकन करून सर्व लोक आश्चर्यचकित होत असत. त्यांचें तें प्रेमभरित भजन, कीर्तन आणि वेदांतविज्ञान भाषण श्रवण करून अनेक भाविकजन भक्तिमार्गास लागले. ज्याप्रमाणें पदार्थांची रुचि कळण्याकरितां धान्याचीं नानाविध पक्कान्नें करावीं, त्याप्रमाणें श्रीमद्भगवद्गीतेचा सखोल, गहन व गुप्तार्थ अज्ञजनांस समजण्यासारखा अनेक दृष्टांतद्रष्टांतांनीं युक्त असा "**भावार्थदीपिका**" [**ज्ञानेश्वरी**] नामक ग्रंथ तयार करून नेवासें येथें असतांनाच श्रीसद्गुरु निवृत्तिनाथांस त्यांनीं दाखविला. तो पाहून निवृत्तिनाथ आनंदित झाले; "परंतु इतर ग्रंथांवर टीका करण्यापेक्षां स्वानुभविक असा स्वतंत्र ग्रंथ लिहिला असता, तर मुमुक्षुजनांस विशेष लाभ झाला असता." अशी त्यांची अनुज्ञा मान्य करून त्याप्रमाणें त्यांनीं तेथें असतांनाच "**अमृतानुभव**" नांवाचा दुसरा ग्रंथ तयार केला. याप्रमाणें स्वात्मानंदसुखाचा अनुभव घेत बरेच दिवस त्या निवास क्षेत्रांत काढल्यावर

तेथून आळंदीस प्रयाण करण्याचा चौघाही बहिणभावंडांनीं विचार केला, व त्याप्रमाणें एके दिवशीं निवास क्षेत्राची देवता आदिमाता श्री म्हाळसादेवीचें दर्शन घेऊन रेड्यासहवर्तमान निवृत्तीनाथ आदी-करून चौघेजण तेथून निघाले. देहाभिमान व मानापमान यांचा त्याग करून ब्रह्मदेवापासून पिपीलिकेपर्यंत सर्व जीव समदृष्टीनें लेखून मार्ग आक्रमण करीत असतां पुणतांब्याजवळ येऊन प्राप्त झाले. तेव्हां श्रीज्ञानराज ह्मणतातः—मुक्ताबाई, निवासक्षेत्र सोडल्यापासून तुला आजच्या इतका शीण कधीं झाला नसावा! कारण, तूं आज फार थकल्यासारखी दिसतेस! तर बाळे, आतां आपण येथेंच क्षणभर बसून श्रीविठ्ठलाचें भजन करूं, ह्मणजे तुझा तितका शीण हरेल! नंतर आपण येथून चालते होऊं.

चांगदेवाचें दर्शन व अगणित प्रेतांचें पुनर्ज्जीवन.

श्रीनिवृत्तिनाथादि भावंडें पुणतांब्याजवळ आल्यावर एका मोठ्या वृक्षाच्या छायेखालीं सर्वजण बसले. त्या थंडगार छायेच्या-योगानें विश्रांति मिळतांच मुक्ताबाई ह्मणतेः—" दादा ज्ञानराया! हें स्थान कितीतरी आनंददायक आहे. येथें बसतांक्षणीं सर्व श्रम परिहार झाले. पण माझें मन श्रीपांडुरंगचरणीं रंगून गेल्यामुळें मला येथेंच भजन करीत बसावेसें वाटतें. यावर श्रीज्ञानेश्वर ह्मण-तातः—मुक्ताबाई! आपण येथें एका क्षेत्रासान्निध बसलों असून त्या क्षेत्राचें महात्म्यच तसें आहे. कारण, गंगेचे कांठीं एक महान्

सिद्धपुरुष समाधिस्थ बसले आहेत. अशा पवित्र स्थलीं आनंदाचा अनुभव कां बरें न यावा? तेव्हां मुक्ताबाई म्हणते:—दादा! मग लौकर चला. आपण प्रथम त्या सिद्धपुरुषाचें दर्शन घेऊं! आम्हां अभाग्यांस अशा सिद्धांचें दर्शन कोठून होणार? ज्ञानेश्वर:—बरें तर चला. तुझ्या म्हणण्याप्रमाणें प्रथम त्यांच्याच दर्शनाला जाऊं.

असें ह्मणून चतुवर्ग भांवंडें ज्या स्थलीं चांगदेव[1] समाधी लावून बसले होते, त्या स्थलाप्रत गेले. आणि त्या सिद्धपुरुषाचें दर्शन घेऊन तेथें जवळच क्षणएक बसल्यावर मुक्ताबाई ह्मणते—"दादा, आज आपलें भाग्य उदयास आल्यामुळें आपल्याला ह्या श्रेष्ठ सिद्धपुरुषाचें दर्शन झालें. अहाहा! केवढा आजचा सुदीन! आतां या ठिकाणीं सिद्धश्रेष्ठ समाधिस्थ बसले आहेत म्हणून आपल्यांस त्यांचा प्रत्यक्ष कृपाप्रसाद मिळाला नाहीं. तथापि नुसतें दर्शन झालें हेंच मोठें भाग्य!" यावर श्रीज्ञानराज ह्म०—बाळे मुक्ताबाई, सत्पुरुषांच्या दर्शनाचा व त्यांच्या संगतीचा मोठा लाभ होतो. आज आपणांस घडलेल्या संतदर्शनाचा लाभ फार अवर्णनीय आहे.

याप्रमाणें उभयतांचा संवाद चालला असतां त्या सिद्धपुरुषाच्या आसमंत्भागीं पुष्कळ प्रेतें पडलीं असून प्रेतरक्षक त्यांचें रक्षण करीत आहे, हें पाहून मुक्ताबाई ह्मणते—दादा ज्ञानराया, ह्या सिद्धपुरुषाच्या आसमंत् भागांत मृत झालेल्या मानव प्राण्यांचीं प्रेतें कां

१ यांचें किंचित् चरित्र ओघानेंच पुढें येईल.

रें पडलीं असावींत ? यावर श्रीज्ञानराज ह्मणतात:—बाळे मुक्ताबाई, तुला शंका आली आहे, यास्तव तेथें असलेल्या मनुष्यास विचार ह्मणजे तो तुला सर्व सांगेल. हें श्रीज्ञानराजांचें भाषण ऐकून मुक्ताबाई प्रेतरक्षकास विचारते:—बाबा, ह्या समाधि लावून बसलेल्या महान् तेजस्वी सिद्धपुरुषाचें नांव काय ? आणि ह्यांच्या सभोंवतीं पडलेल्या प्रेतांचा अग्निसंस्कार न होतां तीं येथें कां पडलीं आहेत ? या ठिकाणीं तुह्मी कशासाठीं उभे राहिलांत हें कृपाकरून सांगावें ! तेव्हां प्रेतरक्षक ह्मणतो:—मुली, हे महान् योगिराज असून त्यांना चांगदेव महाराज असें ह्मणतात. योगबलाच्या योगानें काळाचीं वंचना करून हे सिद्धपुरुष चौदाशें वर्षें जिवंत आहेत ! ह्यांच्या योगबलाचें एवढें अलौकिक सामर्थ्य आहे कीं, जेव्हां ह्यांच्या समाधीचें उत्थान होतें, तेव्हां ते ह्या प्रेतावर योगबलाचें तेज सोडून एकदम त्या सर्वांना जिवंत करतात ! ह्मणून फार लांबलांबच्या लोकांनीं आपल्या मेलेल्या नातलगांचीं शवें येथें आणून ठेविलीं आहेत. यांत माझेंही एक मनुष्य असल्याकारणानें मी त्याचें संरक्षण करीत आहें. मग मुक्ताबाई म्हणतात:—ज्ञानराजा, केवढें हें आश्चर्य ! या भूमंडळावर असा कोण महात्मा आहे, कीं अशा मृत प्राण्यांना तो सजीव करीत आहे. धन्य चांगदेवा ! धन्य ! लोकांवर केवढा हा ह्यांचा उपकार ! तपश्चर्येचें किती अपूर्व बल हें ! पण दादा, ह्या प्रेतांची दुर्दशा पाहून माझें अंतःकरण अगदीं

कळवळत आहे! पण अगाध सामर्थ्यवांचून व्यर्थ बोलून काय उपयोग?

ज्ञानराजः—मुक्ताबाई, ह्या प्रेतांना सजीव करण्याची तुझी इच्छा असल्यास ती भक्तकामकल्पद्रुम असा जो पांडुरंग तो पूर्ण करील! कारण, जीवांनीं श्री पांडुरंगाचें नाम सप्रेम भक्तीनें उच्चारिलें असतां महान् योगसिद्धींचें सामर्थ्य त्याच्या अंगीं येते! आतां तूं असें कर; श्रीविठ्ठलाच्या नामसंकीर्तनांत तल्लीन होऊन त्या सर्व प्रेतांना जीवदान दे. ह्मणजे सर्व प्राणी सजीव होऊन विठ्ठलनामाचा गजर करीत उठून बसतील!

याप्रमाणें श्रीज्ञानराजांचें अभयवचन श्रवण करून मुक्ताबाई श्रीपांडुरंगाच्या नामस्मरणांत अगदीं तल्लीन झाली. आणि तिनें तेथें एक जवळच कुत्र्याचें शव पडलें होतें, तें घेऊन त्या प्रेताच्या ढिगावरून ओंवाळून फेंकून दिलें! लागलीच तीं सर्व प्रेतें विठ्ठलाचें नामस्मरण करीत उठून बसलीं! इतकेंच नव्हें, तर तें मृत कुत्रेंही सजीव होऊन शेंपटी हलवीत मोठ्या आनंदानें निघून गेलें!! तेथील सर्व मृत प्रेतें सजीव झाल्यावर त्यांनीं ह्या चतुवर्गास साष्टांग प्रणिपात करून मोठ्या आनंदानें ती आपआपल्या ग्रामीं निघून गेली. योगसाधनावांचून केवळ नामस्मरणाच्या लहरींत एका अल्पवयस्क मुलीनें हा अलौकिक चमत्कार केलेला पाहून चांगदेवाच्या शिष्यशाखांस परमाश्चर्य वाटलें. व त्यांनीं ह्या चतुवर्गाला वंदन केलें. मग श्रीनिवृत्तिनाथादि भावंडें हीं तेथून निघून मार्गस्थ झालीं.

महिषवराची समाधि

भगवंताच्या नामलीलेचा गजर व अध्यात्मचर्चा हींच त्यांचीं समाधानाचीं मुख्य साधनें असल्यामुळें त्याच महदानंदांत मार्ग आक्रमण करीत चालले असतां आळे गांवानजीकच्या अरण्यांत आले. तेव्हां ज्यांनीं सतत् वेदाचें अध्ययन चालविलें अशा महिषराजांचा मृत्युकाल जाणून श्री ज्ञानराज त्यांस ह्मणतातः—महिषवरा! तूं आतां लौकरच इहलोक सोडून निजधामाप्रत जाशील. तुझी इच्छा असल्यास कांहीं वरप्रदान मागून घे. यावर तो ह्मणतोः—महाराज, आपल्या सत्संगतीनें मी या जन्मांतून तर मुक्त झालोंच; परंतु यापुढें मला जन्ममृत्यूची बाधा होऊं नये, हीच आपल्या चरणापाशीं माझी प्रार्थना आहे. श्री ज्ञाने०—आतां तूं योगमार्गानें आपल्या प्राणाचें निरोधन कर, ह्मणजे तुझे सकळ वांछित हेतु परिपूर्ण होतील.

त्याप्रमाणें त्यानें योगधारण करतांच कलेवर मृतवत् पडून त्याच्या ब्रह्मरंध्रांतून एक तेजस्वी विशाल पुरुष बाहेर पडला व त्यानें श्रीज्ञानराजांच्या चरणांवर मस्तक ठेविलें. तेव्हां श्री ज्ञानराज ह्मणतात, "हे महापुरुषा, तूं कोण आहेस व तुला पशू योनी कशी प्राप्त झाली, हें मला सांग." त्यावर तो कर-द्वय जोडून प्रार्थना करून बोलूं लागला. "महाराज, मी पक्षेंद्र असून ऋषिशापानें एका जगत्पाळाचा घोडा झालों; दुसऱ्या जन्मीं

महिष झालों. या महिषयोनींत जन्म घेतल्यावर आपल्या कृपेनें माझा उद्धार व्हावयाचा होता तो झाला! आतां मला बोधामृत प्राशन करवून या भवबंधनापासून माझा उद्धार करा." श्रीज्ञाने०:— "तुला आणखी मनुष्ययोनींत तिसरा जन्म घ्यावा लागेल, मग संतसमागमानें तुझा उद्धार होईल."

असें श्रीज्ञानदेवांनीं म्हणतांच त्या दिव्य पुरुषानें पुन्हां त्यांस प्रणिपात करून तो अदृश्य झाला. मग श्रीज्ञानेश्वरराजानें त्यास तेथेंच समाधी देऊन त्यावर आपल्या हातानें एक मोठा धोंडा ठेवून त्यास सिंदूरलेपन केलें. नंतर दरकुच दरमजल करीत करीत ते चतुर्वर्ग अलंकापुरीस जात असतां, त्यांस आपली जन्मभूमि आपण केव्हां पाहूं असें झालें होतें. व असेच उद्गार एके वेळीं मार्गांत मुक्ताबाईनेंही काढले होते. ठीकच आहे. कारणपरत्वें मनुष्य किती जरी दूर गेलेला असला तरी त्याला आपल्या जन्मभूमीच्या दर्शनाची उत्कट इच्छा व्हावयाचीच! असो. याप्रमाणें ते परमेश्वराचे गुणानुवाद गात गात अलंकापुरीस येऊन पोहोंचले. बहुत दिवसांनीं आपल्या प्रिय मुलांस पाहिलें म्हणजे सदय अंतःकरणाच्या मातेस प्रेमाचा पान्हा फुटतो, त्याप्रमाणें अलंकापुरींतील लोकांस त्यांच्या आगमनानें अत्यानंद झाला. त्या सर्वांनीं त्या दिव्य मूर्तींच्या चरणांवर मस्तक ठेवलें. परस्परांनीं परस्परांस आलिंगनें दिलीं. प्रतिष्ठान क्षेत्रांत श्री ज्ञानराजांनीं केलेल्या चमत्कारांचें

इतिवृत्त अलंकापुरींतील ब्रह्मवृंदांस पूर्वींच श्रुत झालें होतें. त्यामुळें व तेथून आणलेलें आज्ञा पत्र सोपानदेवांनीं त्यांच्या हातीं देतांच त्यांची खात्री झाली. ज्याप्रमाणें वाचस्पतच्यिा भाषणास इंद्रादि देव मान तुकवतात, किंवा श्रीवेदव्यासाचें वचन सकल पंडित मान्य करतात, तद्वत् प्रतिष्ठान क्षेत्रांतील ब्रह्मवृंदांचें आज्ञापत्र अलंकापुरींतील ब्राह्मणांनीं शिरसावंद्य मानलें. व ते आपसांत बोलूं लागले कीं, “ आपल्या पूर्ण भाग्योदयानें हे त्रैमूर्तींचे अवतार आपल्या आळंदी क्षेत्रांत झाले आहेत. हे जगद्गुरु आह्मां अज्ञ जनांच्या उद्धारार्थ या भूमंडलावर सर्वत्र संचार करतात ” असें आनंदानें बोलत ते आपआपल्या घराप्रत निघून गेले. व श्री ज्ञानराजादि चौघा भावंडांनीं आपल्या पूर्वींच्या राहत्या घरीं वास केला.

विसोबा चाटयाची छळणा.

श्रीनिवृत्तिनाथादि चतुर्वर्ग आळंदी येथें राहूं लागल्यावर पुष्कळ लोकांनीं त्यांच्यापासून उपदेश ग्रहण केला. कित्येकांनीं त्यांच्या दर्शनाचा नित्यनेमही ठेवला! अशा प्रकारें त्यांची कीर्ति सर्वतोमुखीं झाली. परंतु कित्येक दुष्ट, अभिमानाच्या ताठ्यानें फुगून गेलेले असल्यामुळें त्यांची प्रसृत होत चाललेली सत्कीर्ति त्यांच्या डोळ्यास खुपूं लागली! जेथें त्यांच्या स्तुतीचा भाग निघाला तेथें यांची निंदा ठेवलेलीच. अशा प्रकारचा तेथें एक विसोबा या नांवाचा ब्राह्मण कापडाचा व्यापार करीत असे, ह्मणून त्यास विसोबा

चाटी असें ह्मणत असत. एके दिवशीं असें झालें की, विसोबा-चाटी हा आपल्या गादीवर तक्याशीं टेंकून बसला असतां त्याचा कारकूनही पलीकडे जवळच लिहीत बसला होता. तेव्हां कांहीं कुरापत काढून श्रीज्ञानदेवाची निंदा करावी अशा हेतूनें तो ह्मणतो.

विसोबाः—दिवाणजी, अलीकडे आमच्या या गावांत संताळाचें फार बंड माजलें आहे. उठला सुटला तो चालला त्या ज्ञान्याच्या दर्शनाला! कालचीं पोरें आणि तीं धर्मबाह्य अशा संन्याशापासून झालेलीं! पण आमच्या गांवांतील लोकांनीं काय त्यांची बडेजावी माजविली आहे! त्यांचीं नुसतीं नांवें कानीं पडलीं, तर माझ्या अंगाची आग होते! त्यांचे बाप तर काय, मोठ्या अनुतापानें काशीस जाऊन त्यांनीं प्रथम संन्यास घेतला; पुढें काम आवरेनासा झाला! पोटाची उपासमार होऊं लागली, तेव्हां त्याचाही तिटकारा वाटून पुन्हां गृहस्थाश्रमी बनले! त्यांची ही पोरें! धर्माविरुद्ध यांचें जनन! असें असून सगळेच आपले मूर्ख बनून त्यांच्या नादीं लागतात! त्याअर्थीं गांवांत किती अनर्थ घडत आहे? अशांचीं मुखें पहातांच सचैल स्नानच केलें पाहिजे. पण मूर्ख जन उलट त्यांच्या भजनीं लागले! ज्यांनीं इतर जनांस उपदेश करून चांगल्या मार्गास लावावयाचे, जे धर्मगुरु, तेच ब्राह्मण ज्ञानोबाला ईश्वर मानून त्याच्या भजनीं लागले! व आपल्या आया बहिणींना उपदेश देऊं लागले. मला तर असें वाटतें कीं, आज जर धर्माचा

शास्ता कोणी येथें असतां तर मीं त्याजकडून अशा ब्राम्हणांना दंडच करविला असता. याप्रमाणें आपल्याशींच क्षणभर वाचाळ पंचवीशी करून आपल्या कारकुनास तो म्हणूं लागला:—कायहो दिवाणजी, तुह्मी जात असतां का त्या ज्ञान्याच्या दर्शनाला! त्याच्याविषयीं तुमचें मत काय आहे, हें सांगाल तर खरें?

दिवाण:—हो. मीं रोज त्यांचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं, असाच निश्चय केला आहे, व त्याप्रमाणें वागतों. ज्याप्रमाणें शीतळ चंद्रापासून दुसऱ्यास कधीं ताप होत नाहीं, त्याप्रमाणें साधु पुरुषापासूनही कोणाला लवमात्र त्रास होत नाहीं. दुसऱ्यावर उपकार करण्याकरितां त्यांचे अवतार आहेत. पापपंकांत रुतलेले, निंदक, धर्मलंड असे लोक विनाकारण त्यांना छळीत असतात, तरी त्यांची शांतवृत्ति मुळीच ढळत नाहीं. माझ्या बोलण्याचा आपल्याला कदाचित् राग येईल. मी खरोखर सांगतों, ब्रम्हज्ञानाचा ठेवा परमेश्वरानें श्रीज्ञानराजांजवळच ठेवला आहे! त्यांच्या नुसत्या नामस्मरणानेंच अंतःकरणाची शुद्धि होते, तर मग त्यांची थोरवी काय सांगावी!!

विसोबा:— पुरे पुरे तुझा वाचाळपणा. तूंही त्या वर्गांतलाच. मूर्ख शिरोमणी! आज मीं तुझें बोलणें ऐकून घेतलें; पण पुन्हां माझ्यासमोर त्याची स्तुती केलेली मला खपायाची नाहीं, हें पूर्णपणें लक्षांत ठेव.

दिवाणः—माझ्या जें अनुभवास आलें तें मी बोललों. पण एवढें लक्षांत असूं द्या कीं, तोंडपुजेपणाचें भाषण करून त्यांच्या निंदेनें मी आपली जिव्हा कधींही विटाळून घेणार नाहीं! श्रीज्ञानदेव महाराजांचें गुणवर्णन केल्यानें माझा उद्धारच होईल, असें मी समजतों!!

विसोबाः—मूर्खा, संन्याशाच्या मुलांच्या गुणवर्णनानें जर उद्धार होईल तर संन्याशांना लग्न करण्याची मोकळीक आहे असें ह्मटलें पाहिजे. तुझ्या ज्ञानोबाला कांहीं अक्कल आहेरे! थोर—श्रीमंत-लोकांचा मानमरातब कसा ठेवावा इतकें सुद्धां त्याला कळत नाहीं, मग तो ज्ञानी कसला?

दिवाणः—त्यांचें ज्ञान व्यवहारनिपुणाला कळणारच नाहीं. अहो, तुह्मी अज्ञानवस्त्र पांघरून त्या बालयोगी व वीतरागी अशा महात्म्यांची निंदा करून आपली जिव्हा कां विटाळून घेतां? अहाहा!! ज्ञानपूर्ण श्रीज्ञानराजांची ती बालमूर्ति ध्यानांत आणतांच मनाला अतीशय संतोष होतो. मग भक्तीनें त्यांचें प्रत्यक्ष दर्शन घेतलें, तर किती आनंद होईल! त्यांचें नित्य दर्शन घेतात ते तर धन्य होत!! खरोखरच ते पुनर्जन्मापासून मुक्त होतील यांत संशय नाहीं!!!

विसोबाः—तुला मी इतकें बोलूं दिलें हाच माझा मूर्खपणा झाला. वाचाळा, आपलें तोंड बंद कर. आह्मी नरककुंडांत पडलों, तरी चिंता नाहीं; परंतु अशा ढोंगी लोकांची आह्मी फजीतीच करणार!

दिवाण:—बोलणें सोपें आहे. पण करणें फार अवघड आहे हें लक्षांत ठेवा.

विसोबा:—तूं माझ्या समोर त्या ज्ञान्याची अतिशय स्तुती केलीस, ह्मणून तुला मीं आज कामावरून दूर केला आहे. उठ चालता हो येथून.

दिवाण:—येवढेंचना ? कांहीं हरकत नाहीं! तुमच्या सारख्यांची नोकरी ही पोटाची टीचभर खळगी भरण्याकरितांच करावयाची ना? आह्मीं आपलें मन तुम्हांला विकलें नाहीं! ज्यांच्या मंगल नामाकरितां तुह्मी आज मला नोकरीवरून दूर करीत आहां, त्याच नांवावर मी भिक्षा मागून आपला चरितार्थ चालवीन, व तेंच नांव माझें रक्षण करून अंतीं मला मोक्षपद देईल.

विसोबा:—पुरे कर तुझी वटवट ! येथून चालता हो एकदांचा, आणि गळ्यांत कफनीं अडकवून त्या सन्याशाच्या मुलांजवळ जाऊन बैस. ह्मणजे तो तुला खायला देईल. सुखानें बसून खाण्याचें नशीबीं पाहिजेना ! ! तुह्मांला तेंच पाहिजे. ऊठ चालता हो !

दिवाण:—नशीब कुठें गेलें तरी बरोबरच असतें; परंतु तुम्हांस मात्र सत्पुरुषांची निंदा केल्याचें प्रायश्चित भोगावें लागेल हें लक्षांत ठेवा.

विसोबा:—मला प्रायश्चित कोण देणार ? पण तुला मात्र या

गोष्टीनें उपाशी रहाण्याचें आजपासून प्रायश्चित मिळालें ना? जोपर्यंत मध्यान्हवेळ झाली नाहीं तोंपर्यंतच ह्या सर्व ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी आठवतात बरें.

दिवाण:—ते सर्व आपल्या सारख्यांना! जे निस्सीम भक्त आहेत त्यांना त्याची पर्वाच नसते! असें ह्मणून तो बिचारा त्याच्या दुकानांतून चालता झाला, व हे राजश्री आपल्याशींच पुटपुटत मोठ्या ऐटीनें तक्याशीं टेंकून बसले. यावरून अहंमन्य लोक अभिमानानें कसे फुगलेले असतात हें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. ज्याप्रमाणें पतंग आपल्या स्वभावधर्माप्रमाणें प्रकाशमान अशा दीपकावर झडप टाकीत असतो, तसेंच जे दुष्ट जन आहेत ते काकदृष्टीनें सज्जनांचीं वर्मे टेहळीत असतात. श्रीपरमभगवद्भक्त प्र्हादास पाहून हिरण्यकश्यपु जसा तळमळत होता, किंवा पांडवांची सत्कीर्ति ऐकून दुर्योधन आपल्या अंतःकरणांत जळत होता, त्याप्रमाणेंच श्रीज्ञानदेवांची अलौकिक कीर्ति ऐकून विसोबा चाटी अत्यंत संतप्त होत असे. "ही तर संन्याशाचीं पोरें! यांच्या सहवासानें तीं आपल्याला स्वतांसारखेंच करतील; किंवा नुसती नजरभेट झाली, तरी आपल्या बुद्धीस फरक पडेल," असें जाणून तो चटदिशी बाजूनें जात असे. इतका तो श्रीज्ञानदेव महाराजांचा कट्टा शत्रु बनला होता.

एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं, श्रीनिवृत्तिनाथास मांडे

खाण्याची इच्छा झाल्यामुळें त्यांनीं मुक्ताबाईस मांडे करावयास सांगितलें. म्हणून ती बिचारी कुंभाराच्या घरीं मडकें आणावयास चालली, तोंच मार्गांत समोरून विसोबा चाटी येत आहे असें पाहून ती बाजूनें चालली. मत्त हत्ती पाहण्याबरोबर कमलनीस जशी भीति उत्पन्न होते, किंवा ससाण्यास पाहून कोकिला थरथर कांपूं लागते, अथवा व्याघ्रास पाहून हरिणी दूर पळून जाण्याचा प्रयत्न करते, त्याप्रमाणें मुक्ताबाई भीतिग्रस्त होऊन दुसऱ्या बाजूस वळली. तेव्हां विसोबा चाटी हा त्या माउलीला मुद्दाम हांक मारून ह्मणतो.

" काय ग ए मुक्ते, इतक्या लगबगीनें तूं कोठें चाललीस ?"

मुक्ता०:—माझ्या निवृत्तिदादांना आज मांडे खाण्याची इच्छा झाली आहे, म्हणून मी कुंभाराच्या घरीं रांधणें आणावयास चाललें आहें.

विसोबा:—तुझे ज्ञानोबा व निवृत्तिदादा तर लोकांत मोठे साधु ह्मणवितात! तर मग त्यांना मांडे खाण्याची इच्छा कशी झाली?

मुक्ता०—ते कुठें आपल्यास साधु ह्मणवितात? त्यांना ईश्वराची भक्ति आवडते ह्मणून ते करतात व लोक त्यांना साधु ह्मणतात. यांत त्यांचा काय दोष बरें!

विसोबा:—दोष नाहींतर काय? हे 'भोंदु' लोकांना नादीं लावून गोड गोड पदार्थ खाण्याची इच्छा करतात. अशांना कोण ह्मणेल साधु?

मुक्ता०:—हें पहा विसोबा, त्यांना कंदमुळें आणि मिष्टान्न सारखेंच आहे बरें!

विसोबा:—सख्या भावाची सख्खी बहीण तूं! मला बोलायला का तूं आटपणार आहेस? पण तुझ्या ज्ञानोबाला सांग कीं, इतर जनांप्रमाणें माझ्यापुढें तुझें ढोंग चालणार नाहीं. मी तुला असे सांगतों कीं, तूं कुंभाराच्या घरीं रांधणें आणावयास जाशील किंवा रांधणें आणशील तर तें मी फोडून टाकीन. इतकें तरी कशाला? मीच जाऊन त्या कुंभाराला सांगतों ह्मणजे तो तुला कसें रांधणें देतो हें मी पाहीन. जर कदाचित् तो देईल तर त्याजकडे येणें असलेली बाकी आत्तांचे आत्तां वसूल करून घेईन. मुक्ते, तूं त्याच्या घरीं जाऊं नकोस! खबरदार गेलीस तर! आल्या वाटेनें येथूनच परत चालती हो!

असें ह्मणून तिला रागें भरून ताडन केलें व परत घराच्या रस्त्याला लावून देऊन, आपण कुंभाराच्या घरीं जाऊन त्याला मुक्ताबाईस मडकें न देण्याबद्दल सक्त ताकीद देऊन तो चालता झाला. रांधणें न देण्याबद्दल कुंभारास ताकीद झाल्यामुळें तो चिंताक्रांत झाला. व क्षणभर स्तब्ध राहून आपल्या मनाशींच बोलूं लागला कीं, "काय करावें? सत्पुरुषांची सेवा आमच्या हातानें घडणेंच अशक्य! त्यांतून जर त्यांनीं आमच्याजवळ असलेली एखादी जिन्नस मागितली, तर ती त्यांच्यापासून पैसे

न घेतां खुषीनें देईन असा मीं आपल्या मनांत पूर्ण विचार करून ठेवला होता; परंतु त्याला हें मधेंच विघ्न आलें! जर द्यावें तर हा सावकार लागलींच दाराशीं येऊन बसेल, मग त्याला द्यावयाला आज आपल्याजवळ पैसे कुठें आहेत?" अशा मोठ्या चिंतेंत तो पडला. शेवटीं त्यास निरुपायानें विसोबाचें ह्मणणेंच मान्य करणें भाग पडलें. काय करतो बिचारा! विसोबा चाट्यानें मुक्ताबाईस कुंभाराच्या घरीं न जाण्याविषयीं निक्षून सांगितलें तरी तो तेथून गेल्यावर ती माउली हळू हळू दुसऱ्या मार्गानें कुंभाराच्या घरीं गेली, व त्याजपाशीं तिनें एक मडकें मागितलें. परंतु त्यास विसोबाची सक्त ताकीद असल्यामुळें नाइलाजास्तव मडकें न देण्याच्या इरायानें तो लीनतेनें भाषण करून ह्मणूं लागला:—" बाई, तुला मीं मडकें दिलें असतें; परंतु तूर्त मजजवळ शिल्लक नाहीं. आवा नुकताच भट्टींत घातला आहे, तो निघाला ह्मणजे देईन बरें!" अशी त्याची निराशेची वाणी ऐकून मुक्ताबाई हिरमुसली होऊन परत घरीं गेली.

"जळ तुंबता तडागीं फोडावा लागतो जसा पाट ॥
शोकक्षोभीं रोदन हृदयस्थैर्या नसे दुजी वाट ॥"

या कव्योक्तीप्रमाणें बिचाऱ्या मुक्ताबाईस विसोबानें निष्कारण ताडन केलें, व कुंभारानें यःकश्चित् एका मडक्याकरितां त्या माउलीचा अपमान केला. शिवाय वडीलदादाची आज्ञा कशी परिपालन होईल या त्रयीनें तिला अत्यंत दुःख होऊन नेत्रावाटें अश्रु बाहेर

पडूं लागले. तेव्हां श्रीज्ञानेश्वरादि त्रिवर्ग इंद्रायणीवर स्नानास गेले होते, मग ते घरीं परत आले. तेव्हां दारांतच आपल्या प्रिय बहिणीचा रुदनस्वर त्यांच्या कर्णीं पडला! लागलींच आपल्या बहिणीजवळ जाऊन मोठ्या प्रेमानें तिच्या पाठीवर हात फिरवीत श्रीज्ञानराजानें विचारलें.—"बाई, तुला इतकें दुःख होण्याचें काय कारण झालें?" सुजनहो, मनुष्य शोकग्रस्त असतां एखादा ममतेचा मनुष्य लडिवाळपणानें विचारूं लागला, ह्मणजे शोकाचा अतिरेक होऊन एकदम रुदनाचा मोठा उमाळा येतो! तद्वत् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं विचारतांच मुक्ताबाईस रडण्याचा मोठा हुंदका आला. तो सावरून झालेली सर्व हकीकत त्यांस निवेदन केली; तेव्हां श्रीज्ञानराज ह्मणतात.—

श्रीज्ञानेश्वरांच्या पाठीवर मांडे भाजणें.

"बाळे, एवढ्यासाठीं तूं इतकी शोकग्रस्त कां झालीस? त्या विसोबाचा स्वभाव आह्मांला ठाऊक आहे, पण त्याला काय करावें बरें? बाई, तूं कांहीं काळजी करूं नकोस! जा सामुग्रीची सिद्धता कर; पुढील सर्व व्यवस्था मी करतों." तें ऐकून मुक्ताबाईस मोठा आनंद झाला, व ती सामान आणण्याच्या तयारीस लागली. मग सर्व सिद्धता झाल्यावर आपल्या बंधूंस सांगतांच त्यांनीं ओणवे होऊन योगबलानें आपला जठराग्नी इतका प्रदीप्त केला कीं, जांबुनंद सुवर्णाप्रमाणें श्रीज्ञानराजांची पाठ लाल झाली, व मुखावाटें ज्वाला बाहेर

पडूं लागल्या! अशी त्यांचे देहाची स्थिति झाल्यावर ज्ञानराजानें सांगितलें कीं, मुक्ताबाई, आतां तूं आपलें कार्य कर! याप्रमाणें बंधूची आज्ञा झाल्यावर मुक्ताबाईनें मांडे अरुवार लाटून श्रीज्ञानराजांच्या पाठीवर भाजून काढण्यास सुरुवात केली. इकडे हें कृत्य चालूं असतां तिकडे विसोबा चाट्यास एकाएकीं स्मरण झालें कीं, 'आज मुक्ताबाई निवृत्तिनाथास मांडे करून घालणार आहे. मांडे भाजावयाचें पात्र न देण्याविषयीं मीं कुंभारास सक्त ताकीद दिली होती. आतां ती कसे मांडे करते तें पाहूं' असें ह्मणून लगबगीनें निघून त्यांच्या स्वयंपाक घराच्या बाजूस जे गवाक्षद्वार (जाळी) होतें, त्यांतून तो आंत डोकावून पाहूं लागला, तों श्रीज्ञानराजांची पाठ प्रखर अग्नीप्रमाणें लाल झाली असून त्यांच्या मुखावाटें भयंकर ज्वाला चालल्या आहेत, असें त्या चाटयाच्या दृष्टीस पडलें!! तेव्हां अतिशय आश्चर्य वाटून प्रत्यक्ष पाहिलेल्या अमानुष कृतीनें विसोबास परम उद्वेग उत्पन्न झाला व "यांस मनुष्यें कोण म्हणेल" असें उद्गार त्याच्या मुखांतून सहज बाहेर पडले! तिकडे मुक्ताबाईचे मांडे सर्व करून झाल्यावर श्रीज्ञानेश्वरमहाराज आपला जठराग्नी शांत करून उठून बसले. मग मुक्ताबाईनें इतर सर्व पदार्थांसह चारी पात्रें वाढून तयार केल्यावर तीं चौघेहीजण एकदम भोजनास बसलीं. अहाहा!! काय त्या वेळचा थाट सांगावा!!! स्वानंदाच्या ताटांत सप्रेम भक्तीची क्षिप्रा वाढून शांति सौख्याची शर्करा ज्यांत घातली अशा त्या भक्ति-

शांतियुक्त क्षिप्रेंत स्वानुभवाचे मांडे चुरून बहिणभावंडांचें आवडीचें भोजन सुरूं झाले; पण बाहेर काय चमत्कार झाला पहा!!

विसोबा चाट्यास पश्चात्ताप.

काकदृष्टीनें शोधण्याकरितां उतावळा झालेला विसोबाचाटी क्षणएक एखाद्या प्रस्तरमूर्तीप्रमाणें तटस्थ झाला. जणूं काय त्यास प्रबळ मूर्च्छनाच आली! कांहीं वेळानें तो सावध झाल्यावर आपल्या मनाशीं ह्मणतो,:—हाय हाय!! मीं केवढें घोरतर पातक केलें!! ज्याप्रमाणें उत्तम गंगाजल मद्य भासावें किंवा धनाचा ठेवा कृशान्नरूप दिसावा, तद्वत मी या ईश्वर मूर्तीस साधारण मनुष्यें समजलों! अनेक वेळां मीं यांची मनसोक्त निंदा केली, माऊली मुक्ताबाईस मीं मूर्खानें ताडन केलें, त्यावेळीं माझे हे हात कां गळून पडले नाहींत? निंदा करतांना जीभ कां झडून पडली नाहीं? प्रतिष्ठान क्षेत्रांत श्रीज्ञानराजांनीं केलेले अलौकिक चमत्कार मीं कानांनीं ऐकले होते, पण ती मी थट्टाच समजलों होतों! मनुष्यवाणी नसलेल्या पशूकडून वेद बोलविलें! स्वर्गस्थ पितर साक्षात् भोजनास आणलें! निर्जीव पाषाणांच्या मासिदींतून मनुष्यवाणी वदविली! आणि मेलेल्या प्राण्यांस संजीव केलें! "अघटित घटना पटीयसी" अशा सत्पुरुषांची—महात्म्यांची—प्रत्यक्ष ईश्वरमूर्तीची म्या अधमाधमानें व्यर्थ निंदा केली! देवा, हें पातक मी आतां कसें फेडूं? माझ्याकरतां यमराजाला निराळाच नरक तयार करावा

लागेल ! शिव शिव ! ज्ञानराज माझ्या या अनंत अपराधाची मला क्षमा करतील काय ? त्यांच्यावांचून आपल्याला दुसरे कोणी तारणार नाहीं ! त्यांनाच शरण जावें. मग ते तारोत अथवा मारोत !

असा पूर्ण पश्चात्तापानें तापलेला तो विसोबा चाटी " त्यांना शरण जावें " येवढें मनांत येतांच तत्काळ तेथून निघून घरांत शिरला व भोजनास बसलेल्या श्रीज्ञानराजांच्या पात्रांत एकदम हात घालून अन्नाचा कवळ उचलून त्यानें लागलीच मुखांत घातला. ज्यावेळीं त्यानें ताटांत हात घातला, त्यावेळीं दयाघनज्ञानराज माऊलीनें सहज लीलेनें ह्मटलें:—" **खेंचरा मागें सर.** " हाच उपदेश व हाच प्रसाद असें समजून तो आनंदानें डोलूं लागला ! !

ईश्वरांश श्रीज्ञानेश्वरादि चतुर्वर्गाचें यथासांग भोजन आटोपल्यावर ते बाहेर (ओटीवर) आले. तेव्हां विसोबानें भक्तिपूर्वक त्यांस साष्टांग प्रणिपात करून प्रार्थना केली कीं, " महाराज, मी सर्वतोपरी अपराधी आहें. आपल्यासारख्या प्रतापशाली महात्म्यांची मीं मूर्खानें अतीशय निंदा केली. जसा अभागी मनुष्य मत्सरबुद्धीनें रत्नाला गारगोटी समजतो, किंवा कामधेनूला वनगाय समजतो, त्याप्रमाणें मी आपलें खरें स्वरूप न ओळखतां आपल्यास साधारण मनुष्य समजलों. मीं आपली व्यर्थ छळणा केली. मी मूर्ख महापापी, चांडाळ, अधमाधम असून मनास वाटेल ती व तोंडास येईल ती, पाहिजे त्यावेळीं आपल्याविषयीं वल्गना केली; पण

त्यायोगानें आपल्या थोरपणाची हानी न होतां उलट तो वृद्धिंगत झाला. मी मात्र घोर नरकाचें साधन केलें! ज्याप्रमाणें लोह आणि परीस यांचा संयोग झाल्याबरोबर लोहाचें सुवर्ण बनते, त्याप्रमाणें आतां तुमच्या पाठीवर मांडे भाजलेली अद्भुत कृति पाहून तत्काळ माझे डोळे उघडले; भ्रांतिपटल नष्ट होऊन माझ्या अंतःकरणांत पूर्ण प्रकाश पडला; माझें अज्ञान आपल्या पूर्ण कृपेनें दूर होऊन आतां मला खऱ्या गुणागुणाची परीक्षा करतां आली, हें मी मोठें भाग्य समजतों. आपण प्रत्यक्ष ईश्वरमूर्ति आहां! मी पतित आहें. माझ्या सर्व अपराधांची क्षमा करून मला या भवबंधनापासून मुक्त करा. आतां मला पूर्ण पश्चात्ताप झाला आहे. तारणार आपण सर्व समर्थ आहां!" असें ह्मणून विसोबानें श्रीज्ञानराजांच्या पायांवर लोळण घातली. तेव्हां त्यांनीं त्यास उठवून ह्मटलें:—"उठा; खेचर उठा! तुमच्यापासून आह्मांला बिलकूल ताप झाला नाहीं. उगीच कां खेद करतां? अहो, जेथें अग्नीच नाहीं तेथें ताप कसा उत्पन्न होईल?" यावर विसोबा ह्मणतो:—"आपण थोर मनाचे समुद्राप्रमाणें गंभीर आहां! आई जरी लेकराचें शतशः अपराध क्षमा करून त्याचें पालन करतें, त्याप्रमाणें मला आतां बोधामृत पाजून त्रिविध तापापासून मुक्त करा." याप्रमाणें प्रार्थना करून तो स्तब्ध राहिला. श्रीज्ञानराजांनीं त्याचें अंतःकरण शुद्ध झालें आहे, असें जाणून ते त्यास ज्ञानोपदेश करतात.

विसोबा खेंचरास ज्ञानोपदेश

" विसोबा, अंत:करण हें एक क्षेत्र आहे. त्या क्षेत्राची यम नियमरूप नांगरानें शुद्धि करून मग त्यांत भगवद्भक्तिरूपीं दिव्य बीज पेरावें; आणि त्यास सत्स्वरूपाचें पाणी देऊन उत्तम प्रकारें लावणी करावी. नंतर त्यास विषयवासनारूप पशूंचा उपद्रव न व्हावा, ह्मणून त्यांच्या सभोंवतीं वैराग्याचें कुंपण लावावें! इतकी तयारी झाल्यावर त्याच्यावर पडणाऱ्या कामक्रोधादि षड्विध रोगांचा शमदमादि षट्संपत्तिरूप दिव्यौषधीनें नाश करावा. कदाचित् त्या वल्लींची कुतर्करूपी कोल्हे नासाडी करण्यास येतील, त्यांना विचाररूप गोफणीनें पिटाळून लावलें पाहिजे. त्यांत वितंडवादरूपी उगवणारें तृण विवेकरूप शस्त्रानें वरचेवर छेदून टाकीत जावें. ह्मणजे त्या क्षेत्रांत ब्रह्मानंदाचें उत्तम पीक येईल! आणखी असें पहा—अशा उत्तमोत्तम पिकाची खराबी करण्यास मनरूपी माकड अगदीं टपून बसलेला आहे! त्यास ब्रह्मानुसंधानरूप युक्तीनें धरून एकाग्रतारूपी रज्जूनें आत्मरूपी खुंटीला बळकट बांधून टाकिलें ह्मणजे परमामृताचें फळ चाखावयास मिळेल! एवढ्याकारितां प्रथम मन स्वाधीन ठेवलें पाहिजे. मनरूपी चोर आत्मधन चोरून सर्वस्वाचा नाश करण्यास इतकें पटाईत आहे कीं, इंद्रादिदेव सुद्धां त्यास धरण्यास असमर्थ झाले! या चोरानें कित्येकांस नाना तऱ्हेच्या विषयाचें आमिष दाखवून

सर्वतोपरी नागविलें आहे. महान् महान् योगी श्रेष्ठांस सुद्धां त्यांनीं भ्रष्ट करून सोडलें.

विसोबा०:—मग सद्गुरो, अशा या प्रतापी मनाला स्वाधीन कसें करावें हें कृपा करून सांगावें.

श्रीज्ञान०:—विसोबा,! प्राणायामानें मनाचें आकलन करून श्रद्धापूर्वक परमेश्वराचें ध्यान करीत असावें; अशा प्रकारें नित्यनेमानें अभ्यास केल्यास विक्षेपाचा अभाव होऊन मन आत्मस्वरूपीं लय पावेल.

विसोबा:—गुरुराया, हा मार्ग मला बिकट दिसतो. या खडतर साधनानें मन आवरतां येईल असें मला वाटत नाहीं. यास्तव असा दुसरा एखादा सोपा मार्ग दाखवावा कीं, त्यायोगें मी या भवसागरांतून सहज तरून जाईन.

श्रीज्ञान०:—कांहीं हरकत नाहीं; तुला दुसराही उपाय सांगतों. ज्याप्रमाणें राजदूत अपराधी मनुष्याला बांधून वधस्तंभाकडे नेतात त्यावेळीं तो अपराधी मनुष्य पुढील भयंकर देखावा मनांत आणून अत्यंत दीन होतो; त्याप्रमाणें प्रत्येक प्राणिमात्रास केव्हां तरी मृत्यु हा येणारच हें लक्षांत वागवून सकल प्राणिमात्रांशीं अभिमान सोडून प्रत्यक्ष आपल्या पोटच्या पोराप्रमाणें प्रेमानें वागावें व परमेश्वराची भजनपूजनआदिद्वारां भक्तिपुरःसर एकनिष्ठतेनें सेवा करावी. जशी पतिव्रता स्त्री आपल्या पतीवर पूर्ण श्रद्धा ठेवून त्याला एकपतित्वानें भजते, त्याप्रमाणें आपण एका परमेश्वरावांचून दुसरी-

कडे कशांतही लक्ष पुरवूं नये. एकत्वानें त्याच्याकडे लक्ष लागलें, ह्मणजे तो दयाघन प्रभु आपल्या भक्तास मुक्तिरूप आपली कन्या देऊन आपला जावई करतो.

विसोबा:—हा मात्र सुलभ उपाय मला दिसत आहे; व तो आपल्या कृपेनें साध्य करीन असें मला वाटतें. आतां श्रुतीमध्यें " नाऽन्यःपंथा विद्यतेऽजनाय " ह्मणजे आत्मज्ञानावांचून अन्य मार्ग नाहीं असें म्हटलें आहे. यास्तव तें ज्ञान समजून घेण्याची मला उत्कट इच्छा आहे, ती पूर्ण करणार आपणच समर्थ आहां!

श्रीज्ञाने०:—बरें आहे. तेंही सांगतों. " सर्वंखल्विदं ब्रह्म " ह्मणजे परमात्म्याची सर्वत्र अनस्यूत व्याप्ति आहे. मी, तूं व स्थावरजंगमात्मक जगत् सर्व आत्मरूपच होय. जसा घट, रांजण, व परळ, हीं एका मृत्तिकेचींच असून नांवें मात्र भिन्नभिन्न आहेत; तसें मी—तूं व जगत् एकच आहे असें मान. कारण उपाधिभेदानें तो अनेक रूपानें भासतो. वस्तुतः तो असंग आहे. अशा निर्विकार आत्म्याच्याठायीं अज्ञजन मायावश होऊन " मी कर्ता " " मी भोक्ता " असें जाणतात; ह्मणून त्यांना अभिमानाचा ताठा उद्भवतो व त्यायोगानें द्वैतभावाची वृद्धि होऊन मनुष्यें आपणच आपला नाश करून घेतात. वास्तविक पहातां आत्मा हा अक्रिय, असंग, कूटस्थ आणि सर्वसाक्षी असा आहे. अशा विचाराला आत्मज्ञान असें ह्मणतात.

विसोबा:—सद्गुरो, आत्मज्ञानप्राप्तीचें एखादें सुलभ साधन असल्यास कृपा करून या दासाला सांगावें.

श्रीज्ञाने०:—ज्याला आत्मज्ञानाची प्राप्ति करून घेणें असेल, त्यानें अत्यंत बलवान् अशा षड्रिपूंशीं घोर युद्ध करून त्यांना रसातळास पोहोंचविलें पाहिजे. असंभावना व विपरीत भावनारूप आवरणांचें श्रवणमननादिरूप शस्त्रानें छेदन केलें पाहिजे. मग विक्षेपरूप शक्तीला ब्रह्मानुसंधानरूप प्रतोदानें झोडपून पार पिटाळून दिलें पाहिजे. मग आत्मस्वरूपांत निमग्न होऊन उत्तम अशा ब्रह्मानंदरसाचें सुखानें पान करावें. एकदां ब्रह्मानंदसुखाची गोडी लागली ह्मणजे त्या मनुष्यास स्त्री—पुत्र, धन—दौलत, शेत—वाडी, घर—दार किंबहुना राज्यसंपत्तीचीसुद्धां वासना उत्पन्न होत नाहीं. विसोबा, आत्मज्ञानाचें वर्णन किती जरी केलें तरी तें अपुरेंच ! आत्मज्ञान प्राप्त झाल्यानें वासनेला क्षयरोग लागतो व मन आपला मननभाव सोडून देतें. आत्मज्ञानासारखा दुसरा कोणताही श्रेष्ठ लाभ नाहीं, ह्मणूनच योगीजन सर्वसंगपरित्याग करून अरण्यसेवन करतात. कां कीं, या दिसणाऱ्या अशाश्वत मायिक पदार्थांकडे आसक्तीपूर्वक मन मुळींच वळणार नाहीं. सर्व प्राणीमात्रांत मनुष्य जन्म हा श्रेष्ठ गणला जात आहे, तो तरी या करितांच कीं, ईश्वराराधनपूर्वक आपण कोण, कोठून आलों, व पुढें आपल्याला कोठें जावयाचें, याचा पूर्णपणें विचार करून असंख्य जन्ममरणाच्या फेऱ्यांपासून मुक्त व्हावें.

विसोबा:—अहाहा! गुरुराजा, आज आपण आपल्या अमृतरूप वचनानें मला पापपंकांतून बाहेर काढलेंत! माझ्या हृदयकोशांत दुर्मिळ अशा अमृतसिंधूचा ओतप्रोत संचय करून ठेवलात! त्यानें मी आज धन्य झालों, माझ्या जन्माचें खरें सार्थक आज झालें. जसा सूर्याचा उदय झाल्यावर अंधःकाराचा लोप होतो, तसा आपल्या बोधामृतानें माझ्या अंतःकरणांत सांठून राहिलेल्या अज्ञान-रूपी तमाचा पूर्णपणें नाश होऊन ज्ञानरूप सूर्याचा उदय झाला. आतां मला सर्वत्र आनंदी आनंद भासत आहे. मी आपल्या चरणकमलीं हें चित्तरूपी कमल समर्पण करून आपल्या अनुज्ञेनें सर्वस्वाचा त्याग करून श्रीक्षेत्र पंढरपूर येथें वास करतों. आपला वरदहस्त माझ्या मस्तकीं असावा.

याप्रमाणें उपदेश ग्रहण करून विसोबा खेचर स्वात्मानंद अमृत सिंधूंत यथेच्छ पोहूं लागले. ज्याप्रमाणें नारदमुनीच्या दर्शनानें वाल्मिकीचा तामस गुण नाहींसा झाला, त्याप्रमाणें जो विसोबा क्रोध आणि मत्सर यांचा कांहीं दिवस मूर्तिमंत पुतळा होता, तोच विसोबा श्री ज्ञानराजांच्या पूर्ण कृपेनें सात्विक, धर्मनिष्ठ व श्रद्धाळु असा होऊन ईश्वरस्वरूपीं तल्लीन झाला. यावरून सत्समागमाचा महिमा किती अगाध आहे, हें सुजनांच्या सहज ध्यानीं येईल.

सुजनहो! श्री निवृत्तिनाथादि संतश्रेष्ठ हे पुणतांबा येथें अघटित महिमा करून अलंकापुरीस गेलेले पूर्वींच सांगितलें आहे. तो

महिमा चांगदेवांची समाधि उत्थान झाल्यावर समजल्यामुळें त्यांस अनुताप झाला. चांगदेव हे मूळ कोण होते याची प्रथम थोडी-थोडी माहिती देऊन नंतर त्यांचें समग्र वृत्त निरूपण करतों.

चांगदेवांचा वृत्तांत.

चांगदेव हे इंद्राचे मरुद्गण असून स्वामीशापानें मृत्युलोकीं मानवरूपानें अवतीर्ण झाले. जेव्हां इंद्रानें शाप दिला, तेव्हां त्यांनीं विव्हळ होत्साते स्वामीची स्तुति करून उश्शाप मागितला. त्यास अमरपतीनें संतुष्ट होऊन असा उश्शाप दिला कीं, "मरुद्गणा, जगदुद्धारासाठीं शिव, विष्णु, ब्रह्मा व आदिमाया हे कलियुगीं अनुक्रमें निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताबाई या नांवानें प्रकट होतील, तेव्हां तूं त्यांना शरण जा. म्हणजे तूं शापविमुक्त होऊन त्यांच्या अनुग्रहानें कृतकृत्य होशील." तें त्यांचें वचन ऐकून चांगदेव संतुष्ट होत्साते भूलोकीं मानवजन्म घेते झाले. चांगदेवांनीं बाळपणींच वेदाध्ययन व मंत्र–तंत्रादिकांचें अनुष्ठान सिद्ध केल्यावर संपूर्ण योगाचाही उत्तम प्रकारें अभ्यास केला! हे योगबलानें कालाची वंचना करून १४०० वर्षे जिवंत होते!! ह्मणून चौदा शतकाला यांचीं निरानिराळीं चौदा नांवें पडलीं आहेत. श्री ज्ञानेश्वर व

१ चांगदेव चांगा, २ वटेश्वर चांगा, ३ चक्रपाणी चांगा, ४ चांगासिद्ध ॥ १८ ॥
५ शिवयोगी चांगा, ६ मणिसिद्ध चांगा, ७ अनकर चांगा, ८ नाहमा नामें ॥१९॥
९ नागेश नामें चांगा, १० मुधेश नामें चांगा, ११ सत्यासिद्ध चांगा १२ निश्चलदास
१३ चिधादेवी चांगा, १४ म्हणवीवुटी चांगा, चौदानामें चांगा वर्तमान ।२१

चांगदेव यांची जी भेट झाली तीच शेवटच्या समाधीची होय.

श्री निवृत्तिनाथादि भांवडें पुणतांब्याहून निघून गेल्यावर कांहीं कालांनीं चांगदेवांची समाधि उत्थान झाली. तेव्हां ते नेहमींच्या परिपाठाप्रमाणें दीर्घ स्वरानें म्हणाले:—" ज्यांचीं प्रेतें जिवंत होण्याकरितां त्यांच्या आप्तेष्टांनीं आणली असतील, व यंदां जे कोणी मृत्यु पावले असतील, त्या सर्व प्रेतांना चांगदेवाची अशी आज्ञा आहे कीं, प्रेत हो ! तुह्मी सर्वांनीं जिवंत होऊन माझ्या-समोर यावें. " ह्या त्यांच्या आज्ञेचें कोणींच उत्तर दिलें नाहीं, हें पाहून चांगदेवांची शिष्यशाखा मात्र लागलीच त्यांच्याजवळ प्राप्त झाली. तेव्हां चांगदेव शिष्यास म्हणतात—बाळा ! या खेपेस कोणीच मृत्युमुखीं पडला नाहीं, किंवा यमराज निद्रिस्त झाल्यानें त्याचा दरबार उघडला नाहीं वा यंदांच्या सालांत कोणाचेंहीं आ-युष्य संपलें नाहीं; अनेक रोगरूपी दूत यमराजाची आज्ञा पालन करण्यास कंटाळले, किंवा ब्रह्मदेवांनींच मृत्यूविषयीं कांहीं नियमानियम करून ठेवला नाहीं; अथवा कोणाचीही प्रेतें आलींच नाहींत कीं काय ?

शिष्य:—गुरु महाराज! काय सांगू ? येथें प्रेतें इतकीं येऊन पडलीं होतीं कीं, त्यांना ठेवण्यास सुद्धां जागा नव्हती. थोड्या दिवसांपूर्वीं दहा–पंधरा वर्षांचीं कोमल चार बालकें हरिनामाचा

गजर करीत येथें आलीं होतीं. त्यांची अंगकांति महान् तेजःपुंज असून त्यांची मुद्रा अत्यंत शांत होती! त्यावेळीं मला असें वाटलें कीं, तीं साक्षात् आदिमातेसह त्रैमूर्ति जगदुद्धारासाठीं मानवरूपानें भूलोकीं अवतीर्ण झालीं आहेत! त्या चौघांनीं स्वामींचें दर्शन घेऊन अत्यंत नम्रपूर्वक दंडवत प्रणाम केला; आणि मग त्यांपैकीं बाल-योगिनीनें येथें असलेल्या प्रेतरक्षकांकडून स्वामींची व त्या प्रेतांबद्दलची संपूर्ण माहिती मिळविली. तो वृत्तांत ऐकून त्या कुमारीचें हृदय करुणतेनें आर्द्र झालें; आणि तिनें त्या बालतपोनिधींस येथें पडलेल्या मृतप्राण्यांचें पुनरज्जीवन करण्याबद्दल नम्रपूर्वक विनवणी केली. त्यावेळीं बालप्रभूंनीं तिला विठ्ठलनामाचा गजर करण्यास आज्ञापिले. तेव्हां ती कुमारिका श्री विठ्ठलनामसंकीर्तनांत तल्लीन होऊन तिनें जवळच पडलेलें कुत्र्याचें शव घेतलें; आणि त्यास त्या प्रेतांवरून ओंवाळून फेंकून दिलें. त्यायोगें तीं प्रेतें तर जिवंत झालीच परंतु तो ओंवाळून फेंकलेला मृत कुत्राही जिवंत होऊन निघून गेला!! केवळ श्रीहरिनामसंकीर्तनानें शवांस जिवंत करणारे असे महात्म्ये आजपर्यंत माझ्या पाहण्यांत किंवा ऐकण्यांत सुद्धां आलें नव्हतें!

चांगदेवः—बेटा! खरोखर हें केवढें अद्भुत सामर्थ्य बरें! यावरून ते कोणी तरी ब्रह्मवेत्ते असून जगदुद्धारासाठीं साक्षात् परमेश्वरच या भूतलावर मानवरूपानें अवतीर्ण झाले असावेत असें मला वाटतें! त्या बालयोग्यांची चौकडी कोठून आली, येथून कोणीकडे

गेली, आणि त्यांचीं नांवें काय याची तुला कांहीं माहिती असल्यास सांग.

शिष्य०—सद्गुरो ! ती बालयोग्यांची चौकडी कोण होती, कोठली राहणारी, त्यांचीं नांवें काय, ती कोठून आली, आणि कोणीकडे गेलीं, हें मला कांहींच समजलें नाहीं.

याप्रमाणें शिष्याचें वचन ऐकून चांगदेव तटस्थ झाले! इतक्यांत चांगदेवाच्या दर्शनाकरितां प्रतिष्ठानक्षेत्राहून एक ब्राह्मण येऊन त्यानें त्यांस साष्टांग प्रणिपात केल्यावर पैठणक्षेत्रीं घडलेलें श्रीज्ञानेश्वरांचें अलौकिक वृत्त निवेदन केलें. ती आश्चर्यकारक वार्ता ऐकून चांगदेवास व त्याच्या शिष्यशाखेस परम आश्चर्य वाटून ती कांहीं अंशीं सत्य असावी, असें त्यांनीं अनुमान केलें. तेव्हां त्यांचें तें धोरण ओळखून त्या ब्राह्मणानें त्यांचा अघटित महिमा आपण स्वतः पाहिल्याबद्दल पुन्हां त्यांची पूर्णपणें खात्री केली. तथापि ही गोष्ट कितपत खरी आहे, याचा संशय येऊन तिच्या चौकशीकरितां चांगदेवांनीं पत्र देऊन मुद्दाम आपल्या शिष्यांस पैठणक्षेत्रीं पाठविलें. ते शिष्य आज्ञेप्रमाणें प्रतिष्ठानक्षेत्रीं गेल्यावर तेथील ब्रह्मवृंदांची भेट घेऊन त्यांनीं त्यास तें पत्र दिलें; आणि तेथें सूक्ष्मरीतीनें शोध करून त्याचें उत्तर आणलें. नंतर ते शिष्य चांगदेवाचें दर्शन घेतल्यावर त्यांस ह्मणतातः—"गुरुजी! आह्मीं प्रतिष्ठानक्षेत्रीं जाऊन त्यांचा सूक्ष्म रीतीनें शोध केला; त्यावरून

पूर्वी प्रतिष्ठानक्षेत्रस्थ ब्राह्मणानें सांगितलेला वृत्तांत अक्षरशः खरा आहे, इतकेंच नव्हे तर तेथील ब्रह्मवृंदांनीं पत्र लिहून आमच्या हातीं दिलें. आणि मला तोंडीं असेंही सांगितलें कीं, निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव व आदिमाता मुक्ताबाई ह्या ज्ञानमय मूर्ति प्रतिष्ठानक्षेत्राहून निघून नेवासक्षेत्रीं गेल्या. तेथें कांहीं काल वास करून श्रीज्ञानेश्वरांनीं श्रीमद्भगवद्गीतेवर "भावार्थ दिपिका" नामक मराठी भाषेंत परमोत्तम टीका लिहिली आणि नेवासेक्षेत्रस्थ आबालवृद्धांस श्रीमद्भगवद्गीतेचा गूढार्थ उत्तम प्रकारें समजून देऊन आत्मज्ञानाची ओळख करून दिली! नंतर त्यांनीं तेथून नुकतेंच अलंकापूरक्षेत्रीं प्रयाण केलें. याप्रमाणें साद्यंत वृत्त स्वामीस निवेदन करून प्रतिष्ठानक्षेत्रस्थ द्विजश्रेष्ठांनीं दिलेलें हें पत्र आपल्या चरणीं अर्पण करीत आहों." पैठणक्षेत्रस्थ ब्राह्मणांनीं पत्र लिहून पाठविलें, तें असें:—

"परात्परा सिद्धा गुरुसी नमन । पत्र अवलंबन केलें स्वामी ॥
विद्यार्थी ये आह्मी सर्वंही ब्राह्मण । झालों सुखसंपन्न आशीर्वादें ॥
देवें ऐकिली जी वार्ता ती वर्तली येथें । पढविलें पशूतें वेदघोषें ॥
गृहस्थाचे पितर आणुनी जेवाविलें । प्रत्यक्ष पाहिलें आपण नेत्रीं ॥
निवृत्ति ज्ञानेश्वर मुक्ताबाई सोपान । वय तो लहान बाळरूपी ॥
करूनि ऐशी क्रीडा येथुनि स्वार झाले । नेवासिया गेले महासिद्ध ॥

याप्रमाणें पैठणाहून आलेलें पत्र वाचून चांगदेव आश्चर्यचकित झाले; आणि ते आपल्या मनाशीं ह्मणूं लागले:—मीं तेरा वेळां काळाची वंचना करून वाचासिद्धि, मनोजयसिद्धि, प्राणजयसिद्धि,

व अणिमादि अष्टसिद्धि प्राप्त करून घेतल्या! इतकेंच नव्हे, तर अगणित शिष्यशाखाही वाढविली. व त्या करितां मला जे परिश्रम करावे लागले, ते श्रीज्ञानराजांच्या अलौकिकप्रतापाचा विचार केला असतां अगदींच व्यर्थ होत! कारण, अशा अद्भुत लीला एका ईश्वरावांचून इतरांच्या हातून घडणें अशक्यच! त्याअर्थीं श्रीज्ञानेश्वरादि चतुवर्ग ईश्वरांश आहेत यांत संशय नाहीं! अशा सत्पुरुषांच्या दर्शनाचा लाभ केव्हां होईल, याचीच मला तळमळ लागली आहे. याप्रमाणें अनुताप पावलेले चांगदेव आपल्या शिष्यवर्गास ह्मणतात:—" शिष्यहो आपण उदईक सर्वजण आळंदीस जाऊं चला." हें ऐकून त्यांपैकीं एक शिष्य ह्मणतो:—" गुरु महाराज! ज्या गोष्टी आपण प्रत्यक्ष पाहिल्या नसून निव्वळ ऐकीव आहेत, त्यांविषयीं आपण इतकें आतुर होण्याचें कारण नाहीं. प्रथमत: आपण त्यांस पत्र लिहून पाठवावें, म्हणजे त्यांच्या उत्तरावरून आपल्यास त्यांची योग्यता सहज कळून येईल." ही शिष्योक्ति चांगदेवास पटली; आणि तत्काल त्यांनीं आपल्या शिष्यास दौत—लेखणी आणण्याची आज्ञा केली. त्यांच्या आज्ञेप्रमाणें शिष्यांनी लिहिण्याची सर्व सामुग्री हजर केली. नंतर ते पत्र लिहिण्यास बसले; पण प्रथमत: मायना काय लिहावा, याचाच चांगदेवास मोठा विचार पडला, तो असा:—" ते वयानें लहान आहेत, ह्मणून 'चिरंजीव' लिहावें, तर त्यांचे ठायीं असलेल्या अमोघ

ज्ञानावरून ते केवळ ब्रह्मरूपच होत असें दृष्टोत्पतीस येतें. बरें, तीर्थरूप लिहावें, तर सांप्रत ते अत्यंत बालदशेंत आहेत." शेवटीं काय लिहावें हें कांहीं सुचेना; ह्मणून चांगदेवांनीं हातांतील लेखणी खालीं ठेवली आणि ते त्रासानें ह्मणाले:—" पत्र कसें लिहावें, हेंच प्रथम कळेना! त्याअर्थी धि:कार असो मला व माझ्या सिद्धाईला!! " असें ह्मणून ते उद्वेग चित्तानें स्वस्थ बसले! तें पाहून एक शिष्य म्हणतो:—सद्गुरो! आतां मला एक युक्ति सुचली; ती अशी कीं, आपण त्यांना कोरेंच पत्र पाठवून द्यावें, ह्मणजे झालें. त्याच्या उत्तरावरून आपल्याला त्यांच्या ज्ञानाचा अनुभव सहज कळून येईल. ही शिष्यांनीं योजलेली युक्ति चांगदेवास पसंत पडून लागलींच त्यांनीं त्या कोऱ्या कागदाची पत्रासारखी घडी केली. आणि ती शिष्याचे हातीं देऊन त्यास अलंकापुरीस जाण्यास सांगितलें. तेव्हां त्या शिष्यानें गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांना साष्टांग प्रणिपात केला; आणि तो तेथून निघून आळंदीस येऊन दाखल झाला.

प्रभातकाळीं मंदवाऱ्याची झुळूक सुटली असून सूर्यकिरणें उदयाचलावर मंदगतीनें प्रकाशित झालीं होतीं. अशा सुशांत समयीं श्रीनिवृत्तिनाथादि चतुर्वर्ग आश्रमाबाहेर आपसांत अध्यात्मविषयक चर्चा करीत बसले होते. ती अशी:—

अध्यात्मविषयक चर्चा

श्रीज्ञा०—श्रीगुरु निवृत्तिदादा! ब्रह्म व जगत् ह्यांच्या

सत्यासत्यतेविषयीं शास्त्रांत अनेक प्रकारच्या मतांचें विवेचन केलें आहे. आतां आपलें ठाम मत काय आहे, तें कृपा करून निवेदन करावें.

निवृत्तिनाथ—ज्ञानराजा ! जरी लोकांत अनेक प्रकारचीं मतें दृष्टोत्पत्तीस येतात, तरी त्या सर्वांचे मुख्य दोन भेद आहेत. कोणी ब्रह्म सत्य व जगत् मिथ्या आहे असें मानतात. कोणी कोणी ब्रह्म सत्य व जगत्ही सत्य आहे म्हणतात. ह्या दोहोंचाच वाद सर्वत्र चाललेला असतो. आतां आपण ह्या दोहोंचें विवेचन करूं. पहा—ब्रह्माच्या सत्यत्वाविषयीं उभयतांची एकवाक्यता आहेच; पण जगत् मिथ्यत्वासंबंधानें मात्र त्यांच्या मतांत भेद दृष्टोत्पत्तीस येतो. ज्या अर्थी ब्रह्मसत्यत्वाविषयीं सर्वांची एकवाक्यता आहे; त्याअर्थी जगन्मिथ्यत्वाची सिद्धी होते; आणि माझेंही मत असेंच आहे. यास्तव ज्यांना परमपदप्राप्तीची इच्छा असेल, त्यांनीं द्वैतभाव सोडून निर्गुण ब्रह्माची उपासना करावी.

ज्ञाने०—जगांत बहुतेक लोक सगुण मूर्तींची उपासना करतात तर तें असें कां?

निवृत्ति०—मायेचे वशीभूत झालेल्या जनांचें चित्त निर्मल नसतें म्हणून निर्गुणोपासना करण्यास मलिन चित्त समर्थ नाहीं; यामुळें ते सगुणोपासना करतात.

ज्ञाने०—सगुणोपासना करणें व्यर्थच काय?

निवृत्ति०—छेः ! असें कांहीं माझें ह्मणणें नाहीं. मंद जिज्ञासूं-करितां सगुणोपासना शास्त्रांत सांगितली आहे. तीव्र जिज्ञासूंनीं तर निर्गुणोपासनाच केली पाहिजे.

ज्ञान०—"ज्ञानादेव तु कैवल्यं" ह्मणजे ज्ञानानेंच परमपदाची प्राप्ति होते, असें श्रुतींत सांगितलें आहे. तें ज्ञान वेदांतविचारानें प्राप्त होतें. तर मग भक्तीची अवश्यकता नाहींशी झाली ना?

निवृत्ति०—भाव-भक्तीवांचून ब्रह्मसाक्षात्कार संभवत नाहीं. कारण, केवळ शाब्दिक ज्ञानानें प्रथमतः अंतःकरणाची शुद्धि होत नाहीं. तर मग त्यानें ब्रह्मप्राप्ति कशी होईल? ज्ञान असलें कीं, त्याचा प्रकाश पडायाचाच. पहा—जसा अंधळ्याला दिव्याचा प्रकाश असून देखील दिसत नाहीं; तसा भाव-भक्तीरहित शाब्दिक ज्ञानसंपन्न पुरुषास तेजोमय परब्रह्माचा साक्षात्कार होणें शक्य नाहीं.

यांप्रमाणें ते लोकोद्धारक वचनांची पुष्पवृष्टि करीत असतांना अनेक भाविकजन माना तुकवीत होते. कित्येक नागरिक जन त्यांच्या दर्शनाकरितां येत होते. कांहीं लोक त्यांचें दर्शन घेत होते व कोणी कोणी दर्शन घेऊन आपापल्या घराप्रत जात होते.

चांगदेवाचें कोरें पत्र.

अशा सुसमयीं चांगदेवाच्या शिष्यांनीं अलंकापुरींत प्रवेश केला. तेव्हां श्रीज्ञानेश्वरांच्या सभोंवतीं बसलेला जनसमुदाय व परस्परांत चाललेली वेदांतचर्चा पाहून ते आश्चर्यचकित

झाले; तरीपण अमकेच ज्ञानेश्वर आहेत असें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. म्हणून तेथें जवळपास कित्येक मुलें खेळत होतीं. त्यांस त्यांनीं प्रश्न केला कीं, " बाळांनो ! निवृत्ति—ज्ञानदेव कोठें राहतात, व त्यांचा मठ कोणीकडे आहे, हें आम्हांस सांगावें " त्यावर एका कुमारीनें त्यांजकडे तिरस्कार मुद्रेनें पाहून म्हटलें:—" कायहो, तुम्ही किती उद्धट दिसतां ! ज्यांची कीर्ति त्रैलोक्यांत फडकत आहे, व जे ब्रह्मादिदेवांनाही पूज्य, अशा सत्पुरुषाचें नांव एक-वचनानें उच्चारितांना तुम्हांला लाज नाहीं वाटली ? पहा बरें, ते महात्मे सूर्याप्रमाणें तेजस्वी असून आनंदानें वेदांतचर्चा करीत बसले आहेत ! ! " ह्या त्या कुमारिकेनें सांगितलेल्या खुणेवर जाऊन श्री निवृत्तिनाथादि भावंडांस त्यांनीं नम्रतेनें प्रणाम केला. तेव्हां श्री ज्ञानराज आपल्या भावंडांस म्हणतात:—" दादा, हे ब्राह्मण चांगदेवांकडून आपल्या समाचाराकरितां आले आहेत " ही श्री ज्ञाने-श्वरमहाराजांच्या अंतर्ज्ञानानें निघालेली सहज वाणी चांगदेवशिष्यांच्या कानीं पडतांच ते आश्चर्यचकित झाले व अत्यंत नम्रतापूर्वक पुन्हां त्यांस प्रणाम करून चांगदेवांकडून आणलेलें पत्र श्री ज्ञानराजांच्या हातीं दिलें. तेव्हां निवृत्तिनाथांनीं श्री ज्ञानराजांस आज्ञा केली कीं, ' तें पत्र वाचा. ' त्यावर श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—" यांतील अर्थ कोरा आहे ! " मग निवृत्तिनाथांनीं म्हटलें—" बरोबर आहे. असें पहा ज्ञानराजा, कोऱ्यावरच कांहीं लिहितां येईल. लिहिलेला

कागद् असता तर रद्दींतच गेला असता. यास्तव तुह्मी त्यांना एक कृपापत्र लिहा." ही श्री निवृत्तिनाथांची आज्ञा मान्य करून श्री ज्ञानराजांनीं चांगदेवांस पत्र लिहिलें तें असें—" स्वस्ति श्रीवटेशु । जो लपोनि जगदा भासु । हावी मग भासु । प्रकटला करी ॥ १ ॥ " या ओंवीपासून प्रारंभ करून पासष्ट ओंव्यांचें पत्र लिहिलें. त्यास 'लिखित पासष्टी' असें म्हणतात. त्या पत्रांतील अर्थ ह्मणजे तें केवळ उपनिषद्भागाचें सारच होय. तें वाचून किंवा ऐकून जो त्याचें मनन करील तो तत्काल उपशम पावून त्याच्या हातीं परमतत्त्वच सांपडल्यासारखें होईल. त्याचा सारांश असा—

चांगदेव पासष्टीचा तात्पर्यार्थ.

" जे लपून राहिल्यानें जगताचा भास होतो व ज्याच्या प्रकटनानें जगदाभासाची निवृत्ति होते, असा वटेश [शिवस्वरूप] स्वतः तूं आहेस. ह्मणजे तुझ्या निजरूपाला [ब्रह्मस्वरूपाला] अज्ञानानें जाणलें जात नसल्यामुळें मिथ्या जगत् सत्यवत् प्रतीत होतें. वस्तुतः जगताचा आधार व अधिष्ठान तूं आहेस. उदाहरण—रज्जु [दोरी] च्या अज्ञानानें रज्जुचे ठायीं सर्प प्रतीत होतो. येथें सर्पाचा आधार व अधिष्ठान रज्जु आहे; तद्वत् मिथ्या जगताचा आधार व अधिष्ठान तूं आहेस. या स्थलीं हें रहस्य आहे कीं, रज्जुची सामान्य व विशेष अशीं दोन स्वरूपें आहेत. इदं हें सामान्य स्वरूप व रज्जु हें विशेषरूप जाणावें. जें इदं त्याला सामान्यरूप म्हणतात;

आणि भ्रांतिकालीं ज्या स्वरूपाची प्रतीति होत नाहीं, किंतु ज्याची प्रतीति झाली ह्मणजे भ्रांति निवृत्ति होते, तें रज्जूचें विशेषरूप म्हणावें. तशींच आत्म्याचीं दोन स्वरूपें आहेत. एक सामान्य व दुसरें विशेष. सत् हें सामान्यरूप व असंग, कूटस्थ, नित्य-मुक्त इत्यादि विशेषरूप आहे. म्हणजे आत्मा हा भ्रांतिकालीं स्थूल—सूक्ष्म संघाताशीं अभिन्न होऊन प्रतीतीस येतो; म्हणून आत्म्याचें सत् स्वरूप सामान्य म्हणावें; आणि स्थूल—सूक्ष्म सं-घातामध्यें भ्रांतिकालीं आत्म्याचें असंग, कूटस्थ, नित्यमुक्त रूप प्रतीत होत नाहीं. किंतू आत्म्याचें असंगादि रूप प्रतीति झाली असतां संघातभ्रांति निवृत्त होते, म्हणून त्यास असंग कूटस्थादि विशेषरूप म्हणावें. सामान्यरूप आधार व विशेषरूप अधिष्ठान होय. दृष्टांतः—जसा सर्पाचा आश्रय जो रज्जु त्याचें सामान्य इदंस्वरूप सर्पाचा आधार आहे; आणि विशेष रज्जु स्वरूप अधि-ष्ठान आहे; तद्वत मिथ्या प्रपंचाचा आश्रय आत्मा, त्याचें सामान्य तत्स्वरूप प्रपंचाचा आधार व असंगादि विशेषरूप अधिष्ठान आहे. यास्तव या संघातामध्यें आत्मा तूं आहेस. अशा तुला अ-विद्येचें कार्य जी अंतःकरणादि उपाधि तिच्या संबंधामुळें जन्ममरण-रूप संसार प्राप्त झाला आहे. वस्तुतः तूं ब्रह्मरूप आहेस. वेदांतील महावाक्यांच्या श्रवणमननादिद्वारा असंभावना व विपरीतभावना नष्ट झाल्यावर आत्म्याच्या अपरोक्ष ज्ञानानें अविद्येची अशेष

निवृत्ति होते. मग निरुपाधि आत्माच ब्रह्मरूप आहे, असा अनुभव येतो. चांगदेवा, नामरूपावांचून आस्ति भाति प्रियरूप जो आत्मा त्याचे ठायीं तुझें चित्त आसक्त असून तुला त्याचें ज्ञान झालें आहे. यास्तव तूं ब्रह्मरूप स्वानंदांत मग्न होऊन सुखी हो. ज्या अर्थीं ज्ञानसंपत्ति तुझ्या घराप्रत आपोआप आली आहे, त्या अर्थीं वेद्य–वेदकभाव म्हणजे द्वैतभाव टाकून सुखरूप असें जें परमपद त्याप्रत प्राप्त हो " अशाप्रकारचें अत्यंत बोधपर पत्र श्रीज्ञानराजांनीं चांगदेवांच्या शिष्यांच्या स्वाधीन करून सांगितलें कीं, चांगदेवांस आमचा साष्टांग प्रणिपात निवेदन करावा. नंतर ते शिष्य पत्र घेऊन आपल्या गुरूकडे गेले. आणि त्यांनीं स्वतः अलंकापुरीस पाहिलेल्या वृत्तावरून चांगदेवांस श्रीज्ञानराजांच्या ज्ञानभांडाराचें वर्णन निवेदन केलें. तें असें:—गुरु महाराज! आपल्या सत्संगतीनें आह्मांला अनेक साधुपुरुषांचें दर्शन झालें; पुष्कळ तपस्व्यांची भेट झाली; पण आळंदीचे श्रीज्ञानराजांसारखे ज्ञानी आजपर्यंत आमच्या पाहण्यांत आले नाहीं! काय त्यांचा कडकडीत विरक्तपणा; किती तरी परमेश्वरावर एकनिष्ठ भक्ति; केवढें तें त्यांच्या शरीरकांतीचें दिव्य तेज; कितीतरी त्यांची शांत मुद्रा; इतकेंच नव्हे तर अज्ञानी प्राण्यांचे ह्या भवबंधनापासून उद्धार होण्याकरितां ते शंकासमाधानपूर्वक उत्तम प्रकारें सर्व जिज्ञासू पुरुषांस आत्मज्ञानाचा उपदेश करीत असतात. एवंच ते केवळ ईश्वरी अवतारच

होत. त्यांपैकीं श्रीज्ञानेश्वर महाराज तर प्रति ईश्वरच! वयानें तरी मोठे आहेत ह्मणावें तर तसेंही नाहीं. त्यांचें वय अवघे चौदा पंधरा वर्षांचें असावें. याप्रमाणें त्यांची हकीकत सांगितल्यावर तें पत्र दिलें. मग चांगदेवांनीं मोठ्या भक्तिपुरस्सर त्या पत्राची पूजा केल्यावर वाचण्यास प्रारंभ केला; परंतु आत्मज्ञानपूरीत असा पत्रांतील गूढार्थ त्यास स्पष्टपणें समजेनासा झाला. तेव्हां ते आपल्या मनाशीं बोलूं लागले.

चांगदेवांचा अनुताप.

"अहा! काय ही माझी शोचनीय स्थिति! मौंजीबंधन झाल्यावर मीं उत्तम प्रकारें वेदाध्ययन केलें; तापी नदीच्या कांठीं खडतर तपश्चर्या करून नानाप्रकारचीं दैवतें प्रसन्न करून घेतलीं; आणि गोदावरीच्या तीरीं वास करून मोठ्या धैर्यानें अष्टांगयोगाचा संपूर्ण अभ्यास केला; त्यायोगें अणिमादि अष्टसिद्धि प्राप्त करून घेतल्या! पण त्या लहान अर्भकांनीं लिहिलेल्या पासष्ट ओंव्यांचा मथितार्थ काय आहे त्याचें अद्यापि मला यथार्थ ज्ञान झालें नाहीं. या दांभिक सिद्धाईच्या भरानें मी आपल्या स्वस्वरूपास भुलून गेल्यामुळें माझे ठायीं अहंकार उद्भवून ज्ञानभ्रष्ट झालों! धिःकार असो मला व त्या माझ्या सिद्धाईला! चौदाशें वर्षें जगून मला एवढा अर्थ समजला नाहीं, मग आत्मज्ञानाची गोष्ट लांबच राहिली! आतां मात्र माझी पूर्ण खात्री झाली कीं, सद्गुरूच्या कृपेवांचून आत्मज्ञानाची प्राप्ती होत नाहीं. पहा—श्रीरामचंद्र साक्षात् अवतारी होते, त्यांनीं देखील

श्री वसिष्ठ मुनींला गुरु केला; आणि श्रीकृष्ण सांदीपनाला शरण गेले. तेव्हांच त्यांना आत्मज्ञान प्राप्त झालें. यास्तव आतां मला गुरु करणें उचित होय." याप्रमाणें पश्चात्ताप पावलेले चांगदेव आपल्या शिष्यांस म्हणाले:—शिष्यहो! अल्पवयस्क श्रीज्ञानराजांचें हें अमोघ ज्ञान जाणून मला त्यांच्या दर्शनाची उत्कटेच्छा झाली आहे. यास्तव आळंदीस जाण्याची सत्वर तयारी करा. त्यावर शिष्य ह्मणतात:-सद्गुरो! आमची एवढी विनंति आपण कृपा करून मान्य करावी. आपल्या विद्येचें सामर्थ्य मोठें आहे; यास्तव आपण सर्व परिवारासह चांगल्या ऐश्वर्यानें त्यांच्या भेटीस जावें, ह्मणजे त्यांचेही नेत्र दिपतील! "बरें आहे." ह्मणून चांगदेवांनीं मंत्रबलानें व्याघ्राचें स्तंभन करून सर्पास मोहित केल्यावर हातांत भुजंग धारण करून ते व्याघ्रावर आरूढ झाले. मग आपल्या चौदाशें शिष्यांसहवर्तमान गाड्या, घोडे, पालख्या, म्याने व मंगलवाद्यें इत्यादि लवाजम्यानिशीं चांगदेवांची स्वारी श्रीज्ञानेश्वरांच्या दर्शनार्थ चालली असतां मार्गांत शेंकडो लोकांच्या झुंडीच्या झुंडी चांगदेवांच्या दर्शनास येत होत्या! अशाप्रकारें मार्ग आक्रमण करीत करीत भीमातीरीं येऊन त्यांनीं मुक्काम केला, व तेथून निघण्यापूर्वी आपल्या दोन शिष्यांस "चांगदेव आपल्या दर्शनाकरितां येत आहेत" असा निरोप सांगण्याकरितां पाठविलें व मागाहून आपणही निघाले.

श्रीनिवृत्तिनाथादि भावंडांची व चांगदेवांची भेट.

प्रभातकालीं श्रीनिवृत्तिनाथादि चौघी भावंडे आपल्या आश्रमानजीक असलेल्या पडक्या भिंतीवर बसून विठ्ठलनामाचा गजर करीत होतीं. इतक्यांत चांगदेवांचे शिष्य तेथें येऊन त्यांनीं त्यांस प्रणाम करून विनयानें म्हटलें:—" महाराज, सिद्ध चांगदेव आपल्या दर्शनाकरितां येत आहेत. " हें ऐकून निवृत्तिनाथादि चतुर्वर्गास आनंद झाला. तेव्हां निवृत्तिनाथ ह्मणाले:—ज्ञानराजा, अणिमादि अष्टसिद्धि, चतुर्दश विद्या व चौसष्ट कला यांचें पूर्णपणें ज्ञान झालें असून चौदाशें वर्षांचा जो सिद्ध पुरुष त्यांना आपण सामोरे जावें हें उचित होय. अशी निवृतिनाथांची आज्ञा होतांच श्रीज्ञानराजांनीं सहज म्हटलें. " भिंतीमाई, चला सिद्धांच्या दर्शनाला. " तेव्हां त्यांच्या वचनप्रभावानें ती भिंत तत्काळ चालूं लागली! हें अघटित कृत्य पाहून जनांस फार आश्चर्य वाटलें. ह्मणून तेही त्यांच्याबरोबर चालले. मग वृत्तांत सांगण्यास आलेले चांगदेवाचे शिष्य हा अद्भुत चमत्कार पहातांच तांतडीनें तेथून निघून गेले. इतक्यांत व्याघ्रावर आरूढ होऊन हातांत नागप्रतोद घेतला ऽ. असे चांगदेव समोरून येतांना शिष्यांच्या दृष्टीस पडले.तेव्हां ... आपल्या गुरूस पाहून ह्मटलें. " महाराज, ज्यावेळीं आपला निरोप सांगावयास आम्ही तेथें गेलों, त्यावेळीं निवृत्तिनाथादि महात्मे ... पडक्या भिंतीवर बसले होते. आपला निरोप त्यांनीं ऐकतांच

जड भिंतीसह ते आपल्यास सामोरे यावयास निघाले! ते येत आहेत, पहा! तेव्हां चांगदेव त्यांस पाहून आपल्या मनांत अत्यंत विस्मय पावले. व ह्मणूं लागले कीं, " धिःकार असो मला ! व्यर्थ माझ्या सिद्धीचा बडीवार! मी सचेतन प्राण्यावर बसून आलों. पण ते तर अचेतन अशा भिंतीवर बसून मला सामोरे येत आहेत. अहाहा!! काय त्यांचा अगाध महिमा! आतां त्यांनाच शरण जावें हें बरें!" अशा प्रकारें अनुताप पावलेल्या चांगदेवांनीं वाघावरून तत्काल उडी टाकली, व हातांतील सर्प दूर फेंकून दिला. ज्ञानेश्वरादि चतुरवर्ग किंचित् लांब होते, तरी तेथपासूनच चांगदेवांनीं त्यांस शतशः प्रणाम केले! चांगदेव आपल्या वाहनावरून खालीं उतरल्याचें श्रीनिवृतिनाथादि चतुरवर्गांनीं पहातांच तेही भिंतीवरून खालीं उतरले. इतक्यांत चांगदेवांनीं येऊन त्यांचे पाय धरले व सद्गदीत अंतःकारणानें ह्मणूं लागले—" अहाहा!! सद्गुरुसमर्था श्रीज्ञानेश्वरा! तुह्मी मस्तकावर ज्ञानमुकुट, अंगांत भक्तिकफनी व कमरेस वैराग्यवस्त्र परिधान करून लोकोद्धारासाठीं या भूमंडळावर अवतीर्ण झाला आहां! त्याअर्थीं सद्गुरुनाथा, मी अत्यंत मूढ-असून आपणास शरण आलों आहें. या दीनाचा आतां आपण उद्धार करावा! देवा, मी सिद्धींच्या गर्वभरांत गर्क झाल्यामुळें आपल्यासारख्या ब्रह्मरूप पुतळ्यांचे कृपेस पात्र झालों नाहीं. इतकेंच नव्हे तर, आपणांस माझी सिद्धाई दाखविण्याकरितां हातांत सर्प-

प्रतोद घेऊन व्याघ्रावर आरूढ झालों. परंतु आतां सचेतन प्राण्याप्रमाणें चालत आलेली ही जड भिंत दृग्गोचर होतांच माझा तो गर्व व देहाभिमान जागच्याजागीं जिरून गेला. जसा दीपापासून झालेला प्रकाश दीपांतच लय पावतो; तद्वत माझ्यापासून उद्भवलेल्या अभिमानाचा मजमध्येंच लय झाला. अहाहा!! किती मोठा आजचा भाग्याचा दिवस!!! आज अभिमानाचें ओझें डोक्यावरून खालीं उतरल्यामुळें मी अत्यंत सुखी झालों! सद्गुरो, मी आपणांस अनन्यभावानें शरण आलों आहें. आतां मला बोधामृत पाजून पावन करा!" हें चांगदेवांचें अत्यंत नम्रतायुक्त भाषण ऐकून श्रीज्ञानराज ह्मणतात:—योगिश्रेष्ठा चांगदेवा, तुम्ही सिद्धपुरुष असून फार थोर आहां! सर्वज्ञ असून आह्मांसारख्या दीनदुबळ्यांच्या कल्याणासाठीं जन्म घेऊन षट्चक्रभेदनानें अणिमादि अष्टसिद्धी व नवऋद्धी आपण दासी केल्या आहेत, ह्मणून आपणच धन्य पुरुष आहां! आह्मींच आपल्यास वंदन केलें पाहिजे. असें ह्मणून त्या सर्वांनीं चांगदेवांस साष्टांग प्रणिपात केल्यावर श्रीज्ञानेश्वरांनीं त्यांस हातीं धरून जवळच एक घनदाट छायेचा वट[1]वृक्ष होता, त्याच्या छायेखालीं ती सर्व मंडळी जाऊन बसली. नंतर चांगदेवांनीं पुन्हां त्यांस नम्रतापूर्वक प्रणाम करून विनयानें ह्मटलें.

---

१ यास विश्रांतिवट असें ह्मणतात. हा वटवृक्ष आळंदी गांवापासून सुमारें एका मैलावर आहे.

चांगदेव:—सद्गुरो! मी स्तुतीस मुळींच पात्र नाहीं. आपली थोरवी कितीही वर्णन केली तरी ती थोडीच! अहाहा! आज आपल्या दर्शनाचा लाभ घडला, ह्मणून माझा अभिमान नष्ट झाला. आपल्यासारख्या ब्रम्हविद्वरिष्ट पुरुषांच्या दर्शनाकरितांच मीं कालाची वंचना करून चौदाशें वर्षे हें शरीर वांचविलें. ह्मणूनच आज मला ह्या ज्ञानमय तेजोमूर्तीचें दर्शन झालें. त्यायोगें अभिमानाचें समूळ निरसन होऊन आतां माझें चित्त निर्मल झालें. माझ्या योगाभ्यासाचें पुण्य उदयास आल्यामुळें आज मला सद्गुरुचरणीं लोटांगण घालून या भवबंधनापासून मुक्त होण्याची बुद्धि सुचली. यास्तव कृपानिधे, एकदां ही माझी ' अहं ग्रंथि ' छेदन करून मला कृतकृत्य करावें.

ज्ञानेश्वर:—चांगदेवा, योगी पुरुष योगाभ्यासाचे बळेंकरून परमपदाचें जवळ नवळ जाऊं लागला कीं, अहंकार हा हळूच त्याच्या अंतःकरणांत प्रवेश करतो. त्यायोगें षड्रिपूंच्या अंगीं बळ येऊन ते मूर्तिमंत त्याच्यापुढें उभे राहूं लागतात. असें होतां होतां एकदां त्यांचा पगडा बसला कीं, तो पुरुष त्यांचा गुलाम बनलाच! अशा पुरुषाला परमेश्वरप्राप्तीची चुकामुक होते. यास्तव ऋद्धि—सिद्धी यांना तृणवत् तुच्छ मानून त्यांचा अभिमान सोडावा; आणि परमात्मस्वरूप ओळखून त्या स्वरूपांत निमग्न व्हावें, म्हणजे द्वैतभाव नष्ट होऊन सर्वत्र आत्मरूम दिसूं लागेल!

चांगदेवा, आत्मस्वरूपाची थोरवी सांगणें ह्मणजे अमृताची गोडी अमृतासारखीच आहे असें ह्मणण्याप्रमाणेंच होय! ज्याला आत्म्याचें ज्ञान झालें, त्याला सर्व कांहीं प्राप्तरूपच आहे! तो पुरुष मायिक पदार्थांस मुळींच भुलत नाहीं; आपपर ह्या द्वैतभावाला शिवत देखील नाहीं. जगांतील सकल प्राणी आपले आप्त होत असें त्याला वाटतें. 'सर्व मीच व माझें सर्व' अशी अद्वैतस्थिति प्राप्त झाल्यावर काय! तो जिकडे पाहील तिकडे त्याला आत्मरूपच दिसणार! हें आत्मज्ञानरूप खड्ग ज्याला प्राप्त झालें असेल त्यास त्रैलोक्यांत कमी काय आहे? अशा प्रकारचा ज्ञानी पुरुष जरी प्रपंचांत मग्न झाल्यासारखा दिसला, तरी तो पाण्यांतील कमलाप्रमाणें त्याहून अलिप्तच राहतो. कारण, त्याचा विरक्तरूप अग्नि प्रज्वलित असतो. त्या अग्नींत विषयरूप काष्ठें कितीही घातलीं, तरी तीं भस्मीभूत होऊन जातात.

चांगदेवः—ह्मणूनच मी आत्मस्वरूप जाणण्याच्या हेतूनें आपल्यास शरण आलों आहें. त्याअर्थी आपण मला त्याचें ज्ञान करून द्यावें.

श्रीज्ञानेश्वरः—चांगदेवा, केवळ वेदांतवाक्यें श्रवण केल्यानें आत्म्याचें अपरोक्ष ज्ञान प्राप्त होत नाहीं. त्या वाक्याचें मनन, निदिध्यासच केला पाहिजे. सर्वांनीं आत्मस्वरूपाची ओळख करून घ्यावी, ह्मणून ब्रह्मदेवानें चार देव निर्माण केले. पण

त्यांना देखील त्या स्वरूपाचा थांग लागला नाहीं. ह्मणून वेदांनी " नेति नेति " (इतकेंच नव्हे, इतकेंच नव्हे.) असें ह्मटलें. अर्जुनास आत्मस्वरूपाचें ज्ञान करून देण्यासाठीं भगवंतांनीं गीता वर्णिली; पण तेवढ्यानें त्याची तृप्ति झाली नाहीं असें जाणून, पुन्हां त्यास उत्तरगीता सांगितली; तेव्हां त्याचें आवरण व विक्षेप दूर होऊन अपरोक्षज्ञान प्राप्त झालें. यास्तव तुह्मी आत्मज्ञान प्राप्त करून घेऊन ब्रह्मानंदांत तल्लीन व्हा.

याप्रमाणें त्या वटवृक्षाखालीं उभयतांचा संवाद झाल्यावर श्रीज्ञानराजांनीं चांगदेवांस मोठ्या प्रेमानें आपल्या आश्रमाप्रत नेलें. चांगदेवांनीं त्यांच्या सत्संगतीनें आनंदांत कांहीं काळ घालविल्यावर एके दिवशीं त्यांनीं पुन्हां प्रश्न केला.

चांगदेवः—श्रीज्ञानराजा ! आतां मला ब्रम्हस्वरूपाची ओळख करून घेण्याची उत्कटेच्छा झाली आहे. यास्तव कृपा करून त्या ब्रह्माचें लक्षण सांगा.

श्रीज्ञानेश्वरः—चांगदेवा ! ब्रम्ह आकाशाप्रमाणें सर्वव्यापक असल्यामुळें त्याचें क्रियारहित निश्चलरूप आहे. अविद्यादि विकाररहित असें तें अद्वितीय ब्रम्ह आपल्याहून भिन्न नाहीं, तर तें केवळ आत्मरूपच आहे. आपल्या आत्मरूपानें ज्या अद्वितीय ब्रम्हाप्रत ज्ञानी पुरुष प्रत्यक्ष पहातो, तें ब्रम्ह सर्व जगताला व्यापून राहिलें आहे. तसेंच निरातिशय असें त्याचें आनं-

दरूप असल्यामुळें सर्वोत्कृष्ठ आहे. आतां ब्रम्हाचें ज्ञान करून घेण्याची तुम्हांस इच्छा झाली आहे, त्याअर्थी श्रीगुरुनिवृत्तिदादांच्या कृपेनें मुक्ताबाई तुम्हांस उपदेश करील; पण उपदेश देण्यापूर्वी एक मनुष्य बळी द्यावा लागतो, यास्तव तुमच्या शिष्य शाखेपैकीं बळी द्यायला एखाद्याला घेऊन या.

याप्रमाणें श्रीज्ञानराजांची आज्ञा होतांच चांगदेव बळी आणण्याकरितां आपल्या शिष्यवर्गाकडे गेले. ते गेल्यावर श्रीज्ञानराज निवृत्तिनाथांस ह्मणतात—अद्यापि चांगदेवाचा अभिमान नष्ट झाला नाहीं. ज्याप्रमाणें जारिणी स्त्रिया कामी पुरुषाला फसवितात त्याप्रमाणें ऋद्धिसिद्धि भुलवून त्यास अहंकाररूपी मांगाच्या स्वाधीन करतात. हा मांग मोक्षरूपी पर्वतावर चढून जाणाऱ्या योगी पुरुषास मध्येंच गांठून त्याच्या पुण्याईची व ज्ञानाची राखरांगोळी करण्यास मागें पुढें पहात नाहीं. वास्तविक विचार केला तर चांगदेवाची योग्यता केवढी मोठी बरें!! आणि तपोबल तरी केवढें! समाधि लावण्यांत जणूं काय प्रति शंकरच; असें असून एका अहंकाराच्या स्वाधीन झाल्यामुळें इतक्याही श्रेष्ठ गुणांची नासाडी झाली. यास्तव योगी पुरुषांना काय किंवा संसारिक मनुष्यांना काय! ते अहंकाराच्या स्वाधीन झाले कीं मुकलेच. वायु निरपेक्षतेनें सर्वत्र संचार करतो. अभिमानरहित होऊन सूर्य उदय पावतो, वेद स्वभावतांच कल्याणकारक मार्ग दर्शवि-

तात. नद्या लाभावांचून वाहतात. हें सर्व निरभिमानानें लोकोपकारासाठीं आपआपली क्रिया बिनचूक करतात. तशींच प्रत्येकानें अभिमानाचें गांठोडें बाजूला सारून लोकोपयोगी कर्में करीत असावीं.

इकडे चांगदेवांनीं श्रीज्ञानेश्वरांच्या आज्ञेप्रमाणें बळी आणण्यास आपल्या शिष्यवर्गांत जाऊन प्रत्येकास " मला उपदेश ग्रहण करण्याकरितां एक नरबली पाहिजे; यास कोणीतरी कबूल व्हा !" असें विचारलें. पण दुसऱ्याकरितां स्वतःचा जीव देण्यास कोण तयार होणार ? कोणीही शिष्य कबूल करीत नाहींत असें पाहून त्यांस परम अनुताप झाला. "धिःकार असो मला ! मी व्यर्थ शिष्यशाखा वाढवून त्यांना शाल्योदन खावयास घातलें. परंतु प्रसंगीं एक तरी उपयोगी पडला कां ! यावरून जन्मतः व अंतीं ज्याचा तो एकटाच ! शिव ! शिव !! आतां मला खरोखर पश्चत्ताप झाला ! काय आश्चर्य ! शिष्यांना मीं बळीचा प्रश्न करतांच जसें मांजर दृष्टीस पडतांच उंदीर पटापट पळून जातात, तसेंच सर्व शिष्य आपआपलें गवाळें घेऊन पळून गेले ! आतां श्रीसद्गुरु ज्ञानराजांस काय सांगावें ! माझे शिष्य ऐकत नाहींत ह्मणून? कांहींही होवो. अनन्यभावानें त्यांनाच शरण जावें. अन्य उपाय नाहीं." असा अनुताप पावलेले चांगदेव तेथून निघून श्रीज्ञानराजांच्या आश्रमीं आले.

चांगदेवांस मुक्ताबाईचा उपदेश.

प्रहर दिवसाचे समयीं मुक्ताबाई आंगणाच्या जवळच असलेल्या अडोशाच्या न्हाणींत मंगलस्नानास बसल्या होत्या. इतक्यांत पूर्ण अनुतापानें गहिंवरून गेलेले चांगदेव लगबगीनें आंत शिरणार तोंच मुक्ताबाई त्यांच्या दृष्टीस पडल्या! तेव्हां ते आपल्या मनांत ओशाळून लागलींच परत फिरले, व अंतःकरणांत अत्यंत खेद पावून मनाशींच ह्मणतात कीं, " आज मला केवढें पातक लागलें! कारण मंगलस्नान करीत बसलेल्या मातोश्री मुक्ताबाई माझ्या दृष्टीस पडल्या ! शिव ! शिव ! धिक् माझें जिणें ! मी या संतश्रेष्ठांची सेवा करून ज्ञानामृत प्राशन करण्यास या स्थलीं आलों असतां माझ्यानें दोष घडावा ! तर मग माझ्या पदरीं पातकांचीच राशी आहे, असें ह्मटलें पाहिजे. देवा ! आतां मी कोणतें प्रायश्चित घेऊं ! आणि या पातकाचें क्षालन कसें करूं ? माता मुक्ताबाई माउलीस आतां हें तोंड तरी कसें दाखवूं ? " असें हळहळत चांगदेव बाहेरच उभे राहिले होते. इतक्यांत मुक्ताबाईचें स्नान झाल्यावर वस्त्रपरिधान करून त्या बाहेर आल्या, व ह्मणूं लागल्या:— चांगदेवा, मी स्नानास बसलें, ह्मणून लज्जित होऊन माघारा कां फिरलास ? अरे, काळाची वंचना करून आज चौदाशें वर्षें तूं आपला देह व्यर्थ वांचविलास ! सिद्धाईच्या योगानें लोकांत कीर्ति मान मिळविलीस; परंतु तुझ्या अंतःकरणांतला द्वैतभाव अद्याप दूर झाला नाहीं. याचें कारण मी तुला सांगतें. नीट लक्ष देऊन ऐक.

असें ह्मणतांच चांगदेवानें मुक्ताबाईचे चरणांवर अतिनम्रतापूर्वक मस्तक ठेविलें. नंतर त्याला उठवून मुक्ताबाई सांगते—चांगदेवा,ऐक.

जरी गुरुकृपा असती तुजवरी । तरी विकार नये तो अंतरीं ।
भिंतीस कोनाडे तैसियापरी । मानुनि पुढें येतासी ॥ १ ॥
जनीं वनीं हिंडता गाय । वस्त्रें नेसत असती काय ।
त्या पशु ऐसींच मी पाहे । तुज कां नये प्रत्यया ॥ २ ॥

आणखी असें पहा. चांगदेवा,

" आत्मज्ञान बोध नाहीं तुज झाला । विकल्प उदेला तेणें चित्तीं ॥१॥
आत्माराम जो कां नांदे तत्र देहीं । तोचि ज्ञानें पाही शरीरीं या ॥ २ ॥
स्त्री पुरुष नामें काप-चाळ्या भिन्न । दोहोंसी कांचन मूळ एक ॥ २ ॥
घागरी रांजण जरि भिन्नाकृती । मृत्तिका आहे ती सर्व एका ॥ ३ ॥
स्त्री पुरुष देह दृश्यीसी निराळे । चैतन्य वेगळे नाहीं त्यांत ॥ ५ ॥
पाही पांडुरंग सर्वत्र बिंबला । रिता ना उरला ठाव कोठें ॥ ३ ॥

चांगदेवा ! जोंपर्यंत गुरुमुखानें बोधामृत प्राशन केलें नाहीं, तोंपर्यंत द्वैतभावाची निवृत्ति होत नाहीं, ही भेदबुद्धीच जन्ममरणास कारणीभूत आहे. " देहात्म बुद्धिजं पापं न तद्गोवध कोटिभिः । आत्माहं बुद्धिजं पुण्यं न भूतो न भविष्यति ॥ " म्हणजे देहालाच आत्मा समजण्यानें कोटि गोहत्यांपेक्षां अधिक पाप केल्यासारखें होय. आणि आत्मबुद्धीच्या पुण्याचें वर्णनच करतां येत नाहीं. यास्तव अतःपर देहात्मबुद्धि सोड आणि आत्मस्वरूप ओळखून त्यांत तल्लीन रहा. ह्मणजे तुला ब्रह्मानंदाचा अनुभव येईल. बरें तें असो. पण ज्ञानदेवदादांनीं तुम्हांला उपदेश देण्यापूर्वीं तुम्हांकडून

एक नरबळी घेण्याविषयीं मला सांगितलें आहे. त्याची तुमच्या कडून तयारी आहे ना ?

चांगदेवः—मातोश्री, गर्विष्ठ मनुष्यालाच ज्ञानशून्य ह्मणतात, तें सत्य होय. मीं सिद्धाईचा बाजार मांडून चौदाशें सांप्रदायी शिष्य जमा केले. आणि तेच माझे जिवलग आहेत अशी माझी पूर्ण खात्री होती. परंतु काय सांगूं? जोंपर्यंत त्यांना माझ्याकडून शाल्योदन खावयास यथेच्छ मिळत असे तोंपर्यंत ते मला अत्यंत लडिवाळपणा दाखवीत असत. बळीची गोष्ट काढतांच रणांगणांतील भ्याड शिपायाप्रमाणें त्यांनीं मला सोडून लागलींच पलायन केलें. यास्तव मातोश्री, श्रीसद्गुरुज्ञानेश्वरांच्या आज्ञेप्रमाणें ह्या चांग्याचाच बळी घेऊन पावन करा ह्मणजे झालें! आतां दुसरा कांहीं उपाय नाहीं.

मुक्ताबाईः—आतां मात्र खरोखर तुमचा देहाभिमान नष्ट झाला. चांगदेवा, तुमचा गर्व व देहाभिमान नाहींसा करण्याकरितांच ज्ञानदेवदादांनीं बळीचा उपाय योजला होता.

चांगदेवः—अहाहा!! सद्गुरु ज्ञानराजा! तुह्मीं या दीन दासावर हा केवढा उपकार केलात! धन्य गुरुवर्या! आपली भक्तवत्सलता मला आज पूर्णपणें कळून आली.

मुक्ताबाईः—चांगदेवा! आतां तुह्मी उपदेशास योग्य शुद्धपात्र झाले आहां! ह्मणून सद्गुरूच्या एकाच वचनानें तुह्मांला पूर्ण वैराग्य आलें. आतां तुह्मी ज्ञानाचे योग्य अधिकारी झाले

ह्मणून आतां मी तुह्मांस श्रीनिवृत्तिदादांच्या व ज्ञानेश्वरदादांच्या कृपाप्रसादानें तें ज्ञान सांगतें:—चांगदेवा, ज्या ब्रह्माचें सगुणरूपानें वर्णन केलें आहे, तें निर्गुण ब्रह्माहून भिन्न नसून उपाधीचा त्याग केल्यानें तें सगुण ब्रह्मच निर्गुणरूप आहे. अशा त्या अद्वितीय ब्रह्माहून भिन्न असा दुसरा कोणताच पदार्थ नाहीं. ब्रह्मा, विष्णु, रुद्र, इंद्रादि देवता, अग्नि, सूर्य, चंद्र, काल, पंचमहाभूतें, इत्यादि जेवढें म्हणून हें जग आहे, तें संपूर्ण जग ब्रह्मरूपच होय. उदाहरण—स्वप्नामध्यें स्वप्न पाहणारा पुरुष एकटाच असून नानाभावांप्रत प्राप्त होतो; तद्वत् तो एकच परमात्मा मायेच्या संबंधानें नानारूपानें भासतो. अशा त्या अद्वितीय परमात्म्याच्या ज्ञानावांचून मोक्षप्राप्तीचा दुसरा कोणताच मार्ग नाहीं. "मी ब्रह्मरूप आहें" असें जें आत्मज्ञान हाच एक मोक्षप्राप्तीचा मार्ग होय.

चांगदेव:—मातोश्री, तुम्हीं सांगितल्याप्रमाणें हा आत्मा जर अद्वितीय आहे; तर ह्या लोकीं त्या आत्म्यासंबंधानें नानाप्रकारचे भेद कां प्रतीतीस येतात ?

मुक्ताबाई:—चांगदेवा, उत्तम प्रश्न केलात! आकाशांतील चंद्रासंबंधानें वास्तविक विचार करून पहातां भेद मुळींच नाहीं. यद्यपि तो अद्वितीयपणें एकच आहे, तथापि जलपात्रांच्या उपाधिभेदानें नानाप्रकारें भासतो; तद्वत् या आत्म्याचे ठायीं अनेकत्व नसून कार्योपाधीमुळें तो अनेक प्रकारांनीं प्रतीतीस येतो. वास्तविक पाहिलें तर आत्मा सर्वांहून भिन्न आहे. तेव्हां हें चांगदेवा,

मी कोण आधि ओळखावें । मग आपण आपल्या पाहावें ।
स्वरूपीं समरस व्हावें ! रात्रंदिन ॥ १ ॥
त्रिगुणावरुतें ज्ञान पै निश्चित । तथापी निरुतें घेई बापा ॥ २ ॥
मुक्ताबाई ह्मणे होई तूं सावध । सांगितल्या बोध पुढील तो ॥ ३ ॥

चांगदेवः—मातोश्री, त्रिविधतापाचा नाश करणारा व अखंड सुख देणारा हा तुमच्या मुखकमलांतून निघालेला अमृतरूपी बोध कानीं पडतांच त्यायोगें माझ्या अंतःकरणांत एकदम प्रकाश पडून मला सर्व जगत् ब्रह्मरूप दिसूं लागलें. मातोश्री, तुमचे हे अनंत उपकार माझ्यानें फिटणार नाहींत ! आपल्या मनाचें समाधान करून दुसऱ्याचें समाधान करणारे सद्गुरु जगांत दुर्मिळ आहेत. ह्मणूनच "न गुरोरधिकं तत्वं न गुरोरधिकं तपः" असें जें श्रुतींत ह्मटलें आहे तें सत्य होय. मातोश्री, तुमच्या बोधामृतानें आज मी कृतकृत्य झालों.

मुक्ताबाईः—चांगदेवा, हा बोध तुमच्या हृदयमंदिरीं पूर्ण ठसल्यामुळें कालवंचना करून चौदाशें वर्षें रक्षण केलेल्या तुमच्या देहाचें सार्थक होऊन आज त्यास अमरत्व प्राप्त झालें. चांगदेवा ! तुम्हांला माझें शेवटचें हेंच सांगणें आहे कीं, रात्रंदिवस भगवंताचें चिंतन, मनन, व नामसंकीर्तन करून काल घालवा, ह्मणजे तुम्हांस परमपद प्राप्त होईल; पहा, श्रीहरिकीर्तन हा मोक्षधामाप्रत जाण्यास अत्यंत सोपा मार्ग होय. यावांचून कलियुगां दुसरा सोपा मार्ग कोणताच नाहीं.

नामवर्ळे देहीं असोनी या मुक्त । शांति क्षमाचित्त हरिभजनें ॥१॥
दया धरा चित्तीं सर्वांभूतीं करुणा । निरंतर वासना हरिरूपीं ॥ २ ॥
माधव मुकुंद हरिनाम चित्तीं । सर्व पै मुक्ति नाम पावे ॥ ३ ॥
मुक्ताबाईचें धन हरिनामें उच्चारूं । अवघाचि संसारू मुक्त केला ॥ ४ ॥

याप्रमाणें नामसंकीर्तनाचें महत्व मुक्ताबाईनें चांगदेवास सांगितलें. नंतर श्रीज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ, सोपानदेव आणि मुक्ताबाई या सर्वत्रांस विनयानें प्रणिपात करून चांगदेव ब्रम्हानंदांत तल्लीन होऊन राहूं लागले. पुढें कांहीं दिवसांनीं श्रीज्ञानेश्वर श्रीपंढरी क्षेत्रास गेले.

सुजनहो, श्रीज्ञानदेव पंढरीक्षेत्रास गेले, म्हणून त्यांची किंचित् माहिती या स्थळीं देऊन मग त्यांचें वृत्तही निरूपण करीत आहें.

श्री पंढरीक्षेत्रमाहात्म्य.

सांप्रत ज्यास पंढरीक्षेत्र म्हणतात, तेथें फार प्राचीन कालीं दाट अरण्य होतें. त्या स्थलीं दिंडीर या नांवाचा एक बलाढ्य राक्षस रहात असल्यामुळें त्या अरण्यास दिंडीरवन असें नांव पडलें. तो देवादिकांसही अजिंक्य होऊन जनांस अत्यंत पीडा देऊं लागल्यामुळें भगवान् श्रीविष्णूनें मल्लिकार्जुनाचा अवतार घेऊन लोहाच्या गदेनें त्याचा वध केला. त्यावेळीं त्या राक्षसानें भगवंताची प्रार्थना केली कीं, आपल्या लोहदंडानें मला मुक्ति मिळाली म्हणून ह्या अरण्यास 'लोहदंड' हेंच नांव पडावें. ही त्याची इच्छा

भगवंतानें पूर्ण केली, ह्मणून त्या अरण्यास पुढें लोहदंड क्षेत्र असें ह्मणूं लागले. त्यापूर्वी एकदां असें झालें होतें कीं, श्रीशंकर भीमाशंकर नांवाच्या डोंगरावर तपश्चर्या करीत बसलें असतां त्यांच्या अंगावाटें घामाचा पूर लोटला, तो त्या दिंडीरवनांतून गर्जना करीत चालला. भीमाशंकराच्या डोंगरांतून या नदीचा उगम झाल्यामुळें ही भीमा असें नांव पावली. किंवा भीमासारखी गर्जना करीत चालली ह्मणूनही कदाचित् भीमा असें नांव पडलें असेल. दिंडीरवनांतून चाललेल्या भीमानदीच्या तीरीं चंद्राला शाप झाल्यामुळें त्यानें घोर तपश्चर्या केली, ह्मणून तेवढ्या भागाला त्या पतितपावन गंगेला चंद्रभागा असें ह्मणतात. द्वापारांतीं आदिमाया रुक्मिणी श्रीकृष्णावर रागावून द्वारकेहून निघून दक्षिणप्रांतीं या लोहदंड क्षेत्रांत येऊन चंद्रभागेच्या काठीं तिनें घोर तपश्चर्या आरंभिली. तेव्हां श्रीकृष्ण तिचा शोध करीत करीत गोकुळ—वृंदावनांत आले. व तेथून गोपालांसमवेत लोहदंड क्षेत्राप्रत प्राप्त झाले. मग भगवान् गोपालांस दूर राहण्यास सांगून आपण ज्या ठिकाणीं रुक्मिणी तपश्चर्या करीत बसली होती, त्या स्थळीं येऊन तिच्याशीं नानातऱ्हेचीं विनोदाचीं भाषणें केलीं. बळीरामाचा अवतार महा भगवद्भक्त पुंडलीक या नांवानें होऊन त्यानें लोहदंडक्षेत्रीं वास केला होता; त्याची चमत्कारिक कथा अशी आहे कीं, पुंडलीक हा जन्हु या नांवाच्या

लिन, सत्वस्थ, व धर्म—कर्मनिष्ठ ब्राम्हणाचा मुलगा होता. पुंडलीक

तरुणपणीं अतिशय छांदिष्ट, दुष्टकर्मी, मातापितरांचें छळण करणारा व पत्नीच अधिदैवत मानणारा असा होता. त्या लोहदंड क्षेत्रांतील अनेक जन काशीयात्रेस निघाले; असें पाहून पुंडलिकाच्या प्रिय पत्नीनें हट्ट घेतल्यामुळें त्यानें तिला आपल्या स्कंधावर घेतली; आणि मातापितरांच्या गळ्याला दोरी बांधून ती आपल्या हातांत धारण करून ही पापमय मूर्ति काशीयात्रा करावयास निघाली. बराच मार्ग आक्रमण झाल्यावर एके दिवशीं सर्वजण चालत असतां रात्रीचे वेळीं मार्ग चुकून पुंडलीक हा एकटाच अरण्यांत असलेल्या कुक्कुट नांवाच्या साधूच्या आश्रमीं गेला. तेथें त्यांनीं कांहीं चमत्कार पाहिल्यावरून त्या कुक्कुट साधूचें व पुंडलिकाचें संभाषण झालें. त्यावेळीं त्या महात्म्यांनीं पुंडलिकास चांगला बोध करून मातापितर हींच आपलीं दैवतें असून त्यांची सेवा केल्यानें जन्माचें सार्थक होईल असें सांगितलें. तो बोध पुंडलिकाच्या अंतःकरणांत इतका ठसला कीं, त्यांनीं सर्व संकल्पाचा परित्याग करून माता-पितरांशिवाय अन्य दैवत नाहीं असें मानून त्यांची एकनिष्ठपणें सेवा केली. काशी क्षेत्रापासून जो त्यांच्या सेवेला प्रारंभ झाला तो चिरकालचा असा झाला. लोहदंडक्षेत्रीं परत आल्यावर तर त्यांनीं त्यांच्या सेवेशिवाय दुसरीकडे अगदी लक्ष्यच दिलें नाहीं. या त्याच्या सेवेस परमात्मा संतुष्ट होऊन रुक्मिणीपासून निघाल्यावर आपल्या प्रिय

भक्ताच्या आश्रमीं येऊन कटीवर दोन्हीकर ठेवले; व प्रमुदित अंतःकरणानें त्याजकडे पहात राहिलें. त्यावेळीं भगवान् आले आहेत असें जाणून मातापितरांच्या सेवेंत अंतर पडेल ह्मणून तेथें जवळच पडलेली वीट[1] त्यांनें देवास बसावयास ह्मणून फेंकून दिली. तेव्हां भगवान् कटीवर हात ठेवून विटेवर उभे राहिले. आपल्या भक्ताचा इष्टार्थ पूर्ण करण्यासाठीं ते अद्याप तसेंच आहेत. मातापितरांची सेवा आटपल्यावर पुंडलिकानें देवास साष्टांग नमस्कार घातला, व त्या वेळीं घेतलेल्या वरप्रदानाप्रमाणें त्या लोहदंडक्षेत्रालाच पंढरीक्षेत्र असें नांव पडलें. कृष्णावतार संपल्यावर प्रत्यक्ष भगवान् तेथें येऊन राहिल्यामुळें अनेक देव, तीर्थें व अनेक भगवद्भक्त त्यांच्या दर्शनाला येऊं लागले. अद्याप त्यांच्या कांहीं साक्षि पहावयास सांपडतात. श्रीपंढरीक्षेत्राचा महिमा दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊं लागल्यामुळें अगणित संतमेळाही तेथें नित्य वास करूं लागला, तेव्हांपासून पंढरीक्षेत्र हें केवळ प्रति वैकुंठ झाले ! या सारखें दुसरें क्षेत्र[2] आजकाल या आर्यभूमंडलीं नाहीं. जन्मास

१ इंद्रास वृत्रासुराचा शाप झाल्यामुळें तो आपल्या उद्धारार्थ पुंडलिकाच्या आश्रमापुढें वीट होऊन पडला होता; तीच ही वीट होय.

२ सुखालागी करिशी तळमळ । तरी तूं पंढरीस जाई एक वेळ ॥ १ ॥
मग तूं अवघाची सुखरूप होशी । जन्मोजन्मीचीं दुःखें विसरशी ॥ २ ॥
चंद्रभागीं करितां एकवार स्नान । त्याचे दोष पळती रानोरान ॥ ३ ॥

आल्यावर एकदां तरी श्रीपंढरी क्षेत्रास जाऊन चंद्रभागास्नान व पाडुरंगाचें दर्शन अवश्य घेतलें पाहिजे.

अशा भूवैकुंठ श्रीपंढरीक्षेत्रीं दामशेटी या नांवाचा एक शिंपी सदाचरण संपन्न व पापभिरु असा भगवद्भक्त रहात होता. त्याला कार्तिक शु० ११ रविवारीं नामदेव हे चंद्रभागेच्या काठीं एका शिंपल्यांत सांपडलें. नामदेव हे मूळ सनत्कुमाराचे अवतार होत. अशीं त्या कालीं आकाशवाणी झाली. नामदेव हे भगवंताच्या प्रत्येक आवतार समयीं होतेच. हिरण्यकश्यपूचे वेळीं प्रल्हाद या रूपानें अवतीर्ण झालें. रामावतारी अंगद, कृष्णावतारी उद्धव जो सर्व यादवांत श्रेष्ट, ज्याला भगवंतांनीं भागवतांत अनेक स्थळीं उपदेश केला; आणि आपण मथुरेस आल्यावर ज्याला गोकुळवासी जनांचें शांतवन करण्याकारितां पाठविलें, तो प्रियभक्त या कलियुगांत नामदेव या रूपानें प्रगट झाला. त्यांनीं प्रत्येक आवतारीं भगवंतांची नामलीलाच गायली ह्मणून हे नामदेव नांव पावले. हे दोन वर्षांचे झाले, तेव्हां पासूनच श्रीपांडुरंगाचें भजन करूं लागले व आपल्या मित्रमंडळीसही त्यानें भगवंताचें नामसंकीर्तन करण्यास लाविलें. नामदेव हे बालपणापासून श्रीपांडुरंगाचे अत्यंत प्रियकर झाल्यानें त्यांनीं त्यास आपल्या हातांनीं भोजन घातलें ! अशा श्रीपांडुरगाच्या प्रियभक्ताचें दर्शन घ्यावें. असें श्रीज्ञानराजांच्या मनांत आलें.

श्रीज्ञानेश्वरांचें श्रीपंढरीस गमन व नामदेवासह तीर्थाटन.

श्रीज्ञानेश्वरांनीं आपला हेतू श्रीगुरुनिवृत्तिनाथांस कळविला मग

त्यांची आज्ञा घेऊन श्रीज्ञानदेव श्रीपंढरी क्षेत्रास आल्यावर प्रथम श्रीपांडुरंगाचें दर्शन घेऊन नामदेवाच्या आश्रमाप्रत आले. श्रीज्ञानेश्वर आपल्या आश्रमीं येत आहेत, असें नामदेवानें दुरून पहातांच मोठा उल्हासित होत्साता त्यांच्याजवळ जाऊन साष्टांग प्रणिपात केला. आणि त्यानीं त्यांस अत्यंत प्रेमपूर्वक आपल्या आश्रमीं आणिलें. मग नामदेवानें त्यांची पूजा करून नम्रपणानें ह्मणूं लागले कीं, ' आज माझें भाग्य उदयास आल्यामुळें श्रीज्ञानराजांचें मला दर्शन झालें. ह्या दुःखरूप संसारांत निमग्न झालेल्या अज्ञ प्राण्यांच्या उद्धारार्थ ज्यांचा आवतार आहे, ते आज माझ्या येथें चालून आले त्याअर्थीं मी किती तरी धन्य आहे. असें ह्मणून त्यांनीं त्यास पुन्हां प्रणाम केला. त्यावर श्रीज्ञानदेव ह्मणतात. नामदेवा, तुह्मी मोठे धन्य अहां! कारण, श्रीहरीच्या संनिध अखंड तुमचा वास; अशा परमश्रेष्ट भगवद्भक्ताचें दर्शन घ्यावें, म्हणून मी आज तुमच्या आश्रमीं आलों. नामदेवा, ज्ञानी पुरुष जरी जीवन्मुक्त झाला, तरी त्यानें गुरुची सेवा, सत्समागम, परमेश्वराचें भजन, आणि तीर्थाटन हीं अवश्य करावी. तुमच्या सत्समागमानें तीर्थयात्रा करावी, अशा हेतूनें मी येथें आलों आहे. त्याअर्थीं तुम्ही माझा मनोरथ पूर्ण केला पाहिजे. हें श्रीज्ञानराजांचें भाषण ऐकून नामदेव आपल्या चित्तांत अगदीं उद्विग्न झाले; व आपल्या मनाशींच ह्मणूं लागलें कीं, ज्याप्रमाणें कस्तुरीचा त्याग

करून पदरांत राख बांधावी, किंवा कल्पतरूची घनदाट छाया टाकून शिंदीच्या छाये खालीं बसावें; त्याप्रमाणें श्रीपंढरीसारखें परमपवित्र क्षेत्र टाकून अन्य तीर्थी जाणें होय. नामदेव अशा विचारांत मग्न असतां त्याला एकदम स्फूर्ति होऊन ते श्री ज्ञानराजास ह्मणतातः—श्री ज्ञानदेवा, आपण आपला हेतु मला कळविला तो योग्यच आहे; परंतु ज्याच्या पूर्णकृपेनें हा देह पोसला जात आहे आणि कायावाचामनःपूर्वक मी ज्याचा ह्मणवितों, त्या श्रीपांडुरंगाच्या अधिन आहे, यामुळें त्यांनीं आज्ञा दिल्यावांचून आपल्यास वचन देतां येत नाहीं. यावर ज्ञानदेव म्हणतातः—नामदेवा, तुम्ही अत्यंत सुज्ञ अहां! तुमचा भावार्थ मी समजलों. तुमच्या मनोदयाप्रमाणें चला, आपण राउळांत जाऊं आणि श्री पांडुरंगाची आज्ञा घेऊं! असें म्हणून श्री ज्ञानराजांनीं नामदेवाचा हात धरून ते उभयतां देवालयांत गेले आणि श्री पांडुरंगाच्या चरणावर मस्तक ठेवून श्री ज्ञानराजानें आपला हेतु त्यांना निवेदन केला. तेव्हां देव किंचित् हांसून म्हणतातः—नामदेवा,! ज्ञानेश्वर ही केवळ परब्रह्ममूर्ति असून तुझ्या सत्समागमाची इच्छा करीत आहे, यास्तव तूं त्यांच्या समागमें संचार करून लौकर परत ये. मार्गांत चालतांना किंवा केव्हांही तुला माझा विसर न पडेल, अशी तूं आपली सदैव वृत्ति ठेव. याप्रमाणें भगवंतांनीं नामदेवास बोध करून निरोप दिल्यावर ते सद्गदित कंठानें ज्ञानदेवास म्हणतात. ज्ञानेश्वरा आज मी

आपला केवळ जीव कीं प्राण, अशी मूर्ति तुझ्या स्वाधीन करीत आहे. नामदेवास मी आपाल्यापासून आजपर्यंत कधीं दूर केला नव्हता; परंतु तुझ्यासारख्या नैष्ठिक भक्ताचें वचन मला उलंघन करतां येत नसल्यामुळें केवळ कष्टानें आज मी नामदेवास तुझ्या अधीन करीत आहे; यास्तव त्याला आपल्या प्राणापेक्षां अधिक सांभाळ! असें म्हणून भगवंतांनीं नामदेवाचा हात श्रीज्ञानेश्वरांच्या हातांत दिला. नंतर ते उभयतां श्रीपांडुरंगाच्या चरणावर प्रेमभावानें मस्तक ठेवून तेथून निघाले. त्यावेळीं नामदेवास अत्यंत दुःख झालें, व पांडुरंगावांचून त्यास क्षणभरसुद्धां चैन पडेना; म्हणून ते मार्गानें चालतांना वरचेवर फिरून पाहूं लागले. ज्याप्रमाणें क्षुधातुर मनुष्य अन्नावांचून तळमळ करतो; किंवा हरिणीचें पाडस चुकलें ह्मणजे ती जशी घाबरी होते; तद्वत् नामदेव पांडुरंगाच्या वियोगनलानें विव्हल होत्साते तत्काळ मूर्च्छना येऊन धरणीवर पडले! कांहीं वेळानें सावध झाल्यावर नामदेव ह्मणतातः—देवा! तुला माझा कंटाळा आला म्हणून तूं मला दूर घालविलेंस कां? हे प्रभो! आई–बाप–बंधु–भगिनी वगैरे माझें गणगोत सर्वतोपरी तूंच आहेस! असें असून मी आज गाय होऊन या वनांत पडलों आहे!! नामदेव इतके व्याकूळ झालेले पाहून श्री ज्ञानराजांनीं त्यांचें समाधान केल्यावर ह्मणतातः—नामदेव, श्रीपांडुरंगाचे ठायीं तुमचें एवढें दृढ प्रेम असून तुम्ही इतके कां घाबरतां? तुमच्या हृदयांत तो नाहीं काय?

मृगनाभींत कस्तुरी असून त्याच्या अज्ञानानें तो जसा शोध करीत फिरतो; तद्वत् तुमच्या हृदयमंदिरीं श्रीपांडुरंगाचा नित्य वास असून तुम्ही इतकें विठ्ठल कां व्हावें.?

नामदेवाची प्रेमभक्ती.

श्रीनाम०:—श्रीज्ञानराजा, सगुणरूपाचे ठायीं माझी प्रीति जडली असल्यामुळें निर्गुणोपासनेकडे माझें चित्त वेधत नाहीं.

श्रीज्ञाने०:—अहाहा ! ! नामदेवा ! भगवंताच्या ठिकाणीं तुझा केवढा हा अलोट प्रेमा! ह्मणूनच परमेश्वर तुमच्या अधीन झाला आहे. ज्या भक्तिभावानें तुम्ही श्रीपांडुरंगाला आपलासा केला आहे, तो मार्ग मला सांगा!

श्रीनाम०:—मला शास्त्रव्युत्पत्तीचें ज्ञान नाहीं. मी अज्ञ ह्मणून श्रीपांडुरंगानें मला आपल्या हातीं निरविलें, आणि आपण मला ज्ञान विचारतां? ज्याप्रमाणें कृपणाच्या मंदिराला कल्पतरु याचक होऊन जावा, तद्वतच आपलें विचारणें आहे.

श्रीज्ञाने०:—नामदेवा, तुमचें तें अलोट प्रेमभक्तीचें वर्णन माझ्या एकदां कानीं पडून मला तृप्त करा. अहो, प्रेमरसावांचून पुष्कळ ज्ञान प्राप्त झालें, तरी त्याचा काय उपयोग? तें शाब्दिक ज्ञान भक्तीची बरोबरी कशी करील. अत्यंत प्रेमानें ओथंबलेली तुमची रसभरित व मधुर वाणी नित्य ऐकावयास मिळावी. ह्मणून मी तुमच्या संगतीची इच्छा केली. ती माझी इच्छा तुम्ही पूर्ण करावी.

श्रीनामदेवः—श्रीज्ञानराजा, आपल्यास ज्ञान सांगण्याची माझी योग्यता नाहीं. तथापि आपल्या आज्ञेनें माझा अनुभव मी आपल्यास सांगतों. ईश्वराची भक्ति करणाराच्या अंगीं प्रथम वैराग्य उत्पन्न झालें पाहिजे. मग प्राणीमात्रांचे ठायीं अढळ दया ठेवून सर्वांभुती एकच आत्मा आहे असें जाणावें. त्याच्या चित्ताला प्रपंचाची तळमळ असतां कामा नये. आणि उत्तम, मध्यम व कनिष्ट अशी द्वैतभावना त्याचे ठायीं मुळींच नसली पाहिजे. परमेश्वराचे ठायीं पुर्ण श्रद्धा ठेवून त्याच्या नामसंकीर्तनांत अहर्निश तल्लीन झाले पाहिजे. ज्याप्रमाणें हरिण गानलुब्ध होऊन तहान भुक किंबहुना देहभान सुद्धां विसरून जातो; त्याप्रमाणें ज्याचें चित्त हरिगुणश्रवणाकडे लागतें. त्यालाच श्रवणभक्ति असें ह्मणतास. भक्ति तीन प्रकारची आहे. एक श्रवणभक्ति, दुसरी मननभाक्ति, आणि तिसरी निदिध्यासभाक्ति, ह्यां पैकीं श्रवणभक्तीचें विधान आपल्यास निवेदन केलें, आतां बाकींच्या दोन्ही सांगतों. कृपण मनुष्य पैसा सांचविण्याच्या कामीं रात्रंदिवस जसें चिंतन करींत असतो; तसें लक्ष ठेवून परमेश्वराच्या स्वरूपाचें जो चिंतन करतो त्याला मननभाक्ति ह्मणतात. जशा जारिणी स्त्रिया आपल्या घरांतील कामधंदा करीत असतां पर पुरुषावर चित्त ठेवितात; त्या प्रमाणें ज्याचें चित्त सदां सर्वकाळ परमेश्वराचे ठायीं वेधलेलें असेल, त्याला निदिध्यासभक्ति

ह्मणतात. तात्पर्य—ज्ञानराजा! स्त्रिया ज्याप्रमाणें भरलेल्या पाण्याच्या दुडी मस्तकावर रचून मोकळे हात सोडून परस्परांशीं बोलत रस्त्यानें जातात. तद्वत् परमेश्वरावर लक्ष ठेवून संसार रहाटी करावी. हा जो माझा अनुभव तो मी आपल्यास कथन केला.

हें नामदेवाचें गहन बोल ऐकून ज्ञानेश्वर अत्यंत विस्मीत झालें व आपल्या मनासींच ह्मणू लागलें कीं, नामदेवासारखा प्रेमळ व आध्यात्म ज्ञानानें परिप्लुत असा भक्त विरळच सांपडेल. याप्रमाणें आनंदानें वेदांतचर्चा, व भगवल्लीला वर्णन करीत करीत कऱ्हाडाजवळ आले.

कऱ्हाडचे राजाची द्वेषबुद्धि व त्यास ज्ञानोपदेश.

भक्तजनहो! ज्यावेळीं श्रीज्ञानदेव व नामदेव ही संतजोडी हरिगुण गात गात कऱ्हाडाजवळ येऊं लागली, त्यावेळीं तेथील राजसेवक राजकारणास्तव त्याच मार्गानें चालला असतांना उभयतांची गांठ पडली. तेव्हां राजसेवक त्या उभय संत मूर्तीस अत्यंत नम्रतापूर्वक दंडवत प्रणाम करून ह्मणतो:—संतहो! तुह्मी अगदीं कोमल असून अत्यंत रमणीय अहांत! तुमच्या दर्शनानें माझीं सकल पातकें दग्ध होऊन अंत:करण शांत झालें. सांप्रत आपण कोठून आला व कोणीकडे चालला अहां? हें मला कृपा करून सांगावें! कारण, आमच्या येथील श्रीमन्महाराजाधिराज रामराय महाराज हें सांप्रत साधुसंतांची अत्यंत छळणा करीत आहेत. कोणी साधु-संत जर

या नगरींत आले; आणि ती बातमी आमच्या महाराजांस समजली कीं, तें कांहीं एक विचार न करितां एकदम त्यास सुळीं देतात! हें त्या राजदूताचें विनयपूर्वक भाषण ऐकून श्रीज्ञानेश्वर ह्मणाले कीं, अरे बाबा, ह्या नगरींत अशी जर पुंडाई असेल, तर आह्मी ग्रामांत प्रवेश न करितां येथेंच राहू! परंतु तूं आमची एक कामगिरी केली पाहिजेस. तेव्हां राजसेवक म्हणाला. आपण साक्षात ईश्वररूप असल्यामुळें आपली आज्ञा मला शिरसा वंद्य आहे, आणि मी तीचें परिपालन अवश्य करीन. यावर श्रीज्ञानेश्वर ह्मणाले:—राजदूता, चाकणच्या महिपतरावाची कन्या सीताबाई ह्या तुमच्या महाराजांच्या राज्ञि आहेत. त्यांच्या वडिलांनीं त्यांची भेट घेऊन येण्याबद्दल सांगितल्यावरून आह्मी या मार्गानें आलों. तूं आपल्या राणी साहेबांस एवढाच निरोप सांग कीं, ज्ञानेश्वर तुमच्या भेटीकरितां येऊन गांवाबाहेर तुमची मार्गप्रतिक्षा करीत बसले आहेत. ही ज्ञानराजांची आज्ञा त्या राजसेवकानें शिरसा वंद्य मानून तत्काल त्यांनीं आनंदानें परत कऱ्हाड नगरींत प्रवेश केला, आणि राजवाड्यांत जाऊन पाहतो तों राज्ञि स्वस्थ चित्तानें श्रीपांडुरंगाची पूजा करीत बसली आहे. तिचा लहान मुलग बाळकृष्ण हाही जवळच खेळत आहे तथापि त्यानें त्या राज्ञीस प्रणाम करून अत्यंत नम्रतापूर्वक श्रीज्ञानराजांची आज्ञा निवेदन केली. तेव्हां त्या संतश्रेष्ठाची ती आज्ञा मोठ्या उल्हासानें ऐकून

राजपत्नि सीताबाई आपल्या मनांशीं म्हणते!—अहाहा! केवढें माझें भाग्य कीं, असें महान् सत्पुरुष माझ्या सारख्या यःकश्चित् स्त्रीच्या भेटीस आले! आतां मला त्यांच्या दर्शनास जाणें उचित आहे. पण महाराज ह्या गोष्टीच्या विरुद्ध आहेत! देवा, आतां मी कसें करूं? माझी इच्छा तुजवाचून कोण पूर्ण करणार बरे! आतां मी त्यांच्या दर्शनास जाण्याची सिद्धता करतेंच. तसेंच त्यांस उदयीक भोजनासही सांगून येते. श्रीज्ञानराजां-सारख्यांचें उच्छिष्ट आमच्या सदनांत पडलें तर केवढें अगाध पुण्य लागेल! हा सर्व माझ्या मनाचा विचार झाला, पण तिकडे ही गोष्ट कशी काढावी बरें! केवळ साधू—संताचें नांव कानीं पडलें कीं, त्यांच्या अंगाची लाही होते! मग भोजनास बोलाविण्याची गोष्ट लांबच राहीली! देवा पांडुरंगा! याची काळजी तुलाच आहे आतां! दुर्वासऋषी साति द्रौपदीचें सत्व हरण कर-ण्यासाठीं मध्यरात्रीचे समयीं तिच्या सदनीं प्राप्त झाले, तेव्हां तूं द्वारकेहून येऊन त्या ऋषीस तृप्त करून द्रौपदीचें सत्व राखिलेंस; त्याप्रमाणेंच मजवरही कृपा करावी. आतां सत्व हरण्याची वेळ आली आहे; त्या अर्थी महाराजांना सद्बुद्धि देऊन माझा हेतू पूर्ण होईल असें कर! पांडुरंगा! तूं दीनबंधु म्हणवितोस, यामुळें या दीन दासीची इच्छा तृप्त करणें तुझ्याकडेसच आहे! या प्रसंगीं धैर्य धरूनच वागलें पाहिजे. याप्रमाणें परमेश्वराची प्रार्थनाकरून श्री-

ज्ञानराजाच्या दर्शनास जाण्याचा त्या राज्ञीनें पूर्णपणें निश्चय केला उत्सुकतेनें आपल्या मुलास म्हणाली—बाळ, चल आपण श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनास जाऊं! तेव्हां बाळकृष्ण म्हणतो:—आईगं! आजोबांनीं तुला ज्यांची सेवा करावयास सांगितली होती, आणि तें नेहमीं ज्यांच्या अद्भुतलीला सांगत असत, तेच कांग हें ज्ञानेश्वर महाराज! हें त्या बाळकृष्णाचे प्रेमरसपुरित बोबडे बोल ऐकून त्याच्या मातेस समाधान झालें. त्यावर ती राजपत्नि म्हणते:—होय रे बाळ! तेच हें श्रीज्ञानेश्वर महाराज होत! बाळ:—मग चल तर आतां आपण त्यांच्या दर्शनास जाऊं आणि आपल्या घरीं त्यांना जेवायलाही बोलावूं.

याप्रमाणें माता—पुत्राचा संवाद झाल्यावर राज्ञी सीताबाईनें त्यांच्या आश्रयानें राहणाऱ्या दीक्षितास विचारिलें कीं, गुरो, पति-आज्ञे वांचून संत दर्शनाला जाता येते कां? तेव्हां दीक्षित म्हणतात:—स्त्रियांनीं पतीची आज्ञा घेतल्यावांचून कोणतेही कर्म करूं नये, असें शास्त्रांत सांगितलें आहे, तथापि श्रीहरि प्राप्त्यर्थ कर्म केल्यास तो अधर्म होत नाहीं, यास्तव तो अवश्य आचरावा. पहा—भरतानें आपल्या मातेचें वचन पालन केलें असतें, तर भगवान् श्रीरामचंद्राचे कृपेस तो पात्र झाला असतां काय? प्रल्हादानें पित्याच्या वचनाचा अव्हेर केला नसतां, तर त्यास भगवान् विष्णु प्रसन्न झाले असते काय? शिवाय गौळणी स्त्रिया गोपिका आपल्या पती

टाकून श्रीकृष्णस्वरूपीं तल्लिन झाल्यानें परमपदास पावल्या. अहाहा! केवढें हें त्यांचें भाग्य! परमार्थ लाभासाठीं व्यवहार सत्तेंतील शास्त्रवचनाचें उल्लंघन केलें तरी कांहींच दोष नाहीं. किंबहुना उलट लाभ होतो. माते, हीं शास्त्रवचनें लक्षांत आणून दुर्लभ अशा संतदर्शनाचा तुह्मी मुळींच अव्हेर करूं नका. संतसेवा हेंच सकल शास्त्रांचें सार आणि सत्समागम हाच नित्य वैकुंठवास होय! यावर सिताबाईः— गुरुजी, आपली आज्ञा आहे तर आतांच मी या माझ्या बाळाला घेऊन संतदर्शनाला चालले.

याप्रमाणें बोलून व उभय मातापुत्रांनीं दीक्षितांस प्रणाम करून ज्या स्थळीं श्रीज्ञानराज व नामदेव यांनीं मुक्काम केला होता, त्या स्थळीं जाऊन मोठ्या प्रेमानें त्यांना वंदन केलें. त्यावेळीं श्रीज्ञानराजांनीं बाळकृष्णास “ शतायुमान् भव ” व सीताबाईस अखंड “ सौभाग्यवती भव ” असा आशीर्वाद दिला. नंतर राज्ञि सीताबाईनें दोन्हीकर जोडून श्रीज्ञानराजांची प्रार्थना केली. ती अशीः—“सद्गुरो! मी आज आपल्या दर्शनानें या बाळासुद्धां पवित्र झालें. पण आह्मी अधमाधम! महापापी आहोंत! आपण समर्थ अहां! यास्तव कृपा करून आमच्या आश्रमीं येऊन आह्मां सर्वांना पावन करावें! तसें न करतां आपण आमचा आव्हेर करून जाल तर पतितपावन हें समर्थांचें ब्रीद! त्याला कलंक लागेल! कोट्यानुकोटी अपराध आमच्या हातून झाले अ-

सतील तरी त्याची क्षमा करून ह्या दीन अबलेची इच्छा पूर्ण करणार आपण समर्थ आहां. समर्थांच्या दर्शनानें महाराजांच्या मनांतील साधुसंताविषयींचा द्वेषभाव नष्ट होऊन ते ज्ञानसंपन्न होतील. या माझ्या तान्हुल्यावरही आपली पूर्ण कृपादृष्टी असावी; ह्मणजे त्याला कशाचेंच भय राहणार नाहीं. यास्तव सर्व संतांनीं राजवाड्यांत येण्याची अवश्य कृपा करावी. " नंतर बाळकृष्ण प्रार्थना करतो:—महाराज, माझी इच्छा अशी आहे कीं, आपणा संतास घरीं नेऊन भक्तीपूर्वक आपलें पूजन करावें आणि आपलें उचिष्ट आमच्या सदनीं पडावें, या योगें आह्मी कृतार्थ होऊं अशा हेतूनेंच माझी माता आपल्यास प्रार्थना करीत आहे. तीं मान्य करून आमच्या कुळास पावन करावें! यावर श्रीज्ञानेश्वर:—बाळ! तुझे हें कोमल बोल आमच्या मनाला अत्यंत समाधान देतें झालें. तुझ्या व तुझ्या मातेच्या विनंतीप्रमाणें आह्मी येतों बरं! तुह्मी पुढें चला. आह्मी क्षणभर श्रीपांडुरंगाचें भजन करून येऊं.

इतकी श्रीज्ञानराजांची कृपापूर्ण वाणी ऐकून त्या उभयतां मायलेकरांना अत्यानंद झाला व ते पुन्हां त्या श्रेष्ठ संत मूर्तींना वंदन करून परत राजवाड्यांत आले. थोरांच्या घरीं तयारीला काय उशीर आहे! लागलीच संतांच्या भोजनाची तयारी झाली. परंतु "मनसा चिंतितमेकं दैवमन्यत्र चिंतयेत्" या

वचनोक्ति प्रमाणें त्या दिवशीं कऱ्हाड नगरींत राज्याकडून एक घोर पातक घडलें; व त्याचा परिणाम त्यास तत्काल भोगावा लागला! तें असें.

कऱ्हाड नगरीचा रामराजा हा त्या वेळीं साधू—संतांचा कट्टा द्वेषी बनला होता. आपल्या नगरींत कोणी संत आले ह्मणजे तो त्यांचा अत्यंत छळ करी; कधीं कधीं त्यांस सुळावरही देत असे. त्याप्रमाणें त्या दिवशीं प्रातःकाळी राजाच्या हुकुमानें चार संत सुळीं दिले गेले, त्या वेळीं त्यांनीं संतप्त होऊन राजास "ज्या अर्थीं तूं आमचा अन्यायानें प्राणघात करितोस, त्या अर्थीं आठ प्रहरांत तुझ्या एकुलत्या एका मुलाचा घात होईल!" याप्रमाणें त्या संतांचा शाप होतांच तो त्याच्या तत्काळ प्रतितीस आला. तो असाः—दोनप्रहरचा समय झाला, अद्यापि संत मंडळी भोजनास आली नाहींत; हें पाहण्याकरितां राजपुत्र बाळकृष्ण राजवाड्याच्या उंच अशा गच्चीवर चढला. पाठीमागें दासी उभी राहून खालीं उतरण्याकारितां त्याचें आर्जव करीत होती. व तो उंच उंच पाय करून त्यांच्या येण्याच्या मार्गाकडे अवलोकन करीत होता. इतक्यांत दुर्दैवानें मुलाचा झोंक जाऊन तो तळमजल्याच्या फरशीवर एकदम खालीं पडला. तत्काळ ती दासी खालीं उतरून गेली; आणि पाहते तों बाळकृष्णाचें डोकें फुटून रक्तप्रवाह चालला आहे. मग अतिशय घाबरून तिनें "**धांवा धांवा**" म्हणून मोठ्यानें

किंकाळी फोडली. ती ऐकून राजा राणी व इतर मंडळी सर्व धांवत आली. राणीनें त्याचें शीर आपल्या अंकावर घेतलें. इतक्यांत त्याचा प्राण निघून गेला! मग त्या शोकाला काय विचारावयाचें! आईच ती! राजाही शोकाक्रांत झाला. इतक्यांत राजगुरुही तेथें आले. त्यांस पहातांच राजास अधिक दुःख होऊन म्हणूं लागलाः—" गुरुमहाराज, कृतकर्माचें प्रायश्चित्त मला बरोबर मिळालें. पण माझा बाळ आतां मला भेटेल कांहो? माझ्याशीं मंजुळ शब्द बोलेल काय? गुरुमहाराज, अशा संकटसमयीं मी कोणाला शरण जाऊं! असा कोण आहे कीं, मला साधुशापापासून मुक्त करून माझा बाळ मला भेटवील! असा कोणी संत असेल तर गुरुराज सांगाहो! मी आतां जाऊन त्यांचे पाय धरतों. राजगुरुः— राजा, तुम्ही असें घाबरूं नका! थोडासा धीर धरा! तुमचें पुण्यबलवत्तर आहे, म्हणून ईश्वरमूर्ति या तुझ्या कऱ्हाड नगरी समीप प्राप्त झाल्या. राजा, श्रीज्ञानेश्वर महाराज देशपर्यटण करीत करीत येथें आले आहेत. आतां तुम्हीं त्यांना शरण जाल तर ते संत तुह्मांस शापापासून मुक्त करून पुत्रदानही देतील. त्यांनीं ह्या सृष्टीवर अशीं अनेक अघटीत कृत्यें केलीं आहेत. त्यांना तुमच्या मुलाला जीवंत करणें मोठेसें अशक्य नाहीं.

सत्य ज्ञानमंडित राजगुरूचें हें भाषण ऐकून राजा तत्काल त्यांच्या दर्शनाकरितां निघाला. इतक्यांत तें संत नगरांत आ-

त्याची बातमी राजास लागली. राजा-राणी-मंत्री-राजगुरु वगैरेंच्या संमतीनें असें ठरलें होतें कीं, आपला मुलगा मृत झाला आहे, हें जर त्या संतमूर्तीस कळेल तर तें आपल्या हातून पूजा वगैरे कांहींच ग्रहण करणार नाहींत. यामुळें तो निद्रिस्त आहे, असें सांगून त्यांची सेवा करावी, नंतर मृतमुलास त्यांच्या पुढें आणावें. याप्रमाणें विचार होऊन श्रीज्ञानेश्वरमहाराज, नामदेव आदिकरून संतमंडळी येतांच राजा आपल्या श्रेष्ठ लोकांसह त्यांस सामोरा जाऊन मोठ्या आदरानें राजवाड्यांत आणून त्यांना उच्चासनीं बसविलें, आणि राजोपचारानें पूजा करून प्रार्थना केली कीं, महाराज माझें हें केवढें भाग्य! आपण भगवद्रूप असून या पामराचे घरीं आपलें आगमन झालें त्या योगानें आज माझी सर्व दुरितें लयाप्रत गेलीं. नंतर सति सीताबाई श्रेष्ठ संतमूर्तींची विधिपूर्वक पूजा करून साष्टांग प्रणिपात केल्यावर प्रार्थना करतेः—हे भगवन्, या दासीच्या प्रार्थनेस मान देऊन आपण आमच्या आश्रमाप्रत आगमन केलें. त्यायोगानें आम्ही कृतार्थ झालों. आपण माझ्या पित्याचे गुरु अहां! त्याच्यावर जशी आपली कृपा आहे; तशीच ह्या दीन दासीवर असावी.

श्रीज्ञानेश्वरः—सीताबाई, मीं मघापासून राजाच्या मुखाकडे अवलोकन करीत आहे, व तुमचेही मुख न्याहाळून पाहत आहे; परंतु तुमची मुखकमलें आनंदीत नसून आगदीं म्लान झालीं आहेत.

याचें कारण काय ? आणि तुमचा पुत्र जो बाळकृष्ण तोही कोठें दिसत नाहीं. त्याला माझ्याजवळ आणा बरें ! त्यास प्रेमालिंगन देण्याकरीतां माझें मन अतिशय उत्कंठीत झालें आहे. यास्तव आणवा हो त्याला अगोदर !

सीताबाई:—सद्गुरो, तो नुकतांच निजला आहे, झोंप झाली ह्मणजे मी त्याला घेऊन येईन. प्रथम आपले भोजन होऊ द्या.

नामदेव:—मातोश्री सीताबाई, ज्यानें आम्हांला अत्यंत प्रेमानें भोजनास येण्याचें आमंत्रण दिलें त्याला सोडून आम्ही कसें बरें भोजन करावें ! बाळकृष्ण हा साक्षात् पांडुरंग मूर्तीच होय. तो भेटला म्हणजे आह्मांला श्रीपांडुरंग दर्शनाचा लाभ घडेल; यास्तव कृपा करून त्याला घेऊन यावें. तसें कशाला ! मीच त्याला उठवितों असें ह्मणून नामदेव तत्काल उठले आणि बाळकृष्णाजवळ जाऊन त्यांचे आंगावरील वस्त्र काढून पहातात तों बाळकृष्ण रक्तानें भरलेला आहे. असें पाहून नामदेव घाबरून ह्मणतात “ ज्ञानराजा, हा काय अनर्थ झाला पहा ! ” हें शब्द श्रीज्ञानेश्वरानें ऐकतांच लागलीच तें त्यांच्याजवळ येऊन सद्गदीत होऊन ह्मणतात:—“ बाळा, तूं आह्मांला सप्रेम अंतःकरणानें भोजनास येण्याचें आमंत्रण दिलेंस, ह्मणून आम्ही तुझ्या प्रसादाकारितां मोठ्या आनंदानें आलों. आणि तूं आम्ही येण्यापूर्वीच निजधामाप्रत प्रयाण केलेंस ! असें कां बरें !

यात्रमाणें श्रीज्ञानराज त्या शवाशींच बोलून परमेश्वराची प्रार्थना करतात. हें प्रभो पांडुरंगा! या सकुमार बालकानें आणि त्याच्या मातोश्रीनें आह्मांला आदरानें आपल्या घरीं आणावें आणि आजच त्यांच्या घरीं असा अनर्थ घडावा! देवाधिदेवा! तुझ्या भक्ताची सेवा केली असतां महान् अनर्थ होतात, अशी जर जगांत अपकीर्ति झाली; तर कोणीही तुझ्या भक्ताला दाराशीं उभे करणार नाहीं! सर्वजन आमचा उपहास करतील! भगवंता! तूं भक्तांचा कैवारी असून यावेळीं कां इतकी कठोरता धारण केलीस! प्रल्हादाकरितां स्तंभीं प्रकट झालास! शिळारूप अहिल्येचा उद्धार केलास! द्रौपदीला क्षणोक्षणीं संकटापासून मुक्त केलेंस! आणि आतां माझ्याकरितां बौध्य झालास! हें भक्तकामकल्पद्रुमा! आतां तूं धांव, आणि या बालकाला सजीव करून आपलें ब्रीद राख! प्रभो! आपल्यावाचून दासाची आस कोण पुरविणार आहे! अशाप्रकारें त्या जगन्नियंत्या परमेश्वराचा धांवा करून ज्ञानराज श्रीविठ्ठलनामाचा गजर करूं लागले. तें पाहून नामदेव आदिकरून सर्व मंडळी भजन करूं लागली. इतक्यांत झोपेंतून जागा झाल्याप्रमाणें बाळकृष्ण उठून बसला. त्यानें श्रीज्ञानराजांस पहातांच मोठ्या प्रेमानें घट्ट मिठी मारली. तेव्हां ज्ञानराजांनींही त्यास आपल्या हृदयांशीं घट्ट धरून म्हटलें. हा हा, भक्तवत्सला पांडुरंगा या बालकास तुह्मी जिवदान देऊन आम्हाला कृतार्थ केलेंत

असें भगवंताचे आभार मानून ते बाळकृष्णास म्हणतात:—बाळ, आतां आपल्या मातापित्यांची भेट घे, असें म्हणतांच बाळकृष्ण लागलीच रामरायास जाऊन घट्ट मिठी मारून म्हणूं लागला:—दादा, या संतश्रेष्ठांनीं आज आपल्या कुळाचा उद्धार केला बरें! साधुपुरुषांना भक्तांच्या कल्याणाकरितां किती तरी कष्ट सोसावे लागतात! अहाहा! ह्या संत महंतांची थोरवी किती वर्णन करावी! सतांसारखे दीन प्राण्यांवर उपकार करणारे त्रिभुवनांत कोणीच नसतील!

रामराजा:—बाळा, यावेळीं तुझ्या मुखांतून निघालेली बोधरूपीं मुक्ताफळें माझ्या कर्णद्वारें शिरून अंत:करणांत प्रविष्ठ झालीं; आणि त्या योगें मी आनंदातिशयांत तल्लीन झालों! काय सांगावें! श्रीज्ञानराजाच्या दर्शनानें सूर्योदय होतांच जसा अंध:कार पलायन करतो, तसें माझे सकल दोष दूर होऊन मी पुनित झालों. देवा! साधु—संतांचा महिमा अगाध आहे.

सीताबाई:—हे बाळा, तूं लहान दिसतोस खरा; पण तुझी ज्ञानकला लहान नव्हे. तूं केवळ राजकुलाला पावन करण्याकरितांच अवतरला आहेस! असें ह्मणून सीताबाईनें बाळकृष्णास श्रीज्ञानराजांच्या पायावर घालून व आपणही त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून ह्मणते:—सद्गुरु समर्था, ह्या धर्मभगिनीला पुत्रदान देऊन आपण आमच्या कुळाचा उद्धार केलांत! या उपकृतिबद्दल मी

आपल्या चरणीं काय अर्पण करूं! आपलें उपकार फेडण्याचें माझ्या ठिकाणीं सामर्थ्य नाहीं. तरी देवा! आपण आमचें चित्तरूपीं धन घेऊन आमचा उद्धार करा ह्मणजे झालें! याप्रमाणें सर्वांनीं श्रीज्ञानेश्वरांची स्तुति केल्यावर आनंदानें मंडळीचें भोजन झालें, नंतर राजगुरुः—सर्व समर्था ज्ञानराजा! राजा आणि राणी हे उभयतां आपला अगाध महिमा पाहून फार आनंदभरीत झाले आहेत. आतां त्यांना आपल्या दर्शनाच्या प्रभावानें सर्व राज्य—संपत्ति तुच्छ वाटूं लागून ते आपल्या बोधामृताची इच्छा करीत आहेत, त्याअर्थी त्यांची इच्छा पूर्ण करून त्यांना आपण ह्या भवबंधनापासून मुक्त करा! श्रीज्ञानेश्वरः—अहो राजगुरु, तुह्मी साक्षात् वेदमूर्ति अहां. आपल्या कृपाप्रसादानें ते धन्य आहेत. ज्या अर्थी त्यांची इच्छा आहे. त्या अर्थी थोडासा बोध करतों:—

हे रामराया! ह्या राज्यलक्ष्मीला भुलून तूं कधींही उन्मत्त होऊं नकोस! तिचा गर्व बाळगून साधु—संत-गो-ब्राम्हण-अतिथि-अभ्यागत व प्रजाजन इत्यादिकांचा छल कदापि करूं नकोस! तुझें सुकृत चांगलें आहे, ह्मणून तूं राजकुलांत जन्म घेतलास; त्याअर्थी धर्मानें राज्यकारभाराचा गाडा हाकीत राहा. आपल्यास सुख मिळावें ह्मणून तूं जसा झटतोस तशीच प्रजापालन करण्याविषयीं दक्षता बाळग. दुष्टजनांचा त्याग करून सत्संगति धर. साधुसंताना अन्नोदक देऊन त्यांची उत्तम प्रकारें सेवा करीत राहा. त्यांना

कालत्रयींही दुःख देऊं नकोस. त्यांना कष्टी केलेस तर वडवाग्नी प्रमाणें गुप्त असलेलें त्यांचें तपोबल सूक्ष्म रीतीनें तुझ्या महान् सुकृतांना दग्ध करील. त्यायोगें तुला इहपरलोकीं दुःख भोगावें लागेल. विषयरूप विषाचा त्याग करून संतांच्या बोधामृतप्राशनानें नित्य तृप्त हो. कामक्रोधादि शत्रूंचें शमदमादिखड्गानें छेदन कर. मनरूपी मर्कटाला 'कपिचणकन्यायवत्' ब्रह्मानुसंधानरूपी चणे देऊन आत्मरूप जाळ्यांत धर. मग ब्रह्मानंदांत मग्न होऊन जनकराजा-प्रमाणें राज्य कर. राजा, सर्व उपायांपेक्षां सत्संग श्रेष्ठ आहे. असें श्रीवसिष्ट महामुनींनीं श्रीरामचंद्रास वारंवार सांगितलें आहे. संत-सेवा हेंच मोक्षाचें मुख्य साधन होय. याप्रमाणें आचरण करू लाग-लास ह्मणजे सदैव सुखीं राहून अंतीं तुला परमपद प्राप्त होईल.

रामराजा:—सद्गुरो, आज आपण प्राशन करविलेल्या बोधामृ-तानें मी धन्य झालों. आपल्या सारख्या सत्पुरुषांचा जन्म जगाच्या कल्याणासाठींच होय. देवा, हा आपला महदुपकार मी कशानें फेडूं! आपल्या चरणीं मी आपलें तन—मन—धन पूर्वींच अर्पण केलें आहे; पण कृपासागरा! अवशेष राहिलेले त्रिगुणरूपीं धन घेऊन मला ऋणमुक्त करा! यापुढें मी आपल्या आज्ञेप्रमाणें वागेन. प्रजेला दुःख देणार नाहीं. गो—ब्राह्मणांचें रक्षण करीन. साधु—संतांची सर्वप्रकारें सेवा करून त्यांचा अशीर्वाद मिळवीन. पण आपली कृपा मात्र असावी. राणीः—सद्गुरुराया! आमचे

माता—पीता—देव, सर्व आपणच अहां ! आज आपल्या कृपाप्रसादानें आमच्या जन्माचें सार्थक झालें. असेंच वारंवार बोधामृत पाजून आमची तृषा शांत करावी.

श्रीज्ञानेश्वरः—मातोश्री, तूं महान् भाग्यशाली आहेस! तुझ्या पुण्याईला पारावार नाहीं. आजपर्यंत साधुसंतापिषयीं जशी आदरबुद्धि होती, तशीच सर्वदां ठेवून त्यांच्या सेवेंत तत्पर रहा. ह्मणजे पांडुरंग तुझें कल्याण करील. नंतर राणीनें बाळकृष्णास श्री ज्ञानराजांच्या चरणावर घालून ह्मणाली:—“ महाराज, आपण जीवदान दिलेल्या या बाळकृष्णाचे मस्तकावर आपला वरदहस्त असावा. ” असें ह्मटल्यावर श्री ज्ञानराजांनीं बाळकृष्णास जवळ घेऊन आणि त्याच्या अंगावरून हात फिरवून ह्मणाले:—बाळा, तुझ्या निमित्तानें सर्वांचें कल्याण झालें. यास्तव तूं धन्य आहेस! तुला माझा पूर्ण आशीर्वाद आहे. बाळकृष्णः—हे ज्ञानराजा! आपल्या कृपेनें आम्ही सर्व कृतार्थ झालों. आमच्यासारख्या अज्ञ जनांच्या कल्याणासाठीं आपण देह कष्टविता! देवा, या तुमच्या उपकृतीबद्दल फेड करणार कोण समर्थ आहे! हे सद्गुरो! मला आपण आपल्या स्वरूपांतच लय करून घ्या, एवढेंच आपल्या चरणापाशीं माझें मागणें आहे.

श्रीज्ञानेश्वरः—बाळा, तुझें हें अमनस्क वचन श्रवण करून मी आनंद भरीत झालों! परमेश्वर तुझी इच्छा पूर्ण करील!

याप्रमाणें राजानें बोधामृत प्राशन केल्यावर त्यांची पूजा केली; पादतीर्थही प्राशन केलें, आणि सर्वत्रांनीं त्यांस साष्टांग नमस्कार केल्यानंतर श्री ज्ञानराजानें आपल्या कंठातील तुलसी माला काढून रामराजाच्या कंठांत घातली, तेव्हां नामदेव म्हणतातः—रामराया ही माला श्रीज्ञानराजानें तुमच्या कंठांत घातली आहे. ती तुम्ही आपल्या कंठांत सदैव अशीच वागवा. हें संतज्ञानाचें श्रेष्ठ भूषण आहे. ही माला धारण करून कदाचित् तुह्मी दुराचरणीं प्रवृत्त झालांत, तर पांडुरंगाची आज्ञा उलंघन केल्याच्या दोषास पात्र व्हाल! ही माल सदैव कंठांत राखून तुह्मी पांडुरंगाचें भजन करीत राहा, ह्मणजे तो तुमच्यावर पूर्ण कृपा करील. असें नामदेवांनीं सांगितल्यावर पुन्हां सर्वत्रांनीं त्या सर्व संतांस साष्टांग प्रणिपात केला. श्रीज्ञानराज व नामदेवादि संत मंडळी तेथून मार्गस्थ झाली. या उभय संतमूर्ति मार्ग आक्रमण करीत असतांना आनंदानें परमेश्वराचे गुणानुवाद गात गात हस्तनापुरास येऊन दाखल झाल्या.

गोपुनरुज्जीवन.

नामदेव हे साक्षांत श्रीपांडुरंगाचे अत्यंत प्रिय असल्यामुळें त्यांच्या भजनाचा सोहाळा फार मनोहर होत असून तें प्रेमरसपूर्ण भजन ऐकण्याकरतां हस्तनापुरांतलें हजारों जन टाळ—मृदंग—पताका घेऊन त्याबरोबर भजन करूं लागले. ही वार्ता सर्व नगरांत पसरतां पसरतां शेवटीं तेथील अविंध बादशहाच्या कानावरही गेली.

तेव्हां तो तत्काळ तेथें येऊन सर्व लोकांसमक्ष एका धेनूचा वध करून त्यांनीं नामदेवास सांगितलें कीं, “ मी ही धेनु मारली आहे, आतां तूं हिला जिवंत केल्यास तुझें हें भजन सत्य आहे, नाहींतर हें सर्व ढोंग आहे असें समजून मी तुला शासन करीन. किती दिवसांत गाय सजीव करतोस बोल !” अशी उद्दामपणाची त्या बादशहाची वाणी ऐकून नामदेवांनीं “ चार दिवसांनीं ही धेनु जिवंत होईल” असें सांगितलें. मग बादशाह त्या गाईच्या रक्षणास आपले सेवक ठेवून तेथून निघून गेला. नंतर श्रीनामदेवानें मोठ्या अट्टहासें-करून प्रभूचा नाना प्रकारें करुणस्वरानें धांवा केला. त्यांतील सारांश:—देवा ! तुझें गुणवर्णन करीत असतां हें मध्येंच काय विघ्न आण-लेंस ? माझी सेवा तुला आवडली नाहीं कां ? कां माझ्याहांतून कांहीं अपराध घडला, ह्मणून मला ही शिक्षा केलीस ? असें ह्मणून नामदेव त्या गौतमीचें मस्तक आपल्या मांडीवर घेऊन परमेश्व-राची विनवणी करीत होते. शेवटीं नामदेव ह्मणतात:—पांडुरंगा ! तूं प्रेमळभक्तांच्या कीर्तनांत बसलास ह्मणून माझी करुणध्वनी तुला ऐकूं आली नाहीं, किंवा देवेंद्रानें तुला अमृतपानाकरितां बो-लावून नेलें ह्मणून तुला माझ्यावरलें संकट कळलें नाहीं ? हे प्रभो ! नानावस्त्रालंकार भूषणानें कोणी श्रीमंत भक्त तुझी राजोपचारानें पूजा करीत बसला आहे, ह्मणून तेथेंच तल्लीन होऊन तुला माझा विसर पडला कां ? पांडुरंगा ! तूं भक्तांचा कैवारी असून या वेळींच

इतकी कठोरता कां धारण केली ? नारायणा तुझा भक्त जो प्रल्हाद त्याच्या संरक्षणाकरितां तूं स्तंभीं प्रकट झालास ! शीळारूप होऊन पडलेल्या अहल्येचा उद्धार केलास ! द्रौपदीचा मान राखलास ! गजेंद्राला संकटांतून मुक्त केलेस ! आणि देवा, माझ्याकरितां बौद्ध होऊन वैकुंठीं स्वस्थ बसून राहिलास ! हे भक्तकाम कल्पद्रुमा ! हें तुझें केवढें ब्रीद आहे. यास्तव धांव ! धांव ! ! आणि या धेनूला जीवदान देऊन ह्या तुझ्या दीन दासाची आस पुरीव. ह्याप्रमाणें अहोरात्र तीन दिवस सारखा धांवा चालला होता. चौथे दिवशीं श्रीपांडुरंग प्रकट होऊन त्यांनीं ती मृत गाय जिवंत केली! नंतर मोठ्या प्रेमानें नामदेवास आलिंगन दिलें. त्या वेळचा देवभक्तभेटीचा सोहळा कोण वर्णन करील ! ! नामदेव ह्मणतातः—देवा, आजपर्यंत मी तुझ्यावर कोणतेंच संकट घातलें नाहीं, ह्मणून तूं यावेळीं माझा अंत पाहिलास कां ? त्या वेळीं नामदेवाचा कंठ भरून त्याच्या नेत्रांतून आश्रुधारा चालल्या होत्या ! हें पाहून भगवान् म्हणतातः—नामदेवा ! तुझ्याच संकल्पामुळें मला चार दिवस वाट पहावी लागली. जर तूं त्याच वेळीं "आतांच गाय सजीव करीन" असें म्हणतास तर मग मीही तत्क्षणीं येऊन गाय जीवंत केली असती; व तुलाही इतका शीण झाला नसता. ज्याप्रमाणें स्फटिक लिंग ज्यावर ठेवावें त्याप्रमाणें त्याचा रंग दिसतो. तद्वत् भक्ताच्या आवडीप्रमाणेंच मला वर्तन करावें लागतें. इतकें सांगून

भगवान् तत्काळ अदृश्य झाले. गाय सजीव झाल्यानें सर्व जनांस आनंद होऊन तें नामदेवाच्या चरणावर लोळण घालूं लागले. मग सज्जनांनीं ही वार्ता बादशहाचे कानावर घातली, तेव्हां तो विस्मय पावून त्यास्थलीं आला; आणि मोठ्या भक्तिपुरस्सर त्यानीं नामदेवाचें चरण धरलें. नंतर सर्वांनीं जयजयकार करून श्रीपांडुरंगाची आरती केली. सर्व जन नामदेवास धन्यवाद देऊन त्याचें गुणवर्णन करीत आपापल्या स्थानाप्रत निघून गेले.

श्रीवारणाशीक्षेत्रीं देवजोडीचें गमन.

मृत धेनु जीवंत केल्यामुळें नामदेव हे प्रति ईश्वरच आहेत असें हस्तनापुरांतील जनांस वाटूं लागले. नामदेवाच्या भजनाचा नित्य नवा सोहळा पाहून त्यांचेवर भगवद्भक्तांची दृढ श्रद्धा जडली. श्रीज्ञानेश्वर व श्रीनामदेव या उभयतांनीं तेथें कांहीं दिवस वास करून एके दिवशीं तेथून प्रयाण केलें; आणि ते मार्गांतील तीर्थें करीत व संतांचीं दर्शनें घेत आनंदवन म्हणजे श्रीवाराणशीक्षेत्रास येऊन दाखल झाले. नित्य परम पावन अशा भागीरथीचें स्नान व विश्वेश्वराचें दर्शन घडत असल्यामुळें त्या उभयतांस आह्मी कृतार्थ झालों असें वाटत असें. काशीक्षेत्रनिवासी महाभगवद्भक्त कबिराची प्रसृत झालेली सत्कीर्ति श्रीज्ञानराज व श्रीनामदेव यांनीं ऐकून ते त्यांच्या भेटीस गेले. तेव्हां त्यानीं उभय संतमूर्तींचें आदरातिथ्य केले आणि परस्परांत वंदनादि शिष्टाचार झाल्यावर श्रीज्ञानराजानें

त्यांस श्रीनामदेवाची ओळख करून दिली; व श्रीपंढरीक्षेत्राचेंही महात्म्य वर्णन केलें; पुन्हां असेंही सांगितलें कीं, "कबीरा, तुह्मी एकदां श्रीपंढरी येथें येऊन श्रीपांडुरंगाचें दर्शन घ्यावें. त्यास्थलीं तुमचें आगमन झाल्यानें तिकडील संत मंडळींचीं दर्शनें होऊन शिवाय तुमच्या दर्शनानें अज्ञजनही पावन होतील." या श्रीज्ञानेश्वराच्या भाषणास कबिरानीं मान्यता देऊन येत्या कार्तिकमासीं श्रीपांडुरंगाचे दर्शनास येण्याचें वचन दिलें. मग कांहीं वेळ त्रिवर्गांत अध्यात्मविषयक चर्चा झाल्यावर श्रीज्ञानेश्वर व श्रीनामदेव आपापल्या स्थानाप्रत गेले. श्रीपांडुरंगाचा प्रियभक्त नामदेव व प्रत्यक्ष विष्णू आवतार श्रीज्ञानेश्वर या उभयतांचीं अकस्मात दर्शनें झाल्यानें कबिरासही महदानंद झाला.

यज्ञवृत्तांत.

ही उभयतां देवजोडी श्रीकाशीक्षेत्रीं असतांना तेथील विद्वन्मुकुटमणी अशा कांहीं श्रेष्ठ ब्रह्मवृंदांनीं एक यज्ञ केला. यज्ञसमाप्तीनंतर अग्रपूजेचा मान कोणास द्यावा, याबद्दल त्या ब्रह्मवृंदांत वादविवाद सुरू झाला. जेव्हां त्याचा शेवट लागेनासा झाला, तेव्हां सर्वानुमतें हत्तीणीच्या शुंडेंत पुष्पमाला देऊन ती ज्या भाग्यवानाच्या कंठांत माला घालील, त्यालाच हा बहुमान द्यावा असें ठरविलें. त्याप्रमाणें हत्तीणीच्या शुंडेंत पुष्पमाला देऊन ती शहरांत सोडून दिली. त्या वेळीं अग्रपूजेच्या मानास

हापापलेले कित्येक द्विजवर्य त्या हत्तीणीच्यापुढें जाऊन उभे रहात, परंतु आपणांस सोडून पुढें जाण्याचा तिचा रोंख पहातांच ते ब्राह्मण आपल्या मनांत खजील होऊन बाजूस होत. इतक्यांत असें झालें कीं, कांहीं संत मंडळीसह श्रीज्ञानेश्वर व श्रीनामदेव त्या मार्गानें जात असतां हत्तीणीनें ती माला श्रीज्ञानराजांच्या कंठांत घातली! तेव्हां सर्वत्रांनीं श्रीज्ञानेश्वरांचा जयजयकार करून त्यांना अग्रपूजेचा मान देण्याचें ठरविलें. नंतर क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदां पैकीं श्रेष्ठ द्विजवर्य पुढें होऊन त्यांनीं श्रीज्ञानराजांच्या चरणावर मस्तक ठेवून प्रार्थना केली कीं, महाराज, आह्मी मणिकर्णिकेच्या घाटावर यज्ञ समाप्त करून त्याच्या अग्रपूजेच्या मानासंबंधीं आह्मां ब्रह्मवृंदांत वाद उत्पन्न झाल्यामुळें सर्वानुमतें हत्तीच्या शुंडेंत पुष्पमाला दिली, व तिनें ती माळ आपल्या कंठांत घातली, त्या अर्थीं आपण अग्रपूजेचे अधिकारी आहां! यास्तव तुम्ही त्या मालेचा स्वीकार करून हें यज्ञकार्य सिद्धीप्रत न्यावें. अशी आमची प्रार्थना आहे.

श्रीज्ञानराजः—त्या श्रेष्ठ द्विजवर्यांची प्रार्थना ऐकून आपल्या मनाशीं ह्मणतात. परमेश्वरा! मला कशाला या मानाच्या भानगडींत घातलेंस! देवा! हीं लौकीक वाढविणारीं कृत्यें माझ्या हातून कशाला करवितोस! मी या मानाला मुळींच पात्र नाहीं. या क्षेत्रांत वेदव्यासासारखे त्रिकालज्ञ, वेदज्ञ, असे श्रेष्ठ ब्राह्मण पुष्कळ आहेत. त्यांच्यापेक्षां मी कांहीं श्रेष्ठ नाहीं. अशा प्रकारें

ते कांहीं काल विचारांत आहेत, तों इकडे त्यां पैकीं कांहीं द्विजश्रेष्ठ परस्परांत त्याबद्दल चर्चा करूं लागले. ती ऐकून ज्ञानराज पुन्हां मनाशींच म्हणतातः—देवा! माझ्याकरितां या ब्रह्मवृंदांत वाद उत्पन्न व्हावा! साधूपासून दुसऱ्यास पीडा होऊं लागली तर तो साधू कसला! इतकावेळपर्यंत श्रीनामदेव स्वस्थच होते. श्रीज्ञानराजाला हा अग्रपूजेचा मान देऊं नये अशी त्या कुटाळ द्विजवर्गांत चाललेली चर्चा ऐकून शेवटीं नामदेव म्हणतातः—श्रेष्ठ ब्रह्मवृंद हो, अग्रपूजेच्या मानाचा अधिकारी कसा असावा लागतो व त्यांचे ठिकाणीं कोणतें सामर्थ्य असलें पाहिजे, हें कृपा करून आह्मांस स्पष्ट सांगावें! नामदेवाचें भाषण ऐकून त्यांपैकीं एकजण ह्मणतोः— यज्ञाचा पुरोडांश त्यांच्या हातून श्रीविश्वेश्वरानें भक्षण केला पाहिजे.

श्री नाम०—ठीक आहे. तसेंही होईल! आपणासारख्या वेदवेत्त्या ब्रह्मणांचा आशिर्वाद असल्यावर काय होणार नाहीं!!

पुरोडांश ग्रहण.

याप्रमाणें संभाषण झाल्यावर विद्वान्, श्रेष्ठ व वेदवेत्ते अशा ब्रह्मवृंदांच्या मनांत तत्काळ आलें कीं, या सत्पुरुषांच्या अंगीं कांहीं तरी अलौकिक सामर्थ्य असलें पाहिजे. त्याशिवाय असें खात्रीचें वचन कोणी बोलणार नाहीं. असो. मग सर्व मंडळी यागस्थलीं जाऊन तेथील पुरोडांश श्रेष्ठ द्विजवर्यांनीं श्रीज्ञानराजांच्या हातीं दिला. व तो घेऊन याज्ञिक मंडळी, नगरवासी जन, श्रीज्ञानराज आणि

श्रीनामदेव यांसह हा सर्व बहुसमाज श्रीविश्वेश्वराच्या देवालयांत गेला. नंतर सर्वांनीं त्यांचें दर्शन घेतल्यावर श्रीज्ञानराज हातांत पुरोडाश पात्र घेऊन सर्वांच्या पुढें झालें. आणि श्रीविश्वेश्वराची प्रार्थना करून म्हणतातः—“ हे भक्तवत्सल विश्वेश्वरा! माझ्याहातून कांहीं अपराध झाले असतील, तर त्याची मला क्षमा करून माझ्या हातांतील हा पुरोडाश आपण ग्रहण करावा. मलाच हा मान मिळावा अशी तुझीच इच्छा असल्यामुळें तूं हत्तिणीला प्रेरणा केलीस. त्याचप्रमाणें आतां मला दर्शन देऊन सर्वांसमक्ष हा पुरोडाश ग्रहण करावा. देवा! सर्वांचे नेत्र माझ्याकडे लागले आहेत. आतां विलंब करूं नये!’ याप्रमाणें श्रीज्ञानेश्वराची प्रार्थना ऐकतांच श्रीशंकर प्रकट होऊन श्रीज्ञानराजांच्या हातांतील पुरोडाश घेऊन लागलीच गुप्त झाले, हा चमत्कार सर्व लोकांनीं पाहून त्यांस परमाश्चर्य वाटलें, व सर्वत्रांनीं तत्काळ श्रीज्ञानराजांचे पाय धरले. तेंव्हा श्रीज्ञानराज त्यांस म्हणतातः—श्रेष्ठ ब्रम्हवृंदहो! हें तुम्ही काय करतां! आपणासारख्या वेदमूर्तींची मी पायधूळ! आपण महाभाग्यवान् पुरुष अहां! आपल्या कृपाप्रसादानें मलाही विश्वेश्वराचें प्रत्यक्ष दर्शन झालें. याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरांचें नम्र भाषण ऐकून सर्व ब्रम्हवृंदांनीं त्यांना शिबिकेंत बसवून सर्व क्षेत्रांत मोठ्या समारंभानें मिरवणूक काढली; आणि मग त्यांस त्यांच्या वसतिस्थानीं महोत्साहानें पावते केलें. सर्व समाज क्षणएक त्या महात्म्यांचे सन्निध स्थित झाल्यावर प्रार्थना केली.

ब्रह्मवृंदांस ज्ञानोपदेश.

सद्गुरो ! आपण मूर्तिमंत ईश्वररूप आहात ! आपली अघटित करणी पाहून आम्ही आश्चर्य चकित झालों ! धन्य महाराज ! ! आपण स्वतः अत्यंत पवित्र असून दुसऱ्यासही पावन करणारे आहात ! ज्ञानराजा ! आम्ही शास्त्रनिपुणतेमुळें गर्वभरानें फुगलों होतों; परंतु आपल्या दर्शनमात्रेकरून आमचा तो ताठा दूर होऊन आज आम्हांस आत्मज्ञानाची उत्कटेच्छा झाली आहे. यास्तव कृपानिधे ! आह्मांस परमात्मध्यानाचा एखादा सोपा उपाय सांगून कृतार्थ करावें. यावर श्रीज्ञानेश्वर ह्मणतात:--सुजनहो ! जसें लोक यज्ञसमयीं अधरारणी व उत्तरारणी ह्यांच्या मध्यभागीं मंथा ठेवून त्या मंथेस दोरी लावून पुनः पुनः घर्षण करून अग्नि प्रकट कारितात. तद्वत् साधक पुरुषानें आपल्या शरीरास अधरारणी कल्पून व अकार, उकार आणि मकार ह्या तीन मात्रायुक्त प्रणवास उत्तरारणी कल्पून मनास मंथारूप करून ह्या सर्वांच्या ध्यानरूप क्रियेस रज्जूरूप कल्पावें; आणि अशा प्रकारच्या चिंतनानें निरंतर ध्यानाचें आवृत्तिरूप मंथन करावें. याप्रमाणें मंथन केलें असतां ह्या शरीरामध्यें अद्वितीय आत्मरूप अग्नि प्रकट होतो. तो आत्मरूप अग्नि एकवार प्रकट होतांच काम-क्रोधादि पाश दग्ध करून टाकतो. ते सर्व पाश दग्ध झाल्यावर साधक पुरुष अद्वितीय ब्रम्हरूपानें स्थित होतो; ह्मणजे जो जीव "अहं ब्रम्हास्मि

[मी ब्रम्ह आहे] " अशा प्रकारच्या ज्ञानरूप अग्नीच्या योगें कामादि सर्व पाश दग्ध करितो. तो त्वं पदार्थ रूप जीव तत्पदार्थरूप ब्रह्माहून भिन्न नाहीं, तर तो केवळ ब्रह्मरूप आहे असें जाणतो. पूर्वोक्त संघाताचे ठायीं गुप्तरूपानें असलेला आत्मा उत्तरोक्त ध्यानरूप मंथनानें तत्काळ प्रतीतीस येतो. अशा प्रकारें अधिष्ठान आत्म्याच्या साक्षात्कारानें साधकाचें मन ज्या कालीं द्वैत प्रपंचाकार वृत्तीचा त्याग करते, त्या कालीं तें प्रपंचत्यागरूप अमनस भावाप्रत प्राप्त होतें; अर्थात तें लय पावतें.

ब्रह्मवृंद:—भगवान् ज्ञानराज! मन अत्यंत प्रबल असल्यामुळें त्याचा जय करण्यास कोणीच समर्थ नाहींत; तर मग हें ध्यान कसें करतां येईल.

श्रीज्ञानेश्वरः—बाबांनो! मनाचा जय करण्याचें जर कोणासच सामर्थ्य नसतें, तर श्रुति-स्मृत्यादि शास्त्रांनीं मनोजय करण्याचें विधानच केलें नसतें. कारण, अशक्य कर्माचें विधान शास्त्रें करीत नसतात. पहा—अधिकारी पुरुषास अग्निहोत्रादि कर्में करण्याचें सामर्थ्य आहे, म्हणूनच त्यांचें विधान शास्त्रांत दिलें आहे; परंतु अग्निभक्षण करण्याचें विधान शास्त्रांत सांगितलें नाहीं. मनाचा जय करण्याचें विधान तर शास्त्रांत वारंवार आढळतें; इतकेंच नव्हे, तर अनेक विद्वान् पुरुषांच्या अनुभवानें तें सिद्ध आहे. यास्तव गुरुशास्त्रांच्या उपदेशानें मनाचा जय अवश्य होतो हें सिद्ध झालें.

ब्रह्मवृंदः—ज्ञानराजा! मनोनिग्रहाचा उपाय कोणता तो आह्मांस निवेदन करावा.

श्रीज्ञानेश्वरः—द्विजश्रेष्ठ हो! मनाचा निग्रह करण्याचे दोन उपाय आहेत. एक 'वैराग्य' आणि दुसरा 'अभ्यास.' हा संपूर्ण द्वैतप्रपंच ह्या जीवास अनेक प्रकारच्या दुःखाची प्राप्ति करून देणारा आहे. यास्तव हें सर्व जग दुःखमय आहे. अशा प्रकारें गुरु—शास्त्रादिकांच्या उपदेशानें हें सर्व जग दुःखरूप जाणून कोणत्याही पदार्थांच्या प्राप्तीची इच्छा न करणें हेंच 'वैराग्या'चें स्वरूप होय. आणि मृन्मय घटाचें वास्तविक स्वरूप मृत्तिके—[माती] हून भिन्न नाहीं, तद्वत् या जगताचें स्वरूप एका ब्रम्हाहून भिन्न नाहीं, तर केवळ ब्रह्मरूपच आहे, असें जें मनाचे ठायीं वारंवार चिंतन करणें त्याचेंच नांव 'अभ्यास'. मनोनिग्रह करण्याचे हें दोनच उपाय होत. तसेंच त्या मनोनिग्रहयोगास लय, विक्षेप व कषाय हे तीन दोष विरोधी आहेत; तथापि त्यांचा नाश वरील दोन उपायांनीं करावा. तो असाः—

दोषनिवृत्त्युपायः—हे ब्रह्मन्! ध्यान करीत असतां जेव्हां हें चित्त निद्रारूपलयाचे ठायीं प्रवृत्त होतें, तेव्हा त्यांस आत्मचिंतनरूप अभ्यासाकडे लावावें. कामोपभोगाविषयीं तत्परतारूप विक्षेप अवस्थेप्रत जेव्हां हें चित्त प्राप्त होतें, तेव्हां विषयांचे ठायीं असलेल्या अनेक दोषांचें चिंतनरूप वैराग्याच्यायोगें त्या चित्तास कामादिभोगांपासून

निवृत्त करावें; आणि रागादिकांच्या संस्कारानें चित्ताचे ठायीं जी आत्मानात्मवृत्तिरहिततारूप स्तब्धावस्था तिलाच ‘ कषाय ’ असें म्हटलें आहे. ह्या कषायरूप दोषाची निवृत्ति ‘ वैराग्य ’ व ‘ अभ्यास ’ ह्या दोन उपायांनीं करावी. अशा प्रकारच्या उपायांनीं जेव्हां अधिकारी पुरुषाचें चित्त ब्रम्हाकार होतें, तेव्हां त्या अवस्थेपासून चित्त चळूं न देतां तेथेंच स्थिर करावें. ब्रम्हवृंदहो ! हा ब्रम्हाकाररूप जो मनोनिग्रह तोच वेदांत वाक्यांच्या विचाररूप ज्ञानाचें फल होय. तसेंच तें योगाचेंही फल आहे. यासारखें दुसरें कोणतेंच सांख्ययोगाचें फल नाहीं. याप्रमाणें श्री ज्ञानेश्वरांनीं त्या विद्वान् ब्रह्मवृंदांस उपदेश करून त्यांच्या मनाचें शांतवन केलें. नंतर ते ब्रह्मवृंद सद्गुरू श्री ज्ञानेश्वरांस दंडवत प्रणाम करून श्री सद्गुरूंच्या बोधामृतानें आज आम्ही कृतार्थ झालों ‘ धन्य ज्ञानराजा धन्य ! ! असें म्हणत ते आपआपल्या आश्रमाप्रत चालते झाले.

योगसिद्धीची व भक्तिप्रभावाचि समानता.

श्रीज्ञानेश्वर व नामदेव हे महान् प्रतापशाली संतश्रेष्ठ श्री काशीक्षेत्रीं अद्भुत लीला दाखविल्यावर कांहीं काल त्या स्थलीं वास करून, नंतर ती संतजोडी एके दिवशीं तेथून निघून गया, प्रयाग, अयोध्या, मथुरा—वृंदावनादि पवित्र स्थलीं वास करीत असलेल्या साधुपुरुषांचें दर्शन घेत द्वारावती क्षेत्रास येऊन दाखल झाली. तेथील द्वारकाधीश जो श्रीकृष्ण त्याचें दर्शन घेऊन श्री विठ्ठलाचें

गुणानुवाद गात मारवाडांतून मार्ग आक्रमण करीत चालले असतां दोन प्रहरचे समयीं उभय संतमूर्तींस तहान लागली. तेव्हां ते उभयता तृषाशमनार्थ पाण्याचा शोध करीत असतां अकस्मात् एक कूप त्यांच्या दृष्टीस पडला; परंतु त्यांत पाणी फार खोल असल्यामुळें तृषा भागवितां येत नाहीं, असें जाणून श्री ज्ञानेश्वर ह्मणूं लागले—नामदेवा! मला एक योगयुक्ति सुचली आहे. आतां मी ती करून पाहतों. असें बोलून त्यांनीं अणिमा सिद्धीच्या योगानें सूक्ष्मरूप धारण करून त्या कूपांत प्रवेश केला! उदक प्राशन करून वर येतांना अंजली भरून उदक आणलें. आणि ह्मणाले:—नामदेवा! सूक्ष्मरूप धारण करण्याची योगकला तुह्मांस माहीत नसावीसें वाटलें ह्मणून मी आपल्या ओंजळींत पाणी आणलें आहे. चैतन्यघन आत्मा सर्वांघटीं एकच आहे; त्या अर्थीं मनांत किंचित्ही द्वैतभाव न आणितां तुह्मी माझ्या अंजलींतील पाणी प्राशन करावें. श्रीज्ञानेश्वरांची ही करुणापर वाणी ऐकून नामदेव ह्मणतात—ज्ञानराजा! श्री पांडुरंग जर सर्वांतर्यामीं वास करतो, तर माझ्याही अंतरीं तो आहेच. शिवाय ‘ भक्तकामकल्पद्रुम ’ हें त्याचें ब्रीद असल्यामुळें तो माझीही तृषा शांत करील! ज्ञानराजा! तुह्मी क्षणएक धीर धरून काय चमत्कार घडतो तो अवलोकन करावा. असें बोलल्यावर नेत्र झांकून नामदेव ध्यानस्थ झाले, आणि करुणास्वरानें भाकूं लागले:—“ पांडुरंगा! धांव आतां! तूच माझें दैवत, माझी संपत्ति, माझे

गणगोत तूंच ! आणि माझें योग–याग–तप–सिद्धि सर्व तूंच ! सर्वतोपरी तूंच माझा आधार आहेस ! तर मग या प्रसंगीं माझें संकट तुझ्यावांचून दुसरें कोण बरें निवारण करील. ज्याप्रमाणें गजेंद्रास महान् संकटांतून मुक्त केलेंस; आणि वस्त्रहरणसमयीं द्रौपदीस साह्य केलेंस, तद्वत् देवा ! लौकर धांव घेऊन माझ्या तृषेचें शांतवन कर. सांप्रत मी तृषेनें अत्यंत व्याकूल झालों आहे. " याप्रमाणें इकडे नामदेवाचा अंतःकरणपूर्वक धावा चालू असतां तिकडे श्री पांडुरंगास दुःश्चिन्हें दिसून येऊं लागलीं. यामुळें देव उद्विग्न होत्साते स्वस्थ बसले ! तेव्हां आदिमाता रुक्मिणीनें विचारिलें कीं "देवा ! तुह्मी एकाएकीं असें स्तब्ध कां झालात " यावर देव म्हणतातः—

आज माझा वामनेत्र लवू लागून वाम बाहूही वारंवार स्फुरण पावत आहे. त्याअर्थी कोणी तरी माझा प्रियभक्त संकटांत पडला आहे, असें ह्मणून देव ध्यानस्थ झाले. तेव्हां त्यांस असें कळून आले कीं, नामदेव तृषेनें व्याकूल झाला आहे. मग भगवंतांनीं पंढरीस राहूनच इकडे असा चमत्कार केला कीं, ज्या विहरीजवळ ही देव जोडी बसली होती, ती विहीर[1] एकाएकीं पाण्यानें तुडुंब भरून जाऊन आणखी वरून पाणी वाहूं लागलें. हा चमत्कार

---

१ सांप्रत तें एक तीर्थ झालें असून त्या स्थळीं मार्गशीर्षमासीं अद्याप मोठी यात्रा भरत असते.

पाहून ज्ञानराज ह्मणतातः—नामदेवा ! खरोखर तूं आपल्या निस्सीम भक्तीनें देव ऋणी केला आहेस ! हें पहा, विहीर भरून जल वाहूं लागलें. ऊठ आतां, डोळे उघड ! मग नामदेवांनीं डोळे उघडून पाहून पांडुरंगाची करुणा भाकली, आणि आपली तृषा शांत केली. नंतर मोठ्या आनंदानें श्रीज्ञानराजानें नामदेवास प्रेमालिंगन देऊन म्हटलें ! नामदेवा, तुझी निस्सीम भक्ति पाहून खरोखरच मी फार संतुष्ट झालों. ज्याप्रमाणें नळानें जलावर पाषाण तारलें, किंवा भगिरथानें स्वर्गाहून भागीरथी भूलोकीं आणिली; त्याप्रमाणें तुह्मी आज आपल्या दृढ भक्तीनें पाताळची भोगावती वर आणिली. धन्य तुमचें कुल ! व धन्य तुह्मीं ! ! तुमची संगति सोडून जाऊंच नये असें मला वाटूं लागलें आहे. यापुढें आतां तीर्थाटन करण्याचीही माझी इच्छा राहिली नाहीं, असें ह्मणून श्रीज्ञानराजानें नामदेवाचें पाय धरलें. उलट नामदेव त्यांच्या पाया पडून ह्मणूं लागले कीं, मी अज्ञान लेंकरूं ! श्रीपांडुरंगानें मला आपल्या स्वाधीन केलें असून आपण माझ्या पायापडून मला दोषांत कां घालता ! याप्रमाणें विनोदार्थ उभयतांचा प्रेमसंवाद झाल्यावर ते पुन्हां प्रवासास निघाले. याप्रमाणें उभयतां देवजोडी उत्तर, पश्चिम व पूर्वदिशेकडील तीर्थें करीत करीत दक्षिणदिशेकडील श्रीरामेश्वरास गेले. तेथून निघून माघशुद्ध चतुर्दशीस ह्मणजे महाशिवरात्रीस औंढयास आले.

औंढ्यानागनाथ देउळाची पराङ्मुखता.

श्रीज्ञानेश्वर व नामदेव औंढ्यास आल्यावर तेथील तीर्थाचें स्नान करून मग श्रीनागनाथाचें दर्शनार्थ देवालयाकडे गेले. या उभय दिव्य संतांनीं त्या देवालयाच्या महाद्वारापाशीं जातांच नागनाथास परम प्रेमानें तेथूनच लोटांगणें घातलीं. नंतर आंत जाऊन देवास पुन्हां साष्टांग प्रणिपात केला; व परत महाद्वाराजवळ येऊन तेथें देवासन्मुख उभे राहून नामदेवांनीं कीर्तनास आरंभ केला. त्यांचें तें प्रेमळ कीर्तन चालू असतां पुष्कळ भाविकजन टाळ—मृदंग, वीणा व भजनाच्या सामुग्रीसह येऊन नामदेवाच्या पाठीमागें उभे राहिले. नामदेवाचें तें प्रेमभरित अंतःकरणानें चाललेलें कीर्तन ऐकून भावीकजन इतकें आनंदीत झालें कीं, बसल्या जागेवरून उठून दुसरीकडे जावें, असें त्यांच्या मनांत सुद्धां येईना! प्रेमळ भक्तीनें देव भक्त एकरूप होतात, त्याप्रमाणें श्रोते व वक्ते एक चित्त होऊन भगवन्नामसंकीर्तनांत अगदीं तल्लीन झाले. अशा समयीं कांहीं कर्मठ ब्राह्मण स्नान करून ओल्या वस्त्रानिशीं नागनाथाची पूजा करण्याकरितां तेथें आले. त्यांनीं हा चाललेला भजनाचा सोहळा पाहून ह्मणूं लागले कीं, येथें उगीच टाळ कुटून तुह्मी गोंधळ काय माजविला आहे. पंढरीच्या मेळ्याप्रमाणें येथेंही भजनी मेळा तयार झाला आँ; पण तें पंढरीसच लागू. आमच्या नागनाथाला असला गोंधळ खपणार नाहीं. शिवाय नामदेव हा

जातीचा शिंपी असून आपल्या कीर्तनांत अनेक वेदप्रमाणें दाखवून आम्हा सारख्या कर्मठ ब्राह्मणांना ज्ञान शिकवितो काय? हें आह्माला पसंत नाहीं. चालते व्हा येथून! नाहींतर आह्मी तुह्मांस ताडन करून हांकून लावूं! त्यां पैकीं कित्येक समंजस ब्राह्मणांनीं म्हटलें,:—बाबांनो! तुह्मांला असाच गोंधळ घालावयाचा असेल, तर देवळाचे मागले बाजूस जाऊन तेथें मनसोक्त टाळ कुटा! आरडा, ओरडा! काय वाटेल तें करा! ह्मणजे आह्मी आतां देवाला अभिषेक वगैरे करणार आहों त्याला अडथळा होणार नाहीं. हें त्या द्विजवर्यांचें भाषण ऐकून नामदेवांनीं त्यास नमस्कार केला, व विनयानें म्हटलें:—"हे ब्रह्मन्, आपली आज्ञा आह्मांस मान्य आहे. आपल्या ह्मणण्याप्रमाणें आम्ही देवळाच्या मागें जाऊन भजन करतों बरें! ईश्वराचें नाम संकीर्तन कोठेंही केलें तरी सारखेंच! असें म्हणून नामदेव देवळाचें मागें जाऊन कीर्तन करूं लागले. ज्याप्रमाणें दुधांत मीठ घातलें ह्मणजे तें बिघडतें, किंवा कस्तुरींत हिंग पडला तर ती खराब होते; त्याप्रमाणें श्रोत्रवृंदाचें मन द्विजांच्या भाषणानें अगदीं विरस झालें. ह्मणून ज्याप्रमाणें सूर्यामागून किरणें जातात, किंवा वायुगतीनें मेघ वळतात! त्याप्रमाणें तेथील श्रोतृसमाज नामदेवांच्या मागें निघून गेला.

नामदेव देवालयाच्या मागें जाऊन भजनास उभे राहिल्यावर नागनाथ आपल्या समोर नाहीं, ह्मणून त्यांच्या मनाला अत्यंत खेद

वाटून नेत्रावाटें टपटप अश्रुबिंदू पडूं लागले. तेव्हां सर्वांनीं विठ्ठलनामाचा प्रचंड गजर केला. त्या गर्जनेंत नामदेवांनीं आपली नेत्रपाती लावून देवाचा धांवा करण्यास प्रारंभ केला. ज्याप्रमाणें चैतन्यानें देहास सोडावें किंवा मातेनें बालकास अरण्यांत टाकून द्यावें त्याप्रमाणें नामदेवाची स्थिति झाली. तेव्हां नामदेवांनीं पांडुरंगाचा धावा केला. तो असाः—अनाथनाथा पांडुरंगा! तूं मला आज दूर केलेंस! देवा माझें तुला विस्मरण झालें काय! हे पांडुरंगा! श्रीज्ञानराजांबरोबर भरतभूमीवरील सर्व तीर्थें व सर्व दैवतें आनंदानें पाहिलीं; परंतु दासावर कृपादृष्टि करणारें तुझ्यासारखें दयाशील दैवत माझ्या दृष्टीस पडलें नाहीं. अहाहा, देवा!! तुझें तें गोजिरवाणें मुखकमल, कंबरेवर हात ठेवून समचरण जोडलेलें दिगंबर मूर्तीचें दिव्य स्वरूप पाहतांच देहभान नाहींसें होतें! हे प्रभो, आतां तुझी तीं सकुमार पाऊलें केव्हां माझ्या दृष्टीस पडतील! देवा माझ्यावर रागावलास ह्मणून मला पाठिमोरा झालास का! श्रीशंकर आणि श्रीपांडुरंग यांच्या ठिकाणीं मी कधींही द्वैतभाव ठेवला नाहीं, असें असून कोणत्या अपराधानें शंकर मला आज पाठमोरे झाले! याप्रमाणें नामदेवाच्या मुखांतून सारखी प्रार्थना चालू असतां अकस्मात् आकाश मार्गानें विद्युल्लतेप्रमाणें महा तेजस्वी अशा नऊ लक्ष पताका खालीं उतरल्या व नामदेवाची सप्रेम भक्ति पाहून अंतरिक्षांतून देवगणांनीं त्यांजवर पुष्पवृष्टी केली. हा चमत्कार पाहून

सर्वजण आनंदानें टाळ्या पिटूं लागले; आणि विठ्ठलनामाची प्रचंड गर्जना सुरू केली. तेव्हां नामदेवाचें चित्त किंचित् आनंदीत झालें. परंतु ज्याच्यासमोर आपण कीर्तनास उभे राहिलों तो भगवान् शूलपाणी जर आपल्या समोर असतां तर भजनास मोठा रंग आला असतां. देवा रुक्मिणीवरा, या अज्ञान बालकावर तुझ्यावाचून कोण बरें कृपा करील ! असें नामदेवांनीं ह्मणतांच पूर्वाभिमुख असलेलें श्रीनागनाथाचें देवालय पश्चिमाभिमुख झालें. श्रीशंकरमूर्ति नामदेवाच्या समोर आल्यावर त्यांस परमावधीचा आनंद झाला. मग सकल श्रोतृवृंदासहवर्तमान प्रेमोल्हासानें परमेश्वराचें भजन करण्यांत उर्वरित दिवस व सकल रात्र केव्हां निघून गेली हें कोणासच कळलें नाहीं. प्रातःकालचा समय झाल्यावर देवळांतील ब्राह्मण श्रीशंकराची पूजा संपूर्ण करून बाहेर आले, व आश्चर्यचकित होऊन ह्मणूं लागले कीं, " अहो, हें आज असें काय झालें! पूर्वेचा सूर्य पश्चिमेस कसा उदयास आला ! आपल्यास जाग्रणानें भ्रांति झाली किंवा दिशाभूल झाली हें कांहींच कळत नाहीं. अशा स्थितींत त्यांनीं एकदां सभोंवार निरीक्षण करून पाहिलें तों तीर्थें वगैरे सर्व जागच्याजागीं असून देवालय मात्र फिरलेलें आहे, असें त्यांच्या लक्षांत आलें. तेव्हां ते ब्राह्मण विस्मयाकुल होत्साते ह्मणतातः—साधु—संतांच्या अघटित लीलेचा अंत ब्रह्मदेवाससुद्धां लागला नाहीं; मग आह्मां पामराची काय कथा ! आह्मी कर्मठ-

पणाचा अभिमान बाळगून महान् भगवद्भक्त नामदेवाचा धिःकार केला, त्या अर्थी आज आम्हांकडून हा एक मोठाच अपराध घडला. नामदेव हा उद्धवाचा अवतार असून आम्हीं त्याची अवहेलना केली, हें आम्हांस योग्य नव्हे. असा अनुताप पावून ते द्विजवर्य नामदेवाजवळ येऊन त्यांनीं त्यास साष्टांग नमस्कार घातला; आणि प्रार्थना केली कीं, नामदेवा! तुझ्यासारखा भगवद्भक्त सृष्टीवर विरलाच सांपडेल! जों पर्यंत या अवनीवर चंद्रसूर्य प्रकाशत आहेत, तोंपर्यंत तुझी विमल कीर्ति या भूमंडळावर अजरामर गाजत राहील. मग सर्व भक्तजनांनीं देवास आरती करून प्रसाद वगैरे वाटल्यावर त्यांपैकीं भाविकजन ह्मणतात:— नामदेवा! आपल्याबरोबर भगवन्नामाच्या संकीर्तनाचा आज आम्हांस अमृतोपम अलभ्यलाभ घडला; परंतु आम्हां अज्ञ जनांस दुःखरूप अशा भवसागरांतून मुक्त होण्यासारखा कांहीं तरी बोध कराल अशी प्रार्थना आहे. हें त्यांचें विनययुक्त भाषण ऐकून नामदेव ह्मणतात:—

नामदेवाचा भक्तजनांस बोध.

सुजनहो, षड्गुणैश्वर्यसंपन्न परमेश्वराची प्राप्ति झाल्यानें ही नरतनु पावन होईल. याकरितां ईश्वराची आणि साधूंची एकनिष्ठपणें सेवा करावी, त्यांजवर पूर्ण प्रेम ठेवून चिरकाल त्यांच्या संगतीचा लाभ घडेल अशी योजना करावी, ईश्वराची व साधूंची मनो-

भावापासून पूजा करून त्यांच्या चरणकमलाचें तीर्थ प्राशन करावें, त्यांचीं गुणचरित्रें गांवीं, त्यांच्या मूर्तीचें दर्शन करावें आणि सर्वाभूती परमेश्वराची व्याप्ति आहे अशी दृढ बुद्धि ठेवून सामर्थ्यानुरूप प्राण्यांच्या इच्छा पुरवाव्या, व सर्वांचा सन्मान करावा. या प्रमाणें साधन करीत जे लोक कामक्रोधादि षड्रिपूंना जिंकून इंद्रियांचें दमन करतात; आणि परमेश्वराची निष्काम सेवा करतात त्यांची ईश्वरावर दृढभक्ति जडते. एकदां परमेश्वरावर दृढभक्ति बसली ह्मणजे तो पुरुष त्याचीं चारित्रें मोठ्या प्रेमानें गातो. त्यावेळीं त्याला आपल्या देहाचें भान राहत नाहीं. अशी स्थिति झाली ह्मणजे त्या पुरुषांचें अज्ञान जाऊन तो आत्मस्वरूपीं लीन होतो. मग त्याचें जन्ममरणरूप संसृति चक्र मोडून जाते. याकरितां तुह्मीं आपल्या हृदयांत आपल्या आत्म्याचें निरंतर चिंतन चालवा. याप्रमाणें नामदेवाचा बोध ऐकून सकल जन ह्मणूं लागले. "केवढा आज हा आनंदाचा दिवस! सत्पुरुषांच्या मुखांतील हे अमृत सारितेचें बोधरूपी जल प्राशन करण्यास आमची कोणती पूर्व पुण्याई उभी राहिली नकळे!" असा नामदेवाचा गुणानुवाद गात सर्व लोक त्यांची आज्ञा घेऊन आपापल्या स्थानीं निघून गेले.

श्रीपांडुरंगदर्शनाचा सोहळा.

श्रीज्ञानेश्वर व नामदेव ह्या उभय संतमूर्ति औंढ्याहून निघून आनंदानें संचार करीत करीत श्रीपंढरपूर क्षेत्राजवळ आल्या. तेव्हां त्या उभ-

यतांस मोठा आनंद झाला! कन्या सासऱ्याहून माहेरी जाऊं लागली ह्मणजे तिला जसा आनंद होतो, त्याप्रमाणें श्रीपंढरीजवळ येतांच नामदेवास आनंदाचें भरतें येऊन पांडुरंगाचें चरण कधीं पाहीन असें त्यास झालें होतें. जेव्हां पांडुरंगाच्या देवळाचा कळस नामदेवाच्या दृष्टीस पडला, तेव्हां तेथेंच त्यानीं प्रथमतः लोटांगण घातलें. मग पांडुरंगाच्या दर्शनास आतुर झालेला नामदेव श्रीज्ञानदेवासह महाद्वारापाशीं येतांच तेथें त्यांनीं इतक्या सप्रेमभरानें लोटांगण घातलें कीं, त्याचें देहभान नाहींसें होऊन ते अगदीं निचेष्टित पडले. मग श्रीज्ञानराजानें नामदेवास सावध करून ते उभयतां आंतील सभा मंडपांत जातात तोंच श्रीपांडुरंग त्यांना सामोरे येऊन त्यांनीं मोठ्या प्रेमानें प्रथम नामदेवास दृढालिंगन दिलें, व आपल्या कंठांतील सुमनतुळसीमाला त्याच्या कंठांत घातली. नंतर श्रीज्ञानराजानेंही पांडुरंगाच्या चरणावर आपलें मस्तक ठेवलें.

नामदेवाच्या भेटीची गोडी फार अप्रतिम! त्यावेळीं उभयतांचें कंठ सद्गदीत होऊन नेत्रांवाटें अश्रुपूर लोटले! अहाहा! काय हा देव—भक्त प्रेमा! देव व भक्त यांच्या अंतःकरणांतली प्रेमरसगोडी कोण वर्णू शकेल! देव—भक्तांचें प्रेमालिंगनादि शिष्टाचार झाल्यावर श्री पांडुरंगानें ह्मटलें:—नामदेवा, तुझ्या वियोगानें मी अगदीं विव्हल होत्साता मला रात्रीची झोंप कशी ती नव्हती. सारें लक्ष तुझ्याकडे असें, त्यामुळें रात्रंदिवस मला चैन

पडेना! जसें धेनुला वत्स भेटल्याबरोबर आनंद होतो. तसा या क्षणीं तुला पाहून मला आनंद झाला. वगैरें संभाषण झाल्यावर थोडयाच वेळानीं देव पुन्हां नामदेवास ह्मणतात:— नामदेवा! आतां तूं सकल तीर्थयात्रा करून आला आहेस! त्याअर्थीं तूं त्यांचें उद्यापन केलेस तरच इतक्या दूर जाऊन तूं आपल्या शरीराला क्लेश सोसल्याचें सार्थक होईल. ज्याप्रमाणें अनेक पुराणें श्रवण करून त्याचें जर मनन झालें नाहीं, किंवा षड्रस पक्कान्नाची पाकनिष्पत्ति करून भोजन झालें नाहीं तर तें जसें निष्फळ होतें, तद्वत् यात्रेच्या शेवटीं ब्राम्हण संतर्पण झालें नाहीं, तर यात्रा निर्फळ होते; याकरितां आतां तूं यात्रेचें उद्यापन कर. नामदेवा! तुला कदाचित् शंका येईल कीं, त्याची खटपट कोणी करावी? तर तुला ती काळजी नको. मी व रुक्मिणी सर्व तजवीज करतों. जेथें देव आदिमायेसह ब्राह्मण संतर्पणाच्या तजविजीला लागले, तेथें उणेपणा काय असणार! याप्रमाणें सर्व सिद्धतेला श्रीपांडुरंग लागून रुक्मिणिमाता अन्नपूर्णा झाली. तेथील अन्नग्रहण करण्यास स्वर्गलोकीचे अमृतपान करणारे इंद्र, चंद्र, ब्रम्हदेव आदिकरून सर्व देव आपापल्या गणांसह त्या समारंभास प्राप्त झाले. श्रीज्ञानदेव यात्रा संपूर्ण करून श्रीपंढरीस आल्याची बातमी आळंदीस कळतांच तेथून श्रीनिवृत्तिनाथादि त्रिवर्ग भावंडें, विसोबा-खेचर हेही प्राप्त झाले. नरहरी सोनार, गोरा कुंभार, सावतामाळी

वगैरे भक्तमंडळीही त्या स्थळीं विराजमान झाली. याप्रमाणें देवभक्त यांचा तो सोहळा पाहण्यास इतरही भाविकजन आल्यानें त्यावेळीं श्रीपंढरीक्षेत्रास एकाप्रकारें अवर्णनीय शोभा आली होती. उद्यापनाचे दिवशीं क्षेत्रस्थ ब्राम्हण व इतर मंडळीची भोजनें झाल्यावर देव व सकल भक्त एकाच पंक्तीस बसून त्यांनीं आनंदानें भोजन केलें. अस्तु.

श्रीपाडुरंगांसह सर्व मंडळीचें अलंकापुरीस गमन.

सर्व भक्त व संत मंडळी एकत्र होऊन नित्य श्रीपाडुरंगाचें नामसंकीर्तन प्रेमपूर्वक करीत असत. त्यांच्या कीर्तनास इतर भाविक जनही येत होते, त्यामुळें तेथें मूर्तिमंत ब्रम्हच संचरलें होतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यावेळीं ते सर्व मिळून अभेदरूपानें भजनांत तल्लीन होत असत. अशा प्रकारें श्रीज्ञानराजांनीं गुरु निवृत्तिनाथादि भावंडांसह कांहीं दिवस त्या श्रीपंढरीक्षेत्रांत आनंदानें वास केल्यावर एके दिवशीं ते श्रीपांडुरंगाला म्हणाले; आतां माझा समाधिकाल प्राप्त झाला आहे, यास्तव आपण मला आपल्या अक्षय्य पदापाशीं न्या, ह्मणजे आपण आपल्या भक्तजनांसह अलंकापुरीस येऊन मला समाधि दिल्यावर आमचें अवतारचरित्र संपलें." ही ज्ञानराजाची विनंति ऐकून देव म्हणतात "ज्ञानदेवा! तूं माझीच ज्ञानकला आहेस व ज्या अर्थीं तुला आतां समाधी घेण्याची इच्छा झाली आहे त्याअर्थीं आम्हीं तेथें येऊन तो योग घडवून आणूं!" हें भगवंतानें श्री-

ज्ञानराजास दिलेलें अभय वचन व श्रीज्ञानराजांनीं पांडुरंगाची केलेली प्रार्थना नामदेवांनीं ऐकून ते म्हणाले:—" पांडुरंगा! आपण श्रीज्ञानराजाला समाधि देणार! मग आह्मी त्यांच्यावांचून कसें रहावें बरें! अतिशय सहवासानें श्रीज्ञानराजाचे ठायीं माझें अत्यंत प्रेम जडलें आहे; त्या अर्थीं देवा, ज्ञानराजाचा वियोग मी कसा सहन करावा!" ही नामदेवाची सद्गदित वाणी ऐकून पांडुरंग ह्मणतात:—" नामदेवा, अरे ज्ञानराजा तो मीच! माझें रूप तेंच ज्ञानराजाचें रूप!' मी मौन धरून असाच जर विटेवर उभा राहिलों, तर या कलियुगीं भवसागरांत बुडणाऱ्या जीवांना मोक्षप्राप्तीचा सुगम मार्ग कोण दाखवील! जनोद्धारार्थ मीच ज्ञानरूपानें आवतार घेतला. आतां माझें आवतारकृत्य संपलें. ह्मणून ज्ञानराजाचें हें मदंशरूप मी आपल्या रूपांत लय करीत आहे. नामदेवा, हें गुप्त रहस्य स्वतः तूं अंतर्ज्ञानानें जाणून सर्व संतांना सांग! ज्यावेळीं तुम्हांला ज्ञानराजाचें स्मरण होईल, त्यावेळीं तुम्ही त्यांचें ध्यान करीत जा. ह्मणजे ज्ञानराजाच्या व्यक्त रूपानें मी तुम्हांला दर्शन देत जाईन. नामदेवा, ज्ञानराजास समाधी देण्याकरितां सर्व संतासह तुम्ही येथून प्रयाण करावें, व मीही तुमच्या बरोबरच येतों.

या प्रमाणें देव—भक्तांचा झालेला संवाद श्रीपांडुरंगाच्या दर्शनाकरितां गोराकुंभार, सावतामाळी, भानुदास आदिकरून संत

मंडळी जेव्हां राउळांत जमली; तेव्हां नामदेवांनीं त्यांस सांगितला. तो ऐकून संत मंडळीस किंचित् वाईट वाटलें कीं ज्ञानराज आपणा सर्वांस सोडून जाणार! मग सर्वत्र भक्त व संतमंडळी आलंकापुरीस जाण्यास तयार झाली. त्यांच्याबरोबरच श्रीज्ञानेश्वरादि चतुर्वर्गही निघाले. त्यावेळीं श्रीज्ञानराजानें श्रीपांडुरंगाच्या चरणावर मस्तक ठेवून त्यांची प्रार्थना केली. "हे भीमातीरविहारा पांडुरंगा! तुह्मांला पाहून ब्रह्मादिदेवही वेडे झाले. तेथें तुमचें सुयश या तुमच्या दीन दासानें कोठवर गावें! नारायणा, तुमचे गुण गातां गातां सात्विक अष्टभाव दाटून माझ्या अंगावर रोमांच उभे राहतात, कंठ भरून येतों, आणि नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागतात. हे भगवन्, आपल्या अनंत युगींच्या लीला माझ्या मुखानें गाववून माझें यश अखिल भूमंडळीं प्रसृत केलेंत! देवा, तुमच्या या अपार भक्तवत्सलतेचा महिमा मी कोठवर वर्णन करावा! मी तुमच्या चरणापाशीं ज्ञानसमाधिसुखाचें अखेरचें मागणें मागितल्याप्रमाणें

१ "द्वैरूपो वासुदेवश्च चलं चांचल्यमेवच ।
चलं संन्याशिनो रूपो मचलं प्रातिमादिकं ॥"

अर्थ.—परमेश्वराचीं चल व अचल अशीं दोन स्वरूपें आहेत. पैकीं चल हें संन्याशाचें रूप व अचल रूप ती प्रतिमा, यांत भेद मुळींच नाहीं.

अनुग्रह करण्याचें कबूल केलें आहे, त्याप्रमाणें आपण मातोश्री रुक्मिणी व पूर्व युगाचे भक्तजन आणि ही संतमंडळी यांसह आलंकापुरीस चलून मला समाधि देऊन कृतार्थ करा. देवा, आतां

आणखी एक प्रार्थना राहिली, ती मी यावेळींच करतों. हें प्रभो, माझ्या सद्गुरु निवृत्तिदादांना त्र्यंबकेश्वरी कुशावर्त तीर्थीं जलसमाधि द्यावी, तसेंच सोपानदेवाला कऱ्हेच्या तीरीं वत्सरग्रामीं[1] अखंड समाधी सुख द्या! पांडुरंगा माझ्या मुक्ताबाईला मी आपल्या—माता रुक्मिणीच्या ओटींत घालीत आहे. तर तिच्या हातून सेवा घ्या; आणि तिला येदलाबाद येथें समाधि द्या. यापेक्षां आपल्या चरणापाशीं माझें आणखी दुसरें कांहीं मागणें नाहीं." याप्रमाणें श्री पांडुरंगाची प्रार्थना झाल्यावर श्रीज्ञानराज नामदेवाकडे वळून म्हणतात:—नामदेवा, तुमच्या संगतीनें माझा काल फार आनंदांत गेला. आतां आपल्या सकल संतबंधुसहवर्तमान मजबरोबर अलंकापुरीस चलून सर्वांनीं आपल्या हातांनीं या ज्ञानदेवाला समाधि देऊन या देहाला पूनित करावें! नंतर श्री ज्ञानराजांनीं पुन्हां एकदां श्री पांडुरंगचरणीं प्रेमपूर्वक साष्टांग प्रणिपात करून, "हे भगवान् चलावें आतां!" असें श्री ज्ञानराजानें ह्मणतांच नामदेव ह्मणाले:—

"आतां पांडुरंग स्मरा। जन्म मृत्यु चुकवा फेरा॥ १॥
ऐसा कांहीं करा नेम। मुखीं स्मरा रामनाम॥ २॥
विषय चिंता ऐसें ध्यान। तेणें होईल समाधान॥ ३॥
नामा ह्मणे हरिदास। त्यासीं असावा अभ्यास॥ ४॥

याप्रमाणें नामदेवाचें कीर्तन झाल्यावर सर्वांनीं "विठ्ठल" नामाचा प्रचंड गजर करून श्री पांडुरंगाच्या चरणावर मस्तक

१ पुरंधर तालुक्यांत सासवड ह्मणून गांव आहे, त्या स्थलीं.

ठेविलें आणि सर्व संत मंडळी राउळांतून बाहेर पडली;व लागलीच आळंदीचा मार्ग धरून पांडुरंगाचें नामस्मरण करीत चालती झाली.

समाधीचा सोहळा.

याप्रमाणें भगवन्नामाचा गजर करीत सर्व संत व भक्तमंडळीं आलंकापुरीस येती झाली. मग इंद्रायणीच्या तीरावर सिद्धेश्वर लिंगाच्या दक्षिण बाजूस द्वार करून समाधीची गुहा तयार केली. त्या गुहेचेजवळ अजानवृक्ष असून पलीकडे सुवर्णपिंपळ आहे. अशी सर्व सिद्धता झाल्यावर कार्तिक वद्य ८ पासून समाधी उत्सवास प्रारंभ केला. शेवटल्या दिवशीं ह्मणजे वद्य १३ चे दिवशीं प्रातःकाळीं त्या गुहेच्या सभोंवति कुंकुम व चंदनाचे सडे घालून उत्तम प्रकारच्या रंगवल्लिका काढल्या. व ज्या स्थलीं श्रीज्ञानेश्वर महाराज समाधिस्थ बसणार; त्यास्थलीं दर्भ, दुर्वा, बिल्वपत्र वगैरे मंगल पदार्थ पसरून त्यावर धूतवस्त्र घातलें. आणि त्याच्यावर तुळसी व सुगंधपुष्पें परूसन त्याच्या मध्यभागीं खालीं कुशासन व त्यावर मृगासन घातलें. मग त्याच्या सन्मुख श्रीज्ञानराजांनीं केलेली भावार्थ दीपिका, (ज्ञानेश्वरी) अमृतानुभव चांगदेवपासष्ठी, स्वात्मज्ञान, हरिपाठ आणि स्फुट अभंग वगैरे ग्रंथ ठेवून योगवासिष्टही ठेविलें. त्या भोंवती प्रज्वलित असें चार रत्नदीप ठेवले. अशी मनोहर समाधीची मांडणी केली. हा उत्सव अवलोकन करण्याकरितां इंद्र, चंद्र, ब्रह्मदेव, श्रीशंकर आदिकरून

प्रमुख देवही आले होते. मग साक्षात् परब्रह्मस्वरूप श्रीपांडुरंग होते, हें निराळे सांगणें नकोच. शिवाय आकाशांत इतर देवगणांच्या विमानांचीही पुष्कळ दाटी झाली होती. समाधिस्थ होण्याची जेव्हां वेळ आली तेव्हां श्रीज्ञानराज निवृत्तिनाथ त्रिवर्ग भावंडें संत–महंत, इतर भक्त मंडळी व नागरीक जन यांसहवर्तमान श्रीभगवन्नामाचा गजर करीत त्या स्थलीं आल्यावर त्यास उच्चासनावर बसविले व सर्वांनीं त्यांची पूजा केली. त्यांच्या भालपट्टलीं सुंदर केशरी गंध लावून मध्यें कस्तुरीचा भव्य तिलक लाविला, मग त्यांच्या कंठांत सुगंध पुष्पाचे हार व तुलशीमाला घातल्या. नंतर श्रीज्ञानराज ह्मणतात:—

"पूर्वजन्मीं सुकृतें थोर केलीं। तीं मज आजि फळासि आलीं ॥ १ ॥
परमानंदु आजि मानसीं । भेटि झाली या संताशीं ॥ २ ॥
माय, बाप, बंधु, सखे, सोयरे । याते भेटावया मन न धरे ॥ ३ ॥
एकएका तीर्थाहुनी आगळे । तयामाजी परब्रह्म सांवळें ॥ ४ ॥
निर्धनासि धनुलाभ जाहला । जैसा अचेतनी प्राण प्रकटला ॥ ५ ॥
वत्स विघडालिया धेनु भेटली । जैसी कुरंगिणी पाडस मिनली ॥ ६ ॥
हें पियुष्या परतें गोड वाटत । पंढरीरायाचे भक्त भेटत ॥ ७ ॥
बापरखुमादेवीवर विठ्ठलें । संत भेटतां भवदुःख फिटलें ॥ ८ ॥

सर्व वैष्णव संत हो! तुम्ही सर्वांनी श्रीपांडुरंगाबरोबर येथवर येऊन मला शेवटचें दर्शन दिलें, आणि वद्य ८ पासून आज त्रयोदशीपर्यंत हा समाधिउत्सव पूर्ण केला, तेणें करून मी धन्य झालों. अलंकापुरवासी जनहो! मी आज बहुत दिवस तुमच्या गांवीं होतों. तुम्ही अपत्य-

वंतांनीं आम्हां चौघा भावंडांचा प्रेमानें प्रतिपाळ करून आमचा योगक्षेम चालविला. तुमच्यासारखें आईबाप आह्मांला त्रिभुवनांतही मिळणार नाहींत! तुमच्या प्रेमाचा मला नित्य आठव होईल! आतां मी आपल्या स्वस्थानाप्रत गमन करतों, तरी माझें स्मरण असूं द्या. मजवर लोभ ठेवा. तुम्हांला अधिक काय सांगावयाचें! हें पहा:— माझ्या विठोबारायाचे हे दीनवत्सल, व आपपरभाव रहित असे भक्त, तुम्हां सकल मुमुक्षु चातकांना अखंड जलधारा देणारे स्वानंद सुखाचे मेघ आहेत! हे श्रवणामृताचे कुंभ, कीर्तनाचे स्वयंभु पर्वत, शांतिभुवनाचीं निधानें, चातुर्यार्णवीचीं रत्नें, वैराग्य अंबरीचे दिनकर, अक्षय्य विज्ञानानंद चंद्र, प्रेमगंगेचे ओघ, विवेक मेरूचीं सुंदर शृंगें आणि क्षमेचे तरुवर असे हे भगवद्भक्त तुमच्या थोर भाग्यानें तुह्मांला लाधले आहेत. तुह्मांला हा भवसिंधु पार उतरू न नेण्याकरितां श्री पांडुरंगानें हीं थोर जहाजें निर्माण केलीं आहेत. तेव्हां तुम्ही या जहाजांत बसून हरिनामाचा गजर करीत सच्चिदानंद प्रभूच्या अविनाशी पदाप्रत जा. या संतश्रेष्ठांची थोरवी ब्रह्मादिदेवांनाही वर्णन करतां येणार नाहीं! तेथें मी त्यांच्या दासांच्या दासानें त्यांची कितीतरी स्तुति करावी! पहा. कृतयुगांत सकल प्राणिमात्र परमेश्वरध्यानानें मोक्षपदाप्रत गेलें! त्रेतायुगीं महामख करून वैकुंठभुवन आपलेंसें केलें! आणि द्वापारीं प्रत्यक्ष राजोपचारांनीं पूजा करून ते प्रभुपदाप्रत गेले! परंतु या कलियुगीं

परमेश्वरांचें नामसंकीर्तन हेंच अत्यंत सोपें मोक्षप्राप्तीचें श्रेष्ठ साधन आहे. यासाठीं दृढ भक्तियुक्त अंतःकरणानें तुमचे अंतकाळीचे पाठिराखे, आणि पर लोकीचे सखे–सोयरे, असे जे हे संत महाराज त्यांना शरण जाऊन '**रामकृष्णहरि**' या षडाक्षरी मंत्राचा नित्य पाठकरा. मायबाप संत हो! मी दीन लेंकरूं आहे. माझ्या तोंडून कधीं आपणास अधिक उणें शब्द उच्चारले गेले असले तर त्याची तुह्मी मला क्षमा करा! आणि मजवर अखंड प्रेम ठेवा!

याप्रमाणें नागरीक जनांना उपदेश व संतांची प्रार्थना केल्यावर श्री सद्गुरु निवृत्तिनाथाच्या चरणावर मस्तक ठेवून क्रमानें सोपानदेव व मुक्ताबाई यांस पोटाशी धरून ह्मणतातः—बाळांनो! तुह्मी आपल्या मनांत अगदीं खिन्न होऊ नका! श्री पांडुरंग व माता रुक्मिणी तुमचा प्रतिपाळ करतील! श्री पांडुरंगाचें रात्रंदिवस चिंतन करा! तो तुमचे कांहीं उणें पडूं देणार नाहीं! देवा, यांचा प्रतिपाळ करणें तुमच्याकडेसच आहे! नंतर नामदेव अगदीं विव्हल झाले आहेत असें पाहून नामदेवास प्रेमानें आलिंगन देऊन श्रीज्ञानराज म्हणाले:—श्रेष्ठ नामदेवा! तुह्मी आपल्या मनास अगदीं क्लेश होऊं देऊं नका! तुह्मी सर्वांनीं आपल्या मनास विवेकाचें आळें घालून श्रीपांडुरंगाचें सोज्वल स्वरूप ध्यानीं आणून त्यांत तल्लीन व्हा! (इतक्यांत आकाशांत विमानाची दाटी झाली आहे व श्रीपांडुरंगासन्निध सकल देव आणि ऋषि मुनी वगैरे दृष्टीस पडूं लागतात.

तेव्हां त्यांची प्रार्थना करतात:)-इंद्र—चंद्रादि सकल श्रेष्ठ देवगणहो! आणि ऋषि-मुनी हो! तुह्मी सर्व या तुमच्या बालकाच्या समाधिउत्सवाचे कौतुक पहाण्याच्या निमित्तानें या स्थलीं प्राप्त होऊन मला दर्शन दिलें तेणें करून मी धन्य झालों! अशीच या दीन बालकावर कृपा असावी! तुम्हां सर्वांना आतां शेवटचा साष्टांग प्रणिपात करतों! समाधिस्थ बसण्याची मला सर्वांत्रांची अनुज्ञा असावी! असें ह्मणतांच व त्याप्रमाणें श्रीज्ञानराजांनीं सर्वांस साष्टांग प्रणिपात करतांच आकाशांतून त्यांच्यावर पुष्पवृष्टि झाली. नंतर श्रीपांडुरंगास व निवृत्तिनाथास साष्टांग प्रणाम करून श्रीज्ञानराज समाधीस्थलीं जाऊन बसले. तेव्हां सर्व संत मंडळी विठ्ठलनामाचा गजर करूं लागली. त्या नादांतच श्रीज्ञानराजांनीं वायुरोधनानें आपला प्राण ब्रह्मांडीं नेऊन ठेवला[1], त्यावेळीं त्यांच्यावर पुन्हां स्वर्गांतून पुष्पवृष्टि झाली. मग सर्वांनीं श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पवित्र व मंगलनामाचा जयजयकार केला. नंतर श्रीनिवृत्तिनाथानीं आपल्या हातानें द्वारदेशीं शिळा बसविल्यावर संतांनीं विठ्ठलनामाचा प्रचंड घोष केला. तेव्हां देवांचीं विमानें व सकल देव आणि ऋषिगण अदृश्य होते झाले. मग नागरिकजनासमवेत संत व भक्तमंडळी जयघोष करीत आपापल्या स्थानीं निघून गेली. (इति संपूर्ण.)

---

१ समाधि लावून स्थित झालेले योगी, योगयुक्तीनें बिंदुनिरोध केलेले ब्रम्हचारी (ही योगयुक्ति भिमावधूतांनीं तयार केलेल्या **योगमार्गप्रदीप** पुस्तकांत दिली आहे. तेथें पहावें) व औषधीनें कायाकल्प केलेले चतुर अशा पुरुषांचीं कलेवरें विकार पावत नाहींत!!!

अलंकापुरी (आळंदी) वर्णन.

अलंकापुरी म्हणजे आळंदी हें स्थान श्री ज्ञानेश्वरमहाराजांच्या वेळेपासून विशेष प्रसिद्धीस आलें. तथापि आळंदी ही फार प्राचीन कालापासून पुण्यभूमिका आहे. सांप्रत जेथें आळंदी गांव वसला आहे, ती जागा पूर्वकालीं अरण्यमय असून त्यास आनंदवन असें ह्मणत असत. यास प्रमाणः—

"अलकानाम आनंदवन सर्वत्र पूज्यते ।
अत्र्याप्सुदाहरंतीमामितिहासं पुरातनं ॥"

त्याच प्रमाणें या स्थलाला प्रत्येक युगांत निरनिराळीं नांवें होतीं.

"कृतायुगेच आनंदं त्रेतायां वारुणं स्मृतं ।
द्वापारं कपिलं ज्ञेयं कलौब्रूतेऽलकापुरी ॥"

अलंकापुरीला शोभा देणारी इंद्रायणी नदी हिचाही असाच पुरातन इतिहास आहे. यावरून फार प्राचीनकालापासून आळंदीचें स्थान पवित्र व प्रसिद्ध आहे. त्या स्थळीं सिद्धेश्वर महादेवाचेंही स्थान फार पुरातन असून शिवाय चक्रतीर्थ, चंडिकातीर्थ, वगैरे पुराणप्रसिद्ध तीर्थेंही आहेत. इंद्रायणी आणि कुबेरगंगा या मध्यें जें बेट आहे, तें श्री ज्ञानेश्वरमहाराजांचें नित्य ध्यानस्थ बसण्याचें आवडतें ठिकाण होय. श्रीज्ञानश्वरमहाराजांची समाधी मूळची विटबंदी असून तेथें सांप्रत टोलेजंग भव्य मंदिर झालें आहे. यांच्या समा-

धीस श्री छत्रपती महाराजांपासून तों इंग्रज सरकारच्या अमला-पर्यंत वेळोवेळीं इनामें मिळालीं आहेत.

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी पाठीमागें श्रीविठोबा रखुमाईच्या मूर्ति आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें देवालय दक्षिण-उत्तर आहे. पुढें तीन तीन कमानींचा सुबक मंडप असून वर घुमट आहे. त्याच्या पुढच्या अंगास दुसरा एक १५ खांबाचा विस्तृत मंडप आहे. हे खांब नक्षीदार असून या मंडपांत लक्ष्मणनाथ आणि केसरीनाथ यांच्या समाधी आहेत, व पलीकडे मुक्ताबाईचें देवालय असून त्याच्या पलीकडे श्रीसिद्धेश्वराचें अति पुरातन देवालय आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या देवालयाच्या कळसाचें काम नंदराम नायकांनीं केलें आहे, असें ह्मणतात. मुक्ताबाईचा मंडप भाऊराव रणनवरें यांनीं बांधला व तेथील शिखराचें काम श्री नृसिंहसरस्वतीनें केलें आहे असें सांगतात. शिवाय या यतिश्रेष्ठांनीं एक भव्य रथ श्रीज्ञानेश्वरमहाराजांकरितां तयार केला असून तेथें त्यांनीं एक धर्मशाळा बांधली आहे.

प्रदक्षिणेच्या वाटेवर अजानवृक्ष, सुवर्णपिंपळ, व हैबतरावबोवांचा मठ हीं आहेत. ज्या पिंपळाला श्रीज्ञानेश्वरांची मातोश्री प्रदक्षिणा घालीत असतांना श्री रामानंदस्वामींनीं आशीर्वाद दिला तोच हा पिंपळ होय. देवालयासमोर ज्या ओऱ्या आहेत, त्या निर-निराळ्या वेळीं बांधलेल्या आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या

देवालयाच्या तिन्ही दरवाज्यांवर तीन नगरखाने आहेत. पूर्व दरवाज्यावर चंदुलालचा, पश्चिम दरवाज्यावर गायकवाडाचा व उत्तर दरवाज्यावर खुद्द आळंदी संस्थानचा, असे नगरखाने आहेत समाधीचा उत्साह कार्तिक वद्य ८ पासून ३० पर्यंत चालतो. श्री ज्ञानेश्वरासारख्या महात्म्यांचीं चरित्रें अगाध होत. पहा—श्रीज्ञानेश्वर महाराजांस आज सहाशें वर्षें झाली असून दिवसेदिवस वाढत्याप्रमाणावर त्यांची कीर्ति प्रसृत होत आहे. तेव्हां " अहह महतां निरभिमानश्चारित्रविभूतयः " हें खरें आहे!

ज्याप्रमाणें श्रीज्ञानेश्वरांच्या देवालयाची 'प्रदक्षिणा करते वेळीं पाहण्यासारखीं स्थलें आहेत, तशीच नगर प्रदक्षणेच्याही वाटेवर आहेत. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या मुख्य देवालयाच्या दिल्लीदरवाज्याच्या दोहों बाजूस लहान चौकटीमध्यें जयविजयाप्रमाणें गरुडाच्या व मारुतीच्या मूर्ति आहेत. पितळेच्या पत्र्यानें आच्छादीत पितळी उंबरठा आहे. दरवाज्या बाहेर दोहींकडे हत्ती व सिंहाची अशीं दोन चित्रें आहेत. पुढें फरसबंदी असून तेथून खालीं इंद्रायणीकडे जाण्याचा सुरेख घाट आहे. प्रदक्षिणेच्या मार्गावर गोपाळपुरा आहे तेथें श्रीगोपालकृष्णाची व श्रीमुरलीधराची अशा मूर्ति आहेत. तेथून पुढें श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं चालविलेली भिंत आहे. तिची लांबी १७ हात, रुंदी २॥ हात व उंची ५ हात आहे! हिची डागडुजी वारंवार करीत आहेत. तेथें पादुका, बहिरोबा व चांगदेव

यांच्या मूर्ति आहेत. तेथून दूर ज्या स्थलीं श्रीज्ञानेश्वर महाराज व चांगदेव यांचें बोधपर भाषण झालें तेथें विश्रांतीवट आहे या शिवाय भागीरथी तीर्थ, मनकर्णिका कुंड, [जांबुळ बेटाजवळ कुबेरगंगा, पुंडलिकाचें देवालय, हीं स्थळें पाहण्यासारखी आहेत चक्रतीर्थांत श्रावण—भाद्रपदमासीं पुष्कळ मासें दृष्टीस पडतांत एरव्ही कधीं दिसत नाहींत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मुख्य देवळा जवळच श्रीराममंदिर व श्रीविष्णुमंदिर हीं अर्वाचीन काली बांधलेलीं देवालयें आहेत.

याप्रमाणें आळंदी क्षेत्राचें महात्म्य प्राचिनपासून चालत आले असून व सांप्रतही चाललें आहे. तेथून श्री ज्ञानेश्वर महाराजांची पालखी जेष्ट व० ८ स निघून श्री पंढरपूर येथें आषाढ शु० १० स जाते व श्रीपंढरीहून श्रीपुंडलिकाची व श्रीनामदेवाची अशा दोन्ही पालख्या निघून कार्तिक वद्य ११ स आळंदीस येतात. त्याबरोबर दिंड्याही असतात. याप्रमाणें प्रतिमासाच्या एकादशीला आळंदी येथें पुष्कळ यात्रा जमते. तेव्हां प्रत्येक भाविकानें आळंदीस जाऊन श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें दर्शन घेऊन व इंद्रायणीचें स्नान करून आपलें शरीर पूनित करावें आणि श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें व साधू संताच्या दर्शन घ्यावें, हेंच मानव जन्मास आल्याचें सार्थक होय.

आरती.

जयदेव जयदेव जय ज्ञानसिंधु ।
नामस्मरणें तुमच्या तुटती भवबंधू ॥ धु० ॥
होता कृपा तुमची पशु बोले वेद ।
निर्जीव चाले भिंती महिमा अगाध ॥
भगवद्गीता टीका ज्ञानेश्वरी शुद्ध ।
करूनी भाविक लोकां केला निजबोध ॥ १ ॥
चवदाशें वर्षांचे तपी रहिवाशी ।
येउनि चांगदेव लागले चरणासी ॥
करूनी कृपा देवें अनुग्राहिलें त्यासी ।
देउनि आत्मज्ञान केलें सहवासी ॥ २ ॥
समाधिसमयीं सकळ संत समुदाव ।
घेउनि सुरवर आले श्रीपंढरीराव ॥
द्वारीं अजानवृक्ष सुवर्णपिंपळासमाव ।
जाणुनि महिमा निळा मागे चरणातळीं ठाव ॥ ३ ॥

समाप्त.